महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०

( दिनांक १ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारलेला )

MAHARASHTRA ACT No. XXIV OF 1961

# THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960

( *As modified up to 1st November, 2006* )

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : २६.०० रुपये ]

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०

अनुक्रमणिका

उद्देशिका.

## प्रकरण एक

**प्रारंभिक**


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | ४ |
| २ | व्याख्या. | ४ |


## प्रकरण दोन

**नोंदणी**


| | | |
|---|---|---|
| ३ | निबंधक व त्याच्या हाताखालील कर्मचारी. | ८ |
| ३क | तात्पुरती रिक्त पदे. | ८ |
| ४ | ज्यांची नोंदणी करता येईल अशा संस्था. | ९ |
| ५ | मर्यादित किंवा अमर्यादित दायित्वासह नोंदणी. | ९ |
| ६ | नोंदणीच्या शर्ती. | ९ |
| ७ | संस्थांना किंवा संस्थांच्या वर्गाला नोंदणीविषयक शर्तींपासून सूट देण्याचा अधिकार. | १० |
| ८ | नोंदणीसाठी अर्ज. | ११ |
| ९ | नोंदणी. | ११ |
| १० | नोंदणीचा पुरावा. | १२ |
| ११ | विवक्षित प्रश्नांचा निर्णय करण्याचा निबंधकाचा अधिकार. | १२ |
| १२ | संस्थांचे वर्गीकरण. | १२ |
| १३ | संस्थेच्या उपविधिंची सुधारणा. | १२ |
| १४ | उपविधित सुधारणा करण्याबाबत निदेश देण्याचा अधिकार. | १३ |
| १५ | नावात बदल करणे. | १३ |
| १६ | दायित्वातील बदल. | १३ |
| १७ | संस्थांचे एकत्रीकरण, हस्तांतरण, विभागणी किंवा रूपांतर. | १४ |
| १८ | सार्वजनिक हिताच्या दृष्टीने एकत्रीकरण, विभागणी व पुनर्रचना करण्यासाठी निदेश देण्याचा अधिकार. | १५ |
| १८क. | सहकारी बँकांचे एकत्रीकरण. | १६ |
| १८ख. | प्राथमिक कृषि पतसंस्थांचे एकत्रीकरण. | १७ |
| १८ग. | संस्था ज्या स्थानिक क्षेत्रात कार्य करतात त्या क्षेत्रात फेरफार करण्यात आल्यामुळे त्या संस्थांची पुनर्रचना करणे. | १८ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १९ | संस्थांची पुनर्रचना. | १९ |
| २० | संस्थांची भागीदारी. | १९ |
| २०क | संस्थांकडून सहयोग. | २० |
| २१ | नोंदणी रद्द करणे. | २० |
| २१क | संस्थांची नोंदणी रद्द करणे. | २० |

प्रकरण तीन

**सदस्य आणि त्यांचे हक्क व दायित्वे**

| | | |
|---|---|---|
| २२ | जिला सदस्य होता येईल अशी व्यक्ती. | २१ |
| २३ | सदस्यत्व खुले असणे. | २३ |
| २४ | नाममात्र सदस्य, सहयोगी सदस्य व हितैषी सदस्य. | २४ |
| २५ | सदस्यत्व बंद होणे. | २४ |
| २५क | सदस्य नोंदवहीतून सदस्यांची नावे काढून टाकणे. | २४ |
| २६ | देय रकमा भरीपर्यंत सदस्यत्वाच्या हक्कांचा वापर न करणे. | २४ |
| २७ | सदस्यांचा मतदानाचा अधिकार. | २४ |
| २८ | भाग धारण करण्यावर निर्बंध. | २६ |
| २९ | भाग किंवा हितसंबंध यांचे हस्तांतरण किंवा त्यावरील भार याबाबत निर्बंध. | २७ |
| ३० | सदस्यांच्या मृत्यूनंतर हितसंबंधाचे हस्तांतरण. | २७ |
| ३१ | भाग किंवा हितसंबंध जप्तीस पात्र नसणे. | २८ |
| ३२ | पुस्तके, इत्यादी पाहण्याचे सदस्यांचे हक्क. | २८ |
| ३२क | विवक्षित संस्थांनी सदस्यांना पासबुके देणे व अशा पुस्तकातील नोंदी देय रकमांचा पुरावा असणे. | २८ |
| ३३ | माजी सदस्यावर व मृत सदस्यांच्या संपदेवर असणारे दायित्व. | २९ |
| ३४ | सदस्यांची नादारी. | २९ |
| ३५ | सदस्यांना काढून टाकणे. | २९ |

प्रकरण चार

**संस्थांचे निगमन, कर्तव्ये व विशेषाधिकार**

| | | |
|---|---|---|
| ३६ | संस्था हा निगम निकाय असणे. | २९ |
| ३७ | संस्थांचा पत्ता. | ३० |
| ३८ | सदस्यांची नोंदवही. | ३० |
| ३९ | अधिनियम इत्यादींची प्रत तपासणीसाठी खुली असणे. | ३० |
| ४० | नोंदीची प्रत पुरावा म्हणून ग्राह्य असणे. | ३० |
| ४१ | संस्थेचे भाग व ऋणपत्रे यासंबंधीच्या संलेखांना सक्तीच्या नोंदणीपासून सूट. | ३० |
| ४२ | कर आकारणीपासून सूट देण्याचा अधिकार, रक्कम परत करण्याचा अधिकार. | ३१ |
| ४३ | कर्जे घेण्यावर निर्बंध. | ३१ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ४४ | कर्ज देण्याच्या धोरणाचे नियमन. | ३२ |
| ४४क | विवक्षित प्रकरणांमध्ये व्याजावर मर्यादा. | ३२ |
| ४५ | सदस्य नसलेल्या व्यक्तींबरोबर इतर व्यवहार करण्यावर निर्बंध. | ३२ |
| ४६ | सदस्यांचा भाग किंवा हितसंबंध यांच्या बाबतीतील भार व वजावट. | ३२ |
| ४७ | संस्थेचा अग्रहक्क. | ३३ |
| ४८ | विवक्षित संस्थांकडून कर्ज घेणाऱ्या सदस्यांच्या स्थावर मालमत्तेवर भार. | ३४ |
| ४८क | संस्थेच्या देय रकमा भागविण्यासाठी विवक्षित कृषि उत्पन्नाच्या विक्रीच्या किंमतीमधून करावयाच्या वजाती. | ३५ |
| ४९ | विवक्षित बाबतीत संस्थेचा दावा पुरा करण्यासाठी वेतनातून कपात. | ३७ |

प्रकरण पाच

**राज्यांकडून संस्थांना सहाय्य**

| | | |
|---|---|---|
| ५० | राज्य शासनाची संस्थांमध्ये प्रत्यक्ष भागीदारी. | ३८ |
| ५१ | राज्य शासनाची संस्थांमध्ये अप्रत्यक्ष भागीदारी. | ३८ |
| ५२ | प्रमुख राज्य भागीदारी निधी. | ३८ |
| ५३ | दुय्यम राज्य भागीदारी निधी. | ३८ |
| ५४ | भाग खरेदी करण्यासाठी राज्य शासनाची मान्यता. | ३९ |
| ५५ | विवक्षित भागांच्या संबंधात दायित्व मर्यादित असणे. | ३९ |
| ५६ | लाभांशाच्या रकमेवर निर्बंध. | ३९ |
| ५७ | शिखर संस्थांची व मध्यवर्ती संस्थांची क्षतिपूर्ती. | ३९ |
| ५८ | भाग भांडवल आणि लाभांश इत्यादींचा विनियोग. | ३९ |
| ५९ | शिखर संस्था किंवा मध्यवर्ती संस्था समापित झाल्यावर प्रमुख किंवा दुय्यम राज्य भागीदारी निधीचा विनियोग. | ४० |
| ६० | प्रमुख किंवा दुय्यम राज्य भागीदारी निधी हा मत्तांचा भाग न होणे. | ४० |
| ६१ | राज्य शासन आणि शिखर संस्था यांच्यामधील करार. | ४० |
| ६२ | संस्थांना राज्याकडून द्यावयाच्या सहाय्याचे इतर प्रकार. | ४० |
| ६३ | या प्रकरणातील तरतुदी इतर कायद्यांवर अधिभावी ठरणे. | ४१ |

प्रकरण सहा

**संस्थांची मालमत्ता व निधी**

| | | |
|---|---|---|
| ६४ | निधींची विभागणी न करणे. | ४१ |
| ६५ | नफा विनिश्चित करणे व त्यांचे संविभाजन करणे. | ४१ |
| ६६ | राखीव निधी. | ४१ |
| ६७ | लाभांशावर निर्बंध. | ४२ |
| ६८ | राज्य संघीय संस्थेचे शिक्षण निधीस अंशदान. | ४२ |
| ६९ | सार्वजनिक प्रयोजनांसाठी अंशदान. | ४३ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ६९क | विवक्षित संस्थांच्या सचिवांचा सहकारी राज्य संवर्ग प्रस्थापित करणे व अशा संवर्गासाठी सेवायोजन निधी स्थापन करणे. | ४३ |
| ७० | निधींची गुंतवणूक. | ४४ |
| ७१ | कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी. | ४५ |
| ७१क | पदाधिकाऱ्यांनी किंवा पदाधिकाऱ्यांविरुध्द वैयक्तिक नात्याने दाखल केलेल्या किंवा करण्यात आलेल्या विवक्षित कार्यवाहीसाठी निधीचा वापर न करणे. | ४५ |


प्रकरण सात

**संस्थांचे व्यवस्थापन**


| | | |
|---|---|---|
| ७२ | संस्थेसंबंधीचा अंतिम प्राधिकार. | ४६ |
| ७३ | समिती, तिचे अधिकार व कार्ये. | ४६ |
| ७३एक क | विनिर्दिष्ट संस्था धरून संस्थेच्या समितीवरील एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडणूक. | ४७ |
| ७३एक ख | निवडणूक पुढे ढकलण्याचे राज्य शासनाचे अधिकार. | ४८ |
| ७३एक ग | अधिसूचित संस्थांच्या निवडणुका. | ४८ |
| ७३एक घ | संस्थांच्या अधिकाऱ्यांविरूध्द अविश्वासाचा प्रस्ताव. | ४८ |
| ७३क | विवक्षित प्रवर्गाच्या संस्थांचे एकाचवेळी पदनिर्देशित अधिकारी होण्याकरिता किंवा दहापेक्षा अधिक वर्षांसाठी त्याच संस्थेचे पदनिर्देशित अधिकारी होण्याकरिता अनर्हता. | ४९ |
| ७३कक | सहयोगी सभासद म्हणून असलेला पदनिर्देशित अधिकारी, असा सभासद म्हणून असण्याचे बंद झाल्यावर पदनिर्देशित अधिकारी असण्याचे बंद होणे. | ५२ |
| ७३कख | शासकीय पदाधिकारी या नात्याने धारण केलेले समितीचे सदस्यत्व बंद होणे. | ५२ |
| ७३ख | विवक्षित संस्थेच्या समित्यांवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि दुर्बल गटांच्या सदस्यांसाठी जागा राखून ठेवणे व त्यासाठी निवडणूक. | ५२ |
| ७३खख | विवक्षित संस्थांच्या समित्यांवर कर्मचाऱ्यांसाठी जागा राखून ठेवणे. | ५४ |
| ७३खखख | संस्थांच्या समित्यांवर महिला सदस्यांसाठी जागा राखून ठेवणे व त्यांवरील निवडणुका. | ५५ |
| ७३ग | विवक्षित संस्थांच्या समित्यांवर सदस्यांच्या विवक्षित वर्गाने प्रतिनिधित्व करण्यावर व पदनिर्देशित अधिकारी होण्यावर निर्बंध. | ५७ |
| ७३घ | संस्थेची अन्य संस्थेवरील नामनिर्देशित व्यक्ती, संघीय संस्थेखेरीज इतर संस्थेवर पदनिर्देशित अधिकारी होण्यास पात्र नसणे. | ५७ |
| ७३ङ | विवक्षित आर्थिक मर्यादांचे किमान संख्येइतके व्यवहार नसलेल्या सदस्यांना विनिर्दिष्ट संस्थांमध्ये पदनिर्देशित अधिकारी होण्याचा हक्क नसणे. | ५७ |
| ७३च | संस्थेकडून ज्या मालाच्या खरेदीसाठी कर्ज देण्यात येत असेल, त्या मालाचा व्यापार जो सदस्य करतो किंवा ज्याचा निकटचा नातेवाईक करतो तो सदस्य अशा संस्थेच्या समितीवर राहण्यास पात्र नसणे. | ५८ |
| ७३चच | समितीच्या सदस्यत्वासाठी निरर्हता. | ५८ |
| ७३चचच | समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक होण्यासाठी किंवा पुन्हा निवडून येण्यासाठी पात्रता. | ५९ |
| ७३छ | विवक्षित संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांच्या व अधिकाऱ्यांच्या निवडणुका घेण्याकरिता तरतूद आणि अशा समित्यांच्या सदस्यांचा पदावधी. | ६० |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ७३ज | अवधी संपण्यापूर्वी निवडणूक घेण्याची समितीची जबाबदारी. | ६१ |
| ७४ | संस्थांचा व्यवस्थापक, सचिव आणि इतर अधिकारी आणि विवक्षित संस्थांसाठी असलेला मुख्य कार्यकारी अधिकारी व वित्त अधिकारी यांच्या अर्हता व नेमणुका. | ६२ |
| ७५ | वार्षिक सर्वसाधारण बैठक. | ६२ |
| ७६ | विशेष सर्वसाधारण बैठक. | ६४ |
| ७७ | संस्था, वगैरेनी केलेली कृत्ये विवक्षित दोषांमुळे विधिअग्राह्य न होणे. | ६४ |
| ७७क | समितीची रचना करण्यासाठी सदस्यांची निवड करण्यात कसूर झाली असेल किंवा समितीने पदग्रहण केले नसेल त्याबाबतीत समितीच्या सदस्यांची, नवीन समितीची किंवा प्रशासकाची नेमणूक. | ६५ |
| ७८ | समितीस किंवा तिच्या सदस्यास दूर करण्याचा अधिकार. | ६६ |
| ७९ | आबंधने पार पाडण्यास फर्माविण्याचा निबंधकाचा अधिकार. | ६८ |
| ७९क | लोकहिताच्या दृष्टीने निदेश देण्याचा शासनाचा अधिकार. | ६९ |
| ७९कक | विनियम तयार करण्यासाठी निदेश देण्याचे निबंधकाचे अधिकार. | ७० |
| ७९ख | एखाद्या सदस्याने आपल्या शेतकी उत्पादनाचा संस्करण संस्थेस पुरवठा करण्यात कसूर केल्यास, त्या सदस्यास काढून टाकण्याचा निबंधकाचा अधिकार. | ७१ |
| ८० | अभिलेख, वगैरे जप्त करण्याचा निबंधकाचा अधिकार. | ७१ |

प्रकरण आठ

**लेखापरीक्षा, चौकशी, निरीक्षण आणि पर्यवेक्षण**

| | | |
|---|---|---|
| ८१ | लेखापरीक्षा. | ७२ |
| ८२ | लेख्यातील दोषांची दुरुस्ती. | ७४ |
| ८३ | निबंधकाने चौकशी करणे. | ७५ |
| ८४ | ऋणग्रस्त संस्थेच्या पुस्तकांचे निरीक्षण. | ७५ |
| ८५ | चौकशीचा आणि निरीक्षणाचा खर्च. | ७६ |
| ८६ | खर्चाची वसुली. | ७६ |
| ८७ | निबंधकाने, चौकशीत अथवा निरीक्षणात उघडकीस आलेले दोष संस्थेच्या निदर्शनास आणणे. | ७७ |
| ८८ | अपचारी प्रवर्तक वगैरेविरुद्ध नुकसानी आकारण्याचा निबंधकाचा अधिकार. | ७७ |
| ८८क | चौकशीच्या फीपोटी जमा करावयाची रक्कम. | ७८ |
| ८९ | उपस्थित, वगैरे राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार. | ७८ |
| ८९क | संस्थेच्या कामकाजाचे निरीक्षण करण्याचा अधिकार. | ७८ |
| ९० | संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी संघीय प्राधिकरणाची रचना करणे किंवा त्यास मान्यता देणे. | ७९ |

प्रकरण नऊ

**विवाद मिटवणे**

| | | |
|---|---|---|
| ९१ | विवाद. | ७९ |
| ९१क | सहकारी न्यायालयांची रचना. | ८२ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ९२ | मुदत. | ८२ |
| ९३ | एका सहकारी न्यायालयाकडून दुसऱ्या सहकारी न्यायालयाकडे विवाद हस्तांतरित करणे व विवक्षित प्रकरणांमधील कामकाज तहकूब करणे. | ८३ |
| ९४ | विवादाची तडजोड करण्याची कार्यरीती आणि सहकारी न्यायालयाचे अधिकार. | ८४ |
| ९५ | निवाड्यापूर्वीची किंवा आदेशापूर्वीची जप्ती आणि अंतर्वादित आदेश. | ८६ |
| ९६ | सहकारी न्यायालयाचा निर्णय. | ८६ |
| ९७ | कलम ९६ खालील निर्णय व कलम ९५ खालील आदेश याविरुद्ध अपील. | ८७ |
| ९८ | पैसे कसे वसूल करावेत. | ८७ |
| ९९ | प्रमाणपत्र दिल्यानंतर संपत्तीचे खाजगी हस्तांतरण संस्थेविरुद्ध निरर्थक ठरेल. | ८८ |
| १०० | विकणे शक्य नसलेल्या मालमत्तेचे हस्तांतरण. | ८८ |
| १०१ | विवक्षित सहकारी संस्थेची देय थकबाकी जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करणे. | ८९ |

प्रकरण दहा

**परिसमापन**

| | | |
|---|---|---|
| १०२ | समापन. | ९० |
| १०३ | परिसमापकाची नियुक्ती. | ९१ |
| १०४ | समापनाच्या आदेशाविरुद्ध अपील. | ९१ |
| १०५ | परिसमापकाचे अधिकार. | ९२ |
| १०६ | समापनाच्या आदेशाचे परिणाम. | ९३ |
| १०७ | समापनाच्या किंवा विसर्जनाच्या बाबतीत वादास प्रतिबंध. | ९३ |
| १०८ | परिसमापकाच्या लेख्याची लेखापरीक्षा. | ९४ |
| १०९ | परिसमापनाची कार्यवाही बंद करणे. | ९४ |
| ११० | अधिशेष मत्तेचा विनियोग. | ९५ |

प्रकरण दहा-क

**विमा उतरविलेली सहकारी बँक** ९६

| | | |
|---|---|---|
| ११० क | विमा उतरविलेल्या सहकारी बँकेचे समापन करणे, तिची पुनर्रचना करणे, तिची समिती निष्प्रभावित करणे वगैरे संबंधीचा आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेची मंजुरी किंवा मागणी या वाचून न देणे. | |

प्रकरण अकरा

**सहकारी कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँका**

| | | |
|---|---|---|
| १११ | प्रकरण अकरा, सहकारी कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँकाना लागू करणे. | ९७ |
| ११२ | राज्य व इतर जिल्हा सहकारी कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँका. | ९९ |
| ११२ क | जिल्हा कर्ज समिती, तिची रचना, प्रतिनिधींचा पदावधी, नैमित्तिक रिक्त जागा, अशा समितीचे अधिकार इत्यादी. | १०० |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ११२ क क | मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा यांमधील सहकारी कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँकेचा सदस्य म्हणून प्रतिनिधीची निवड करणे. | १०३ |
| ११२ ख | राज्य सहकारी कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँकेचे अधिमंडळ व समिती. | १०३ |
| ११२ ग | [वगळण्यात आले]. | १०६ |
| ११३ | विश्वस्ताची नेमणूक, अधिकार व कार्ये. | १०६ |
| ११४ | ऋणपत्रे काढणे. | १०६ |
| ११५ | राज्य शासनाने हमी देणे. | १०७ |
| ११६ | विश्वस्ताकडे मालमत्ता निहित होणे आणि ऋणपत्रे धारण करण्याऱ्या व्यक्तींचा मत्तेवरील भार. | १०८ |
| ११७ | कर्ज देण्याचे व जमिनीधारण करण्याचे सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांचे अधिकार. | १०८ |
| ११८ | [वगळण्यात आले.] | १०८ |
| ११९ | कर्जे मंजूर करणारा आदेश विवक्षित बाबतीत निर्णायक असणे. | १०८ |
| १२० | गहाणाचा अग्रक्रम. | १०९ |
| १२१ | सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या नावे करून दिलेली गहाणे आणि इतर संलेख राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेमध्ये निहित असतील. | १०९ |
| १२२ | सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या नावे करून दिलेल्या गहाणाची, भाडेपट्टा, इत्यादीची नोंदणी. | ११० |
| १२३ | गहाणकार किंवा निष्पादक नादार झाल्यास गहाणांवर आणि इतर संलेखांवर आक्षेप न घेणे. | ११० |
| १२४ | [वगळण्यात आले.] | ११० |
| १२५ | संयुक्त हिंदु कुटुंबाच्या व्यवस्थापकांनी करून दिलेली गहाणे आणि इतर लेख. | १११ |
| १२६ | सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३२ याचे कलम ८ हे विवक्षित फेरबदलाच्या अधीन सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी करून दिलेल्या गहाणांना आणि इतर लेखांना लागू होणे. | १११ |
| १२७ | भाडेपट्ट्यावर निर्बंध. | ११२ |
| १२८ | सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने पैसे स्वीकारणे आणि ऋणमुक्ती देणे. | ११२ |
| १२९ | गहाण ठेवलेली मालमत्ता नष्ट झाली असेल किंवा प्रतिभूति अपुरी झाली असेल तर त्याबाबतचे सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे अधिकार. | ११२ |
| १३० | गहाण ठेवलेली मालमत्ता विकत घेण्याचा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा हक्क. | ११३ |
| १३१ | सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी कर्जाची वसुली करणे. | ११३ |
| १३२ | माल अटकावून ठेवण्याचा अधिकार. | ११३ |
| १३३ | गहाण ठेवलेल्या किंवा भारग्रस्त असलेल्या मालमत्तेची विक्री. | ११४ |
| १३३ क | जनजातीतील व्यक्तींची गहाण किंवा भारग्रस्त मालमत्ता, कलम १३३ अन्वये जाहीर लिलावात जनजातींवर व्यक्तींला न विकणे. | ११४ |
| १३४ | विक्री कायम करणे. | ११५ |
| १३५ | विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग. | ११५ |
| १३६ | खरेदीदारास प्रमाणपत्र देणे, मालमत्ता स्वाधीन करणे आणि मालकी हक्क प्रदान करणे. | ११६ |
| १३७ | निबंधकाने प्रमाणपत्र दिल्यावर कर्जाची वसुली. | ११६ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १३८ | जिल्हाधिकाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या वसुलीची पद्धत. | ११७ |
| १३९ | लिलावाद्वारे करावयाच्या विक्रीत अधिकारी किंवा त्यांच्या कुटुंबियांनी बोली न बोलणे. | ११८ |
| १४० | कृषि आणि ग्रामीण विकास बँकेच्या नावे करून दिलेल्या अन्यसंक्रामणास सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ यांचे कलम ४० लागू नसणे. | ११८ |
| १४१ | विवक्षित नुकसान भरून काढण्यासाठी हमी निधींची तरतूद. | ११८ |
| १४२ | कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास कृषि आणि ग्रामीण विकास बँक म्हणून काम करण्यास परवानगी देण्याचा निबंधकाचा अधिकार. | ११८ |
| १४३ | नोटीस बजावणे. | ११९ |
| १४३ क | सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ अन्वये मंजुरी दिलेल्या योजनांच्या संबंधात शासनाच्या हक्कांचे व दायित्वांचे हस्तांतरण करणे. | ११९ |
| १४४ | कृषि आणि ग्रामीण विकास बँकावर देखरेख ठेवण्याचा व विनियम करण्याचा राज्य कृषि आणि ग्रामीण विकास बँकेच्या समितीचा अधिकार. | ११९ |
| १४४ एकक | लोकहित इत्यादीच्या दृष्टीने सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकाची पुनर्रचना, त्यांचे एकत्रीकरण किंवा विभाजन. | १२० |
| १४४ एकख | [ वगळण्यात आले.] | १२० |


## प्रकरण अकरा-क

### विवक्षित संस्थांच्या समित्यांच्या व अधिकाऱ्यांच्या निवडणुका


| | | |
|---|---|---|
| १४४ क | हे प्रकरण लागू होणे व व्याख्या, | १२० |
| १४४ ख | निवडणुका केव्हा घ्याव्यात. | १२१ |
| १४४ ग | निवडणुका पार पाडणे. | १२१ |
| १४४ घ | निवडणुक घेण्याचा खर्च. | १२१ |
| १४४ ङ | सदस्यत्वाकरिता अनर्हता. | १२२ |
| १४४ च | निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब, त्यांची कमाल मर्यादा व हिशेब सादर करणे. | १२३ |
| १४४ छ | निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब सादर करण्यात कसूर केल्याबाबत अनर्हता. | १२३ |
| १४४ ज | अनर्हता दूर करणे किंवा अनर्हतेचा कालावधी कमी करणे. | १२३ |
| १४४ झ | भ्रष्टाचार. | १२३ |
| १४४ ञ | मतदानाची गुप्तता राखणे. | १२५ |
| १४४ ट | निवडणुकांमधील अधिकारी इत्यादीनी उमेदवारांसाठी काम न करणे किंवा मतदानाबाबत दडपण न आणणे. | १२५ |
| १४४ ठ | मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई. | १२६ |
| १४४ ड | मतदान केंद्रामध्ये किंवा मतदान केंद्राजवळ बेशिस्त वर्तणूक केल्याबद्दल शास्ती. | १२६ |
| १४४ ढ | मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती. | १२६ |
| १४४ ण | निवडणुकांत बेकायदेशीर रीतीने वाहणे भाड्याने घेणे किंवा मिळविणे याबद्दल शास्ती. | १२७ |
| १४४ त | निवडणुकीच्या संबंधातील अधिकृत कर्तव्यांचा भंग. | १२७ |
| १४४ थ | मतदान केंद्रावरुन मतपत्रिका बाहेर नेणे हा अपराध असणे. | १२७ |
| १४४ द | इतर अपराध व त्यांबद्दलच्या शास्ती. | १२८ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १४४ ध | या प्रकरणाखालील अपराधांस विवक्षित फेरबदलांच्या अधीन, कलम १४८ लागू असणे. | १२८ |
| १४४ न | निवडणुकीसंबंधीचे विवाद आयुक्तांकडे किंवा इतर विनिर्दिष्ट अधिकाऱ्याकडे सादर करणे. | १२९ |
| १४४ प | सुनावणीच्या खर्चाबाबत ठेवावयाची अनामत रक्कम व खर्चाचा निवाडा देण्याविषयीचा अधिकार. | १२९ |
| १४४ फ | विनंती अर्जातील तपशील. | १३० |
| १४४ ब | विनंती अर्जदाराला ज्याची मागणी करता येईल, असे सहाय्य. | १३० |
| १४४ भ | या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी नियम करण्याचा अधिकार. | १३० |
| १४४ म | विनिर्दिष्ट संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीसाठी विशेष तरतूद. | १३० |

प्रकरण बारा

**अपराध व शास्ती**

| | | |
|---|---|---|
| १४५ | " सहकारी " या शब्दाचा वापर करण्यास मनाई. | १३१ |
| १४६ | अपराध. | १३१ |
| १४७ | कलम १४६ खालील अपराधांबद्दल शिक्षा. | १३३ |
| १४८ | अपराधाची दखल घेणे. | १३४ |
| १४८-क | सहकारी न्यायाधिकरणाचा आणि सहकारी अपील न्यायाधिकरणाचा अवमान. | १३४ |

प्रकरण तेरा

**अपिले, पुनर्विलोकन व पुनरीक्षण**

| | | |
|---|---|---|
| १४९ | महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय. | १३६ |
| १५० | सहकारी अपील न्यायालयाच्या आदेशांचे पुनर्विलोकन. | १३८ |
| १५१ | सहकारी अपील न्यायालयास दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे. | १३८ |
| १५२ | अपिले. | १३९ |
| १५२-क | निवडणुकीत नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्यास त्याविरूध्द अपील करणे. | १३९ |
| १५३ | विवक्षित प्रकरणात अपील प्राधिकाऱ्याने मुदत मर्यादा वाढविणे. | १४० |
| १५४ | राज्य शासनाचे आणि निबंधकाचे पुनरीक्षणविषयक अधिकार. | १४० |

प्रकरण तेरा-क

**महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद**

| | | |
|---|---|---|
| १४५-क | राज्य सहकारी परिषदेची घटना, तिची कार्ये, इत्यादी. | १४१ |

प्रकरण चौदा

**संकीर्ण**

| | | |
|---|---|---|
| १५५ | शासनास देय असलेल्या रकमांची वसुली. | १४१ |
| १५६ | मालमत्ता जप्त करून व तीची विक्री करुन विवक्षित रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार. | १४२ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १५७ | अधिनियमाच्या तरतुदींपासून संस्थांना सूट देण्याचा अधिकार. | १४३ |
| १५८ | निबंधकाच्या अधिकारांचे विवक्षित प्राधिकरणाकडे व अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजन. | १४३ |
| १५९ | राज्याबाहेरील संस्थांच्या शाखा, वगैरे. | १४३ |
| १६० | कागदपत्रे व मालमत्ता निवडणूक झाल्यावर नवीन सभापतीच्या स्वाधीन करणे. | १४४ |
| १६०-क | राज्य विधानमंडळाचे व विवक्षित स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य हे जर संस्थांचे पदधारक असतील, तर त्यांना पारिश्रमिक न देणे. | १४४ |
| १६०-ख | विहित केलेल्या कमाल दराहून अधिक दराने प्रवास भत्ता, दैनिक भत्ता वगैरे मिळण्याचा हक्क समितीच्या सदस्यांना नसणे. | १४४ |
| १६१ | निबंधक आणि इतर अधिकारी लोकसेवक असणे. | १४५ |
| १६२ | सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल हानिरक्षण. | १४५ |
| १६३ | न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध. | १४५ |
| १६४ | वादाच्या बाबतीत नोटीस आवश्यक. | १४५ |
| १६५ | नियम. | १४६ |
| १६६ | निरसन, व्यावृत्ती व अर्थ लावणे. | १५३ |
| १६७ | कपन्यांबाबतचा अधिनियम लागू नसणे. | १५४ |

# सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४[१]

## (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०)

(या अधिनियमास राष्ट्रपती यांची दिनांक ४ मे १९६१ रोजी संमती मिळाली; ही संमती मिळाल्यानंतर तो, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग चारमध्ये दि. ९ मे १९६१ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.)

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६*

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.†

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.‡

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९६० यातील भाग पाच (इंग्रजी) मधील पृष्ठ क्रमांक २७०-२७३ पहा. निवड समितीच्या अहवालासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९६० यातील भाग पाच (इंग्रजी) मधील पृष्ठे ४३२-५१७ पहा.

* सन १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ हा सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

१९६९ चा महा. २७. † सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याचे कलम २७ खालीलप्रमाणे आहे :–

"२७. या अधिनियमान्वये सुधारल्याप्रमाणे असलेल्या मुख्य अधिनियमातील कलम ९१ द्वारे ज्या बाबी निबंधकाकडे पाठवावयाच्या असतील, त्या बाबीसंबंधी कोणत्याही न्यायालयात किंवा प्रलंबित कोणत्याही प्राधिकरणाद्वारे, महाराष्ट्र सहकारी संस्था (द्वितीय सुधारणा) अधिनियम, १९६९ यांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणतेही कामकाज प्रलंबित असेल तर, असे न्यायालय किंवा प्राधिकरण असे सर्व कामकाज निकालात काढले जाण्यासाठी निबंधकाकडे हस्तांतरित करील." विवक्षित प्रलंबित कामकाज हस्तांतरित करणे.

‡ सन १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा, सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ यांच्या कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९* (३० मे १९७३)[१]

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४† (१७ ऑक्टोबर १९७३)[१]

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ (१ मार्च १९७५)[१]

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (१ मे १९७५)[१]

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ (१९ फेब्रुवारी १९७६)[१]

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ (२२ डिसेंबर १९७५)[१]

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (१८ फेब्रुवारी १९७६)[१]

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४‡ (२५ नोव्हेंबर १९७६)[१]

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०§ (२७ सप्टेंबर १९७७)[१]

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ (१७ ऑगस्ट १९७९)[१]

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ (१४ ऑक्टोबर १९८०)[१]

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३ ॥ (१३ ऑक्टोबर १९८१)[१]

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ (१७ मार्च १९८२)[१]

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८** (१ जुलै १९८२)[१]

---

* सन १९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ हा, सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

[१] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

† सन १९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ हा, सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

‡ सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ हा, सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

§ सन १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ हा, सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

॥ सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ हा, सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ अन्वये निरसित करण्यात आला.

** सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १७ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद केलेली आहे :

विवक्षित कामकाज विधिग्राह्य असणे व ते चालू ठेवणे.

"१७. (१) मुख्य अधिनियम किंवा त्याखाली तयार करण्यात आलेले नियम किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यात काहीही अंतर्भूत असेल तरी निबंधकाने किंवा निबंधकाच्या अधिकाराचा वापर करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने त्याच्याकडे विनिर्दिष्ट करण्यात आलेली किंवा त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली कोणतीही बाब ही, मुख्य अधिनियमाच्या कलम ९१ च्या अर्थांतर्गत विवाद असल्याबद्दल दिलेला कोणताही निर्णय आणि या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी निबंधकाने किंवा अशा अधिकाऱ्याने असा कोणताही विवाद निकालात काढण्यासाठी कलम ९३ द्वारे कोणत्याही सहकारी न्यायालयाकडे केलेला कोणताही निर्देश हा, ही बाब विवाद आहे, असा निर्णय देण्यापूर्वी किंवा निकालात काढण्यासाठी हा विवाद सहकारी न्यायालयाकडे विनिर्दिष्ट करण्यापूर्वी, अधिनियमात किंवा नियमात घालून देण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन करण्यात आले नव्हते किंवा संबंधित पक्षकारांना सुनावणीची संधी देण्यात आली नव्हती, याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही किंवा तो केव्हाही विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ (२६ डिसेंबर १९८३)[१]

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८† (२९ जून १९८४)[१]

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ (२९ जून १९८५)[१]

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० (३० जानेवारी १९८६)[१]

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (१२ मे १९८६)[१]

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७‡ (५ सप्टेंबर १९८६)[१]

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८§ (२४ ऑक्टोबर १९८६)[१]

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० (२० मे १९८८)[१]

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ||

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० (३१ डिसेंबर १९९१)[१]

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०£££ (२३ डिसेंबर १९९२)[१]

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (२१ जानेवारी १९९४)[१]

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (५ ऑक्टोबर १९९६)[१]

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ (२ जानेवारी १९९७)[१]

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ (२३ ऑगस्ट २०००)[१]

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४@ (१३ जानेवारी २००१)[१]

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ (७ सप्टेंबर २००१)[१]

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६@ @ (२३ एप्रिल २००१)[१]

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ (२५ ऑगस्ट २००५)[१]

---

(२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकाला कोणत्याही सहकारी न्यायालयाकडे किंवा इतर प्राधिकरणाकडे प्रलंबित असतील असे पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले सर्व विवाद हे त्यांच्याकडे विधिग्राह्यरीत्या विनिर्दिष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येतील आणि या अधिनियमान्वये सुधारण्यात आल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार उक्त प्राधिकरणांकडून ते चालू ठेवण्यात व निकालात काढण्यात येतील."

[१] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

† सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा, सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

‡ सन १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा, सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

§ सन १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ हा, सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

|| सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १ (२) खालीलप्रमाणे :--

"(२) हे कलम आणि कलमे २, ३, ६, ७ आणि १३ ते १८ तात्काळ अंमलात येतील, कलमे ४, ५ आणि ८ ते १२ ही १ डिसेंबर १९८७ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल आणि कलम १९ हे २० जून १९८८ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल."

£££ सन १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ हा, सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

@ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५ द्वारे सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ व सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २६ निरसित करण्यात आले.

@ @ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३ द्वारे सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २६ निरसित करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांसंबंधीचा कायदा एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्याच्या धोरणासंबंधी भारताच्या संविधानात प्रतिपादित केलेल्या संबंधित मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीच्या सुव्यवस्थित विकासासाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने राज्यातील सहकारी संस्थांसंबंधीचा कायदा एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :–

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास [१] अंमलात येईल.

व्याख्या.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, या अधिनियमात,–

(१) " कृषि पणन संस्था " याचा अर्थ,—

(क) ज्या संस्थेचे उद्दिष्ट शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री करणे आणि शेतीच्या उत्पादनासाठी अवजारे व इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणे हे असेल, आणि

(ख) ज्या संस्थेच्या सदस्यांपैकी तीन-चतुर्थांशाहून कमी नाहीत, इतके सदस्य शेतकरी असतील किंवा शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या संस्था असतील, अशा संस्था, असा आहे ;

[२][(२) " शिखर संस्था " याचा अर्थ,—

(क) ज्या संस्थेच्या कार्यक्षेत्राचा विस्तार सर्व महाराष्ट्र राज्यभर असेल,

(ख) सदस्य म्हणून तिच्याशी संलग्न असलेल्या संस्थांच्या मुख्य उद्दिष्टाचे प्रवर्धन करणे आणि त्यांना सुविधा व सेवा पुरविणे, हा जिचा मुख्य उद्देश असेल, आणि

(ग) निबंधकाने जी संस्था " शिखर संस्था " म्हणून वर्गीकृत केली असेल, ] अशी संस्था, असा आहे.

[३][(३) * * * * ]

(४) " अधिलाभांश " याचा अर्थ, स्वतःस झालेल्या नफ्यामधून सदस्यास किंवा सदस्य नसेल अशा व्यक्तीस, संस्थेच्या व्यवसायासाठी त्या सदस्याने किंवा व्यक्तीने दिलेल्या अंशदानाच्या आधारे (यात श्रमदान किंवा सेवा यांच्या स्वरूपात दिलेल्या कोणत्याही अंशदानाचा समावेश होतो) आणि कृषि संस्थेच्या बाबतीत असे अंशदान आणि तसेच, संयुक्तपणे लागवड करण्यासाठी यथास्थिति, सदस्यांनी एकत्र केलेल्या जमिनीची किंमत किंवा त्यापासून मिळालेले उत्पन्न किंवा क्षेत्र या दोन्ही गोष्टींच्या आधारे संस्था ठरवून देईल, त्याप्रमाणे रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात दिलेली रक्कम आहे, असा आहे, [४][ परंतु यामध्ये अधिलाभांश प्रदान अधिनियम, १९६५ अन्वये संस्थेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास अधिलाभांश म्हणून दिलेल्या किंवा देय असलेल्या कोणत्याही रकमेचा अंतर्भाव होत नाही ;] १९६५ चा २१.

---

[१] २६ जानेवारी १९६२, पहा—शासकीय अधिसूचना, सहकार व ग्रामविकास विभाग क्रमांक एससीएल, १०६१-१३५-जी, दिनांक २४ जानेवारी १९६२.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (अ) अन्वये खंड (२) समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये खंड (३) वगळण्यात आला.

[४] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (अ) अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

(५) "उपविधि" याचा अर्थ, या अधिनियमान्वये नोंदलेले व त्यावेळी अंमलात असलेले उपविधि, असा आहे आणि त्यात अशा उपविधिच्या नोंदलेल्या सुधारणांचा समावेश होईल ;

[१][(६) "मध्यवर्ती बँक" याचा अर्थ, ज्या बँकेच्या उद्दिष्टात इतर संस्थांना कर्ज देण्यासाठी निधी उभारण्याचा समावेश असेल, अशी सहकारी बँक, असा आहे, परंतु त्यात नागरी सहकारी बँकेचा समावेश होत नाही ;]

[२][(७) "समिती" याचा अर्थ, कलम ७३ अन्वये संस्थेच्या कारभाराचे व्यवस्थापन ज्या व्यवस्थापन समितीकडे किंवा संचालक मंडळाकडे किंवा कोणत्याही नावाने ओळखण्यात येणाऱ्या अन्य निदेशन निकायाकडे सोपविण्यात आले असेल, ती समिती किंवा तो निकाय, असा आहे ;]

१९५६ चा १. (८) "कंपनी" याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेली कंपनी, असा आहे, आणि त्यात बँकिंग कंपनीचा आणि तसेच, कोणत्याही उद्योगधंद्याचा विकास करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही केंद्रीय, राज्य किंवा प्रांतिक अधिनियमान्वये रचना करण्यात किंवा स्थापन करण्यात आलेले कोणतेही मंडळ, महामंडळ किंवा इतर निगम निकाय यांचा समावेश होईल ;

(९) "ग्राहक संस्था" याचा अर्थ, ज्या संस्थेचे :—

(क) आपल्या सदस्यांसाठी तसेच इतर ग्राहकांसाठीसुद्धा मालाचे प्रापण, उत्पादन किंवा संस्करण करणे आणि तो त्यांना वितरित करणे किंवा त्यांची इतर प्रकारे सेवा करणे, आणि

(ख) असे प्रापण, उत्पादन, संस्करण आणि वितरण करण्यापासून उपार्जित केलेल्या नफ्यांचे संस्थेच्या नियमांद्वारे किंवा उपविधिद्वारे विहित करण्यात आलेल्या प्रमाणात, आपल्या सदस्यांमध्ये व ग्राहकांमध्ये वितरण करणे,

हे उद्दिष्ट आहे, ती संस्था, असा आहे.

१९४९ चा १०. [३][(१० क) "सहकारी बँक" याचा अर्थ, बँकिंग कंपनी अधिनियम, १९४९ यातील कलम ५, पोट-कलम (१), खंड (ख) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे बँकिंगचा व्यवसाय करणारी संस्था, असा आहे आणि त्यात प्रकरण अकरा खालील [४][सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे] कार्य करीत असलेल्या अथवा करणार असलेल्या कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव होतो ;]

[५][(१० क एक) "सहकारी अपील न्यायालय" याचा अर्थ, या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेले, महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, असा आहे ;

(१० क दोन) "सहकारी न्यायालय" याचा अर्थ, [६][या अधिनिमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीअन्वये त्याकडे निर्दिष्ट करण्यात येतील अशा विवादांचा] निर्णय करण्यासाठी या अधिनिमान्वये घटित करण्यात आलेले न्यायालय असा होतो ;]

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (क) अन्वये खंड (६) बदली दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमात कलम २ (ड) अन्वये खंड (७) हा बदली दाखल करण्यात आला.

[३] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २ अन्वये खंड (१०) ऐवजी नवीन खंड (१० क) दाखल करण्यात आला.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ अन्वये "कृषी आणि ग्रामीण विकास बँकेचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २ (ब) अन्वये खंड (१० क एक) व खंड (१० क दोन) हे समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(१० क तीन) " सहकारी वर्ष " याचा अर्थ, [२][३१ मार्च रोजी अथवा विशिष्ट संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या बाबतीत, तिच्या किंवा त्याच्या हिशेबांचे ताळेबंद काढण्याच्या प्रयोजनार्थ [३][निबंधकाने वेळोवेळी जो निश्चित केलेला असेल ] अशा इतर दिवशी संपणारे वर्ष, असा आहे ; ]

[४][(१० क) " पीक संरक्षण संस्था " याचा अर्थ, पिके, बांधकामे, यंत्रसामग्री, शेतीची अवजारे व जमिनीवर पंपाने पाणी आणण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सामग्रीसारखी इतर सामग्री यांचे संरक्षण करणे, हे उद्दिष्टे असलेली संस्था, असा होतो ; ]

(११) " लाभांश " याचा अर्थ, संस्थेस झालेल्या नफ्यामधून सदस्यास, त्याने धारण केलेल्या भागांच्या प्रमाणात दिलेली रक्कम, असा आहे ;

(१२) " कृषि संस्था " याचा अर्थ, शेतीचे उत्पादन, रोजगार व उत्पन्न यांत वाढ करण्याच्या आणि साधनसामग्रीचा अधिक चांगला उपयोग करण्याच्या उद्देशाने ज्या संस्थेत सदस्यांकडून जमिनी एकत्रित केल्या जातात व त्याची, सर्व सदस्यांकडून संयुक्तपणे लागवड करण्यात येते ती संस्था, असा आहे. मग अशा जमिनी, (क) सदस्यांच्या मालकीच्या असोत किंवा त्यांना (किंवा त्यापैकी काही जणांना) भाडे पट्ट्यांनी दिलेल्या असोत किंवा (ख) त्या इतर कोणत्याही प्रकारे संस्थेच्या कब्जात आलेल्या असोत ;

(१३) " संघीय संस्था " याचा अर्थ—

(क) ज्या संस्थेच्या सदस्यांपैकी पाचहून अधिक नाही इतके सदस्य स्वतःच संस्था असतील, आणि

(ब) ज्या संस्थेतील मतदानाचे अधिकार अशा रीतीने विनियमित केलेले असतील की, सदस्य संस्थांना या संस्थेच्या सर्वसाधारण बैठकीत मतांच्या एकूण संख्येच्या चार पंचमांशाहून कमी नाही इतकी मते असतील ती संस्था, असा आहे ;

(१४) " भागीदारी संस्था " याचा अर्थ, भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अन्वये नोंदणी केलेली भागीदारी संस्था, असा आहे ; १९३२ चा ९.

(१५) " सर्वसाधारण संस्था " याचा अर्थ, या कलमाच्या इतर खंडाद्वारे व्याख्या करण्यात आलेल्या संस्थांच्या वर्गापैकी कोणत्याही वर्गात न मोडणारी संस्था, असा आहे ;

[५][(१६) " गृहनिर्माण संस्था " याचा अर्थ, आपल्या सदस्यांना गृहनिर्माणासाठी खुले भूखंड राहण्याची घरे किंवा सदनिका यांची तरतूद करणे किंवा जर घरांसाठी खुले भूखंड, राहण्याची घरे किंवा सदनिका अगोदरच संपादन करण्यात आल्या असतील तर आपल्या सदस्यांना सर्वसामान्य सुखसोयी व सेवा पुरविणे, हे ज्या संस्थेचे उद्दिष्ट असेल अशी संस्था, असा आहे ; ]

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (ई) अन्वये खंड (१० क तीन) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ (अ) अन्वये " ३० जून रोजी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये " निबंधकाच्या पूर्वमान्यतेने जो दिवस निश्चित करण्यात आला असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ब) अन्वये खंड (१० क) समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (फ) अन्वये खंड (१६) बदली दाखल करण्यात आला.

[१][(१६ क) " उद्धरण सिंचन संस्था " याचा अर्थ, ज्या संस्थेचे उद्दिष्ट आपल्या सिंचनासाठी किंवा अन्य कारणासाठी यांत्रिक शक्तीद्वारे किंवा अन्यथा पाणीपुरवठ्याची तरतूद करणे हे असेल, अशी संस्था, असा आहे ; ]

(१७) " परिसमापक " याचा अर्थ, या अधिनियमान्वये परिसमापक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(१८) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, शाळा मंडळाचा आणि त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या कृषि उत्पन्न बाजार समितीचा समावेश होतो ;

(१९) (क) " सदस्य " याचा अर्थ, ज्या संस्थेची नंतर नोंदणी करण्यात आली आहे, अशा सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठीच्या अर्जात सामील झालेली व्यक्ती किंवा संस्थेच्या नोंदणीनंतर संस्थेची सदस्य म्हणून यथोचितरीत्या दाखल करून घेतलेली व्यक्ती, असा आहे आणि त्यात नाममात्र सदस्य, सहयोगी सदस्य किंवा हितैषी सदस्य यांचा समावेश होतो ;

(ख) " सहयोगी सदस्य " याचा अर्थ, जो सदस्य इतर सदस्यांबरोबर संयुक्तपणे संस्थेचा भाग धारण करतो, पण ज्याचे नाव प्रथम स्थानी नसेल, असा सदस्य, असा होतो ;

(ग) " नाममात्र सदस्य " याचा अर्थ, उपविधिंनुसार नोंदणी झाल्यावर नाममात्र सदस्य म्हणून ज्याचे सदस्यत्व मान्य केलेले असेल, तो सदस्य, असा आहे ;

(घ) " हितैषी सदस्य " याचा अर्थ, जो संस्थेच्या ध्येय व धोरणाविषयी सहानुभूती बाळगतो आणि ज्यास असा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात आले असेल, असा सदस्य, असा आहे ;

(२०) " अधिकारी " याचा अर्थ, एखाद्या संस्थेने आपल्या उपविधिंस अनुसरून अशा संस्थेच्या कोणत्याही पदावर निवडून दिलेली किंवा नेमणूक केलेली व्यक्ती, असा आहे; आणि त्यात सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापन संचालक, व्यवस्थापक, सचिव, कोषपाल, समितीचा सदस्य आणि अशा संस्थेच्या कामकाजासंबंधी निदेश देण्यासाठी या अधिनिमान्वये, नियमान्वये किंवा उपविधिंन्वये निवडून दिलेली किंवा नेमणूक केलेली इतर कोणतीही व्यक्ती यांचा अंतर्भाव होतो ;

[२][(२०-क) " शासकीय अभिहस्तांकिती " याचा अर्थ, कलम २१ क, पोट-कलम (२) खाली निबंधकाने नेमणूक केलेली व्यक्ती किंवा व्यक्ती निकाय, असा आहे ; ]

(२१) " विहित " याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(२२) " संस्करण संस्था " याचा अर्थ, मालावर संस्करण करणे, हे ज्या संस्थेचे उद्दिष्ट आहे, अशी संस्था, असा आहे ;

(२३) " उत्पादकांची संस्था " याचा अर्थ, मालाचे उत्पादन करणे व त्याचा विनियोग करणे किंवा आपल्या सदस्यांचे श्रम सामुदायिकपणे कामी लावणे, हे ज्या संस्थेचे उद्दिष्ट आहे, अशी संस्था, असा आहे ;

(२४) " निबंधक " याचा अर्थ, सहकारी संस्थेचा निबंधक म्हणून या अधिनिमान्वये नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(२५) " साधन संस्था " याचा अर्थ, आपल्या सदस्यांसाठी त्यांना आवश्यक असलेले कर्ज, माल किंवा सेवा प्राप्त करून देणे, हे ज्या संस्थेचे उद्दिष्ट आहे, अशी संस्था, असा आहे ;

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २ (क) अन्वये खंड (१६ क) बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (ग) अन्वये खंड (२० क) समाविष्ट करण्यात आला.

(२६) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे ;

(२७) " संस्था " याचा अर्थ, या अधिनियमांन्वये नोंदलेली किंवा नोंदण्यात आली असल्याचे मानण्यात येणारी सहकारी संस्था, असा आहे ;

(२८) " मर्यादित दायित्व असलेली संस्था " याचा अर्थ, ज्या संस्थेच्या सदस्यांचे दायित्व जिच्या उपविधिअन्वये मर्यादित करण्यात आले आहे अशी संस्था, असा आहे ;

(२९) " अमर्यादित दायित्व असलेली संस्था " याचा अर्थ, ज्या संस्थेचे सदस्य तिचे समापन झाल्याने तिच्यावर बोजाबद्दल व बोजाच्या संबंधात आणि संस्थेच्या मत्तेतील कोणत्याही तुटीसाठी अंशदान देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असतील, ती संस्था, असा आहे ;

[१][* * * * *]

(३१) " खेळते भांडवल " याचा अर्थ, भरणा केलेले भाग भांडवल व नफ्यातून उभारलेले निधी आणि कर्ज काढून व इतर मार्गांनी उभा केलेला पैसा यांसह संस्थेकडे असलेले निधी, असा आहे.

## प्रकरण दोन

## नोंदणी

निबंधक [४][ व त्याच्या हाताखालील कर्मचारी.]

३. राज्य शासनास राज्यासाठी सहकारी संस्थांचा निबंधक म्हणून एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल ; तसेच त्यास अशा निबंधकास मदत करण्यासाठी [२][ ते याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशी पदनामे असलेल्या आणि अशा स्थानिक क्षेत्रात किंवा संबंध राज्यभरात ] एका किंवा त्याहून अधिक व्यक्तींची नेमणूक करता येईल आणि सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे या अधिनियमाखालील निबंधकाचे सर्व किंवा कोणतेही अधिकार अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना देता येतील. निबंधकास मदत करण्यासाठी अशा रीतीने नेमलेल्या ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना निबंधकाचे कोणतेही अधिकार दिलेले असतील, ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती, निबंधकाच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली, अधीक्षणाखाली आणि नियंत्रणाखाली काम करील/करतील. [३][ त्या निबंधकास दुय्यम असतील आणि अशा व्यक्तींची आपापसातील दुय्यमता राज्य शासनाकडून ठरविण्यात येईल त्याप्रमाणे असेल.]

तात्पुरती रिक्त पदे.

[५][३ क. निबंधक किंवा अशा निबंधकास मदत करण्यासाठी नेमणूक केलेली एखादी व्यक्ती आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाली असेल किंवा कोणत्याही कारणास्तव आपले पद रिकामे करीत असेल किंवा आपल्या अधिकारितेचा त्याग करीत असेल किंवा मरण पावेल तर,—

(क) निबंधकाच्या बाबतीत निबंधकाच्या कार्यालयातील अपर किंवा सहनिबंधक, आणि

(ख) निबंधकास सहाय्य करण्यासाठी नेमणूक केलेल्या एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत संबंधित कार्यालयातील लगतवरचे पद धारण करणारा ज्येष्ठतम अधिकारी,

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २ (ड) अन्वये खंड (३०) वगळण्यात आला.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ अन्वये कलम ३ (क) समाविष्ट करण्यात आला.

त्याबाबतीत अन्यथा तरतूद करण्यात आली नसेल तर, यथास्थिति, निबंधकाचे पद किंवा त्याच्या स्वतःच्या पदाच्या भरीला निबंधकास सहाय्य करण्यासाठी नेमणूक केलेल्या व्यक्तींचे पद तात्पुरते धारण करील आणि निबंधक किंवा त्याला सहाय्य करण्यासाठी नेमलेली व्यक्ती आपल्या अधिकारपदावर रुजू होईपर्यंत किंवा उत्तराधिकाऱ्याची रीतसर नेमणूक करण्यात येईपर्यंत आणि त्यांच्या नेमणुकीचा कार्यभार आपल्याकडे येईपर्यंत तो, या अधिनियमान्वये निबंधक किंवा निबंधकास सहाय्य करण्यासाठी नेमणूक केलेली व्यक्ती असल्याचे गृहीत धरण्यात येईल.]

४. ज्या संस्थेची उद्दिष्टे सहकारी तत्त्वानुसार आपल्या सदस्यांच्या किंवा जनतेच्या आर्थिक हिताचे किंवा सर्वसाधारण कल्याणाचे संवर्धन करणे, ही असतील त्या संस्थेची किंवा अशा कोणत्याही संस्थेला तिची कामे करणे सुकर व्हावे या उद्देशाने स्थापन केलेल्या कोणत्याही संस्थेची या अधिनियमान्वये नोंदणी करता येईल : ज्यांची नोंदणी करता येईल अशा संस्था.

परंतु, कोणतीही संस्था आर्थिकदृष्ट्या दुबळी होण्याचा संभव असेल किंवा [१][ जिच्या नोंदणीमुळे सहकारी चळवळीच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असेल किंवा जिची नोंदणी ही, राज्य शासन वेळोवेळी काढील अशा धोरणविषयक निदेशांच्या विरोधी होण्याची शक्यता असेल, तर अशा कोणत्याही संस्थेची] नोंदणी करण्यात येणार नाही.

५. संस्थेची मर्यादित किंवा अमर्यादित दायित्वासह नोंदणी करता येईल : मर्यादित किंवा अमर्यादित दायित्वासह नोंदणी.

६. (१) संघीय संस्थेव्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थेची, या अधिनियमान्वये अशा संस्थेचे सदस्य होण्यास पात्र असणाऱ्या व संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या कमीतकमी दहा व्यक्तींचा (अशा व्यक्तीपैकी प्रत्येक व्यक्ती वेगळ्या कुटुंबातील असली पाहीजे). [२][ किंवा निबंधक, सहकारी चळवळीची उद्दिष्टे आणि तिची आर्थिकदृष्ट्या स्वयंनिर्वाहिता आणि विकास या गोष्टी विचारात घेऊन, एखाद्या संस्थावर्गाकरिता वेळोवेळी निश्चित करील इतक्या त्याहून अधिक व्यक्तींचा ;] तिच्यात समावेश असल्याखेरीज या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात येणार नाही : नोंदणीच्या शर्ती.

[३][ परंतु, दहापेक्षा कमी पण पाच किंवा त्यापेक्षा अधिक असतील अशा व्यक्तींचा अंतर्भाव असलेल्या उपसा जलसिंचन संस्थेची या अधिनियमान्वये नोंदणी करता येईल.]

(२) अमर्यादित दायित्व असलेल्या कोणत्याही संस्थेची अशी संस्था तयार करणाऱ्या सर्व व्यक्ती एकाच नगरात किंवा गावात किंवा गावाच्या एकाच गटात रहात असल्याखेरीज नोंदणी करण्यात येणार नाही.

[४][ (२ क) पिके, बांधकामे, यंत्रसामग्री, शेतीची अवजारे व जमिनीवर पंपाने पाणी आणण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीसारखी इतर सामग्री यांचे संरक्षण करण्यासाठी कोणत्याही पीक संरक्षण संस्थेने केलेल्या प्रस्तावाचा मसुदा, त्या प्रस्तावामुळे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या जमिनींच्या सर्व मालकांना आणि उक्त जमिनीत हितसंबंध असण्याचा संभव असलेल्या इतर सर्व व्यक्तींना, त्या प्रस्तावात सहभागी होण्यासाठी किंवा त्याच्या हरकती किंवा सूचना मागविण्यासाठी यथोचितरीत्या प्रसिद्ध करण्यात आला होता आणि आलेल्या हरकती व सूचना (तशा असल्यास) त्या संस्थेने यथोचितरीत्या

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ (अ) अन्वये या परंतुकाची भर घालण्यात आली.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) अन्वये पोटकलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

विचारात घेतल्या आहेत व प्रस्तावात समाविष्ट केलेल्या जमिनींच्या एकूण ६६ टक्यांपेक्षा कमी नसतील इतक्या जमिनी कब्जात असलेल्या मालकाने प्रस्ताव तयार करण्याकरिता आपली लेखी संमती दिलेली आहे व केलेला प्रस्ताव व्यवहार्य आहे, याविषयी निबंधकास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्याची खात्री झाल्याशिवाय कोणत्याही पीक संरक्षण संस्थेची नोंदणी करण्यात येणार नाही. या प्रयोजनासाठी संस्था, निबंधकास पुढील गोष्टी सादर करील:—

(क) प्रस्तावात समावेश करण्यात आलेले क्षेत्र आणि बाधा पोहोचणाऱ्या गावाच्या किंवा गावांच्या नकाशात किंवा नकाशांमध्ये दाखविल्याप्रमाणे भोवतालच्या जमिनी दर्शविणारा आराखडा ;

(ख) प्रस्तावात समाविष्ट केलेल्या जमिनीच्या मालकांची नावे आणि जमिनीची क्षेत्रफळे दर्शविणारा अधिकार-अभिलेखातील यथोचितरीत्या प्रमाणित केलेला उतारा ;

(ग) जमिनीच्या मालकांपैकी ज्यांनी तो प्रस्ताव तयार करण्यास संमती दिलेली आहे, त्या जमीन मालकांची दोन साक्षीदारांसमोर सही केलेली निवेदने ;

(घ) प्रस्ताव कार्यान्वित करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा तपशीलवार अंदाज ;

(ङ) तो खर्च कसा भागविण्याचे ठरविले आहे, ते दर्शविणारे तपशीलवार विवरण.

जेव्हा अशी संस्था नोंदण्यात येईल तेव्हा, प्रस्ताव कार्यान्वित करण्याचा खर्च, संस्थेचा सदस्य होण्यास नकार दिलेला असेल असा कोणताही मालक धरुन, प्रस्तावात समाविष्ट केलेल्या प्रत्येक मालकाकडून संस्थेने वसूल करावयाच्या अंशदानाद्वारे पूर्णतः किंवा अंशतः भागवण्यात येईल, प्रस्तावात समाविष्ट केलेल्या प्रत्येक जमिनीचा मालक, अशा जमिनीच्या बाबतीत वेळोवेळी वसूल करावयाचे अंशदान देण्याकरिता मुख्यतः जबाबदार असेल.]

(३) कोणत्याही संघीय संस्थेची, कमीत कमी पाच संस्था तिच्या सदस्य असल्याखेरीज नोंदणी करण्यात येणार नाही.

(४) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कोणत्याही संस्थेच्या नोंदणीस बाध येतो, असे समजण्यात येणार नाही.

(५) ' मर्यादित ' किंवा ' अमर्यादित ' हा शब्द या अधिनियमान्वये नोंदलेल्या किंवा नोंदण्यात आली आहे असे समजण्यात येणाऱ्या, यथास्थिती, मर्यादित किंवा अमर्यादित दायित्व असलेल्या प्रत्येक संस्थेच्या नावातील शेवटचा शब्द असेल.

**स्पष्टीकरण**.—हे कलम व कलम ८ यांच्या प्रयोजनांकरिता " कुटुंबातील व्यक्ती " या संज्ञेचा अर्थ पत्नी, पती, वडील, आई, [१][ मुलगा किंवा अविवाहित मुलगी ] असा होतो.

संस्थांना किंवा [३][संस्थांच्या वर्गाला] नोंदणीविषयक शर्तींपासून सूट देण्याचा अधिकार.

**७.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास [२][ सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास, ते लादील अशा शर्तींना (तशा शर्ती असल्यास) अधीन राहून नोंदणी संबंधी या अधिनियमान्वये आवश्यक असतील अशा कोणत्याही गोष्टींपासून सूट देता येईल.]

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३ अन्वये " आजा, आजी " या शब्दांनी सुरू होणाऱ्या व " भावाची किंवा सावत्र भावाची बायको " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

८. (१) नोंदणीच्या प्रयोजनांसाठी, निबंधकाकडे विहित नमुन्यात अर्ज करण्यात येईल व त्यासोबत संस्थेच्या प्रस्तावित उपविधिंच्या चार प्रती जोडण्यात येतील [१][ व विहित करण्यात येईल, अशी नोंदणी फी भरण्यात येईल. नोंदणीसाठी आलेल्या अर्जावर कार्यवाही करताना त्यामध्ये अंतर्भूत असलेली सेवा विचारात घेऊन, संस्थेच्या निरनिराळ्या वर्गासाठी निरनिराळ्या नोंदणी फी विहित करता येतील ]. ज्या व्यक्तीकडून किंवा जिच्या वतीने असा अर्ज करण्यात आला असेल, अशी व्यक्ती संस्थेसंबंधी निबंधकास आवश्यक वाटेल अशी माहिती पुरवील. नोंदणीसाठी अर्ज.

(२) अशा अर्जावर,—

(क) संघीय संस्थेखेरीज इतर संस्थेच्या बाबतीत या अधिनियमान्वये अर्हताप्राप्त असतील अशा कमीत कमी दहा व्यक्तींनी (अशा व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्ती वेगळ्या कुटुंबातील असली पाहिजे) आणि,

(ख) संघीय संस्थेच्या बाबतीत कमीत कमी पाच संस्थांनी सह्या केल्या पाहिजेत.

एखाद्या संस्थेच्या वतीने करण्यात आलेल्या अर्जावरील कोणतीही सही, ती ज्या व्यक्तीने केली असेल ती व्यक्ती अशा संस्थेच्या समितीची सदस्य नसेल आणि त्या व्यक्तीस समितीने आपल्या वतीने संस्थेची आणि तिच्या उपविधीची नोंदणी करण्यासाठी केलेल्या अर्जावर सही करण्यासाठी ठरावाद्वारे प्राधिकृत केलेले नसेल आणि अशा ठरावाची एक प्रत अर्जात जोडण्यात आली नसेल, तर विधिग्राह्य असणार नाही.

९. (१) एखाद्या प्रस्तावित संस्थेने हा अधिनियम व नियम यांच्या तरतुदींचे [२][ किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याचे अथवा कलम ४ खाली राज्य शासनाने दिलेल्या धोरणविषयक निदेशांचे ] पालन केलेले आहे व तिचे प्रस्तावित उपविधि या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या विरुद्ध नाहीत, अशी निबंधकाची खात्री झाली असेल तर, तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून [३][ दोन महिन्यांच्या आत अशा संस्थेची व तिच्या उपविधिंची नोंदणी करील. ] नोंदणी.

[४][ (२) नोंदणीसाठी आलेला असा अर्ज पूर्वोक्त कालावधीच्या आत निकालात काढण्यात निबंधकाने कसूर केल्यास, निबंधक, तो कालावधी संपल्याच्या दिवसापासून पंधरा दिवसांच्या आत तो अर्ज निकटतम वरिष्ट अधिकाऱ्याकडे निर्देशित करील आणि जर निबंधक हा स्वतःच नोंदणी अधिकारी असेल, तर, राज्य शासनाकडे निर्देशित करील व त्यानंतर यथास्थिति, निबंधक किंवा राज्य शासन तो अर्ज त्यास मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत निकालात काढील आणि, यथास्थिति, अशा वरिष्ट अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने त्या कालावधीत तो अर्ज निकालात काढण्यात कसूर केल्यास संस्था आणि तिचे उपविधि यांची नोंदणी करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. [५][ आणि त्यानंतर निबंधक, पंधरा दिवसांच्या आत स्वतःच्या सही शिक्क्यानिशी नोंदणी प्रमाणपत्र पाठवील. ] ]

(३) जर एखाद्या प्रस्तावित संस्थेची नोंदणी करण्यास निबंधकाने नकार दिला तर, तो आपला निर्णय त्याबद्दलच्या कारणांसह अर्ज करणाऱ्या व्यक्तीस आणि अशा व्यक्ती एकापेक्षा अधिक असतील तर, ज्या व्यक्तीने त्या अर्जावर प्रथम सही केली असेल त्या व्यक्तीस ताबडतोब कळवील.

(४) निबंधक या अधिनियमान्वये नोंदलेल्या किंवा नोंदण्यात आल्याचे समजण्यात येणाऱ्या सर्व संस्थांची एक नोंदवही ठेवील.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६ (अ) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६ (अ) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[५] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

नोंदणीचा पुरावा.

१०. संस्थांची नोंदणी रद्द केल्याचे सिध्द करण्यात आले असेल त्याव्यतिरिक्त, निबंधकाने सही केलेले नोंदणीचे प्रमाणपत्र त्यात नमूद केलेली संस्था यथोचितरीत्या नोंदलेली असल्याबद्दलचा निर्णायक पुरावा असेल.

११. [१] [* * * * ]

विवक्षित प्रश्नांचा निर्णय करण्याचा निबंधकाचा अधिकार.

एखादी व्यक्ती शेतकरी आहे किंवा नाही किंवा एखादी व्यक्ती संस्थेच्या कार्यक्षेत्रात रहाते किंवा नाही [२] [ किंवा एखादी व्यक्ती कोणताही पेशा, धंदा किंवा कामधंदा करीत आहे किंवा तो चालवित आहे किंवा नाही, अथवा कलम २२, पोट-कलम (१ क) अन्वये घोषित केलेल्या अशा व्यक्तिवर्गापैकी आहे किंवा नाही आणि त्या पोट-कलमाखाली तिला निरर्हता प्राप्त झाली आहे किंवा नाही ] अशा कोणत्याही प्रश्नाचा निर्णय निबंधक करील. [३] [ व त्याचा निर्णय अंतिम असेल, परंतु कोणत्याही व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यावाचून तिला प्रतिकूल असेल असा कोणताही निर्णय दिला जाणार नाही.]

संस्थांचे वर्गीकरण.

१२. (१) निबंधक कलम २ मध्ये व्याख्या करण्यात आलेल्या संस्थांच्या वर्गापैकी कोणत्याही एका किंवा दुसऱ्या वर्गात तसेच नियमांद्वारे विहित करण्यात येईल त्या उपवर्गातसुध्दा सर्व संस्थांचे वर्गीकरण करील.

(२) संस्थेच्या एका वर्गातून दुसऱ्या वर्गात किंवा तिच्या एका उपवर्गातून दुसऱ्या उपवर्गात अशा एखाद्या संस्थेच्या वर्गीकरणात, निबंधकास लेखी नमूद करावयाच्या कारणावरून बदल करता येईल आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व त्यास लादणे योग्य वाटतील अशा अटींना व शर्तीना अधीन राहून अशा रीतीने वर्गीकरण केलेल्या कोणत्याही संस्थेस दुसऱ्या वर्गातील संस्थेची कामे पत्करण्यास मुभा देता येईल.

(३) अशा रीतीने वर्गीकरण केलेल्या सर्व संस्थांची एक यादी दर तीन वर्षांनी, राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल त्या रीतीने निबंधक प्रसिद्ध करील.

संस्थेच्या उपविधिंची सुधारणा.

१३. (१) एखाद्या संस्थेच्या उपविधीत केलेली कोणतीही सुधारणा, या अधिनियमान्वये तिची नोंदणी होईपर्यंत, विधिग्राह्य असणार नाही. उपविधित केलेल्या सुधारणेच्या नोंदणीच्या प्रयोजनासाठी विहित केलेल्या रीतीने, संस्थेच्या सर्वसाधारण बैठकींने संमत केलेल्या सुधारणेची एक प्रत निबंधकाकडे पाठविण्यात येईल. [४] [ उपविधित केलेल्या सुधारणांच्या नोंदणीसांठी केलेला प्रत्येक अर्ज तो मिळाल्याच्या दिनांकापासून [५] [ * * * ] दोन महिन्यांच्या मुदतीत निबंधक निकालात काढली.]

[६] [* * * *]

[७] [ (१ क) नोंदणीसाठी आलेला असा अर्ज पूर्वोक्त कालावधीत निकालात काढण्यात निबंधकाने कसूर केल्यास, त्या कालावधीच्या समाप्तीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, निबंधक तो अर्ज निकटतम वरिष्ठ अधिकाऱ्याकडे निर्देशित करील आणि जर निबंधक हा स्वतःच नोंदणी अधिकारी असेल तर, राज्य शासनाकडे निर्देशित करील व त्यानंतर यथास्थिति, निबंधक किंवा राज्य शासन, तो अर्ज त्यास मिळाल्याच्या

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ७ (अ) अन्वये "संस्थेची रचना करण्याचा किंवा तिची नोंदणी करण्याच्या किंवा ती चालू ठेवण्याच्या प्रयोजनाकरिता " हे शब्द वगळण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ८ (अ) (एक) अन्वये "शक्यतो" हा शब्द वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ८ (अ) (दोन) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ८ (अ) (तीन) अन्वये ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत निकालात काढील आणि यथास्थिति, अशा वरिष्ठ अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने त्या कालावधीत तो अर्ज निकालात काढण्यात कसूर केल्यास उपविधिच्या सुधारणेची नोंदणी करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(१ख) राज्य शासनाने कलम ४ खाली जर कोणतेही धोरणविषयक निदेश काढले असतील व ती सुधारणा या निदेशांच्या विरूद्ध असेल तर, संस्थेच्या उपविधिंमध्ये करण्यात आलेली कोणतीही सुधारणा निबंधक या कलमाखाली नोंदवणार नाही किंवा ज्या उपविधिंची नोंदणी करण्यात आल्याचे मानण्यात आले असेल, त्या उपविधिंमध्ये केलेली सुधारणा अमलात येणार नाही.]

(२) जेव्हा निबंधक एखादा उपविधितील सुधारणेची नोंदणी करील तेव्हा [1][किंवा उपविधितील सुधारणा नोंदण्यात आली असल्याचे मानले जाईल तेव्हा] त्याने प्रमाणित केलेली अशा सुधारणेची एक प्रत तो अशा संस्थेकडे पाठवील व ती प्रत, सुधारणेची रीतसर नोंदणी करण्यात आली असल्याचा निर्णायक पुरावा असेल.

(३) निबंधकाने एखाद्या संस्थेच्या उपविधितील [2][अशा सुधारणेची] नोंदणी करण्याचे नाकारल्यास तो नोंदण्यास नकार देणारा आदेश तसे करण्याबद्दलच्या कारणांसह संस्थेला कळवील.

उपविधित सुधारणा करण्याबाबत निदेश देण्याचा अधिकार.

१४. (१) एखाद्या संस्थेच्या उपविधीत सुधारणा करणे, संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे, असे निबंधकाला आढळून आले तर, तो विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत अशा संस्थेस विहित केलेल्या रीतीने अशी सुधारणा करण्याबद्दल त्यास फर्माविता येईल.

(२) विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अवधीत सुधारणा करण्यात संस्थेने कसूर केल्यास, संस्थेस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर व राज्य शासन अधिसूचित करील, त्या राज्य संघीय संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर, निबंधकास अशा सुधारणेची नोंदणी करता येईल व त्याने प्रमाणित केलेल्या अशा सुधारणेची एक प्रत संस्थेला देता येईल. सुधारणेची वर सांगितलेल्या रीतीने ज्या दिनांकास नोंदणी करण्यात आली असेल त्या दिनांकापासून उपविधित त्याप्रमाणे रीतसर सुधारणा करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल व अशा रीतीने सुधारलेले उपविधि अपिलाला (केले असेल तर) अधीन राहून संस्थेवर व तिच्या सदस्यांवर बंधनकारक असतील.

नावात बदल करणे.

१५. (१) सर्वसाधारण बैठकीत ठराव संमत करून व निबंधकांची मान्यता मिळवून संस्थेस आपल्या नावात बदल करता येईल. परंतु अशा बदलामुळे संस्थेच्या किंवा तिच्या कोणत्याही सदस्यांच्या किंवा माजी सदस्यांच्या किंवा मृत सदस्यांच्या कोणत्याही हक्कास किंवा दायित्वास बाध येणार नाही आणि कोणतीही व्यक्ती, प्राधिकरण किंवा न्यायालय यांच्यापुढे अनिर्णीत असलेली कोणतीही न्यायिक कार्यवाही संस्थेद्वारे किंवा संस्थेविरद्ध तिच्या नवीन नावाने चालू ठेवता येईल.

(२) संस्थेने आपल्या नावात बदल केला असेल तर निबंधक नवे नांव संस्थांच्या नोंदवहीत तिच्या जागी दाखल करील व त्याप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्रात सुधारणा करील.

दायित्वातील बदल.

१६. (१) या अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, संस्थेस तिच्या उपविधित सुधारणा करून, आपल्या दायित्वाचे स्वरुप किंवा व्याप्ती यात बदल करता येईल.

(२) जेव्हा संस्थेने तिच्या दायित्वाचे स्वरुप किंवा व्याप्ती यात बदल करण्याबद्दल ठराव संमत केला असेल तेव्हा, ती अशा ठरावाची लेखी नोटीस तिचे सर्व सदस्य व धनको यांना देईल आणि कोणताही उपविधि किंवा कोणतीही संविदा यात तद्‌विरूद्ध काहीही असले तरी, कोणताही सदस्य किंवा धनको यास, त्याजवर अशी नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीत त्यांचे भाग, ठेवी किंवा कर्ज काढून घेण्याचा विकल्प राहील.

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ८ (ब) (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] उक्त अधिनियमाच्या कलम ८ (ब) (ब) अन्वये " सुधारणेची " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(३) कोणत्याही सदस्याने किंवा धनकोने पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आपल्या विकल्पाचा वापर केला नाही तर, त्याने बदल करण्यास संमती दिली आहे, असे समजण्यात येईल.

(४) संस्थेच्या दायित्वाचे स्वरूप किंवा व्याप्ती यात संस्थेच्या उपविधितील ज्या सुधारणेद्वारा यात बदल करण्यात आला असेल ती सुधारणा एकतर,–

(क) वर म्हटल्याप्रमाणे सर्व सदस्य व धनको यांनी अशा सुधारणेस संमती देईपर्यंत किंवा त्यांनी ती दिली आहे असे समजण्यात येईपर्यंत ; किंवा

(ख) जे सदस्य किंवा धनको पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या विकल्पांचा त्या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत वापर करतील त्यांचे सर्व दावे पूर्णतः भागविता येईपर्यंत किंवा त्यांची अन्यथा पूर्ती करण्यात येईपर्यंत,

नोंदविण्यात येणार नाही किंवा ती अंमलात येणार नाही.

संस्थांचे एकत्रीकरण, हस्तांतरण विभागणी किंवा रुपांतर.

१७. (१) संस्थेस निबंधकाच्या पूर्वमान्यतेने, त्या प्रयोजनासाठी भरविलेल्या विशेष किंवा सर्वसाधारण बैठकीस हजर असलेल्या व मत देणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांनी संमत केलेल्या ठरावाद्वारे पुढील निर्णय घेता येतील :–

(क) दुसऱ्या संस्थेशी एकत्रीकरण करणे ;

(ख) आपली मत्ता व दायित्वे पूर्णतः किंवा अंशतः इतर कोणत्याही संस्थेकडे हस्तांतरित करणे ;

(ग) दोन किंवा त्याहून अधिक संस्थांत आपली विभागणी करणे ; किंवा

(घ) संस्थेच्या इतर वर्गात स्वतःचे रुपांतर करणे :

परंतु वर सांगितल्याप्रमाणे असे कोणतेही एकत्रीकरण, हस्तांतरण, विभागणी किंवा रुपांतर यात संस्थेचे दायित्व इतर कोणत्याही संस्थेत हस्तांतरित करण्याचा अंतर्भाव होत असेल तेव्हा निबंधकांची पुढील गोष्टीबाबत खातरजमा झाल्याखेरीज तो अशा ठरावाद्वारे कोणताही आदेश देणार नाही.—

(एक) संस्थेने असा ठराव संमत केल्यानंतर तिचे सदस्य, धनको व ज्यांच्या हितासंबंधावर परिणाम होण्याचा संभव असेल अशा अन्य व्यक्ती (ज्यांचा या कलमात यापुढे " अन्य हितसंबंधी व्यक्ती " असा उल्लेख केला आहे) यांना विहित करण्यात येईल, त्या रीतीने नोटीस दिली आहे ; आणि अशा नोटिशीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कोणत्याही नवीन संस्थांचे सदस्य होण्याचा किंवा एकत्रीकृत किंवा रुपांतरीत संस्थेत आपले सदस्यत्व चालू ठेवण्याचा किंवा यथास्थिती, त्यांचे भाग, येणे रकमा किंवा हितसंबंध यांच्या रकमेची मागणी करण्याचा विकल्प त्यांना दिला आहे ;

(दोन) सर्व सदस्य व धनको आणि अन्य हितसंबंधी व्यक्ती यांनी त्या निर्णयास अनुमती दिली आहे किंवा कोणत्याही सदस्याने किंवा धनकोने किंवा कोणत्याही हितसंबंधी व्यक्तीने वर सांगितलेल्या आपल्या विकल्पाचा खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत वापर न केल्यामुळे त्या निर्णयास अनुमती दिल्याचे समजण्यात आले आहे ; आणि

(तीन) जे सदस्य व धनको आणि हितसंबंधी व्यक्ती विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत विकल्पाचा वापर करतील, त्यांचे सर्व दावे पूर्णतः भागवण्यात आले आहेत किंवा त्यांची अन्यथा पूर्ती करण्यात आली आहे.

(२) संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ किंवा भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ यात काहीही अंतर्भूत असेल तरी, विभागणी किंवा रुपांतर करण्यात येईल त्यावेळी नवीन संस्थांची किंवा यथास्थिति, रुपांतरीत संस्थांची नोंदणी आणि एकत्रीकरण होईल, त्याप्रसंगी एकत्रीकरण झाल्यावर, एकत्रीकरणाशी, संबंधित असलेल्या संस्थांचा ठराव प्रत्येक बाबतीत, मूळ संस्थेची किंवा एकत्रीकरण केलेल्या संस्थांची मत्ता व दायित्वे नव्या संस्थेत किंवा यथास्थिति, रुपांतरित किंवा एकत्रीकृत संस्थेमध्ये निहित होण्याबाबतचे पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असेल. १८८२ चा ४. १९०८ चा १६.

(३) संस्थांचे एकत्रीकरण केल्यामुळे, किंवा एखाद्या संस्थेच्या विभागणीमुळे किंवा रुपांतरामुळे अशा रीतीने एकत्रीकरण केलेल्या संस्थांचे किंवा अशा रीतीने, विभागणी किंवा रूपांतर केलेल्या संस्थेचे कोणतेही हक्क किंवा बंधन यावर परिणाम होणार नाही किंवा ज्याचे एकत्रीकरण, विभागणी किंवा रुपांतर करण्यात आले असेल, अशा संस्थांकडून किंवा संस्थांविरुद्ध जी न्यायिक कार्यवाही चालू ठेवण्यात किंवा सुरु करण्यात आली असेल अशी कोणतीही न्यायिक कार्यवाही सदोष ठरणार नाही आणि तदनुसार अशी न्यायिक कार्यवाही एकत्रीकृत संस्थेस किंवा यथास्थिति, रूपांतरित संस्थेस किंवा नव्या संस्थेस किंवा अशा संस्थेविरुद्ध चालू ठेवता येईल किंवा सुरू करता येईल.

(४) दोन किंवा अधिक संस्थांचे एकत्रीकरण करण्यात आले असेल किंवा एखाद्या संस्थेची विभागणी किंवा रुपांतर करण्यात आले असेल त्या बाबतीत अशा संस्थांची किंवा संस्थेची नोंदणी, एकत्रीकृत संस्थेची किंवा रुपांतरित संस्थांतरित संस्थांची किंवा संस्थांची विभागणी ज्या संस्थांत झाली असेल त्या नव्या संस्थांची नोंदणी ज्या दिनांकास करण्यात येईल त्या दिनांकास रद्द करण्यात येईल.

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने एकत्रीकरण, विभागाची पुनर्रचना करण्यासाठी निदेश देण्याचा अधिकार.

१८. (१) जर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने किंवा सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीने कोणत्याही संस्थेचे योग्य व्यवस्थापन साध्य करण्याच्या प्रयोजनासाठी दोन किंवा अधिक संस्थांचे एकत्रिकरण करणे किंवा कोणत्याही संस्थेच्या दोन किंवा अधिक संस्था बनवण्यासाठी विभागणी करणे किंवा त्या संस्थेची पुनर्रचना करणे आवश्यक आहे याबद्दल निबंधकाची खात्री होईल तर निकटपूर्वीच्या कलमात काहीही अंतर्भूत असेल तरी, परंतु या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून निबंधकास राज्य शासन राजपत्रातील अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे अधिसूचित करील त्या संघीय संस्थेशी विचारविनियम करुन त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी घटना, संपत्ती, हक्क, हितसंबंध व प्राधिकार आणि अशी दायित्वे, कर्तव्ये बंधने यांसह त्या संस्थांचे एकाच संस्थेत एकत्रीकरण किंवा अनेक संस्थांत विभागणी किंवा पुनर्रचना करण्याची तरतूद करता येईल.

(२) (क) प्रस्तावित आदेशाची एक प्रत मसुद्याच्या स्वरुपात संबंधित संस्थेस किंवा संबंधित संस्थापैकी प्रत्येक संस्थेस पाठविण्यात आली नसेल तर,

(ख) निबंधकाने आदेशाच्या मसुद्यात तो त्या बाबतीत निश्चित करील अशा (वर सांगितल्याप्रमाणे) संस्थेस आदेशाची प्रत ज्या दिनांकास मिळाली असेल त्या दिनांकापासून दोन महिन्यांपेक्षा कमी नसेल, इतक्या मुदतीत संस्थेकडून किंवा तिच्या कोणत्याही सदस्यांकडून किंवा सदस्यांच्या कोणत्याही वर्गाकडून किंवा कोणत्याही धनकोकडून किंवा धनकोंच्या वर्गाकडून त्याला ज्या कोणत्याही सूचना किंवा हरकती मिळाल्या असतील त्या सूचनांच्या किंवा हरकतींच्या दृष्टीने त्यास इष्ट वाटतील अशा फेरबदलाचा विचार केला नसेल व मसुद्यात त्याप्रमाणे फेरबदल केले नसतील तर ;

या कलमान्वये कोणताही आदेश देता कामा नये.

(३) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या आदेशात, निबंधकाच्या मते एकत्रीकरणाची, विभागणीची किंवा पुनर्रचनेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असतील अशा आनुषंगिक, परिणाम रुप व अनुपूरक तरतुदींचा समावेश करता येईल.

(४) ज्या संस्थेचे एकत्रीकरण, विभागणी किंवा पुनर्रचना करावयाची असेल त्या संस्थापैकी प्रत्येक संस्थेच्या ज्या सदस्यांने किंवा धनकोने [1] [किंवा हितसंबंधित असलेल्या अन्य व्यक्तीने ] एकत्रीकरणाच्या विभागणीच्या किंवा पुनर्रचनेच्या योजनेला विनिर्दिष्ट मुदतीत हरकत घेतली असेल अशा प्रत्येक सदस्याला किंवा धनकोला एकत्रीकरणाचा, विभागणीचा किंवा पुनर्रचनेचा आदेश काढल्यावर तो सदस्य असल्यास, त्याचा भाग किंवा हितसंबंध मिळण्याचा आणि तो धनको असल्यास, त्यास येणे रकमा परत मिळण्याचा हक्क असेल.

(५) पोट-कलम (१) खाली आदेश काढण्यात आल्यावर कलम १७ ची पोट-कलमे (२), (३) व (४) यांच्या तरतुदी अशा रीतीने एकत्रीकरण, विभागणी किंवा पुनर्रचना केलेल्या संस्थांस जणू काही अशा संस्थांचे त्या कलमान्वये एकत्रीकरण, विभागणी किंवा पुनर्रचना करण्यात आली असल्याप्रमाणे लागू होतील, तसेच ते एकत्रीकरण, विभागणी किंवा पुनर्रचना केलेल्या संस्थेला सुद्धा लागू होतील

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ९ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[१] [ (६) या कलमात अंतर्भूत असलेला कोणताही मजकूर [२] [दोन किंवा अधिक सहकारी बँकांच्या किंवा दोन किंवा अधिक प्राथमिक कृषि पत्त संस्थांच्या एकत्रीकरणास लागू होणार नाही.] .]

सहकारी बँकाचे एकत्रीकरण.

[३] [ १८ क. (१) लोकहितासाठी किंवा एका किंवा अधिक सहकारी बँकांचे योग्य व्यवस्थापन साध्य करण्यासाठी अशा दोन किंवा अधिक बँकांचे एकत्रीकरण करणे आवश्यक आहे, अशी निबंधकाची खात्री झाल्यास, कलम १७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी त्यास राज्य शासन राजपत्रात अधिसूचित करील, अशा संघीय संस्थेशी किंवा अन्य प्राधिकरणांशी विचारविनिमय केल्यानंतर, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी घटना, संपत्ती, हक्क, हितसंबध व प्राधिकार अशी दायित्वे, कर्तव्ये व बंधने यांच्यासह त्या बँकांचे एका बँकेत एकत्रीकरण करण्याची आदेशाद्वारे तरतूद करता येईल. एकत्रीकरण करावयाच्या बँकेत किंवा तिच्या विरूद्ध सदस्य, ठेवीदार, धनको, कर्मचारी व इतर व्यक्ती यांचे हितसंबंध किंवा हक्क, निबंधकाला ज्या बँकेचा व्यवहार चालविण्यासाठी त्याला अशा व्यक्तींच्या हितांच्या दृष्टीने आवश्यक वाटेल अशा मर्यादेपर्यंत, अशा बँकेच्या मतांचे त्यांच्या दायित्वाशी असलेले प्रमाण विचारात घेऊन कमी करण्याची तरतूद अशा आदेशात करता येईल. अशा आदेशात निबंधकाच्या मते बँकांचे एकत्रीकरण अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा अनुषंगिक, परिणामरुप व अनुपूरक तरतुदीसुद्धा समाविष्ट असू शकतील.

(२) (क) संबंधित बँकांपैकी प्रत्येक बँकेला प्रस्तावित आदेशाच्या मसुद्याची प्रत पाठविण्यात आल्याखेरीज,

(ख) एकतर बँकाकडून किंवा कोणतेही सदस्य, ठेवीदार, धनको, कर्मचारी किंवा अन्य संबंधित व्यक्ती यांच्याकडून त्या बाबतीत निबंधकाने नियत केलेल्या कालावधीत (त्या प्रस्तावित आदेशाची प्रत बँकांना मिळाल्यापासून दिनांकापासून दोन महिन्यांच्या आतील नसावा) मिळालेल्या सूचना किंवा आक्षेप विचारात घेऊन निबंधकाने आदेशाच्या मसुद्यात, त्याला करणे इष्ट वाटतील असे फेरफार केल्याखेरीज,

पोट-कलम (१) अन्वये कोणतेही आदेश काढण्यात येणार नाहीत.

(३) पोट-कलम (१) अन्वये आदेश काढल्यावर या अधिनियमात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही संविदेत, निवाड्यात किंवा अन्य लेखात काहीही अंतर्भूत असले तरी त्यांच्या तरतुदी, सर्व बँका व सर्व किंवा कोणत्याही बँकेच्या संबंधातील कोणतेही अधिकार, मत्ता किंवा दायित्व असणारे त्यांचे सदस्य, ठेवीदार; धनको, कर्मचारी व अन्य व्यक्ती यांच्यावर बंधनकारक असतील.

(४) संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ किंवा नोंदणी अधिनियम, १९०८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पोट-कलम (१) अन्वये काढलेला आदेश हा, त्या आदेशात तरतूद केल्याप्रमाणे संबंधित बँकांचे हक्क, मत्ता व दायित्व यांच्या हस्तांतरणासाठी किंवा ते निहित करण्यासाठी पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असेल.

१८८२ चा ४. १९०८ चा १६.

(५) या कलमान्वये बँकांचे एकत्रीकरण करण्यात आल्यामुळे अशा प्रकारे एकत्रीकरण झालेल्या बँकांच्या कोणत्याही हक्कावर किंवा बंधनांवर परिणाम होणार नाही किंवा अशा कोणत्याही बँकेने किंवा त्या बँकेविरुद्ध जी चालू असेल किंवा जी सुरु करण्यात आली असेल अशी कोणतीही न्यायिक कार्यवाही त्यामुळे सदोष होणार नाही, आणि त्यानुसार अशी न्यायिक कार्यवाही एकत्रीकरण झालेल्या बँकेद्वारे किंवा तिच्याविरुद्ध चालू ठेवता येईल किंवा सुरू करता येईल.

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वये पोट-कलम (६) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम २ अन्वये " दोन किंवा त्यापेक्षा अधिक सहकारी बँका " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३ अन्वये कलम १८ क समाविष्ट करण्यात आले.

(६) जेव्हा दोन किंवा अधिक बँकांचे एकत्रीकरण करण्यात आले असेल तेव्हा, ज्या बँकेशी इतर बँकांचे एकत्रीकरण झालेले असेल, तिची नोंदणी कायम ठेवता येईल व इतर बँकाची नोंदणी रद्द करता येईल किंवा एकत्रीकरण झालेल्या बँकेची नव्याने नोंदणी केलेली असेल त्या बाबतीत एकत्रीकरण होणाऱ्या इतर सर्व बँकांची नोंदणी रद्द केली जाईल.

(७) निबंधकाने या कलमान्वये काढलेला आदेश हा अंतिम व निर्णायक असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेता येणार नाही. ]

[१][१८ ख. (१) (क) एका किंवा अधिक प्राथमिक कृषि पत संस्थांच्या आर्थिक वर्धनक्षमतेबद्दल खात्री करून घेण्यासाठी ; प्राथमिक कृषि पत-संस्थांचे एकत्रीकरण.

(ख) कोणत्याही क्षेत्रातील अशा संस्थांच्या अधिकारितेची परस्परव्याप्ती किंवा त्यामधील संघर्ष टाळण्यासाठी,

(ग) अशा एका किंवा अधिक संस्थांच्या योग्य व्यवस्थापनासाठी,

(घ) संपूर्ण राज्यातील पताविषयक संरचनेच्या किंवा सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीने,

(ङ) ठेवीदारांच्या हिताचा दृष्टींने, किंवा

(च) सार्वजनिक हितार्थ अन्य कोणत्याही कारणासाठी,

दोन किंवा अधिक प्राथमिक कृषि पत संस्थांचे एकत्रीकरण करणे अत्यावश्यक असल्याबद्दल निबंधकाची खात्री होईल त्याबाबतीत, कलम १७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निबंधकास राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे या बाबतीत अधिसूचित करण्यात येईल अशा संघीय संस्थेबरोबर किंवा अन्य प्राधिकरणाबरोबर विचारविनिमय केल्यानंतर, त्या संस्थांचे एकाच संस्थेमध्ये एकत्रीकरण करण्यासाठी तरतूद करता येईल. एकत्रीकरण केलेल्या संस्थेची घटना, संपत्ती, हक्क, हितसंबंध आणि प्राधिकार व दायित्वे, कर्तव्ये व बंधने ही आदेशामध्ये विनिर्दिष्ट करता येतील त्याप्रमाणे असतील. एकत्रीकरण करावयाच्या संस्थेमध्ये किंवा तिच्याविरूध्द सदस्य, ठेवीदार, धनको, कर्मचारी आणि इतर व्यक्ती यांचे जे हितसंबंध व अधिकार असतील ते, निबंधकास, अशा संस्थेच्या मत्तांचे तिच्या दायित्वाशी असलेले प्रमाण यथोचितरीत्या विचारात घेऊन त्या संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी अशा व्यक्तिंच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक वाटेल अशा मर्यादेपर्यंत कमी करण्यासाठी, अशा आदेशामध्ये तरतूद करता येईल. अशा आदेशात, संस्थांचे एकत्रीकरण अंमलात आणण्यासाठी निबंधकाच्या मते ज्या आवश्यक असतील अशा आनुषंगिक परिणामरूप व अनुपूरक तरतुदी असतील ;

(२) (क) प्रस्तावित आदेशाच्या मसुद्याची प्रत संबंधित संस्थांपैकी प्रत्येक संस्थेकडे पाठविण्यात आल्या-खेरीज ;

(ख) निबंधकाने आदेशाचा मसुदा विचारात घेतल्याखेरीज व तो त्या बाबतीत निश्चित करील अशा कालावधीमध्ये (जो प्रस्तावित आदेशाची प्रत संस्थांना मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यापेक्षा कमी नसेल) संस्थांकडून किंवा कोणतेही सदस्य, ठेवीदार, धनको, कर्मचारी किंवा इतर संबंधित व्यक्ती यांच्याकडून निबंधकाला मिळतील, अशा कोणत्याही सूचना किंवा आक्षेप विचारात घेऊन, त्याला करणे इष्ट वाटतील असे फेरबदल त्याने आदेशाच्या मसुद्यामध्ये केल्याखेरीज.

पोट-कलम (१) खाली कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(३) पोटकलम (१) खाली निबंधकाने कोणताही आदेश दिला असेल अशा बाबतीत, कलम १८ क ची पोटकलमे (३) ते (७), (दोन्ही धरून) च्या तरतुदी, निबंधकाने त्या कलमाच्या पोट-कलम (१) खाली केलेल्या कोणत्याही आदेशास त्या ज्याप्रमाणे लागू होतात, त्याचप्रमाणे त्या योग्य त्या फेरफारांसह अशा आदेशास लागू होतील.]

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३ अन्वये, कलम १८ ख समाविष्ट करण्यात आले.

संस्था ज्या स्थानिक क्षेत्रात कार्य करतात त्या क्षेत्रात फेरफार करण्यात आल्यामुळे त्या संस्थांची पुर्नरचना करणे

[1][१८ ग. (१) कोणत्याही संस्थेचे किंवा संस्थांचे कार्यक्षेत्र कोणताही जिल्हा, तालुका, नगरपालिका क्षेत्र किंवा कोणतेही अन्य स्थानिक क्षेत्र यापुरते निर्बंधित असेल आणि असे क्षेत्र त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये दोन किंवा अधिक क्षेत्रात विभागण्यात आलेले असेल किंवा ते कोणत्याही अन्य क्षेत्रात विलीन करण्यात आलेले असेल किंवा ते कमी करण्यात किंवा ते वाढविण्यात आलेले असेल किंवा अन्यथा त्यात फेरफार करण्यात आलेला असेल आणि लोकहिताच्या दृष्टीने किंवा सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीने किंवा एका किंवा अनेक संस्थांच्या हितार्थ किंवा प्रत्येक क्षेत्रातील संस्थांसाठी कार्यक्षेत्राचे योग्य प्रकारे सीमांकन करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही अशा संस्थेची किंवा संस्थांची पुनर्रचना करणे आवश्यक आहे याबद्दल राज्य शासनाची खात्री झालेली असेल तर, राज्य शासनास राजपत्रात आदेश प्रसिध्द करून आणि त्यास योग्य वाटेल अशा अन्य रीतीने प्रादेशिक बदलाचा परिणाम झालेल्या कोणत्याही विद्यमान संस्थेची दोन किंवा अधिक संस्थांत विभागणी करण्यासाठी दोन किंवा अधिक विद्यमान संस्थांचे एकाच संस्थेत एकत्रीकरण करण्यासाठी, कोणत्याही विद्यमान संस्थेचे विसर्जन करण्यासाठी किंवा कोणत्याही विद्यमान संस्थेची पुनर्रचना करण्यासाठी तरतूद करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशाद्वारे पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईलः-

(क) विद्यमान संस्थेची दोन किंवा अधिक संस्थांत विभागणी आणि प्रत्येक संस्थेचे कार्यक्षेत्र ;

(ख) दोन किंवा अधिक विद्यमान संस्थांचे एकाच संस्थेत एकत्रीकरण आणि तिचे कार्यक्षेत्र ;

(ग) कोणत्याही विद्यमान संस्थेचे विसर्जन ;

(घ) कोणत्याही विद्यमान संस्थेची पुनर्रचना आणि तिचे कार्यक्षेत्र ;

(ङ) कोणत्याही विद्यमान संस्थेच्या समितीला काढून टाकणे आणि विद्यमान संस्थेची किंवा नव्या संस्थेची किंवा संस्थांची कामे पाहण्यासाठी राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली व निदेशाखाली आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दोन वर्षापेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीसाठी किंवा संबंधित संस्थेची उत्तराधिकारी समिती रीतसर स्थापन होईपर्यंत, यापैकी जी अगोदरची असेल त्या कालावधीपर्यंत एका प्रशासकाची किंवा अंतरिम व्यवस्थापन समितीची नेमणूक करणे :

[2][परंतु, राज्य शासनाला वेळोवेळी दोन वर्षाच्या कालावधीत वाढ करता येईल ; तथापि, असा एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा जास्त असणार नाही ;]:

[3][परंतु, आणखी असे की, प्रशासकाचा किंवा अंतरिम व्यवस्थापन समितीचा किंवा अशा समितीच्या कोणत्याही किंवा सर्व सदस्यांचा पदावधी किंवा वाढलेला पदावधी समाप्त झालेला नसला तरीसुध्दा राज्य शासन त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे वेळोवेळी उक्त कालावधीमध्ये किंवा वाढविलेल्या कालावधीमध्ये आणि कोणतेही कारण असल्यास, त्याकरिता कोणत्याही अन्य प्रशासकाच्या किंवा अंतरिम व्यवस्थापन समितीच्या किंवा अशा समितीच्या कोणत्याही किंवा सर्व सदस्यांच्या बाबतीत फेरबदल करण्यास आणि नियुक्ती करण्यास सक्षम राहील.]

(च) विद्यमान संघीय संस्थेच्या बाबतीत, तिच्या सदस्य संस्थापैकी कोणत्याही संस्थेची,आदेशात नामित केलेल्या दुसऱ्या संघीय संस्थेचे सदस्य म्हणून बदली करणे ;

(छ) कोणत्याही विद्यमान संस्थेच्या मत्ता, हक्क व दायित्वे, तिने केलेल्या कोणत्याही संविदेतील हक्क व दायित्वे यांसह त्याचे एका किंवा अधिक संस्थांकडे पूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरण करणे आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्ती ;

---

[1] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये कलम १८ ग समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[3] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३ अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(ज) विद्यमान संस्था ज्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत किंवा कोणत्याही अधिकाऱ्यापुढे किंवा प्राधिकरणापुढे अनिर्णीत असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत पक्षकार असेल, त्या कार्यवाहीत पक्षकार म्हणून, विद्यमान संस्थेच्या जागी अशी हस्तांतरिती संस्था दाखल करणे किंवा अशी कोणतीही हस्तांतरिती संस्था जादा दाखल करणे आणि विद्यमान संस्थेपुढे किंवा तिच्या अधिकाऱ्यापुढे किंवा प्राधिकाऱ्यापुढे अनिर्णीत असलेली कोणतीही कार्यवाही अशा कोणत्याही हस्तांतरिती संस्थेकडे किंवा तिच्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित करणे ;

(झ) विद्यमान संस्थेचे कोणतेही कर्मचारी अशा हस्तांतरित संस्थेकडे हस्तांतरित करणे किंवा अशा हस्तांतरित संस्थेकडून त्यांची पुन्हा नेमणूक करणे आणि अशा हस्तांतरणानंतर किंवा पुन्हा नेमणूक केल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या अटी आणि शर्ती ;

परंतु, अशा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या अटी आणि शर्ती या विद्यमान संस्थेच्या सेवेत असताना त्याला लागू असणाऱ्या अटी व शर्तीपेक्षा राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय कमी अनुकूल असणार नाहीत ;

(ञ) विद्यमान संस्थेचे उपविधी कोणताही फेरबदल न करता किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरबदलांसह एका किंवा अधिक संस्थाना लागू करणे ;

(ट) या कलमाखाली काढलेला आदेश अमलात आणण्यासाठी इष्ट किंवा आवश्यक अशा सर्व आनुषंगिक परिणामरुप व अनुपूरक बाबी.

१८८२ चा ४, १९०८ चा १६. (३) संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ किंवा नोंदणी अधिनियम, १९०८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखाली काढलेला आदेश हा, आदेशात तरतूद केलेल्या विद्यमान संस्थेच्या मत्ता, हक्क व दायित्वे यांच्या हस्तांतरणासाठी पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असेल.

(४) राज्य शासनाने या कलमाखाली काढलेला कोणताही आदेश अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

(५) या कलमाद्वारे किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीजकरून, या अधिनियमाच्या व त्याखाली केलेले नियम व आदेश यांच्या तरतुदी इतर सर्व बाबतीत विद्यमान संस्थांना व या कलमाखाली रचना केलेल्या नव्या किंवा पुनर्रचित संस्थाना लागू होतील.]

१९. (क) एखादी संस्था व तिचे धनको यांच्यामध्ये, किंवा संस्थाची

(ख) एखादी संस्था किंवा तिचे सदस्य यांच्यामध्ये, पुनर्रचना.

तडजोड किंवा व्यवस्था करण्याचा प्रस्ताव त्या प्रयोजनासाठी बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण बैठकीत मान्य करण्यात आला असेल तेथे, निबंधकास संस्थेने किंवा संस्थेच्या कोणत्याही सदस्याने किंवा कोणत्याही धनकोने किंवा समापित करण्यात येत असेल अशा संस्थेच्या बाबतीत परिसमापकाने अर्ज केल्यावर, विहित केलेल्या रीतीने संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देता येईल.

२०. (१) कोणत्याही दोन किंवा अधिक संस्थांना, निबंधकाच्या पूर्वमान्यतेने व अशा प्रत्येक संस्थेच्या संस्थाची सर्वसाधारण बैठकीत हजर असलेल्या व मत देणाऱ्या सदस्यांपैकी तीनचतुर्थांश सदस्यांच्या बहुमताने संमत भागीदारी. केलेल्या ठरावाद्वारे कोणताही विशिष्ट धंदा किंवा कोणतेही विशिष्ट धंदे चालविण्यासाठी भागीदारीचा करार करता येईल. परंतु, प्रत्येक सदस्यास ठरावाची व बैठकीच्या दिनांकाची पूर्ण दहा दिवसांची लेखी नोटीस मिळेल :

[1][परंतु, ज्या संस्थेने भाग भांडवल, कर्ज किंवा हमी या स्वरुपात शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य घेतलेले नसेल अशा संस्थेच्या बाबतीत अशी भागीदारी करण्यासाठी, निबंधकाच्या पूर्वमान्यतेची आवश्यकता असणार नाही.]

[1] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २ अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

(२) भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ यातील कोणतीही गोष्ट अशा भागीदारीस लागू होणार नाही. १९३२ चा ९.

संस्थाकडून सहयोग.

[१][२० क. (१) कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांना औद्योगिक गुंतवणूक, वित्तीय सहाय्य अथवा पणन व व्यवस्थापन तज्ञसेवा यासुध्दा कोणताही विशिष्ट धंदा किंवा धंदे चालविण्यासाठी कोणत्याही शासकीय उपक्रमाशी किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही उपक्रमाशी राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने [२][आणि राज्य शासन लादील अशा अटी आणि शर्ती यांना अधीन राहून व विहित करील अशा रीतीने] सहयोग करता येईल.

(२) पोट-कलम (१) खाली कोणत्याही संस्थेकडून किंवा कोणत्याही संस्थांकडून केल्या जाणाऱ्या सहयोगाच्या परियोजनेस मान्यता देण्यापूर्वी राज्य शासन पुढील गोष्टींचा यथायोग्य विचार करील :—

(क) परियोजना आर्थिकदृष्ट्या स्वयंनिर्वाही आहे किंवा कसे;

(ख) संबंधित संस्थेच्या किंवा संस्थांच्या सहकारी स्वरूपाला कोणत्याही प्रकारे बाध न येता, परियोजनेची अंमलबजावणी करता येते किंवा कसे;

(ग) ती परियोजना संबंधित संस्थेच्या किंवा संस्थांच्या सदस्यांच्या हितास पोषक आहे काय किंवा ती सार्वजनिक हिताची आहे काय आणि एकंदरीत सहकारी चळवळीला हितकारक आहे किंवा कसे :

[३][परंतु, ज्या संस्थेने भागभांडवल, कर्ज किंवा हमी या स्वरूपात, शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य घेतलेले नसेल अशा संस्थेच्या बाबतीत राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता असणार नाही आणि अशा संस्थेच्या बाबतीत पोट-कलम (२) च्या खंड (क), (ख) आणि (ग) यांमध्ये निर्धारित केलेल्या आवश्यकतांची परिपूर्ती केलेली असेल तर अशा संस्थेस, तिच्या सर्वसदस्य मंडळाच्या पूर्वमान्यतेने, कोणत्याही उपक्रमाशी सहयोग करता येईल.]

नोंदणी रद्द करणे.

**२१.** जर एखादी संस्था आपली संपूर्ण मत्ता व दायित्वे दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरित करीत असेल किंवा दुसऱ्या संस्थेशी तिचे एकत्रीकरण होत असेल किंवा तिची दोन किंवा अधिक संस्थांत विभागणी होत असेल किंवा जर तिचा व्यवहार समर्पित करण्यात आला असेल [४][किंवा कलम २१ क पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये तिची नोंदणी रद्द करण्यात आली असेल] [५][किंवा कलम १०९ खाली अशा संस्थेचा व्यवहार समर्पित करण्याची कार्यवाही बंद किंवा समाप्त करण्यात आली असेल.]

[६][* * * *]

तर निबंधक त्या संस्थेची नोंदणी रद्द करणारा आदेश देईल. अशा नोंदणी रद्द करण्याबाबतचा आदेश ज्या दिनांकास देण्यात आला असेल, त्या दिनांकापासून संस्थेचे विसर्जन झाले आहे, असे समजण्यात येईल व ती निगमनिकाय असण्याचे बंद होईल.

संस्थाची नोंदणी रद्द करणे.

[७][२१ क. (१) अर्जदारांनी केलेल्या अपवेदनावरून एखाद्या संस्थेची नोंदणी करण्यात आलेली आहे याबाबत निबंधकाची खात्री झाली असेल तर, अथवा संस्थेचे काम पूर्ण झालेले असेल किंवा संपलेले असेल, अथवा ज्या प्रयोजनासाठी संस्थेची नोंदणी करण्यात आली असेल ती प्रयोजने साध्य होत नसतील तर, तो संस्थेच्या मुख्य प्रर्वतकाला, समितीला व तिच्या सदस्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर संस्थेची नोंदणी रद्द करु शकेल :

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १० अन्वये कलम २० क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, याच्या कलम ३ अन्वये हे परंतुक ज्यादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ५ अन्वये " किंवा तिने आपल्या नोंदणीनंतर" या शब्दाने सुरू होणारा व "नोंदणी रद्द केल्यापासून" या शब्दाने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ११ अन्वये कलम २१ क समाविष्ट करण्यात आले.

परंतु, संस्थेची सदस्यसंख्या फार मोठी असेल आणि निबंधकाच्या कार्यालयातील अभिलेखांवरून अशा सर्व सदस्यांचे अचुक पत्ते मिळविणे शक्य नसेल व निबंधकाच्या मते एकेका सदस्यांवर सुनावणीची नोटीस बजावणे व्यवहार्य नसेल त्याबाबतीत (संस्थेची) नोंदणी रद्द करण्याबाबतच्या कार्यवाहीची एक जाहीर नोटीस विहितरीतीने देण्यात येईल आणि अशी नोटीस हीच मुख्य प्रवर्तक व संस्थेच्या समितीचे सदस्य यांच्यासह सर्व सदस्यांना देण्यात आलेली नोटीस आहे, असे मानण्यात येईल आणि अशा कोणत्याही सदस्यांवर स्वतंत्र नोटीस बजावण्यात आलेली नाही, एवढ्याच केवळ कारणांवरून संस्थेची नोंदणी रद्द करण्याबाबतच्या कोणत्याही कार्यवाहीस कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार एखाद्या संस्थेची नोंदणी रद्द करण्यात आलेली असेल त्या बाबतीत निबंधकास या अधिनियमात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, परिस्थितीनुसार आवश्यक असतील असे, शासकीय अभिहस्तांकितीच्या नेमणुकीसह आनुषंगिक परिणामरूप आदेश काढता येतील.

(३) या कलमाखाली केलेल्या नियमांना अधीन राहून शासकीय अभिहस्तांकिती, त्याची संपत्ती, मत्ता, पुस्तके, अभिलेख किंवा अन्य दस्तऐवज ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत मत्तेचे रोखीत रूपांतर करील आणि दायित्वे समापित करील, आणि हा कालावधी निबंधकाला स्वविवेकानुसार वेळोवेळी वाढविता येईल ; तथापि एकूण कालावधी सर्व मिळून तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(४) शासकीय अभिहस्तांकितीला विहित करण्यात येईल इतके पारिश्रमिक आणि भत्ते देण्यात येतील; आणि त्याला विहित पारिश्रमिक किंवा भत्ते यांव्यतिरिक्त अन्य कोणतेही पारिश्रमिक किंवा भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही.

(५) [१][सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या दर्जाहून कमी दर्जा असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला] पोट-कलम (१) व (२) खाली निबंधकाला असणारे अधिकार वापरता येणार नाहीत.]

प्रकरण तीन

## सदस्य आणि त्यांचे हक्क व दायित्वे

**२२.** (१) कलम २४ च्या तरतुदीस अधीन राहून पुढील व्यक्ती व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात येणार नाही. जिला सदस्य होता येईल अशी व्यक्ती.

१८७२ चा ९. (क) भारतीय संविदा अधिनियम, १८७२ अन्वये संविदा करण्यास सक्षम असेल अशी व्यक्ती ;

१८६० चा २१. (ख) भागीदारी संस्था, कंपनी किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना केलेला कोणताही इतर निगमनिकाय किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० या अन्वये नोंदलेली संस्था;

(ग) या अधिनियमान्वये नोंद केलेली किंवा नोंदण्यात आल्याचे समजण्यात येणारी संस्था;

[२][ (घ) राज्य शासन किंवा केंद्र शासन;]

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६ अन्वये मुळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (घ) दाखल करण्यात आला.

(ङ) स्थानिक प्राधिकरण ;

(च) सावर्जनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी करण्याच्या संबंधात त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये नोंदवलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था :

परंतु खंड (क) च्या तरतुदी, केवळ एखाद्या शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी बनविलेल्या संस्थेत दाखल होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीस लागू होणार नाहीत :

परंतु आणखी असे की, राज्य शासन सामान्य किंवा विशेष आदेशाव्दारे घालून देईल अशा अटींना व शर्तींना अधीन राहून एखाद्या भागीदारी संस्थेस किंवा कंपनीस फक्त संघीय किंवा नागरी संस्था असलेल्या किंवा औद्योगिक उपक्रम चालविणाऱ्या किंवा चालविण्याचा उद्देश असलेल्या संस्थेलाच सदस्य म्हणून दाखल करून घेता येईल :

परंतु तसेच, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी जी भागीदारी संस्था किंवा कंपनी ही या अधिनियमान्वये नोंदण्यात आली आहे, असे मानण्यात येणाऱ्या संस्थेची सदस्य असेल, अशा कोणत्याही भागीदारी संस्थेस किंवा कंपनीस या अधिनियमाच्या इतर तरतुदीस अधीन राहून अधिनियमाच्या प्रारंभी व त्यानंतर असे सदस्य म्हणून राहण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण**:—या कलमाच्या प्रयोजनासाठी " नागरी संस्था " या संज्ञेचा अर्थ, ज्या संस्थेचा धंदा मुख्यत्वेकरून महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या कटक क्षेत्राच्या किंवा अधिसूचित क्षेत्र समितीच्या हद्दीत चालतो ती संस्था असा होतो.

[1][ (१ क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या हितसंबंधाचा कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या उद्दिष्टांशी संघर्ष येत आहे किंवा येण्याचा संभव आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन राज्य शासनास राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या सामान्य किंवा विशेष आदेशाव्दारे असे जाहिर करता येईल की, कोणताही व्यवसाय अथवा धंदा करणाऱ्या किंवा चालविणाऱ्या किंवा नोकरी करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला जोपर्यंत अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती, असा व्यवसाय किंवा धंदा करीत अथवा चालवीत असतील किंवा यथास्थिती, नोकरी करीत असतील तोपर्यंत, त्या अशा कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेचा किंवा संस्थांच्या वर्गाचा सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास किंवा चालू राहण्यास अनर्ह असतील किंवा अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या केवळ मर्यादित सदस्यत्वास त्या पात्र राहतील, [2][ एखादी व्यक्ती या प्रमाणे कोणताही पेशा, धंदा किंवा यथास्थिति, नोकरी करीत आहे किंवा व्यवसाय, धंदा चालवीत आहे किंवा काय अथवा एखादी व्यक्ती या पोट-कलमाखाली घोषित करण्यात आली असेल अशा व्यक्तिवर्गापैकी आहे किंवा नाही आणि या पोट-कलमाखाली तिला निरर्हता प्राप्त झाली आहे किंवा नाही, या प्रश्नांचा निर्णय कलम ११ खाली निबंधक करील.]

[3][ (१ ख) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१क) खाली एखाद्या व्यक्तीला निरर्हता आली आहे, असा निर्णय निबंधकाने कलम ११ खाली दिलेला असेल, त्याबाबतीत अशा व्यक्तीला निबंधक किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेली, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती, आदेशाव्दारे सदस्यत्वातून दूर करू शकेल आणि अशी व्यक्ती तिला असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचा कालावधी संपल्यावर त्या संस्थेचा सदस्य असण्याचे बंद होईल.]

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ (ब) अन्वये पोट-कलम (१ क) समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १२ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) अन्वये पोट-कलम (१ख) हे समाविष्ट करण्यात आले.

(२) एखाद्या व्यक्तीस संस्थेचा सदस्य म्हणून [1][दाखल करून घेण्यात आले असेल] तर त्याबाबतीत असा निर्णय (त्यांच्या कारणांसह), त्या व्यक्तीस निर्णयाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा [2][नाव दाखल करुन घेण्यासाठी केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत, यांपैकी जो अवधी अगोदरचा असेल त्या अवधीत कळविण्यात येईल.जर असा अर्ज मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत संस्थेने अर्जदाराला कोणताही निर्णय कळविला नाही तर अर्जदाराला संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. [3][एखादी व्यक्ती मानीव सदस्य झाली आहे किंवा नाही याबाबत कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास सर्व संबंधित व्यक्तींना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर निबंधकाकडून त्याबाबत निर्णय दिला जाईल.]

२३. (१) कोणत्याही संस्थेने पुरेशा कारणावाचून हा अधिनियम व संस्थेचे उपविधि यांच्या तरतुदीन्वये यथोचितरीत्या अर्ह असलेल्या कोणत्याही व्यक्तीस सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास नकार देता कामा नये. सदस्यत्व खुले असणे.

[4][(१क) एखाद्या पात्र व्यक्तींने तिला सदस्य म्हणून दाखल करून घेण्यासाठी केलेला अर्ज किंवा तिने सदस्यत्वाच्या संबंधात भरलेली रक्कम स्वीकारण्यास एखाद्या संस्थेने नकार दिला असेल, त्या बाबतीत अशा व्यक्तीला, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात सदस्यत्वासंबंधीच्या कोणत्याही रकमेसह निबंधकाकडे अर्ज सादर करता येईल, आणि निबंधक तो अर्ज आणि याप्रमाणे कोणतीही रक्कम दिलेली असल्यास ती रक्कम, असा अर्ज आणि ती रक्कम मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत संबंधित संस्थेकडे पाठवील आणि लागोलाग संस्थेकडे असा अर्ज व रक्कम मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत संस्थेने अर्जदाराला कोणताही निर्णय कळविला नाही तर तो अर्जदार अशा संस्थेचा सदस्य झाला असल्याचे मानण्यात येईल. [5][एखादी व्यक्ती मानीव सदस्य झाली आहे किंवा नाही याबाबत कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास सर्व संबंधित व्यक्तींना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर निबंधकांकडून त्याबाबत निर्णय दिला जाईल.]

(२) सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास नकार देणाऱ्या एखाद्या संस्थेच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस निबंधकाकडे अपील करता येईल. [6][निबंधक, असे प्रत्येक अपील शक्यतोवर ते मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत निकालात काढील :

परंतु, तीन महिन्यांच्या उक्त कालावधीच्या आत असे अपील या प्रमाणे निकालात काढण्यात आले नाही तर निबंधक विलंबाची कारणे नमूद करील.]

(३) निबंधकाने अपिलावर दिलेला निर्णय अंतिम असेल आणि तो आपला निर्णय अशा निर्णयाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत संबंधित व्यक्तींना कळवील.

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १२(क) अन्वये "दाखल करून घेण्यास नकार देण्यात आला असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ (क) अन्वये "दाखल करून घेण्यासाठी केलेल्या अर्जाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, यापैकी जी अगोदरची असेल त्या मुदतीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ३ व्दारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १३ (अ) व्दारे पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ४ व्दारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[6] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १३ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][(४) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींना बाधा न येता ज्या संस्थेकरिता, राज्य शासनाने किंवा निबंधकाने एखादे परिमंडल किंवा कार्यक्षेत्र निश्चित केले आहे, अशा कृषी प्रक्रिया संस्थांच्या किंवा अशा अन्य कोणत्याही संस्थेच्या बाबतीत्, तशा संस्थेने तिच्याकडे अर्ज करण्यात आल्यानंतर यथास्थिति, त्या परिमंडलामधील किंवा कार्यक्षेत्रातील प्रत्येक अर्ह व्यक्तीला, अशा व्यक्तींची त्या परिमंडलामध्ये किंवा कार्यक्षेत्रामध्ये अशा अन्य कोणत्याही संस्थेचा सदस्य म्हणून पूर्वीच नोंदणी झालेली नसेल तर, अशा संस्थेचा सदस्य म्हणून प्रवेश देणे तिच्यावर बंधनकारक राहील.]

नाममात्र सदस्य, सहयोगी सदस्य व हितैशी सदस्य.

**२४.** (१) कलम २२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संस्थेस कोणत्याही व्यक्तीस नाममात्र सदस्य, सहयोगी सदस्य किंवा हितैषी सदस्य म्हणून दाखल करुन घेता येईल.

(२) नाममात्र सदस्यास किंवा हितैषी सदस्यास, असा सदस्य म्हणून संस्थेच्या नफ्यात किंवा मत्तेत कोणत्याही स्वरूपात कोणताही भाग मिळण्याचा हक्क असणार नाही. नाममात्र सदस्यास किंवा हितैषी सदस्यास सर्वसाधारणपणे सदस्यांच्या विशेषाधिकारांपैकी व हक्कांपैकी कोणताही विशेषाधिकार व हक्क असणार नाही. परंतु अशा सदस्यास किंवा सहयोगी सदस्यास कलम २७, पोट-कलम (८) च्या तरतुदींना अधीन राहून संस्थेच्या उपविधित विनिर्दिष्ट करण्यात येतील असे, सदस्यांचे विशेषाधिकार व हक्क असतील आणि तो अशा दायित्वांच्या अधीन राहील.

सदस्यत्व बंद होणे.

**२५.** एखाद्या व्यक्तीने, संस्थेच्या सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा स्वीकारण्यात आल्यावर किंवा संस्थेतील तिचा संपूर्ण भाग किंवा हितसंबंध दुसऱ्या सदस्याकडे हस्तांतरीत करण्यात आल्यावर किंवा ती मरण पावल्यावर किंवा तिला संस्थेतून दूर करण्यात किंवा काढून टाकण्यात आल्यावर [२][ किंवा एखादी भागीदारी संस्था, कंपनी, अन्य कोणताही निगम निकाय, संस्था किंवा विश्वस्तव्यवस्था सदस्य असेल त्याबाबतीत त्याचे विसर्जन झाल्यावर किंवा त्यांचे अस्तित्व संपुष्टात आल्यावर] ती संस्थेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

सदस्य नोंदवहीतून सदस्यांची नावे काढून टाकणे.

[३][**२५ क.** जी व्यक्ती सदस्य असण्याचे बंद झाले असेल अथवा या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये किंवा त्यानुसार सदस्य असण्यास किंवा चालू राहण्यास निरर्ह ठरली असेल, अशा व्यक्तींचे नाव संस्थेची समिति आपल्या सदस्य नोंदवहीतून काढून टाकील ;

परंतु, जर संस्थेने या कलमाच्या गरजा पूर्ण केल्या नाहीत तर, निबंधक अशा संस्थेला अशा व्यक्तीचे नाव काढून टाकण्याचा निदेश देईल आणि अशा निदेशाचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.]

देय रकमा भरीपर्यंत सदस्यत्वाच्या हक्कांचा वापर न करणे.

**२६.** कोणतीही व्यक्ती सदस्यत्वांबाबत संस्थेच्या नियमाव्दारे किंवा उपविधिव्दारे विहित करण्यात येईल अशी रक्कम संस्थेला चुकती करीपर्यंत किंवा संस्थेत असा हितसंबंध संपादन करीपर्यंत अशा संस्थेच्या सदस्याच्या हक्कांचा वापर करणार नाही.

सदस्यांचा मतदानाचा अधिकार.

**२७.** [४][(१) पोटकलमे (२) ते (७), दोन्ही धरून, यात अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतीरिक्त कोणत्याही संस्थेच्या सदस्यास, तिच्या कामकाजात एकापेक्षा अधिक मत असणार नाही आणि तिने मत देण्याच्या प्रत्येक अधिकाराचा व्यक्तीशः वापर केला पाहीजे आणि त्याचा बदली व्यक्तीव्दारे वापर करता येणार नाही.

परंतु, समसमान मते पडल्यास सभापतीस एक निर्णायक मत असेल;]

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १३(क) व्दारे पोटकलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १४ अन्वये "काढून टाकण्यात आल्यावर" या शब्दानंतर हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १५ अन्वये कलम २५ क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम २ (अ) अन्वये मूळ पोटकलम (१) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[१][(२) संस्थेचा एखादा भाग एकाहून अधिक व्यक्तींनी संयुक्तपणे धारण केला असल्यास [२][ज्या व्यक्तीचे नाव भागपत्रात प्रथम असेल, त्या व्यक्तीस, ती उपस्थित असल्यास मत देण्याचा हक्क असेल. परंतु, तिच्या अनुपस्थितीत जिचे नाव भागपत्रात दुसरे असेल त्या व्यक्तीस आणि त्या दोन्ही व्यक्तींच्या अनुपस्थितीत जिचे नाव त्यानंतर असेल त्या व्यक्तीस आणि त्याप्रमाणे आधीच्या व्यक्तीच्या अनुपस्थितीत जिचे नाव भागपात्रात नंतर असेल, अशा उपस्थित असणाऱ्या आणि अज्ञान नसणाऱ्या व्यक्तीस मत देण्याचा हक्क असेल ;]

[३][(३) ज्या संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविला असेल त्या संस्थेस, त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्या वतीने मत देण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी कोणत्याही एका सदस्याची नेमणूक करता येईल व त्याप्रमाणे अशा सदस्यास आपल्या संस्थेच्या वतीने मत देण्याचा अधिकार राहील :

परंतु, संघीय संस्थेच्या कोणत्याही नवीन सदस्य संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग अशा संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच फक्त ती त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये मत देण्यास पात्र असेल:

परंतु, आणखी असे की, कलम ७३ ख अन्वये राखीव जागेसाठी निवडणूक असेल त्या बाबतीत कोणाही व्यक्तीला एकापेक्षा अधिक मत असणार नाही.

(३ क) संस्थेच्या व्यक्तीगत सदस्य, अशा संस्थेचा सदस्य म्हणून त्याची नावनोंदणी झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी त्या संस्थेच्या कामकाजात मत देण्याकरिता पात्र असणार नाही.]

(४) त्यावेळीं अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही कंपनीने अथवा इतर निगम निकायाने आपल्या निधीचा कोणताही भाग एखाद्या संस्थेच्या भागामध्ये गुंतविला असेल, त्या कंपनीस किंवा निगम निकायास अशा संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्यावतीने मत देण्यासाठी आपल्या संचालकांपेकी किंवा अधिकाऱ्यांपैकी कोणाही एकास नियुक्त करता येईल, व त्याप्रमाणे अशा संचालकास किंवा अधिकाऱ्यास त्या कंपनीच्या किंवा निगम निकायच्या वतीने मत देण्याचा हक्क राहील.

(५) एखाद्या भागीदारी संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग एखाद्या संस्थेच्या भागांमध्ये गुंतविलेला असेल त्याबाबतीत [४][त्या भागीदारी संस्थेने नियुक्त केलेल्या] तिच्या भागीदारांपैकी एकास त्या भागीदारी संस्थेच्या वतीने अशा संस्थेच्या कामकाजामध्ये मत देण्याचा हक्क राहील.

(६) ज्या स्थानिक प्राधिकरणाने किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग एखाद्या संस्थेच्या भागांमध्ये गुंतविलेला असेल, त्या स्थानिक प्राधिकरणास किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस आपल्या सदस्यांपैकी किंवा विश्वस्तांपैकी कोणत्याही सदस्यास किंवा विश्वस्तास अशा संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्या वतीने मत देण्यासाठी नियुक्त करता येईल आणि त्याचप्रमाणे त्या व्यक्तीस, स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा यथास्थित, विश्वस्त व्यवस्थेच्यावतीने मत देण्याचा हक्क राहील.

(७) संघीय संस्थेच्या बाबतीत, अशा संस्थेच्या प्रत्येक सदस्याचे मतदानाचे हक्क हे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांव्दारे आणि त्या संस्थेच्या उपविधिव्दारे विनियमित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम २ (ब) अन्वये ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ (ब) "अन्वये शेअरच्या प्रमाणपत्रात ज्याचे नाव प्रथम असेल त्या इसमाचे फक्त मत देण्याचा अधिकार असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम २ अन्वये पोट-कलम (३) ऐवजी पुढील पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[४] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ५ अन्वये हा मजकुर समाविष्ट करण्यात आला.

(८) कोणत्याही नाममात्र सदस्यास [1][ * * . * * * ] किंवा हितैषी सदस्यास मतदानाचा अधिकार असणार नाही. [2][ आणि असा कोणताही सदस्य समितीचा सदस्य होण्यास किंवा त्या संस्थेचा प्रतिनिधी म्हणून इतर कोणत्याही संस्थेवरील नेमणुकीस पात्र असणार नाही.]

[3][ (९) कोणत्याही संस्थेच्या समितीवरील शासनाच्या किंवा वित्तव्यवस्था करणाऱ्या कोणत्याही बँकेच्या नामनिर्देशित व्यक्तीस, अशा समितीच्या पदावर निवडून आल्यामुळे जो पद धारण करीत असेल असा, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सचिव, कोषाध्यक्ष किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारा कोणताही इतर अधिकारी यांसारख्या त्या समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या कोणत्याही निवडणूकीच्या वेळी मत देण्याचा हक्क असणार नाही.]

[4][ (१०) कृषी पत संस्थेच्या बाबतीत एखाद्या सदस्याने संस्थेकडून कर्ज घेतले असेल तर, नियत दिनांकापासून कर्ज परत करण्याच्या बाबतीत लागोपाठचे दोन किंवा अधिक हप्ते देण्यामध्ये ज्या ज्यावेळी तो कसुरदार ठरेल, त्या त्यावेळी त्यास संस्थेच्या कामकाजात मत देण्याचा कोणताही हक्क असणार नाही :

परंतु, एखाद्या सदस्याने पणन किंवा संस्करण संस्थेला आपले विक्रेय उत्पादन देण्यासंबंधीचे आपले दायित्व पार पाडले असेल व अशा उत्पादनाचे मुल्य हे त्याच्या देय रकमेपेक्षा कमी नसेल तर त्याच्या देय रकमांचा हिशेब, मग तो पूर्णतः किंवा अंशतः असो, प्रत्यक्षात नंतर नक्की करण्यात येणार असला तरी अशा सदस्यास कसूरदार म्हणून मानण्यात येणार नाही.

(११) पोट-कलम (१०) च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ कृषी पत संस्थेस यथोचित आदेश देता येतील.

भाग धारण करण्यावर निर्बंध.

२८. कोणत्याही संस्थेत, [5][सरकार किंवा कोणतीही इतर संस्था किंवा राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये रचना केलेली जिल्हा परिषद या व्यतिरिक्त कोणत्याही सदस्यास—] १९६२ चा महा. ५.

(क) संस्थेच्या एकूण भाग-भांडवलाच्या विहित करण्यात येईल अशा (कोणत्याही बाबतीत एक-पंचमांशाहून अधिक असणार नाही इतक्या) हिश्श्यापेक्षा अधिक हिस्सा धारण करता येणार नाही, किंवा

(ख) संस्थेच्या भागामध्ये [6][वीस हजार रुपयांहून] अधिक असा कोणताही हितसंबंध धारण करता येणार नाही किंवा त्याबाबत दावा सांगता येणार नाही :

परंतु, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे संस्थांच्या कोणत्याही वर्गाच्या संबंधात भाग-भांडवलाच्या एक-पंचमांशापेक्षा अधिक किंवा कमी कमाल रक्कम किंवा यथास्थित, [6][वीस हजार रुपयांपेक्षा] अधिक किंवा कमी रक्कम विनिर्दिष्ट करता येईल.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ (क) अन्वये "सहयोगी" हा शब्द वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ८ (क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[3] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ५ अन्वये मुळ पोट-कलम (९) ऐवजी हे पोट कलम दाखल करण्यात आले.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ६ अन्वये पोट-कलमे (१०) व (११) ही जादा दाखल करण्यात आली.

[5] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९ अन्वये "राज्य सरकार किंवा कोणतीही इतर संस्था याव्यतिरिक्त कोणत्याही सदस्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १६ अन्वये " पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२९. (१) जास्तीत जास्त भाग धारण करण्याबाबत लगतपूर्ववर्ती कलमाच्या तरतुदींना व याबाबत केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, एखाद्या संस्थेच्या भाग-भांडवलातील सदस्यांचा भाग किंवा हितसंबध यांचे हस्तांतरण किंवा त्यावरील भार, विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहील. भाग किंवा हितसंबध यांचे हस्तातरण किंवा त्यावरील भार याबाबत निर्बंध.

(२) कोणत्याही सदस्याचे कोणत्याही संस्थेच्या भांडवलातील किंवा संपत्तीतील त्याने धारण केलेल्या कोणत्याही भागाचे किंवा हितसंबंधाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे--

(क) त्याने असा भाग किंवा हितसंबंध कमीत कमी एक वर्ष मुदतीपर्यंत धारण केलेला असल्याशिवाय ;

(ख) असे हस्तांतरण संस्थेच्या सदस्याकडे किंवा ज्या व्यक्तीच्या सदस्यत्वासाठी केलेला अर्ज संस्थेने स्वीकारला असेल त्या व्यक्तीकडे [1][अथवा अधिनियमाच्या कलम २३ खाली निबंधकाने जिचे अपील मान्य केंले असेल अशा व्यक्तीकडे किंवा कलम २३, पोट-कलम (१ क) खाली सदस्य म्हणून मानण्यात आलेल्या व्यक्तीकडे ] केलेले असल्याशिवाय ; हस्तांतरण करता येणार नाही.

(३) पोट-कलमे (१) व (२) यात काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या सदस्यास राजीनामा देण्याची मुभा देण्यात आली असेल किंवा त्यास काढून टाकण्यात आले असेल किंवा असा सदस्य या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये केलेल्या नियमाद्वारे किंवा संस्थेच्या उपविधिद्वारे अनर्ह ठरविला गेल्यामुळे तो सदस्य म्हणून राहणे बंद झाले असेल तर, संस्थेस भाग-भांडवलात अशा सदस्याचा असलेला भाग किंवा हितसंबंध त्यासाठी विहित केलेल्या रीतीने ठरविलेले मूल्य देऊन संपादन करता येईल, परंतु, अशा प्रयोजनांसाठी कोणत्याही वित्तीय वर्षात संस्थेने दिलेली भाग-भांडवलाची एकूण रक्कम ही लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षात शेवटच्या दिवशी संस्थेचे जे भरणा झालेले भाग-भांडवल असेल, त्यांच्या दहा टक्के रकमेहून अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण**.--[2][एक].--- काढून टाकण्यात आलेल्या कोणत्याही सदस्याचा भाग-भांडवलातील भाग किंवा हितसंबंध संस्थेच्या कोणत्याही उपविधिनुसार समपहृत करण्याच्या हक्कास उपरोक्त तरतुदीमुळे बाध येणार नाही.

[2][**स्पष्टीकरण दोन**.--या कलमातील " वित्तीय वर्ष " या संज्ञेचा अर्थ [3][दिनांक ३१ मार्च] रोजी संपणारे किंवा ज्या कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाचा लेख्यांचा ताळेबंद, निबंधकाच्या पूर्वमंजुरीने इतर कोणत्याही दिवशी केला जातो त्या संस्थेचा किंवा संस्थांच्या वर्गाच्या बाबतीत अशा दिवशी संपणारे वर्ष असा होतो.]

(४) राज्य शासन एखाद्या संस्थेचा सदस्य असेल त्याबाबतीत त्याने संस्थेच्या भांडवलातील आपल्या भागाच्या किंवा हितसंबंधाच्या केलेल्या कोणत्याही हस्तांतरणास या कलमातील निर्बंध लागू होणार नाहीत, आणि या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास त्याबाबत संस्थेला कमीत-कमी तीन महिन्याची नोटीस देऊन, आपले भाग-भांडवल संस्थेमधून कोणत्याही वेळी काढून घेता येईल.

३०. (१) संस्थेचा एखादा सदस्य मरण पावला असता, संस्था अशा मृत सदस्याचा भाग किंवा हितसंबंध नियमानुसार नामनिर्देशित केलेल्या एका किंवा अधिक व्यक्तींकडे किंवा अशारीतीने कोणतीही व्यक्ती नामनिर्देशित केलेली नसेल तर, जी व्यक्ती मृत सदस्याचा वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी आहे, असे समितीस वाटेल, त्या व्यक्तीकडे हस्तांतरित करील : सदस्याच्या मृत्यूनंतर हितसंबंधाचे हस्तांतरण.

परंतु, अशी नामनिर्देशित व्यक्ती वारस किंवा यथास्थिति, कायदेशीर प्रतिनिधी संस्थेचा यथोचितरीत्या दाखल करून घेतलेला सदस्य असावा :

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १७ अन्वये " त्या व्यक्तीकडे "या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ६ अन्वये या स्पष्टीकरणास "स्पष्टीकरण एक" असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि स्पष्टीकरण दोन ची भर घालण्यात आली.

[3] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३ अन्वये "दिनांक ३० जून "या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

आणखी असे की, या पोटकलमातील किंवा कलम २२ मधील कोणत्याही गोष्टीमुळे अज्ञानी किंवा विकलमनस्क व्यक्तीस वारसाने किंवा अन्यथा मृत सदस्याचे संस्थेतील कोणतेही भाग किंवा हितसंबंध संपादन करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अशा कोणत्याही नामनिर्देशित व्यक्तीस, वारसास किंवा यथास्थिति, कायदेशीर प्रतिनिधीस, मृत सदस्याच्या भागाची किंवा हितसंबंधाची नियमानुसार निश्चित केलेल्या किंमती इतकी रक्कम संस्थेने त्यास द्यावी म्हणून संस्थेस भाग पाडता येईल.

(३) संस्थेकडून मृत सदस्यास देय असलेला इतर सर्व पैसा, संस्थेस अशा नामनिर्देशित व्यक्तीला, मृत सदस्याच्या वारसाला किंवा यथास्थिति, कायदेशीर प्रतिनिधीला देता येईल.

(४) या कलमाच्या तरतुदीनुसार संस्थेने यथोचितरित्या केलेली सर्व हस्तांतरणे व दिलेल्या रकमा या इतर कोणत्याही व्यक्तीने संस्थेविरूध्द केलेल्या कोणत्याही मागणीच्या संबंधात विधिग्राह्य व परिणामकारक असतील.

भाग किंवा हितसंबंध जप्तीस पात्र नसणे.

**३१.** एखाद्या संस्थेच्या भांडवलातील किंवा एखाद्या गृहनिर्माण संस्थेने काढलेल्या कर्जरोख्यातील किंवा संस्थेने आपल्या सदस्यांकडून बचत ठेवीच्या रुपाने उभारलेल्या निधीतील सदस्यांचा भाग किंवा हितसंबंध, सदस्याने काढलेल्या कोणत्याही कर्जाबद्दल किंवा पत्करलेल्या दायित्वाबद्दल किंवा त्यासंबंधात न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार जप्तीस किंवा विक्रीस पात्र असणार नाही आणि इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९ अन्वये सरकारी मुखत्याराचा किंवा प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० अन्वये धारकाचा किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्यान्वये अशा कोणत्याही व्यक्तीचा किंवा प्राधिकाऱ्याचा अशा भागावर किंवा हितसंबंधावर हक्क असणार नाही किंवा त्यास त्यावर कोणताही दावा सांगता येणार नाही.

१९०९ चा ३. १९२० चा ५.

पुस्तके इत्यादी पाहण्याचे सदस्यांचे हक्क.

**३२.** (१) संस्थेच्या प्रत्येक सदस्यास, संस्थेच्या कार्यालयात, कामकाजाच्या वेळात किंवा त्या प्रयोजनासाठी ठरविलेल्या कोणत्याही वेळी अधिनियम, नियम व उपविधि यांची प्रत आणि शेवटचा लेखापरीक्षा झालेला वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा याचा लेखा, समितीच्या सदस्यांची यादी, सदस्यांची नोंदवही, सर्वसाधारण बैठकीची कार्यवृत्ते, समितीच्या बैठकीची कार्यवृत्ते आणि त्याने संस्थेशी केलेले व्यवहार ज्यात नमूद केले आहेत, अशी पुस्तके व अभिलेख यांचे भाग विनामूल्य तपासण्याचा हक्क राहील.

(२) सदस्यांकडून लेखी विनंती करण्यात आल्यावर आणि त्याबाबतीत विहित करण्यात येईल अशी फी देण्यात आल्यावर, अशी फी दिल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संस्था त्यास पूर्ववर्ती पोट-कलमात उल्लेख केलेल्या कोणत्याही दस्तऐवजाची प्रत पुरवील.

विवक्षित संस्थांनी सदस्यांना पासबुके देणे व अशा पुस्तकातील नोंदी देय रकमांचा पुरावा असणे.

[१][**३२ क.** (१) आपल्या सदस्यांना कर्जे देत असेल अशी संस्था, [२][ किंवा राज्य शासन वेळोवेळी राजपत्रात अधिसूचित करील अशी संस्था किंवा संस्थावर्ग ] प्रत्येक सदस्यास एक पासबुक देईल ; त्यामध्ये (पैशाच्या) व्यवहाराचा दिनांक, दिलेल्या कर्जाची रक्कम, व्याजाचा दर, सदस्याने केलेली परतफेड, मुद्दलाची व व्याजाची देय असलेली रक्कम यासारख्या सदस्याशी झालेल्या व्यवहाराचा हिशेब व विहित करण्यात येईल असा इतर तपशील अंतर्भूत असेल. आवश्यक त्या नोंदी पासबुकांमध्ये वेळोवेळी करण्यात येतील व त्यावर समितीने याबाबत प्राधिकृत केलेल्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रतिस्वाक्षरी करण्यात येईल. या प्रयोजनार्थ [३][सदस्याने ] अशा पदाधिकाऱ्याकडे पासबुक सादर करणे बंधनकारक असेल व आवश्यक त्या नोंदी करण्यासाठी पासबुक काही मुदतीपर्यंत ठेवून घेणे आवश्यक असेल तर, अशा पदाधिकाऱ्याकडून त्याबद्दल त्या सदस्यास पावती देण्यात येईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ७ अन्वये कलम ३२ क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १८ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १८ (ब) अन्वये "ठेवीदाराने" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) पासबुकात यथोचितरित्या केलेल्या नोंदी हा तद्‌विरुध्द सिध्द करण्यात येईपर्यंत संस्थेने सदस्याशी केलेल्या व्यवहाराबाबतच्या हिशेबाचा **प्रथमदर्शनी** पुरावा असेल.]

**३३.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, संस्थेच्या माजी सदस्यावर किंवा मृत सदस्याच्या संपदेवर संस्थेची जी ऋणे,— माजी सदस्यावर व मृत सदस्याचा संपदेवर असणारे दायित्व.

(क) माजी सदस्याच्या बाबतीत तो सदस्य असण्याचे बंद झाले असेल त्या दिनांकास; आणि

(ख) मृत सदस्याच्या बाबतीत, त्याच्या मृत्यूच्या दिनांकास;

असतील ती फेडण्याचे दायित्व अशा दिनांकापासून दोन वर्षापर्यंत चालू राहील.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अन्वये एखादी संस्था समापित करण्याचा आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत संस्थेच्या समापनाचा आदेश दिल्याच्या दिनांकांच्या निकटपूर्वीच्या दोन वर्षाच्या आत जो सदस्य असण्याचे बंद झाले असेल अशा माजी सदस्यावरील किंवा मृत पावला असेल त्या सदस्याच्या संपदेवरील दायित्व हे परिसमापणाची संपूर्ण कार्यवाही पूर्ण होईपर्यन्त चालू राहील. परंतु, असे दायित्व ज्या दिनांकास यथास्थिती, तो सदस्य असल्याचे बंद झाले असेल किंवा मरण पावला असेल त्या दिनांकास संस्थेची जी ऋणे असतील त्यानांच केवळ लागू होईल.

१९०९ चा ३- १९२० चा ५. **३४.** इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९, प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला कोणताही तत्सम कायदा यात काहीही अंतर्भूत असेल तरी, संस्थेस सदस्यांकडून येणे असलेल्या रकमांचा क्रम त्यांच्याविरूध्द केलेल्या नादारीच्या कार्यवाहीत अग्रक्रमानुसार शासनाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला त्यांच्याकडून देय असलेल्या रकमांनंतरचा राहील. सदस्यांची नादारी.

**३५.** (१) संस्थेत त्या प्रयोजनासाठी भरविलेल्या सर्वसाधारण बैठकीत उपस्थित असतील अशा, मतदानाचा हक्क असलेल्या सदस्यांपैकी [१][कमीतकमी तीन चतुर्थांश सदस्यांच्या बहुमताने ] संमत झालेल्या ठरावाद्वारे, संस्थेच्या हितास किंवा संस्थेचे कामकाज उचित प्रकारे चालण्यास बाधक ठरतील, अशा कृत्यांबद्दल एखाद्या सदस्यास काढून टाकता येईल : सदस्यांना काढून टाकणे.

परंतु, संबंधित सदस्यास सर्वसाधारण बैठकीपुढे स्वतःची बाजू मांडण्याची संधी दिलेली असल्याखेरीज, कोणताही ठराव विधिग्राह्य असणार नाही आणि निबंधकाने मान्य केल्याशिवाय कोणताही ठराव परिणामकारक होणार नाही.

(२) संस्थेच्या ज्या सदस्यास पूर्ववर्ती पोटकलमान्वये काढून टाकण्यात आले असेल, तो सदस्य अशा रीतीने काढून टाकण्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीसाठी, त्या संस्थेचा सदस्य म्हणून पुन्हा दाखल करून घेतला जाण्यास किंवा इतर कोणत्याही संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करून घेतला जाण्यास, पात्र असणार नाही :

परंतु, निबंधकाला संस्थेने अर्ज केल्यावर व विशेष परिस्थितीत, उक्त मुदतीच्या आत अशा कोणत्याही सदस्यास यथास्थिती, उक्त संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास किंवा इतर कोणत्याही संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास मंजुरी देता येईल.

## प्रकरण चार

## संस्थांचे निगमन, कर्तव्ये व विशेषाधिकार

**३६.** संस्थेची नोंदणी झाल्यानंतर, ज्या नावाने तिची नोंदणी झाली असेल, त्या नावाचा तो एक निगम निकाय होईल. तिची परंपरा अखंड असेल व तिचा एक सामाईक शिक्का असेल, तसेच, तिला मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व तिचा विनियोग करण्याचा, संविदा करण्याचा, वाद व इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्याचा व त्यात प्रतिवाद करण्याचा आणि ज्या प्रयोजनासाठी तिची रचना करण्यात आली असेल, त्यासाठी आवश्यक वाटतील अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल. संस्था हा निगम निकाय असणे.

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ७ अन्वये " तीन चतुर्थांश बहुमताने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

संस्थाचा पत्ता.

**३७.** ज्या पत्त्यावर सर्व नोटीसा पाठविता येतील व सर्व पत्रव्यवहार करता येईल, अशा आपल्या पत्त्याची प्रत्येक संस्था नियमानुसार नोंदणी करून घेईल, आणि अशा संस्थेने उक्त पत्त्यात झालेल्या कोणत्याही बदलाची लेखी नोटीस असा बदल झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत निबंधकाकडे पाठविली पाहिजे.

सदस्यांची नोंदवही.

**३८.** (१) प्रत्येक संस्था आपल्या सदस्यांची एक नोंदवही ठेवील व तीत पुढील तपशील नोंदवण्यात येईल, तो असा,—

(क) प्रत्येक सदस्याचे नाव, पत्ता व व्यवसाय;

(ख) भाग भांडवल असणाऱ्या संस्थेच्या बाबतीत प्रत्येक सदस्याने धारण केलेले भाग;

(ग) प्रत्येक व्यक्तीस सदस्य म्हणून दाखल करुन घेतल्याचा दिनांक;

(घ) अशी कोणतीही व्यक्ती सदस्य असल्याचे बंद झाल्याचा दिनांक; आणि

(ङ) विहित करण्यात येईल असा तपशील :

परंतु, या अधिनियमाव्दारे किंवा तदन्वये एखाद्या संस्थेने एखाद्या सदस्यास मृत्युनंतर स्वतःचा भाग किंवा हितसंबध कोणत्याही व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यास परवानगी दिली असेल, त्याबाबतीत त्या नोंदवहीत, संबधित सदस्याच्या नावापुढे त्या सदस्याच्या भागावर किंवा हितसंबंधावर हक्क असलेल्या व्यक्तीचे नाव आणि ज्या दिनांकास नामनिर्देशन नोंदवले असेल तो दिनांक दर्शवील.

(२) ही नोंदवही कोणत्याही व्यक्तीस ज्या दिनांकास सदस्य म्हणून दाखल करुन घेतले असेल, त्या दिनांकाचा आणि ज्या दिनांकास तो सदस्य असण्याचे बंद झाले असेल, त्या दिनांकाचा **प्रथमदर्शनी** पुरावा असेल.

अधिनियम, इत्यादींची प्रत तपासणीसाठी खुली असणे.

**३९.** प्रत्येक संस्था तिच्या नोंदलेल्या पत्त्यावर या अधिनियमाची, नियमाची व तिच्या उपविधिची आणि सदस्यांच्या यादीची एक प्रत कामाच्या वेळात किंवा संस्थेने त्यासाठी ठरविलेल्या कोणत्याही वेळात जनतेला तपासणीसाठी विनामूल्य खुली ठेवील.

नोंदीची प्रत पुरावा म्हणून ग्राह्य असणे.

**४०.** (१) कामकाजाच्या कमात नियमितपणे ठेवण्यात आलेल्या, संस्थेच्या कब्जात असलेल्या पुस्तकातील, नोंदवहीतील किंवा यादीतील कोणत्याही नोंदीची प्रत विहित करण्यात येईल अशा रीतीने ती यथोचितरित्या प्रमाणित केलेली असल्यास, उक्त नोंद अस्तित्वात असल्याविषयीचा पुरावा म्हणून ग्राह्य होईल आणि मूळ नोंद सादर केली असता, त्यात नमुद केलेल्या गोष्टी व व्यवहार सिध्द करण्यासाठी पुरावा म्हणून ज्या बाबतीत व ज्या मर्यादेपर्यंत ती ग्राह्य समजण्यात आली असती, त्या प्रत्येक बाबतीत व त्या मर्यादेपर्यंत अशी प्रत अशा गोष्टींचा व व्यवहाराचा पुरावा म्हणून स्वीकारण्यात येईल.

(२) राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेशित करील अशा संस्थांच्या बाबतीत ज्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत अशी संस्था पक्षकार नसेल अशा कार्यवाहीत अशा संस्थेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यास न्यायालयाने किंवा न्यायधिशाने विषेश कारणावरून तसा आदेश दिलेला असल्याशिवाय ज्यातील मजकूर पूर्ववर्ती पोट-कलमान्वये सिध्द करता येऊ शकेल, असे संस्थेचे कोणतेही पुस्तक हजर करण्यासाठी किंवा त्यात नमूद केलेल्या गोष्टी, व्यवहार व लेखे सिध्द करण्यासाठी साक्षीदार म्हणून हजर राहण्यास भाग पाडता येणार नाही.

संस्थेचे भाग व ऋणपत्रे या संबंधीच्या संलेखांना सक्तीच्या नोंदणीपासून सूट.

**४१.** भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ यातील कलम १७, पोट-कलम (१), खंड (ख) व (ग) मधील कोणतीही गोष्ट पुढील बाबतीत लागू असणार नाही.— १९०८ चा १६.

(क) संस्थेची मत्ता पूर्णतः किंवा अंशतः स्थावर संपत्तीच्या स्वरुपात असली तरी, संस्थेच्या भागासंबंधीचा कोणताही संलेख, किंवा

(ख) संस्थेने काढलेली ऋणपत्रे धारण केलेल्या व्यक्तीच्या हितासाठी विश्वस्तांकडे ज्या नोंदलेल्या लेखानुसार अशा संस्थेने आपली संपूर्ण स्थावर मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध ही विश्वस्तव्यवस्था म्हणून गहाण दिली असतील, अभिहस्तांतरित केली असतील किंवा त्याजकडे अन्यथा हस्तांतरित केली असतील त्या संलेखानुसार मिळालेल्या तारणावर अशा ऋणपत्रामुळे ते धारण करणाऱ्या व्यक्तीस जेथवर हक्क प्राप्त होतो, ते खेरीजकरून ज्या ऋणपत्रावरून स्थावर मालमत्तेसंबंधी कोणताही हक्क, स्वामित्व किंवा हितसंबंध निर्माण होत नसेल, अभिहस्तांकित होत नसेल, मर्यादित किंवा निष्प्रभावी होत नसेल, अशा कोणत्याही संस्थेने काढलेली कोणतीही ऋणपत्रे, किंवा

(क) कोणत्याही संस्थेने काढलेल्या कोणत्याही ऋणपत्रावरील पृष्ठांकन किंवा अशा ऋणपत्राचे हस्तांतरण.

४२. [1][(१] राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या बाबतीत खाली ठरविल्याप्रमाणे जे मुद्रांक शुल्क, फी किंवा इतर कर लादण्यास राज्य शासन सक्षम असेल त्याबाबतीत [2][संपूर्ण राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, भावी किंवा पूर्वलक्षीप्रभावासह असो– पुढील शुल्क, फी किंवा इतर कर कमी करता येतील किंवा त्यापासून सूट देता येईल ;] —

कर आकारणी पासून सूट देण्याचा अधिकार, [3][रक्कम परत करण्याचा अधिकार.]

(क) संस्थेने किंवा संस्थेच्या वतीने किंवा संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने करून दिलेल्या आणि संस्थेच्या कामकाजासंबंधीच्या लेखांवर किंवा अशा लेखांच्या कोणत्याही वर्गावर किंवा या अधिनियमान्वये निबंधकाने [4][किंवा सहकारी न्यायालयाने] दिलेल्या निवाड्यावर, अनुक्रमे त्यावेळी अंमलात असलेल्या मुद्राकासंबंधीच्या कोणत्याही कायद्यान्वये आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क ;

(ख) संस्थेने किंवा संस्थेच्या वतीने दस्तऐवजाची नोंदणी करण्यासंबंधीच्या आणि न्यायालय फी संबंधीच्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये द्यावयाची कोणतीही फी ; आणि

(ग) त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये संस्थेने किंवा संस्थेच्या वतीने द्यावयाचा इतर कर किंवा फी किंवा शुल्क (किंवा त्याचा कोणताही भाग).

[5][ (२) राज्य शासनास त्याच्याकडून आदेशाद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा परिस्थितीत अशा मर्यादेपर्यंत आणि अशा अटींस व शर्तीस, अशा कोणत्याही अटी व शर्ती असल्यास, अधीन राहून पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कायद्यानुसार भरण्यात आलेल्या कोणत्याही कराची, फीची किंवा शुल्काची रक्कम परत करता येईल.]

४३. [6][ (१) ] संस्था तिच्या उपविधित विहित किंवा विनिर्दिष्ट केले असेल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा शर्तीवरच आपल्या सदस्यांकडून आणि इतर व्यक्तींकडून ठेवी आणि कर्जे स्वीकारील.

कर्जे घेण्यावर निर्बंध.

[7][ (२) पोटकलम (१) अन्वये मिळालेला निधी सुरक्षित रहावा, संबंधित संस्थेच्या किंवा संस्थांच्या उद्दिष्टांच्या अभिवृध्दीसाठी अशा निधीचा योग्य वापर करण्यात यावा यासाठी आणि तो. नियमात व उपविधित घालून दिलेल्या कर्जे देण्याच्या मर्यादेत ठेवता यावा, यासाठी जर निबंधकाच्या मते तसे करणे आवश्यक असेल तर त्यास सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे ज्या अतिरिक्त शर्तीना अधीन राहून आणि ज्या मर्यादेपर्यंत अशा संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास ठेवी स्वीकारता येतील, ऋणपत्रे काढता येतील, किंवा मध्यवर्ती बँकेव्यतिरिक्त इतर धनकोंकडून कर्जे उभारता येतील, त्या अतिरिक्त शर्ती व मर्यादा कोणत्याही संस्थेवर किंवा अशा संस्थांच्या वर्गावर लादता येतील :]

[8][परंतु, ज्या संस्थेने भाग भांडवल, कर्ज किंवा हमी या स्वरुपात शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य घेतलेले नसेल तिला या पोट-कलमातील काहीही लागू असणार नाही आणि अशा संस्थेस, तिची आर्थिक, स्थिती लक्षात घेऊन, स्वतःचे कर्ज धोरण स्वीकारता येईल. तथापि, अशी संस्था, अशा प्रकारे स्वीकारलेल्या आपल्या कर्ज धोरणाबाबत, आणि कोणत्याही वेळी अशा धोरणामध्ये कोणताही बदल केला असल्यास, त्याबाबतचा संपूर्ण तपशील, लेखी स्वरुपात निबंधकाकडे पाठवील.].

---

[1] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २ (१) व (२) अन्वये कलम ४२ ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोटकलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २ (१)अन्वये " सूट देता येईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २ (३) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ८ अन्वये " किंवा त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीने किंवा अशा व्यक्तीच्या मंडळाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २ (१) व (२) अन्वये कलम ४२ ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोटकलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[6] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ८ अन्वये कलम ४३ यास पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला

[7] वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये पोटकलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[8] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, याच्या कलम ४ अन्वये हे परंतुक जादा जादा दाखल करण्यात आले.

कर्ज देण्याच्या धोरणाचे नियमन.

४४. (१) कोणतीही संस्था सदस्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा आपल्या स्वतःच्या भागांच्या तारणावर किंवा जो सदस्य नसेल, अशा कोणत्याही व्यक्तींच्या तारणावर कर्ज देणार नाही :

परंतु, संस्थेच्या निबंधकाच्या विशेष मंजुरीने दुसऱ्या संस्थेला कर्ज देता येईल.

(२) पूर्वगामी पोटकलमात काहीही अंतर्भूत असले तरीही, संस्थेस ठेवीदाराला त्याच्या ठेवीच्या तारणावर कर्ज देता येईल.

(३) जर राज्य शासनाच्या मते, संबंधित संस्थेच्या किंवा संस्थांच्या हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक असेल तर, राज्य शासनास, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास, कोणत्याही मालमत्तेच्या तारणावर रक्कम कर्जाऊ देण्यास मनाई करता येईल, त्यावर निर्बंध घालता येईल किंवा त्यांचे नियमन करता येईल :

[1][परंतु, संबंधित संस्थेच्या संस्थांच्या निधीच्या सुरक्षिततेची खात्री करून घेण्यासाठी, त्यांच्या उद्दिष्टांच्या अभिवृध्दीसाठी, अशा निधीचा योग्य वापर करण्यात यावा यासाठी आणि तो नियमात व उपविधित धालून दिलेल्या कर्ज देण्याच्या मर्यादेत ठेवता यावा यासाठी, निबंधकास शिखर बँकेच्या मान्यतेने कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास आपल्या सदस्यांना किंवा इतर संस्थाना ज्या मर्यादेपर्यंत, ज्या शर्तीवर आणि ज्या पध्दतीने कर्जे देता येतील ती मर्यादा व त्या शर्ती व ती पध्दत यांचे सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे आणखी नियमन करता येईल.]

विवक्षित प्रकरणांमध्ये व्याजावर मर्यादा.

[2][४४ क. कोणत्याही करारामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी संस्था [3][(सहकारी बँक आणि सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक धरून)] जास्तीत जास्त १५ वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी (सदस्य संस्था धरून) कोणत्याही सदस्यास तिने दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या (पुनर्वसन कर्ज धरून, परंतु पाटबंधारे किंवा कृषी विकास प्रयोजनासाठी असलेली दीर्घ मुदतीची कर्जे किंवा कृषितर किंवा वाणिज्यिक प्रयोजनांसाठी असलेली तीन हजार रुपयांहून अधिक कर्जे वगळून) संबंधात, मग असे कर्ज, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८५ च्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर देण्यात आलेले असो, व्याजापोटी कर्जाच्या मुद्दल रकमेपेक्षा अधिक मोठी रक्कम कोणत्याही रीतीने वसूल करणार नाही :] १९८६ चा महा. २०

[4][परंतु असे की, सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने कोणत्याही सदस्याला दिलेल्या, एक लाख रुपयांहून अधिक रकमेच्या कर्जाला, या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

सदस्य नसलेल्या व्यक्तींबरोबर इतर व्यवहार करण्यावर निर्बंध.

४५. या अधिनियमात तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, संस्थेने सदस्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तीशी करावयाचे व्यवहार हे विहित करण्यात येतील अशा निर्बंधांना (तसे निर्बंध असल्यास) अधीन राहतील.

सदस्यांचा भाग किंवा हितसंबंध याच्या बाबतीतील भार व वजावट.

४६. कोणत्याही सदस्याकडून किंवा माजी सदस्याकडून किंवा मृत सदस्याकडून त्याच्या संपदेमधून संस्थेस येणे असलेल्या कोणत्याही ऋणाच्या संबंधात संस्थेच्या भांडवलात अशा सदस्याचा किंवा माजी सदस्याचा किंवा मृत सदस्यांचा जो भाग किंवा हितसंबंध असेल, त्या भागावर किंवा हितसंबंधावर व त्याच्या ठेवीवर आणि अशा सदस्यास द्यावयाच्या कोणत्याही लाभांशावर, अधिलाभांशावर किंवा नफ्यावर संस्थेचा भार राहील ; आणि त्या संस्थेस अशा सदस्यांच्या नावे जमा केलेल्या किंवा त्यास द्यावयाच्या कोणत्याही रकमेची, असे कोणतेही ऋण फेडण्याच्या कामी वजावट करता येईल :

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ९ अन्वये या परंतुकाची भर घालण्यात आली.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १९ अन्वये कलम ४४ क बदली दाखल करण्यात आले.

[3] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ३ (क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ३ (ख) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

परंतु, कोणत्याही सहकारी बँकेस, कलम ७१ अन्वये संस्थेने स्थापन केलेल्या भविष्य निर्वाह निधीतून किंवा राखीव निधीतून अशा बँकेत संस्थेने गुंतविलेल्या कोणत्याही रकमेवर भार ठेवता येणार नाही ; आणि कोणत्याही सहकारी बँकेस सदस्यांकडून देय असलेल्या कोणत्याही ऋणाच्या फेडीसाठी अशी कोणत्याही रकमेची वजावट करण्याचा हक्क असणार नाही.

संस्थेचा अग्रहक्क.

४७. (१) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी परंतु, जमीन महसुलासंबंधीच्या किंवा जमीन महसुलाप्रमाणे वसूल करता येईल अशा कोणत्याही पैशासंबंधीच्या
१९०८ शासनाच्या अग्रहक्काच्या आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ ची कलमे ६० व ६१ यांच्या तरतुदींना अधीन
चा ५. राहून,–

(क) संस्थेस कोणत्याही सदस्याकडून किंवा माजी सदस्याकडून किंवा मृत सदस्याकडून येणे असलेले कोणतेही ऋण किंवा त्याच्याकडे बाकी असलेली मागणीची रक्कम ही–

(एक) अशा सदस्याने किंवा माजी सदस्याने किंवा मृत सदस्याने संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या सहाय्याने किंवा त्याशिवाय संपूर्णतः किंवा अंशतः काढलेल्या पिकांवर किंवा शेतीच्या इतर उत्पन्नावर,

(दोन) संस्थेने पैशाच्या किंवा मालाच्या स्वरुपात अशा सदस्यास, माजी सदस्यास किंवा मृत सदस्यास दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या सहाय्याने संपूर्णतः किंवा अंशतः त्याला पुरविलेल्या किंवा त्याने खरेदी केलेल्या कोणत्याही गुरांवर, गुरांच्या वैरणीवर, शेतीच्या किंवा उद्योगाच्या अवजारांवर किंवा यंत्रसामग्रीवर किंवा वस्तुनिर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर किंवा कर्मशाळांवर, गोदामांवर किंवा धंद्याच्या जागेवर, आणि

(तीन) सदस्याने संस्थेकडे तारण-गहाण म्हणून, तारण म्हणून किंवा अन्यथा गहाण म्हणून ठेवली असेल व जी त्यांच्या अभिरक्षेत असेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेवर प्रथम भार राहील ;

(ख) भाडे, भाग, कर्ज किंवा खरेदीधन किंवा इतर कोणतेही हक्क किंवा संस्थेला द्यावयाच्या रकमा यांच्याबाबत कोणत्याही सदस्याने किंवा माजी सदस्याने किंवा मृत सदस्याने संस्थेला द्यावयाच्या कोणत्याही मागणीच्या बाकी रकमा किंवा देणी ही, अशा संस्थेच्या स्थावर मालमत्तेवर अशा सदस्याचा जो हितसंबंध असेल, त्यावरील प्रथम भार राहील.

**स्पष्टीकरण.**– जमीन महसुलाव्यतिरिक्त इतर देय रकमांच्या संबंधातील शासनाचा अग्रहक्क हा पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी, ज्यांच्या संबंधात शासनाचा दावा असेल अशा निधीतून सदस्याने निर्माण केलेल्या मत्तेपुरताच मर्यादित राहील.

(२) पूर्वगामी पोटकलमान्वये भाराच्या अधीन असलेली कोणतीही मालमत्ता किंवा मालमत्तेतील हितसंबंध, संस्थेच्या पूर्वपरवानगी वाचून कोणत्याही रीतीने हस्तांतरित करता येणार नाहीत व असे हस्तांतरण संस्था ज्या शर्ती (तशा शर्ती असल्यास) लादील, त्यांस अधीन राहील.

(३) पोटकलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेले कोणतेही हस्तांतरण निरर्थक असेल.

(४) पोटकलमे (२) व (३) यात काहीही अंतर्भूत असेल तरी, ज्या संस्थेचे एक उद्दिष्ट आपल्या सदस्यांच्या उत्पन्नाचा विनियोग करणे, हे असेल, अशा संस्थेस तिच्या उपविधित पुढीलप्रमाणे तरतूद करता येईल किंवा अन्यथा आपल्या संदस्यांशी पुढीलप्रमाणे संविदा करता यईल :–

(क) असा प्रत्येक सदस्य आपल्या उत्पन्नाचा विनियोग संस्थेमार्फत करील, आणि

(ख) जो कोणताही सदस्य, उपविधिचा किंवा अशा कोणत्याही संविदेचा भंग केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल तो उपविधित विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने ठरवलेल्या कोणत्याही हानीबद्दल संस्थेस भरपाई देईल.

१९६३ याच्या कलम ३० (क) अन्वये संचयन केंद्रावर विक्रीसाठी दिले असेल तेव्हा, खरेदीदार त्याची जी किंमत देण्याचे कबूल करण्यात आले असेल, अशी किंमत त्यामधून उपरोक्त [१][नमूद करण्यात आलेल्या संस्थांच्या] देय रकमांची [२][ * * * ] वजात केल्यानंतर शेतीचे उत्पन्न विक्रीसाठी देणाऱ्यास चुकती करील आणि त्या कलमात तरतूद केल्याप्रमाणे अशा वजातीची रक्कम उक्त अधिनियमान्वये स्थापलेल्या बाजार समितीस चुकती करील. पूर्वोल्लेखित कलम ३० (क) मध्ये तरतूद केलेल्या पध्दतीने शेतीचे उत्पन्न विक्रीसाठी देणाऱ्यास आणि समितीस अशी रक्कम चुकती केल्यानंतर खरेदीदार शेतीचे उत्पन्न विक्रीसाठी देणाऱ्यास किंमत चुकती करण्याच्या आपल्या दायित्वातून मुक्त होईल. १९६४ चा महा. २०.

[३][संस्थांनी दिलेल्या कर्जापोटी करावयाच्या वजातीची रक्कम [४][ही राज्य शासनास त्याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे अधिसूचित करता येईल अशा दराने वजा करण्यात येईल, तथापि असा दर हा] खरेदीदाराने किंमत म्हणून द्यावयाच्या एकूण रकमेच्या पुढील टक्यांपेक्षा अधिक होणार नाही :—

(एक) विक्रीसाठी दिलेले उत्पन्न ऊसाचे असेल तर—१०० टक्के,

(दोन) विक्रीसाठी दिलेले उत्पन्न [५][कापसाचे] असेल तर —६० टक्के,

(तीन) इतर कोणत्याही बाबतीत —४० टक्के,

(२) खरेदीदाराकडून रक्कम मिळाल्यानंतर, बाजार समिती उत्पन्न विक्रीसाठी देणाऱ्याकडून [६][संबंधित संस्थांना] देय असलेली थकबाकीची रक्कम, त्या प्रयोजनासाठी विहित करावयाच्या वाजवी कालावधीत [६][त्या संस्थांना] चुकती करण्याची व्यवस्था करील. बाजार समितीने धनादेशाची रक्कम मिळाल्यानंतर ८ दिवसांच्या आत अशी देय रक्कम चुकती न केल्यास बाजार समिती अशा देय रकमांवर मुंबई सावकार अधिनियम, १९४६ अन्वये तारणाशिवाय घेतलेल्या कर्जासाठी निश्चित केलेल्या व्याजाच्या कमाल दरापेक्षा अधिक होणार नाही अशा, याबाबतीत विहित करण्यात आलेल्या दराने [६][संबंधित संस्थांना] व्याज देण्यास पात्र ठरेल.] १९४७ चा मुंबई २१.

[७][(३) असा कोणताही खरेदीदार राज्य शासन असेल किंवा त्या शासनाने नेमलेला एखादा अभिकर्ता किंवा अधिकारी असेल किंवा राज्य शासनाने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे अधिसूचित केलेला प्रक्रिया कारखाना असेल किंवा अशा कारखान्याने नेमलेला एखादा अभिकर्ता किंवा अधिकारी असेल, त्याबाबतीत खरेदीदाराने पूर्वी उल्लेखिलेल्या संस्थांच्या देय रकमांची वजात केल्यानंतर, उत्पन्न विक्रीसाठी देणाऱ्याला किंमत चुकती करील आणि उत्पन्न विक्रीसाठी देणाऱ्याच्या वतीने अशा वजातीची रक्कम संबंधित संस्थांना परस्पर देईलः

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४४, कलम २ (अ)(दोन) अन्वये "नमूद करण्यात आलेल्या सहकारी संस्था" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ (अ) (एक) अन्वये "व या नंतर नमूद करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४४, कलम २ (अ) (तीन) अन्वये मूळ मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ (अ) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरिल अधिनियमाच्या कलम ३ (अ) (तीन) अन्वये "कपाशीचे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम २ (ब) अन्वये अनुक्रमे "त्या संस्थेस" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २ (क) अन्वये पोटकलम (३) जादा दाखल करण्यात आले.

परंतु, उत्पन्न देऊ करणाऱ्याने एकाहून अधिक संस्थांकडून कर्जे घेतले असतील त्याबाबतीत खरेदीदरास पिकांसाठी वित्तव्यवस्था करण्यासाठी किंवा हंगामी वित्तव्यवस्था करण्यासाठी किंवा शेतीच्या इतर प्रयोजनासाठी वित्तव्यवस्था करण्यासाठी अठरा महिन्यांहून कमी नसेल आणि पाच वर्षांहून अधिक नसेल, अशा मुदतीत परतफेड करण्याजोग्या देय रकमेची मर्यादा आणि कोणत्याही [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस देय असलेल्या रकमेची मर्यादा लक्षात घेऊन आणि राज्य शासन वेळोवेळी देईल अशा निदेशांच्या (तसे निदेश असल्यास) अधीनतेने कर्ज देणाऱ्या निरनिराळया संस्थांमध्ये विभागण्यात यावयाच्या वजातिच्या रकमेचे प्रमाण निर्धारित करता येईल].

[२][**स्पष्टीकरण**.– या कलमाच्या प्रयोजनाकरिता " खरेदीदार " या शब्दात जी व्यक्ती विक्रीसाठी देऊ केलेल्या कोणत्याही शेती उत्पनाची खरेदी किंमत देईल किंवा जिच्याकडून संस्थेच्या खात्यावर किंवा अभिकर्ता म्हणून किंवा कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने अशा किंमतीचा भरणा करता येईल, अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.]

**४९.** [३][ (१) संस्थेच्या सदस्यास संस्थेच्या प्रित्यर्थ अशा अर्थाने करारपत्र करून देता येईल की, आपला मालक आपणास द्यावयाच्या वेतनातून अथवा मजुरीतून करारपत्रात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी संस्थेला प्रदेय असणारी कोणतीही रक्कम विनिर्दिष्ट अशा हप्त्यामध्ये कापून घेण्यास व त्याचप्रमाणे अशी कापून घेतलेली रक्कम सदस्याकडून संस्थेला देय असलेल्या कोणत्याही ऋणाची किंवा अन्य देणे रकमेची परतफेड करण्यासाठी संस्थेकडे भरावयास सक्षम असेल. अशा करारपत्राची संस्थेच्या अधिकाऱ्याने रीतसर साक्षांकित केलेली एक प्रत संस्थेकडून मालकाला पाठवण्यात येईल.]

विवक्षित बाबतीत संस्थेचा दावा पुरा करण्यासाठी वेतनातून कपात.

(२) [४][ अशा करारपत्राची प्रत मिळाल्यावर ], संस्थेने तशी लेखी मागणी केली असता आणि [५][ जोपर्यंत संस्थेला प्रदेय म्हणून करारपत्राच्या प्रतीत दर्शविलेली एकूण रक्कम कापून घेऊन ती संस्थेला देण्यात येत नाही तोपर्यंत ]; मालक अशा करारपत्रानुसार रक्कम कापून घेईल आणि अशा रीतीने, कापून घेतलेली रक्कम ही जणू ज्या दिवशी तो ती रक्कम देईल त्या दिवशी वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याने देणे असलेल्या वेतनाचा भाग आहे, असे समजून संस्थेकडे भरील.

१९३६ चा ४.

(३) पूर्वगामी पोटकलमान्वये केलेली मागणी मिळाल्यानंतर जर मालक मागणीत विनिर्दिष्ट केलेली रक्कम संबंधित सदस्यास देणे असलेल्या वेतनातून किंवा मजुरीतून कापून घेण्यास कोणत्याही वेळी कसूर करील किंवा कापून घेतलेली रक्कम संस्थेकडे भरण्यात कसूर करील तर, [६][ अशी रक्कम आणि ज्या प्रकरणी मालकाने रक्कम कापून घेतली असेल, परंतु, अशा कापून घेतलेल्या रकमेचा भरणा संस्थेकडे केला नसेल त्याप्रकरणी अशी रक्कम व संस्थेला रक्कम ज्या दिनांकाला देय होते त्या दिनांकाला सुरू होणाऱ्या व संस्थेला रकमेचा प्रत्यक्ष भरणा केल्याचा दिनांक संपणाऱ्या मुदतीसाठी संस्था सदस्याला जेवढ्या दराने व्याज आकारते त्याच्या दीडपट दराने त्यावरील व्याज देण्यास मालक व्यक्तिशः जबाबदार असेल आणि अशी रक्कम

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४१, याच्या कलम ५ (ख) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आले.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ (ब) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २१ (अ) अन्वये पोट-कलम (१) हे बदली दाखल करण्यात आले,

[४] वरील अधिनियमाच्या कलम २१ (ब) (एक) अन्वये "असे करारपत्र करून दिल्यानंतर " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २१ (ब) (दोन) अन्वये "जोपर्यंत असे संपूर्ण ऋण किंवा मागणी चुकती झालेली आहे असे संस्था कळविणार नाही तोपर्यंत " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २१ (क) अन्वये " उक्त रक्कम देण्यास मालक व्यक्तिशः जबाबदार असेल " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " प्राथम्य देण्यात येईल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

व तीवर कोणतेही व्याज असल्यास, त्यासह निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे त्या मालकाकडून जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसुलीयोग्य असेल आणि अशी रक्कम व तीवर याप्रमाणे देय होणारे व्याज यांना, थकित मजुरीसंबंधात मालकावर येणाऱ्या दायित्वाइतकाच अग्रक्रम मिळेल].

(४). या कलमातील कोणताही मजकूर कोणत्याही रेल्वेमध्ये (भारताच्या संविधानाच्या अर्थांतर्गत) आणि खाणीमध्ये व तेलक्षेत्रामध्ये कामावर लावलेल्या व्यक्तींना लागू असणार नाही.

प्रकरण पाच

## राज्यांकडून संस्थांना सहाय्य

राज्य शासनाची संस्थांमध्ये प्रत्यक्ष भागीदारी.

**५०.** (उभयपक्षी) संमत होतील अशा अटींवर व शर्तीवर राज्य शासनास मर्यादित दायित्व असलेल्या संस्थेच्या भागभांडवलात संस्थेला परस्पर अंशदान देता येईल.

राज्य शासनाची संस्थांमध्ये अप्रत्यक्ष भागीदारी.

**५१.** राज्य शासनास, कायद्यान्वये करण्यात आलेल्या विनियोजनाद्वारे एखाद्या संस्थेस मर्यादित असलेल्या इतर संस्थांचा भाग प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खरेदी करण्यासाठी पैसे पुरविता येतील. (पूर्वोक्त प्रयोजनासाठी अशा रीतीने पैसे पुरविण्यात आलेल्या संस्थेचा या प्रकरणात यापुढे " शिखर संस्था "म्हणून उल्लेख करण्यात आला आहे.)

प्रमुख राज्य भागीदारी. निधी.

**५२.** (१) पूर्वी सांगितल्याप्रमाणे पैसे पुरविण्यात आलेली शिखर संस्था अशा पैशांचा "प्रमुख राज्य भागीदारी निधी " या नावाचा एक निधी स्थापन करील.

(२) शिखर संस्था प्रमुख राज्य भागीदारी निधीचा उपयोग खालील प्रयोजनासाठी करील :–

(क) मर्यादित दायित्व असलेल्या इतर संस्थांचे भाग प्रत्यक्षपणे खरेदी करणे ;

(ख) एखाद्या संस्थेस (जिचा या प्रकरणात यापुढे " मध्यवर्ती संस्था " म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) मर्यादित दायित्व असलेल्या इतर संस्थांचे (जिच्या प्रकरणात यापुढे " प्राथमिक संस्था " म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) भाग खरेदी करता यावेत म्हणून त्या संस्थेला पैसे पुरविणे ;

(ग) या प्रकरणाच्या तरतुदींनुसार राज्य शासनास रकमा देणे ;

इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तिला त्यांचा उपयोग करता येणार नाही.

दुय्यम राज्य भागीदारी निधी.

**५३.** (१) प्रमुख राज्य भागीदारी निधीतून शिखर संस्थेने ज्या मध्यवर्ती संस्थेला पैसा पुरविला असेल ती मध्यवर्ती संस्था अशा पैशाचा " दुय्यम राज्य भागीदारी निधी " या नावाचा एक निधी स्थापन करील.

(२) मध्यवर्ती संस्था दुय्यम राज्य भागीदारी निधीचा उपयोग खालील प्रयोजनासाठी करील :–

(क) प्राथमिक संस्थेचे भाग खरेदी करणे ;

(ख) या प्रकरणांच्या तरतुदींनुसार शिखर संस्थेत रकमा देणे.

इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तिला त्यांचा उपयोग करता येणार नाही.

५४. राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय प्रमुख राज्य भागीदारी निधीतील किंवा दुय्यम राज्य भागीदारी निधीतील पैशांतून संस्थेचे भाग खरेदी करता येणार नाहीत. भाग खरेदी करण्यासाठी राज्य शासनाची मान्यता.

५५. (क) राज्य शासनाने ; किंवा

(ख) यथास्थिति, शिखर संस्थेने प्रमुख राज्य भागीदारी निधीतून किंवा मध्यवर्ती संस्थेने दुय्यम राज्य भागीदारी निधीतून,–

एखाद्या संस्थेचे कोणतेही भाग खरेदी केलेले असतील तर त्या बाबतीत अशा भागांच्या संबंधातील दायित्व, ज्या संस्थेचे भाग खरेदी करण्यात आले असतील, [1][ती संस्था समापित करण्यात येत असेल] त्या प्रसंगी अशा भागांच्या संबंधात देण्यात आलेल्या रकमेपुरते मर्यादित राहील. विवक्षित भागांच्या संबंधात दायित्व मर्यादित असणे.

५६. ज्या शिखर संस्थेचे प्रमुख राज्य भागीदारी निधीतील पैशातून इतर संस्थांचे भाग खरेदी केले असतील, त्या शिखर संस्थेस आणि ज्या मध्यवर्ती संस्थेने दुय्यम राज्य भागीदारी निधीतील पैशांतून प्राथमिक संस्थांचे भाग खरेदी केले असतील, त्या मध्यवर्ती संस्थेस उक्त भागांवर संबंधित संस्थेने तो लाभांश जाहीर केला असेल आणि जो त्या संस्थेच्या इतर भागधारकांना देय असेल केवळ तोच लाभांश मिळण्याचा हक्क राहील. लाभांशाच्या रकमेवर निर्बंध.

५७. (१) ज्या संस्थेतील भाग प्रमुख राज्य भागीदारी निधीतून खरेदी केले असतील अशी संस्था समापित करण्यात आलेली असेल किंवा विसर्जित करण्यात आली असेल, तर, ज्या शिखर संस्थेने ते भाग खरेदी केले असतील, त्या शिखर संस्थेविरूध्द राज्य शासनाला किंवा शिखर संस्थेस अशा खरेदीतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही नुकसानीच्या संबंधात कोणताही दावा सांगता येणार नाही. परंतु, यथास्थिति, संस्थेच्या परिसमापनाच्या कार्यवाहीत किंवा तिचे विसर्जन करण्यात आल्यावर, मध्यवर्ती संस्थेस जो कोणताही पैसा मिळेल तो मिळविण्याचा शिखर संस्थेस हक्क असेल. आणि असा पैसा प्रमुख राज्य भागीदारी निधीत जमा करील. शिखर संस्थाची मध्यवर्ती संस्थाची क्षतिपूर्ती.

(२) ज्या संस्थेतील भाग दुय्यम राज्य भागीदारी निधीतून खरेदी केले असतील अशी संस्था समापित करण्यात आली असेल किंवा विसर्जित करण्यात आली असेल तर, ज्या मध्यवर्ती संस्थेने, ते भाग खरेदी केले असतील त्या मध्यवर्ती संस्थेविरूध्द राज्य शासनास किंवा शिखर संस्थेस अशा खरेदीतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही नुकसानीच्या संबंधात कोणताही दावा सांगता येणार नाही,परंतु, यथास्थिति, संस्थेच्या परिसमापनाच्या कार्यवाहीत किंवा तिचे विसर्जन करण्यात आल्यावर मध्यवर्ती संस्थेस जो कोणताही पैसा मिळेल तो मिळण्याचा शिखर संस्थेस हक्क असेल आणि असा पैसा प्रमुख राज्य भागीदारी निधित जमा करण्यात येईल.

५८. (१) इतर संस्थांचे जे भाग प्रमुख राज्य भागीदारी निधीतील पैशातून खरेदी करण्यात आले असतील त्या भागांच्या संबंधात शिखर संस्थेस अशा भागाचे विमोचन करण्यात आल्यावर मिळालेला किंवा लाभांशाचा किंवा अन्य स्वरुपात मिळालेला सर्व पैसा त्या निधीत जमा केला पाहिजे. भाग भाडवल आणि लाभांश, इत्यादींचा विनियोग.

(२) प्राथमिक संस्थांचे जे भाग दुय्यम राज्य भागीदारी निधीतील पैशातून खरेदी करण्यात आले असतील त्या भागांच्या संबंधात मध्यवर्ती संस्थेस अशा भागांचे विमोचन करण्यात आल्यावर मिळालेल्या किंवा लाभांशाच्या किंवा अन्य स्वरुपात मिळालेला सर्व पैसा प्रथमतः त्या निधीत जमा केला पाहिजे आणि नंतर तो शिखर संस्थेकडे हस्तांतरित केला पाहिजे. शिखर संस्थेने असा सर्व पैसा प्रमुख राज्य भागीदारी निधीत जमा केला पाहिजे.

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३३, कलम ११ अन्वये "बंद करण्यात आली असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) यथास्थिति, शिखर संस्थेच्या किंवा मध्यवर्ती संस्थेच्या नावावर असे भाग असले तरीही पोट-कलम (१) व (२) यात उल्लेख केलेला सर्व पैसा व लाभांश राज्य शासनाला देईल.

(४) पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल ती खेरीज करून राज्य शासनाला कलम ५१ अन्वये त्याने शिखर संस्थेस पुरविलेल्या पैशांमुळे होणाऱ्या इतर कोणत्याही प्राप्तीवर हक्क असणार नाही.

शिखर संस्था किंवा मध्यवर्ती संस्था समापित झाल्यावर प्रमुख किंवा दुय्यम राज्य भागीदारी निधीचा विनियोग.

**५९.** (१) ज्या शिखर संस्थेने प्रमुख राज्य भागीदारी निधी स्थापन केला असेल ती शिखर संस्था समापित किंवा विसर्जित करण्यात आली तर त्या निधीत जमा असलेला किंवा त्या निधीत देय असलेला सर्व पैसा राज्य शासनाला दिला पाहिजे.

(२) ज्या मध्यवर्ती संस्थेने दुय्यम राज्य भागीदारी निधी स्थापन केला असेल, ती मध्यवर्ती संस्था समापित किंवा विसर्जित करण्यात आली, तर त्या निधीत जमा असलेला किंवा त्या निधीस देय असलेला सर्व पैसा कलम ५२, पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये मध्यवर्ती संस्थेस ज्या मधून पैसा मिळाला असेल, त्या प्रमुख राज्य भागीदारी निधीस देण्यात येईल आणि त्यात जमा करण्यात येईल.

प्रमुख किंवा दुय्यम राज्य भागीदारी निधी हा मत्तांचा भाग न होणे.

**६०.** प्रमुख राज्य भागीदारी निधीत किंवा दुय्यम राज्य भागीदारी निधीत जमा असलेली कोणतीही रक्कम यथास्थिति, शिखर संस्थेच्या किंवा मध्यवर्ती संस्थाच्या मत्तांचा भाग होणार नाही.

राज्य शासन आणि शिखर संस्था यांच्यामधील करार.

**६१.** या प्रकरणाच्या पूर्वगामी तरतुदींना अधीन राहून,—

(क) राज्य शासन शिखर संस्थेस ज्या अटींवर व शर्तीवर पैसे पुरवील, त्या अटी व शर्ती नमुद करून, राज्य शासन शिखर संस्थेशी कलम ५१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी करार करता येईल.

(ख) शिखर संस्था प्रमुख राज्य भागीदारी निधीतून मध्यवर्ती संस्थेस ज्या अटींवर व शर्तीवर पैसा पुरवील, त्या अटी व शर्ती नमूद करून तिला राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने मध्यवर्ती संस्थेशी कलम ५२ चे पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी करार करता येईल,

संस्थांना राज्याकडून द्यावयाच्या सहाय्याचे इतर प्रकार.

**६२.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा शर्तिना अधीन राहून राज्य शासनाला पुढील गोष्टी करता येतील,—

(क) एखाद्या संस्थेस कर्ज देणे,

(ख) एखाद्या संस्थेने काढलेल्या ऋणपत्रांचे मुद्दल किंवा त्यावरील व्याज किंवा ही दोन्ही देण्याबद्दल किंवा संस्थेचे भाग भांडवल तिच्या सदस्यांना परत देण्याबद्दल किंवा भाग भांडवलावर राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा दरांनी लाभांश देण्याबद्दल हमी देणे ;

(ग) सहकारी बँकेने संस्थेस दिलेल्या कर्जाची परतफेड करण्याबद्दल हमी देणे ;

(घ) भारतीय रिझर्व्ह बँकेने किंवा भारतीय औद्योगिक वित्त महामंडळाने किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना केलेल्या अशा कोणत्याही इतर प्राधिकरणाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा यांच्या मुद्दलाच्या परतफेडीबद्दल व त्यावरील व्याज देण्याबद्दल हमी देणे ; किंवा

(ङ) संस्थेस इतर कोणत्याही स्वरुपात (अर्थसहाय्य धरुन) वित्तीय सहाय्य देण्याची तरतूद करणे.

६३. या प्रकरणातील कलमे ५१ ते ६१ (दोन्ही धरून) यातील त्या तरतुदी त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात अशा तरतुदीशी विसंगत असा कोणताही मजकूर अंतर्भूत असला तरीही परिणामक असतील. या प्रकरणातील तरतुदी इतर कायद्यांवर अधिमावी ठरणे.

## प्रकरण सहा

### संस्थांची मालमत्ता व निधी

६४. [1][विहित करण्यात येईल अशा लाभांश समानीकरण निधी किंवा अधिलाभांश निधी किंवा] संस्थेचा निव्वळ नफा या व्यतिरिक्त निधीचा कोणताही भाग अधिलाभांश म्हणून किंवा लाभांश म्हणून संस्थेच्या सदस्यांना देता येणार नाही किंवा इतर प्रकारे त्यांची सदस्यांमध्ये वाटणी करता येणार नाही. निधींची विभागणी न करणे.

परंतु, सदस्यास त्याने संस्थेसाठी केलेल्या कोणत्याही सेवेबद्दल उपविधीव्दारा घालून देण्यात येईल अशा प्रमाणानुसार पारिश्रमिक देता येईल.

६५. [2][(१) संस्था आपली संबंध्द वार्षिक वित्तीय विवरणे तयार करील व विहित रीतीने परिणामी निव्वळ नफा किंवा तोटा याचा हिशेब काढील]; [3][नफा विनिश्चित करणे व त्याचे संविभाजन करणे.]

(२) संस्थेस [4][आपल्या निव्वळ नफ्याचा] विनियोग, राखीव निधी किंवा इतर कोणत्याही निधीसाठी सदस्यांना त्यांच्या भागांवर लाभांश देण्यासाठी, [5][ * * * * ] सदस्यांकडून आणि जे संस्थेचे सदस्य नसतील अशा इतर व्यक्तींकडून संस्थेच्या व्यवहारात जे साहाय्य मिळाले असेल त्याच्या आधारावर त्यांना अभिलाभांश देण्यासाठी, त्यांनी मानधन देण्यासाठी आणि नियमात किंवा उपविधित विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करता येईल :

परंतु, वार्षिक सर्वसाधारण बैठकीत मान्यता दिल्याशिवाय आणि अधिनियम, नियम आणि उपविधि यांच्याशी सुसंगत असल्याखेरीज नफ्याच्या कोणत्याही भागाचा विनियोग करता येणार नाही.

६६. (१) ज्या संस्थेस आपल्या व्यवहारापासून नफा मिळतो किंवा मिळू शकतो अशी प्रत्येक संस्था एक राखीव निधी ठेवील. राखीव निधी.

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २२ (अ) अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २२ (ब) अन्वये ही समास टीप बदली दाखल करण्यात आली.

[4] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १३ (ब) अन्वये "आपल्या नफ्याच्या" मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १० (ब) अन्वये "राज्य शासन या मजकुराऐवजी ह्या बाबतीत" या शब्दांनी सुरू होणारा व "अंशदान देण्यासाठी" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

(२) [1][प्रत्येक संस्था प्रतिवर्षी आपल्या निव्वळ नफ्याचा किमान एक-चतुर्थांश भाग राखीव निधीत टाकील] आणि [2][अशा राखीव निधीचा उपयोग, या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांच्या, तसे नियम असल्यास, अधीनतेने] संस्थेच्या धंद्यासाठी करता येईल किंवा तो राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल, त्याप्रमाणे कलम ७० च्या तरतुदींना अधीन राहून गुंतवता येईल किंवा राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने अंशतः त्याचा उपयोग, या अधिनियमाच्या उद्दिष्टांना ज्यायोगे चालना देता येईल, अशा एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा राज्याच्या किंवा स्थानिक हिताच्या अशाच एखाद्या प्रयोजनासाठी करता येईल :

[3][परंतु निबंधकास, कोणत्याही संस्थेची किंवा संस्थेच्या वर्गाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन, या पोट-कलमान्वये राखीव निधीस द्यावयाचे अंशदान कमी दराने निश्चित करता येईल, परंतु, हा दर संबंधित संस्थेच्या किंवा संस्थांच्या निव्वळ नफ्याच्या एक-दशांशाहून कमी असणार नाही.

लाभांशावर निर्बंध.

[4][६७. कोणतीही संस्था [5][निबंधकाच्या पूर्वमंजुरीने असेल ते खेरीज करुन] एरव्ही, आपल्या सदस्यांना [5][पंधरा टक्क्यांपेक्षा] अधिक दराने लाभांश देणार नाही.]

राज्य संघीय संस्थेचे शिक्षण निधीस अंशदान.

[6][६८. (१) प्रत्येक संस्था राज्य शासन या बाबतीत अधिसूचित करील, अशा राज्य संघीय संस्थेच्या शिक्षण निधीसाठी विहित करण्यात येईल अशा दराने दरवर्षी अंशदान देईल आणि निरनिराळ्या संस्थांकरिता किंवा संस्थांच्या वर्गाकरिता त्यांच्या आर्थिक स्थितीनुसार निरनिराळे दर विहित करता येईल.

[7][ * * * * * * ]

(२) प्रत्येक संस्था, [8][सहकारी वर्षाच्या समाप्तीनंतर तीन महिन्यांच्या आत] उक्त निधीत आपले अंशदान देईल. या कलमान्वये आवश्यक असलेल्या गोष्टींचे पालन करण्यात जाणूनबुजून कसूर करणारा कोणताही अधिकारी पूर्वोक्तप्रमाणे अधिसूचित केलेल्या संघीय संस्थेत उक्त रकमेची भरपाई करण्यास व्यक्तीशः जबाबदार असेल.]

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १४ (अ) अन्वये " साधन किंवा उत्पादक संस्थेच्या बाबतीत " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " जमा करण्यात आली पाहिजे " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १० अन्वये " अशा राखीव निधीचा उपयोग " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १४ (ब) अन्वये या परंतुकाची भर घालण्यात आली.

[4] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २३ अन्वये कलम ६७ बदली दाखल करण्यात आले.

[5] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ अन्वये " राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने असेल ते खेरीजकरून " आणि " बारा टक्क्यांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११ अन्वये कलम ६८ बदली दाखल करण्यात आले.

[7] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ११ अन्वये परंतुक वगळण्यात आले

[8] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २४ (अ) अन्वये " सदस्यांच्या अधिमंडळाकडून ज्या तारखेस जिचे हिशेब स्वीकृत करण्यात येतील त्या तारखेपासून दोन महिन्यांचे आत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(३) जर कोणतीही संस्था पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत अंशदान देण्यास चुकली असेल, तर त्या बाबतीत देय असलेल्या अंशदानाची रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याजोगी असेल आणि राज्य संघीय संस्थेने निबंधकास, संस्थेने अशी कसूर केल्याचे कळविल्यावर निबंधक त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे देय रक्कम वसूल करण्याबाबत एक प्रमाणपत्र देईल.]

**६९.** कलम ६६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे राखीव निधीसाठी आणि कलम ६८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शिक्षण निधीसाठी तरतूद करण्यात आल्यावर, संस्थेस आपल्या निव्वळ नफ्याच्या वीस टक्क्यांहून अधिक नाही इतकी रक्कम निराळी काढून ठेवता येईल आणि राज्य शासन या बाबतीत वेळोवेळी अधिसूचित करील अशा संघीय संस्थेची मान्यता घेऊन अशा संपूर्ण रकमेचा किंवा तिच्या भागाचा कोणताही सहकारी प्रयोजनासाठी किंवा धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० च्या कलम २ च्या अर्थांतर्गत कोणत्याही धर्मादाय प्रयोजनासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी अंशदान देण्याकडे उपयोग करता येईल. (सार्वजनिक प्रयोजनासाठी अंशदान.) (१८९० चा ६.)

[2][**६९क.** (१) प्राथमिक कृषि पत संस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था व सेवा सहकारी संस्था व याबाबतीत विहित करण्यात येतील अशा संस्थांच्या इतर वर्गाच्या (या कलमात यापुढे ज्यांचा " सहकारी राज्य संवर्ग " असा निर्देश करण्यात आला आहे) सचिवाचा एक सहकारी राज्य संवर्ग प्रस्थापित करण्यात येईल. त्यात राज्य शासनाकडून याबाबतीत अधिसूचित करण्यात आलेल्या मध्यवर्ती संस्थांकडून या प्रयोजनासाठी भरती करण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश असेल. भरती करावयाच्या व्यक्तींची संख्या व त्यांच्या सेवेच्या शर्ती राज्य शासनाकडून याबाबतीत वेळोवेळी [3][देण्यात आलेली सर्वसाधारण व विशेष मार्गदर्शक तत्त्वे, कोणतीही असल्यास, त्यानुसार] मध्यवर्ती संस्थेकडून निश्चित केल्या जातील. (विवक्षित संस्थांच्या सचिवांचा सहकारी राज्य संवर्ग प्रस्थापित करणे व अशा संवर्गासाठी सेवायोजन निधी स्थापन करणे.)

(२) मध्यवर्ती संस्थेस तिने त्या संवर्गात नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे वेळोवेळी पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही संस्थेकडे प्रतिनियुक्तीवर पाठविता येईल. अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही संस्थेच्या अधीन काम करण्यासाठी नेमण्यात आले असेल त्याबाबतीत मध्यवर्ती संस्था निश्चित करील अशा मुदतीसाठी व अशा अटींवर व शर्तीवर त्या पदावरील सेवा त्या संस्थेकडून स्वतःकडे घेण्यात येतील. परंतु, अशी नेमलेली व्यक्ती [4][पोटकलम (३) अन्वये] स्थापन करण्यात आलेल्या निधीमधून आपला पगार व भत्ते घेईल.

[5][(२क) संवर्गात नियुक्त करण्यात आलेल्या आणि पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रत्येक संस्थेच्या नियंत्रणाखाली सचिव म्हणून काम करण्यासाठी प्रतिनियुक्त केलेल्या किंवा पदस्थापित करण्यात आलेल्या व्यक्ती संबंधातील लगत प्रारंभिक पर्यवेक्षी नियंत्रणाचे काम अशा व्यक्तींना ज्या संस्थांचे सदस्य म्हणून प्रतिनियुक्त करण्यात आलेले असेल, अशा प्रत्येक संबंधित तालुक्यातील संस्थांचा समावेश असलेल्या व त्या प्रयोजनासाठी नोंदणी करण्यात आलेल्या, तालुका पर्यवेक्षण संस्थेकडे असेल, तालुका पर्यवेक्षण संस्था, अशा संस्थेच्या उपविधिंद्वारे तिच्याकडे प्रदान करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि तिच्याकडे सोपविण्यात येतील अशी कामे किंवा कर्तव्ये पार पाडील.]

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २४ (ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ३ अन्वये कलम ६९ क समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ (अ) अन्वये काढण्यात आलेल्या " सर्वसाधारण व विशेष आदेशानुसार " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये " निकट अनुवर्ती पोट-कलमान्वये " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २ (क) अन्वये पोट-कलम (२ अ) समाविष्ट करण्यात आले.

(३) राज्य शासनाकडून याबाबतीत अधिसूचित करण्यात आलेली शिखर संस्था " सहकारी राज्य संवर्ग सेवायोजन निधी " या नावाचा एक निधी स्थापन करील. असा निधी स्थापन झाल्यावर तो १ जुलै, १९७३ पासून स्थापन झाला असल्याचे मानण्यात येईल. या निधीचा विनियोग, सहकारी राज्य संवर्गात नेमण्यात आलेल्या व्यक्तींना द्यावयाचे वेतन, भत्ते व इतर वित्तलब्धी यांवरील खर्च व त्या संवर्गाशी संबंधित इतर खर्च भागवण्यासाठी करण्यात येईल.

[१][(४) या बाबतीत राज्य शासनाकडून वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करण्यात आलेली,—

(क) राज्य शासनाच्या मते सहकारी चिटणीस राज्य संवर्गातील कोणत्याही चिटणीसाच्या सेवांपासून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही लाभ घेणारी प्रत्येक संस्था किंवा संस्थांचा वर्ग किंवा संस्थांचे वर्ग आणि—

(ख) राज्य शासनाच्या मते उपरोक्तप्रमाणे असा लाभ घेणारा कोणताही व्यवसाय, धंदा किंवा उद्योग चालविणारा इतर प्रत्येक निगम निकाय किंवा अशा निगम निकायाचा वर्ग किंवा अशा निगम निकायांचे वर्ग,

१ जुलै, १९७७ पासून, विहित करण्यात येईल अशा दराने व अशा रीतीने उक्त निधीस दरवर्षी अंशदान देतील आणि निरनिराळ्या संस्था किंवा इतर निगम निकाय किंवा संस्थेचा वर्ग किंवा संस्थांचे वर्ग किंवा इतर निगम निकायाचा वर्ग किंवा इतर निगम निकायांचे वर्ग यासाठी निरनिराळे दर विहित करता येतील. अंशदानाचा दर किंवा अंशदानाचे दर निश्चित करताना राज्य शासन, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेला खर्च द्यावा लागेल अशी संभाव्य सेवा आणि संबंधित संस्था किंवा इतर निकाय यांची आर्थिक स्थिती विचारात घेईल.

**स्पष्टीकरण.**—संस्था त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यास हे कलम लागू आहे अशा कोणत्याही इतर निगम निकायांकडून उक्त निधीत देण्यात येणाऱ्या अंशदानाच्या आकारणीच्या व वसुलीच्या प्रयोजनासाठी असा निगम निकाय हा, अधिनियम लागू असणारी संस्था म्हणून मानता येईल.]

(५) लगतपूर्ववर्ती पोटकलमांच्या आवश्यकतांचे पालन करण्यात कसूर झाल्यास, निबंधकांस संबंधित संस्थेवर मागणीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत अंशदान देण्याबद्दल मागणीची नोटीस बजावता येईल. अशी मागणी ही, संस्थेच्या उत्पन्नावर भार असेल. उक्त मुदतीत अंशदान देण्यात आले नाही तर निबंधकास संस्थेचे निधी जिच्या अभिरक्षेत असतील, अशा बँकेस किंवा व्यक्तीस अंशदानाची रक्कम ताबडतोब देण्याचा निदेश देता येईल आणि अशी बँक किंवा व्यक्ती निबंधकाच्या आदेशाचे पालन करील, अशा निदेशानुसार केलेल्या प्रत्येक प्रदानाने बँकेच्या किंवा व्यक्तीच्या अभिरक्षेत असलेल्या संस्थेच्या पैशांतून तिने अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्या संबंधात तिच्यावर असलेल्या संस्थेच्या सर्व दायित्वातून तिची पुरेशा रीतीने मुक्तता होईल.

(६) उक्त निधीची अभिरक्षा, त्याचे परिरक्षण, त्यात पैसे भरणे, त्यातून पैसे काढणे व खर्च करणे या बाबींशी संबंधित किंवा त्यांना सहाय्यभूत होणाऱ्या सर्व बाबींचे नियमन करण्यासाठी राज्य शासनास नियम करता येतील.

निधींची गुंतवणूक.

**७०.** संस्था आपले निधी पुढीलपैकी एका किंवा अनेक ठिकाणी म्हणजेच,—

(क) मध्यवर्ती बँकेत किंवा राज्य सहकारी बँकेत,

(ख) भारतीय विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८८२ कलम २० यात विनिर्दिष्ट केलेल्या रोख्यांपैकी कोणत्याही रोख्यांत, १८८२ चा २.

---

[१] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(ग) मर्यादित दायित्व असलेल्या व तिच्याप्रमाणे त्याच वर्गीकरणात मोडणाऱ्या अन्य कोणत्याही संस्थेने काढलेल्या शेअर्समध्ये किंवा रोख्यांत किंवा ऋणपत्रात गुंतवील :

परंतु , कोणतीही संस्था तिच्याकडे भरणा झालेल्या भाग भांडवलाची, विहित करण्यात येईल अशा प्रमाणापेक्षा अधिक गुंतवणूक करणार नाही :

परंतु आणखी असे की, या खंडाच्या तरतुदी कोणत्याही कृषि पत संस्थेने कृषि उत्पन्नावर आधारित अशा कोणत्याही कृषि प्रक्रिया संस्थेमध्ये केलेल्या कोणत्याही गुंतवणुकीला लागू होणार नाहीत ; ]

(घ) निबंधकाने या प्रयोजनासाठी मान्य केलेल्या आणि निबंधक वेळोवेळी लादील अशा शर्तीवर [२][या कलमाच्या खंड (क) मध्ये निर्देशलेल्या (सहकारी बँकेव्यतिरिक्त) इतर कोणत्याही सहकारी बँकेत किंवा बँक व्यवसाय करणाऱ्या कंपनीत ; ]

(ङ) नियमांनुसार किंवा राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशानुसार परवानगी असलेल्या इतर कोणत्याही रीतीने,

गुंतवील किंवा ठेव म्हणून ठेवील.

७१. (१) कोणत्याही संस्थेस आपल्या कर्मचाऱ्यांसाठी एक भविष्य निर्वाह निधी स्थापन करता येईल आणि त्यात संस्थेने आणि तिच्या कर्मचाऱ्यांनी दिलेली अंशदाने जमा करण्यात येतील. अशा भविष्य निर्वाह निधीचा संस्थेच्या धंद्यामध्ये उपयोग करता येणार नाही किंवा तो संस्थेच्या मतांचा भाग होणार नाही. परंतु, तो पूर्ववर्ती कलमाच्या तरतुदींअन्वये गुंतवण्यात येईल आणि विहित पद्धतीने त्यांचे प्रशासन केले जाईल. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी.

(२) पूर्वगामी पोटकलमात काहीही अंतर्भूत असले तरी एखाद्या संस्थेने स्थापन केलेल्या ज्या भविष्य निर्वाह निधीस कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२ लागू असेल, अशा भविष्य निर्वाह निधीचे नियमन त्या आधिनियमान्वये केले जाईल.

[३][(७१-क. [४][(१))] कलमे ७८, ९६ किंवा १४४-न अन्वये संस्थेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याने किंवा पदाधिकाऱ्याविरूद्ध वैयक्तिक नात्याने दाखल केलेल्या किंवा करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा खर्च भागवण्याच्या प्रयोजनार्थ, संस्थेच्या निधीतून कोणताही खर्च करण्यात येणार नाही. असा कोणताही खर्च करता येतो किंवा नाही याबद्दल कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, असा प्रश्न निबंधकाकडे निर्देशित करण्यात येईल व त्याच्याकडून त्याचा निर्णय करण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.] पदाधिकाऱ्यांनी किंवा पदाधिकाऱ्यांविरूद्ध वैयक्तिक नात्याने दाखल केलेल्या किंवा करण्यात आलेल्या विवक्षित कार्यवाहीसाठी निधीचा वापर न करणे.

[४][(२) पोटकलम (१) चा भंग करून कोणत्याही व्यक्तीने खर्च केल्यास निबंधक एक महिन्याच्या आत संस्थेला रक्कम परत करण्याविषयी त्या व्यक्तीस निदेश देईल आणि निदेशाप्रमाणे रक्कम परत करण्यात अशी व्यक्ती कसूर करील त्या बाबतीत अशी रक्कम निबंधकाने प्रमाणपत्र दिल्यावर जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

(३) पोटकलम (२) अन्वये निबंधकाने जिच्याविरूद्ध कार्यवाही केली असेल अशी व्यक्ती कोणत्याही आगामी निवडणुकीच्या वेळी आणि ज्या कालावधीत पोटकलम (२) मध्ये निर्देशित केलेली रक्कम देण्यात अशा व्यक्तीने कसूर केली आहे तो एक महिन्याचा कालावधी समाप्त झाल्यानंतर लगेच घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही पोटनिवडणुकीच्या वेळी कोणत्याही संस्थेचा सदस्य, म्हणून पदावर राहण्यास किंवा कोणत्याही संस्थेचा पदाधिकारी होण्यास निरर्ह होईल.]

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २५ अन्वये खंड (क) बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १५ अन्वये " कोणत्याही बँकिंग कंपनीत " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १२ अन्वये कलम ७१ क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २६ अन्वये कलम ७१ क ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोट-कलमे (२) व (३) जादा दाखल करण्यात आली.

## प्रकरण सात

### संस्थांचे व्यवस्थापन

संस्थेसंबंधीचा अंतिम प्राधिकार. ७२. या अधिनियमातील आणि नियमांतील तरतुदीस अधीन राहून प्रत्येक संस्थेसंबंधीचा अंतिम प्राधिकार उपविधित विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने बोलविलेल्या सर्वसाधारण बैठकीतील सदस्यांच्या अधिमंडळामध्ये निहित असेल. [1][संस्थेच्या उपविधिमध्ये अशी तरतूद असेल त्या बाबतीत सदस्यांनी नेमलेले प्रतिनिधी हे सर्वसाधारण बैठकीस हजर राहतील व अधिमंडळाच्या सर्व अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ अशी बैठक ही अधिमंडळाची बैठक असल्याचे मानण्यात येईल.]

समिती, तिचे अधिकार व कार्ये. ७३. [2][(१)] हा अधिनियम, नियम आणि उपविधि यानुसार प्रस्थापित केलेल्या समितीमध्ये प्रत्येक संस्थेचे व्यवस्थापन निहित असेल व ती समिती, हा नियम, अधिनियम आणि उपविधि याअन्वये अनुक्रमे देण्यात येतील किंवा लादण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

[3][(" १कख) समितीने तिच्या कालावधीत संस्थेच्या कामकाजाशी संबंधित असे जे निर्णय घेतले असतील अशा सर्व निर्णयासाठी समितीने सदस्य संयुक्तपणे पृथकपणे जबाबदार असतील. संस्थेच्या हितास हानी पोहोचविणाऱ्या सर्व कृती व अकृतींना समितीने संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असतील. असा प्रत्येक सदस्य, राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात, त्याने पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत तशा आशयाचे बंधपत्र निष्पादित करील. विनिर्दिष्ट मुदतीत असे बंधपत्र निष्पादित करण्यात कसूर करणाऱ्या सदस्याने समितीचा सदस्य म्हणून त्याचे पद रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, वर निर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही जबाबदारी निश्चित करण्यापूर्वी निबंधक संस्थेच्या अभिलेखाची तपासणी करील आणि संस्थेची झालेली हानी ही, समितीच्या सदस्यांकडून झालेल्या कृती किंवा अकृतीमुळे किंवा कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे, अपघातामुळे किंवा अशा सदस्यांच्या नियंत्रणापलीकडील कोणत्याही परिस्थितीमुळे झाली आहे किंवा कसे हे ठरवील :

परंतु आणखी असे की, समितीचा कोणताही सदस्य, समितीच्या कोणत्याही ठरावाशी किंवा निर्णयाशी सहमत नसेल तर, त्याला त्याचे भिन्न मत व्यक्त करता येईल व ते संस्थेच्या बैठकीच्या कार्यवाहीमध्ये नमूद करण्यात येईल आणि अशा सदस्याला, उक्त ठरावामध्ये समाविष्ट केलेल्या निर्णयासाठी किंवा उक्त ठरावानुसार, त्या संस्थेच्या समितीकडून करण्यात आलेल्या कृती किंवा अकृती यासाठी जबाबदार धरण्यात येणार नाही. अशा भिन्न मत असलेल्या सदस्याची जर तशी इच्छा असेल तर, उक्त ठरावाच्या किंवा निर्णयाच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत, त्याला आपले भिन्न मत निबंधकाला लेखीसुद्धा कळविता येईल. संस्थेचे कामकाज ज्यामध्ये चालविण्यात आले असेल अशा बैठकीला जो उपस्थित नसेल आणि ज्याने त्या बैठकीच्या कार्यवाहीबद्दल नंतर खातरजमा केली नसेल अशा कोणत्याही सदस्यालासुद्धा, त्या संस्थांच्या त्या बैठकीमध्ये चालविण्यात आलेल्या कोणत्याही कामकाजाकरिता जबाबदार धरण्यात येणार नाही.".]

[4][(१क) हा अधिनियम, त्याखाली केलेले नियम किंवा कोणत्याही संस्थेचे अथवा संस्थांच्या वर्गाचे उपविधि यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) तात्पुरती समिती नेमण्यासाठी आणि विहित करण्यात येईल असे इतर कामकाज चालविण्यासाठी संस्थेची पहिली सर्वसाधारण बैठक तिची नोंदणी झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत बोलावण्यात येईल. अशा तात्पुरत्या समितीच्या सदस्यांची मुदत, ती समिती प्रथम नियुक्त करण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी किंवा या अधिनियमाखाली केलेले नियम किंवा उपविधि यांच्या तरतुदींनुसार रीतसर समितीची यथोचितरित्या रचना करण्यात येईल त्या दिनांकापर्यंतचा कालावधी यांपैकी जो अगोदर असेल त्या कालावधी इतकी असेल, आणि अशा तात्पुरत्या समितीचे सर्व सदस्य, असा कालावधी समाप्त झाल्याच्या किंवा समितीची अशी रचना झाल्याच्या दिनांकास आपला पदभार सोडतील ;

(ख) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सहकारी साखर कारखाने व सहकारी सूत गिरण्या आणि राज्य शासन, राजपत्रातील, विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, याबाबत विनिर्दिष्ट करील असा इतर संस्थावर्ग यांकरिता तात्पुरत्या समित्या राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात येतील ; आणि त्यांचे सदस्य, तीन वर्षांकरिता पद धारण करतील, हा कालावधी एका वेळी एका वर्षाने वाढविता येईल, मात्र एकूण कालावधी एकत्रितपणे पाच वर्षांपेक्षा अधिक होणार नाही ;

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १३ अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २७ अन्वये कलम ७३ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[3] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ३ अन्वये पोट-कलम (१कख) दाखल करण्यात आले.

[4] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ५ अन्वये पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

परंतु, राज्य शासनाला, अशा समितीवर नामनिर्देशित केलेला किंवा केलेले सदस्य ज्या कालावधीसाठी नामनिर्देशित करण्यात आला असेल/आले असतील तो कालावधी समाप्त झाला नसला तरी अशी समिती किंवा त्यातील कोणताही किंवा सर्व सदस्य यांमध्ये बदल करण्याचा किंवा तिची पुनर्रचना करण्याचा अधिकार असेल :

परंतु , आणखी असे की, समितीमधील अशा बदलानंतर किंवा पुनर्रचनेनंतर पदभार ग्रहण करणारा किंवा करणारे सदस्य, या खंडाअन्वये ज्यासाठी तात्पुरती समिती नियुक्त करण्यात आलेली असेल, त्या कालावधीकरिता पदभार धारण करील/करतील;

(ग) संस्थेच्या समितीची प्रथम रचना करण्यात येईपर्यंत, संस्थेची तात्पुरती समिती या अधिनियमांमध्ये, नियमांमध्ये आणि उपविधिमध्ये केलेल्या तरतुदीप्रमाणे असलेल्या, अशा संस्थेच्या समितीच्या अधिकारांचा वापर करील आणि कर्तव्ये पार पाडील आणि तिची मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करील.]

[१][(२) एखाद्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या कोणत्याही उपविधिमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निबंधकास, एखाद्या संस्थेचे किंवा संस्थावर्गाचे कार्यक्षेत्र, अभिदत्त भाग भांडवल किंवा उलाढाल विचारात घेऊन राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल. त्याप्रमाणे अशा संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या समितीवरील सदस्यांची कमाल संख्या विहित करता येईल.]

[२][(३) (क) या अधिनियमात किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमात किंवा कोणत्याही संस्थेच्या उपविधित किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, संस्थेच्या समितीच्या सदस्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीत, दोन-तृतीयांश किंवा त्याहून अधिक सदस्य निवडून आले असता निर्वाचन अधिकारी किंवा अशी निवडणूक घेणारा इतर कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, अशा सदस्याच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था
१९८६ (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८६ यांच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी अशी निवडणूक घेण्यात आली असेल
चा महा. आणि अशा संस्थेत सदस्य निवडून आले असतील परंतु कोणत्याही कारणाने समितीची रचना झाली नसेल
३७. त्याबाबतीत त्यांची नावे त्यांच्या कायम पत्त्यांसह निबंधकांकडे अग्रेषित करील. निबंधक, त्याला कळविण्यात आलेली नावे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, अशी नावे व पत्ते सूचना फलकावर किंवा त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही ठळक जागी नोटीस लावून प्रसिद्ध करील किंवा करण्याची तजबीज करील, आणि अशाप्रकारे ती प्रसिद्ध केल्यानंतर संस्थेच्या समितीची रीतसर रचना झाल्याचे मानण्यात येईल. सदस्यांची दोन-तृतीयांश इतकी संख्या ठरविताना अपूर्णांक हिशेबात घेतला जाणार नाही ;

परंतु, अशा रीतीने नावे व पत्ते प्रसिद्ध करण्यामुळे--

(एक) उर्वरित सदस्यांची निवडणूक पूर्ण होण्यास तसेच निवडून आलेल्या सदस्यांची नावे व कायम पत्ते वरीलप्रमाणेच जसजसे उपलब्ध होतील तसतसे प्रसिद्ध करण्यास अडथळा होतो ; किंवा

(दोन) या अधिनियमाखालील समितीच्या सदस्यांच्या पदावधीवर परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

(ख) उर्वरित सदस्य निवडून आल्यानंतर त्यांची नावेही (त्यांच्या कायम पत्त्यांसह) त्यानंतर तशाच प्रकारे निबंधकाकडून प्रसिद्ध करण्यात येतील.]

विनिर्दिष्ट संस्था धरून संस्थेच्या समितीवरील एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडणूक.

[३][७३ एक-क. कलम ७३-छ यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गातील संस्था धरुन संस्थेच्या समितीवर एकापेक्षा अधिक जागांवर कोणतीही व्यक्ती निवडून आली असेल त्याबाबतीत निवडणुकीचे निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, निवडणूक अधिकारी अथवा, यथास्थिति, जिल्हाधिकारी यास स्वतःच्या सहीनिशी लेखी कळवून एक जागा सोडून इतर सर्व जागांचा तिने राजीनामा दिला नसेल तर या सर्व जागा रिक्त होतील. असा राजीनामा मिळाल्यानंतर अथवा उपरोक्तप्रमाणे जागा रिक्त झाल्यानंतर, यथास्थिती, निवडणूक अधिकारी किंवा जिल्हाधिकारी.]

[४][रिक्त जागा स्वीकृती करणाने भरण्याकरिता समितीची बैठक होईल.]

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २७ अन्वये कलम ७३ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम २ अन्वये पोट-कलमे ३ (क) व (ख) समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम ३ अन्वये कलम ७३ एक-क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ५ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

निवडणूक पुढे ढकलण्याचे राज्य शासनाचे अधिकार.

[१][७३ एक-ख. टंचाई, अवर्षण, पूर, आग किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळा किंवा कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या निवडणूक कार्यक्रमाच्या वेळी येणारी राज्य विधानसभेची किंवा विधानपरिषदेची किंवा लोकसभेची किंवा स्थानिक प्राधिकरणाची निवडणूक किंवा राज्य शासनाच्या मते जे अपवादात्मक असेल अशा इतर कोणत्याही कारणामुळे एखाद्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या निवडणुका घेणे, लोकहिताच्या दृष्टीने शक्य नसेल त्याबाबतीत, राज्य शासनास या अधिनियमामध्ये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमामध्ये किंवा उपविधिंमध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कारणे लेखी नमूद करून, त्या कारणासाठी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या निवडणुका एका वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत लांबणीवर टाकता येतील व हा कालावधी आणखी वाढविता येईल, मात्र असा एकूण कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

अधिसूचित संस्थांच्या निवडणुका.

७३ एक-ग. (१) एखाद्या संस्थेची किंवा संस्थावर्गाची (कलम ७३-छ खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संस्थांहून अन्य) उद्दिष्टे किंवा त्यांच्या सदस्यवर्गाची रचना किंवा योग्य व्यवस्थापन आणि सदस्यांच्या हितसंबंध विचारात घेता, लोकहिताच्या दृष्टीने त्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या निवडणुका घेणे आवश्यक आहे, याबाबत राज्य शासनाची खात्री झाली असेल तर, राज्य शासनास, या अधिनियमामध्ये किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा उपविधि यामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे राजपत्रात अशी संस्था किंवा संस्थावर्ग अधिसूचित करता येईल आणि निबंधक अशी संस्था किंवा संस्थावर्ग यांची निवडणूक विहित रीतीने घेईल.

(२) निबंधक हा पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही संस्थेची किंवा संस्थावर्गाची निवडणूक घेण्याचा खर्च विहित रीतीने वसूल करील.

संस्थांच्या अधिकाऱ्यांविरूध्द अविश्वासाचा प्रस्ताव.

७३ एक-घ. (१) जो अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सचिव, कोषाध्यक्ष किंवा कोणत्याही पदनामाने संबोधला जाणारा अन्य कोणताही अधिकारी त्या अधिकारपदावर निवडणुकीद्वारे निवडून आल्याच्या सामर्थ्याने ते अधिकारपद धारण करत असेल, त्याच्याविरूध्द [२][अशा अध्यक्षाच्या, उपाध्यक्षाच्या, सभापतीच्या, उपसभापतीच्या सचिवाच्या, कोषाध्यक्षाच्या किंवा कोणत्याही इतर अधिकाऱ्याच्या निवडणुकीच्या वेळी मतदान करण्याचा हक्क असलेल्या [३][समितीच्या एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांनी समितीच्या सभेत बहुमताने] अविश्वासाचा प्रस्ताव संमत केल्यास, असा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सचिव, कोषाध्यक्ष किंवा यथास्थिति, असा इतर कोणताही अधिकारी म्हणून असण्याचे बंद होईल आणि लागोलाग असा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सचिव, कोषाध्यक्ष किंवा यथास्थिति, इतर कोणताही अधिकारी याचे अधिकारपद रिकामे झाल्याचे मानण्यात येईल,]

(२) अशा कोणत्याही विशेष बैठकीसाठी पाठविण्याच्या मागणीपत्रावर [४][समितीचा यथास्थिति अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सचिव, कोषाध्यक्ष किंवा कोणताही इतर अधिकारी निवडून देण्याचा हक्क असणाऱ्या] एकूण सदस्यांपैकी एक तृतीयांशाहून कमी नसतील इतके सदस्य सही करतील, आणि ते मागणीपत्र निबंधकाकडे सुपूर्द करण्यात येईल. मागणीपत्र विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने तयार करण्यात येईल :

परंतु, अशा विशेष बैठकीसाठी सादर करावयाचे कोणतेही मागणीपत्र पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट, केलेल्या अशा अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही एका अधिकाऱ्याने आपले अधिकारपद धारण केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर केले जाणार नाही.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २८ अन्वये कलमे ७३ एक-ख ते ७३ एक-घ समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ६ (अ) (एक) व (दोन) अन्वये " त्यावेळी समितीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्यास व मतदान करण्यास पात्र असलेल्या समितीच्या एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांनी समितीच्या सभेत बहुमताने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, याच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये " त्या त्या वेळी समितीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदान करण्याचा हक्क असणाऱ्या " ह्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) निबंधक पोट-कलम (२) खाली मागणीपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत समितीची विशेष बैठक बोलावील. अशी बैठक, बैठकीची नोटीस काढण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसानंतरची नसेल अशा दिनांकास घेण्यात येईल.

(४) अशा बैठकीत निबंधक किंवा सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला असा जो अधिकारी निबंधकाने याबाबतीत प्राधिकृत केलेला असेल, तो अध्यक्षपद स्वीकारील. निबंधक किंवा असा अधिकारी यास अशा बैठकीत अध्यक्षस्थानी असताना समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानी असणाऱ्या अध्यक्षास किंवा सभापतीस जे अधिकार असतात तेच अधिकार असतील. मात्र त्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

(५) या कलमाखाली बोलाविण्यात आलेली बैठक कोणत्याही कारणास्तव तहकूब करता येणार नाही.

(६) प्रस्तावाच्या बाजूने किंवा विरूध्द मतदान करणाऱ्या समिति-सदस्यांची नावे बैठकीमध्ये वाचून दाखविण्यात येतील आणि समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्त पुस्तकात त्याची नोंद घेण्यात येईल.

(७) अविश्वासाचा प्रस्ताव फेटाळण्यात आल्यास, अशा रीतीने प्रस्ताव फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून [१][एक वर्षाच्या] आत समितीसमोर कोणताही नवीन अविश्वासाचा प्रस्ताव आणता येणार नाही.]

विवक्षित [३][प्रवर्गाच्या] संस्थांचे एकाचवेळी पदनिर्देशित अधिकारी होण्याकरिता किंवा [४][दहापेक्षा] अधिक वर्षासाठी त्याच संस्थेचे पदनिर्देशित अधिकारी होण्याकरिता अनर्हता.

[२][**७३ क.** (१) या कलमातील आणि कलमे ७३-ग, ७३-घ, ७३-ङ यांमधील "पदनिर्देशित अधिकारी" या संज्ञेचा अर्थ, सभापती व अध्यक्ष असा होतो आणि तीत राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पदनिर्देशित अधिकारी म्हणून जाहीर करील, अशा संस्थेच्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यांचा समावेश होतो, परंतु त्यात राज्य शासनाने किंवा निबंधकाने नेमलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांचा समावेश होत नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, खाली नमूद केलेल्या प्रवर्गापैकी प्रवर्ग एक किंवा प्रवर्ग दोन किंवा प्रवर्ग तीनमध्ये येणाऱ्या संस्थापैकी एकापेक्षा अधिक संस्थांचा पदनिर्देशित अधिकारी असणार नाही किंवा असण्याचे चालू राहणार नाही. आणि तीन प्रवर्गातील एकूण दोनपेक्षा अधिक संस्थांमध्ये पदनिर्देशित अधिकारी असणार नाही किंवा तसा असण्याचे चालू राहणार नाही.

**प्रवर्ग एक.**—ज्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार सबंध राज्यभर असेल, अशा संस्था.

[५][**प्रवर्ग दोन.**—ज्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार, सबंध राज्यभर नसेल,—

(क) परंतु , त्यांचे अधिकृत भाग भांडवल लक्षात न घेता, कमीत कमी एका सबंध जिल्हाभर असेल, किंवा

(ख) परंतु , एका किंवा त्याहून अधिक जिल्ह्यातील एक भाग किंवा अनेक भाग समाविष्ट असलेल्या क्षेत्रापर्यंत असेल आणि ज्यांचे अधिकृत भाग भांडवल रु. १० लाखांपेक्षा अधिक असेल, अशा संस्था.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ६ (क) अन्वये "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२ अन्वये कलमे ७३ क ते ७३ छ समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २९ (फ) अन्वये "विनिर्दिष्ट" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम ४ (ब) अन्वये "सहापेक्षा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ अन्वये प्रवर्ग दोन व तीन दाखल करण्यात आले.

**प्रवर्ग तीन.**—ज्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार एक सबंध जिल्हाभर नसेल, परंतु कमीत कमी एका सबंध तालुक्यापर्यंत असेल किंवा ज्यांचे अधिकृत भाग भांडवल रु. १० लाखांपेक्षा अधिक नसेल पण रु. ५ लाखांपेक्षा कमी नसेल अशा संस्था.]

[1][**स्पष्टीकरण**—या पोट कलमाच्या प्रयोजनासाठी "संस्था" या शब्द प्रयोगामध्ये कोणतेही भाग भागभांडवल नसलेल्या संस्थेचा आणि वाणिज्यिक व्यवहार न करणाऱ्या संस्थेचा अंतर्भाव होणार नाही. ]

[2][(२ क) एखादी संस्था ही, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गात येते किंवा कसे, यासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, असा प्रश्न निबंधकाकडे निर्देशित करण्यात येईल व त्याच्याकडून त्याचा निर्णय करण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल. ]

[3][ * * * * * ]

(४) जर कोणतीही व्यक्ती [4][ * * * ] एकाचवेळी पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या संख्येपेक्षा जास्त संख्येची पदनिर्देशित अधिकारी होईल तर, संस्थेच्या किंवा संस्थांच्या अनुज्ञेय संख्यापेक्षा अधिक संस्थांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून ज्या दिनांकास ती निवडून आली असेल किंवा नेमली गेली असेल, त्या दिनांकापासून कालावधीत उक्त [5][दहा दिवसांच्या] कालावधीत उक्त संस्थेपेक्षा अधिक संस्थेतील किंवा संस्थांतील आपल्या पदाचा राजीनामा तिने दिला नसल्यास किंवा जर त्या निवडणुका किंवा नेमणुका एकसमयावच्छेदेकरून झाल्या असतील किंवा करण्यात आल्या असतील तर त्यापैकी शेवटच्या निवडणुकीचा किंवा नेमणुकीचा निर्णय जाहीर करण्यात आल्याच्या दिनांकापासून [5][दहा दिवसांच्या] कालावधीत तिने राजीनामा दिला नसल्यास ती व्यक्ती [5][दहा दिवसांच्या] उक्त कालावधी संपल्याबरोबर अशा सर्व संस्थांची पदनिर्देशित अधिकारी असण्याचे बंद होईल. [6][आणि लागोलाग, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही समाविष्ट असेल तरीही ; असा राजीनामा देणारी किंवा अशा कोणत्याही किंवा सर्व संस्थांचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून असण्याचे बंद झालेली व्यक्ती, तिची ज्यासाठी निवड किंवा नेमणूक झाली होती, त्या पदाच्या उर्वरित पदावधीत अशा संस्थेचा किंवा संस्थांचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून फेरनिवड किंवा फेरनेमणूक केली जाण्यास पात्र राहणार नाही ; आणि पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या संस्थेहून अधिक म्हणून अशी व्यक्ती कधीही संस्थांचा पदनिर्देशित अधिकारी राहणार नाही. ]

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २९ (अ) अन्वये हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १४ अन्वये पोट-कलम (२ क) समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २९ (ब) अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २९ (क) अन्वये "उक्त अधिनियमाच्या प्रारंभानंतर" हे शब्द वगळण्यात आले.

[5] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ११ (अ) अन्वये "नव्वद दिवसांच्या," या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][(५) कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाच्या कोणत्याही संस्थेत [२][एकूण दहा वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता] पदनिर्देशित पदाधिकारी असणार नाही किंवा असण्याचे चालू ठेवणार नाही अणि उक्त कालावधी संपल्यानंतर अशी कोणतीही व्यक्ती त्या संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी असण्याचे बंद होईल आणि ती पूर्वोक्त [३][दहा वर्षाचा] कालावधी [४][पूर्ण झाल्यापासून समितीच्या एका सत्र भागाचा कालावधी] समाप्त होईपर्यंत असा पदनिर्देशित पदाधिकारी म्हणून फेरनिवड किंवा फेरनेमणूक केली जाण्यास पात्र असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी—

१९६९ चा महा. २७. (क) पदावरील [५][एकूण] [३][दहा वर्षाचा] कालावधी मोजताना महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा), अधिनियम, १९६९ याच्या प्रारंभापूर्वी संबंधित व्यक्ती ज्या कोणत्याही कालावधीसाठी पदाधिकारी असेल तो कालावधी विचारात घेतला जाणार नाही ;

(ख) कोणतीही व्यक्ती, तिने राजीनामा दिला नसेल तर ज्या दिनांकास तिचा [३][दहा वर्षाचा] [६][एकूण] कालावधी पूर्ण झाला असता, त्या दिनांकापासून बारा महिन्याच्या आत, कोणत्याही वेळी पदनिर्देशित अधिकारी म्हणून आपल्या पदाचा राजीनामा देईल, तर तिने राजीनामा दिल्यानंतर तिचा [३][दहा वर्षाचा] कालावधी पूर्ण झाला असल्याचे मानण्यात येईल.]

[७][(६) मंत्रीपरिषदेच्या कोणताही सदस्य पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही मंत्री प्रवर्गापैकी पदनिर्देशित अधिकारी असणार नाही किंवा असण्याचे चालू ठेवणार नाही :

१९८६ चा महा. २०. परंतु, या कलमातील कोणत्याही बाबीमुळे महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या दिनांकाला कोणत्याही अशा संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी असलेल्या मंत्रीपरिषदेच्या कोणत्याही सदस्यावर परिणाम होणार नाही आणि असा पदनिर्देशित अधिकारी म्हणून त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी जर त्याने राजीनामा दिला नाही किंवा कोणत्याही कारणाकरिता अधिकारपद रिकामे केले नाही, तर त्याचा पदावधी समाप्त होईपर्यंत तो अधिकारपद धारण करण्याचे चालू राहील.]

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम ४ (अ) अन्वये मूळ पोट-कलम (५) व स्पष्टीकरण या ऐवजी हे पोट-कलम (५) व स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २९ (ड) (एक) अन्वये "लागोपाठच्या दहा वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम ४ (ग) अन्वये "सहा वर्षाचा" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २९ (ड) (दोन) अन्वये "संपल्यापासून तीन वर्षाचा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ड) (तीन) (अ) अन्वये "लागोपाठचा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ड) (तीन) (ब) अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ई) अन्वये पोट-कलम (६) जादा दाखल करण्यात आले.

सहयोगी सभासद म्हणून असलेला पदनिर्देशित अधिकारी, असा सभासद म्हणून असण्याचे बंद झाल्यावर पदनिर्देशित अधिकारी असण्याचे बंद होणे.

[1][**७३फक.** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती (चौथी सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभानंतर, कोणत्याही जिल्हा परिषदेचा जो सहयोगी सभासद असेल अशा कलम ७३ क पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गातील कोणत्याही संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी हा महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम, ८२ च्या तरतुदी प्रवर्तनात आल्यामुळे, अशा जिल्हा परिषदेचा सहयोगी सभासद असण्याचे बंद होईल, त्या बाबतींत ज्या दिनांकापासून तो जिल्हा परिषदेचा सहयोगी सभासद असण्याचे बंद होईल, त्या दिनांकापासून तो उक्त संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी असण्याचेही बंद होईल.]

१९७५ चा महा. ६.

१९६२ चा महा. ५.

शासकीय पदाधिकारी या नात्याने धारण केलेले समितीचे सदस्यत्व बंद होणे.

[2][**७३कख.** एखाद्या व्यक्तीस केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या सेवेत किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणामध्ये किंवा कोणत्याही निगम निकायामध्ये किंवा कोणत्याही संघटनेमध्ये अधिकारपद धारण करीत असल्याच्या सामर्थ्याने कोणत्याहीं समितीचा सदस्य म्हणून निवडण्यात, स्वीकृत करून घेण्यात, नेमण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आले असेल तेव्हा, तो ज्या दिनांकास असे अधिकारपद धारण करण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून तो असा सदस्य असण्याचे बंद होईल.]

विवक्षित संस्थेच्या समित्यांवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, [5][इतर मागास वर्ग, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग] आणि दुर्बल गटांच्या सदस्यांसाठी जागा राखून ठेवणे व त्यासाठी निवडणूक.

[3][**७३ख.** (१) या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत किंवा कोणत्याही संस्थेच्या कोणत्याही उपविधिंत काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल, अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या समितीवर पुढीलप्रमाणे [4][चार] जागा राखून ठेवण्यात येतील :—

(क) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांमधील सदस्यांसाठी एक; [5][* * *]

[6][(क-१) इतर मागास वर्गातील सदस्यांसाठी एक;

(क-२) निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग यामधील सदस्यांसाठी एक; आणि]

(ख) दुर्बल गटातील सदस्यांसाठी एक.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या [7][चार] राखीव जागा [8][संस्थेच्या उपविधिमध्ये राखीव जागांबाबत पूर्वीच तरतूद करण्यात आलेली नसेल तर] या, अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या समितीच्या सदस्यसंख्येच्या अतिरिक्त असतील.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, अनुसूची अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३० अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम ५ अन्वये मूळ कलम ७३ ख ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[4] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ (क) (एक) अन्वये " दोन " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २ (क) (दोन) अन्वये " आणि " हा मजकूर वगळण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम २ (क) (तीन) अन्वये खंड (क) नंतर हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम २ (ख) अन्वये " दोन " ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियमाच्या क्रमांक १८ कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या [1][किंवा इतर मागास वर्गाच्या किंवा निरधिसूचित जमातीच्या (विमुक्त जातीच्या) किंवा भटक्या जमातीच्या किंवा विशेष मागास प्रवर्गाच्या] किंवा, यथास्थिति, दुर्बल गटामधील संस्थेचा कोणताही व्यक्तीगत सदस्य, किंवा सदस्य संस्थेच्या समितीचा कोणताही निर्वाचित सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीचा कोणताही सदस्य–मग तो या कलमान्वये निवडण्यात, स्वीकृत करण्यात किंवा नियुक्त करण्यात आलेला असो–राखीव जागेसाठी होणारी निवडणूक लढविण्यास पात्र असेल आणि समितीच्या निवडणुकीत मत देण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीस अशा कोणत्याही राखीव जागेसाठी निवडणुकीत मत देण्याचा हक्क असेल.

[2][(४) [3][चारांपैकी] कोणत्याही जागेवर कोणत्याही व्यक्तींची निवड न झाल्यास—

(क) खंड (ख) व (ग) मध्ये उल्लेखिलेल्या संस्थेव्यतिरिक्त इतर संस्थेच्या बाबतीत अध्यक्ष, सचिव किंवा व्यवस्थापक यासारख्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा इतर कोणत्याही पदनामाने ओळखला जाणारा इतर कोणताही अधिकारी ;

(ख) कलम ७३ एक ग अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या संस्थेच्या बाबतीत, निबंधक ; आणि

(ग) कलम ७३ अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संस्थेच्या बाबतीत, जिल्हाधिकारी ;

पोट-कलम (३) अन्वये निवडणूक लढविण्यास हक्कदार असणाऱ्या व्यक्तींमधून समितीवर एक किंवा, यथास्थिती, अनेक सदस्य स्वीकृत करून घेण्यासाठी, समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांची बैठक बोलावील आणि जर ती संस्था खंड (क) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली संस्था असेल तर अध्यक्षांकडून किंवा ती विनिर्दिष्ट संस्था असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांकडून किंवा तो प्राधिकृत करील अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्यांकडून किंवा ती अधिसूचित संस्था असल्यास निबंधकाकडून किंवा तो प्राधिकृत करील अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्यांकडून अशा बैठकीचे अध्यक्षपद भूषविण्यात येईल. अशा बैठकीत कोणताही सदस्य स्वीकृत करून घेण्यात आला नाही तर, अध्यक्ष किंवा जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिती, जेथे बैठकीचे अध्यक्षपद निबंधकाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून भूषविण्यात आलेले असेल त्या बाबतीत असा अधिकारी, अशा बैठकीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या मुदतीत ही वस्तुस्थिती निबंधकास कळवील व लागोलाग निबंधक, त्याला ती वस्तुस्थिती कळल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत किंवा अशा बैठकीचे अध्यक्षस्थान खुद्द निबंधकाने भूषविले असेल त्या बाबतीत अशा बैठकीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, पोट-कलम (३) अन्वये राखीव जागांसाठीची निवडणूक लढविण्यास हक्कदार असणाऱ्या व्यक्तींमधून समितीवर यथास्थिती, एका किंवा अनेक व्यक्तींची नियुक्ती करील.]

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) राज्य शासनाने, कलम ७३ (ख) अन्वये काढलेला महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९८३ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी अंमलात असल्याप्रमाणेचा एखादा सामान्य किंवा विशेष आदेश, कोणताही असल्यास, या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि तो रीतसर निरसित करण्यात किंवा सुधारण्यात येईपर्यंत, अमलात असण्याचे चालू राहील ; (१९८३ चा महा. ४५.)

(ख) " अनुसूचित जाती " या शब्दप्रयोगात " नवबौध्द " यांचा समावेश होईल. [4][* * * * *]

[5][(ख-१) " इतर मागासवर्ग, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग ." या शब्दप्रयोगाचा अर्थ, राज्य शासनाने, इतर मागास वर्ग, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग म्हणून वेळोवेळी घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गांचे भाग किंवा त्यातील गट, असा आहे.]

(ग) " दुर्बल गटातील सदस्य " या शब्दप्रयोगाचा अर्थ, राज्य शासन, वेळोवेळी, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, घोषित करील असा सदस्य किंवा सदस्यांचा गट असा आहे.]

---

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम २ (ग) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १२ अन्वये मूळ पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २ (घ) (दोन) अन्वये " दोहोंपैकी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २ (ङ) (एक) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २ (ङ) (दोन) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

विवक्षित संस्थेच्या समित्यांवर कर्मचाऱ्यांसाठी जागा राखून ठेवणे.

[1][७३ **खख.** [2][(१)] राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या समितीवर त्या संस्थेच्या स्थायी वेतनी कर्मचाऱ्यांची संख्या २५ किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर—

(क) त्या संस्थेच्या समितीच्या सदस्यांची संख्या ११ किंवा त्यापेक्षा किती असेल तर-एक जागा, व

(ख) तशा सदस्यांची संख्या १२ किंवा अधिक असेल तर-पहिल्या अकरा सदस्यांपेक्षा अधिक असणाऱ्या प्रत्येक दर सदस्यांसाठी एक जागा,

अशा कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवण्यात येईल. [2][याप्रमाणे राखून ठेवलेल्या जागा, या मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ किंवा महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१ खाली मान्यताप्राप्त अशा एका किंवा अनेक संघटनांनी केलेल्या निवडीद्वारे अशा कर्मचाऱ्यांमधून भरण्यात येतील.] [3][जेथे अशा मान्यताप्राप्त एक किंवा अनेक संघटना नसतील, आणि जेथे कोणतीही संघटनाच नसेल किंवा जेथे एखादी संघटना मान्यताप्राप्त आहे किंवा नाही यांसह अशा प्रश्नांसंबंधात एखादा विवाद असेल तेथे, अशा राखीव जागा अशा कर्मचाऱ्यांद्वारे, त्यांच्यामधूनच विहित रीतीने निवडणूक घेऊन भरण्यात येतील.] कोणत्याही राखीव जागेसाठी समितीचा सदस्य म्हणून निवड करण्यात आलेल्या किंवा निवडून देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस अशा संस्थेची पदाधिकारी म्हणून निवडून देण्याचा किंवा पदाधिकाऱ्याच्या कोणत्याही निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क असणार नाही.]

१९४७ चा मुंबई ११. १९७२ चा महा. १.

[4][**स्पष्टीकरण**—या कलमाच्या प्रयोजनांकरिता, समितीचे सदस्य म्हणजे समितीचे निवडून आलेले, नियुक्त करण्यात आलेले, नामनिर्देशित केलेले, स्वीकृत करून घेण्यात आलेले तसेच, पदसिध्द असलेले सदस्य, व त्या शब्दप्रयोगात त्यांचा समावेश होतो, परंतु कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधिंचा त्यात समावेश होणार नाही.]

[5][(२) निलंबनाधीन असलेला कोणताही कर्मचारी पोट-कलम (१) खाली निवडला जाण्यास किंवा निवडून दिला जाण्यात किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असणार नाही.

(३) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांचा पदावधी हा, संस्थेच्या उपविधिखाली तरतूद केल्याप्रमाणे समितीच्या अवधीबरोबर समाप्त होईल आणि समितीच्या सदस्यांच्या नव्याने होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीनंतर पोट-कलम (१) अन्वये यथास्थिति, सदस्यांची नव्याने निवड करणे किंवा निवडणूक करणे आवश्यक असेल.]

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १५ अन्वये कलम ७३ खख हे नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३१ (अ) अन्वये कलम ७३ खख यास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि "अशा रितीने राखून ठेवलेली जागा" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ७ (आ) अन्वये जेथे "कोणतीही संघटना" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "भरण्यात येतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[5] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३१ (ब) अन्वये ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

[१][७३ खखख. (१) हा अधिनियम, किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये, किंवा कोणत्याही संस्थेच्या उपविधिंमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी खालील रीतीने महिलांकरिता जागा राखून ठेवण्यात येतील .— संस्थांच्या समित्यांवर महिला सदस्यांसाठी जागा राखून ठेवणे व त्यांवरील निवडणुका.

(क) जास्तीत जास्त ९ समिती सदस्यांचा समावेश असलेल्या समितीवर एक जागा,

(ख) १० किंवा अधिक, परंतु जास्तीत जास्त १९ समिती सदस्यांचा समावेश असलेल्या समितीवर दोन जागा, आणि

(ग) २० किंवा अधिक समिती सदस्यांचा समावेश असलेल्या समितीवर तीन जागा,

[२][**स्पष्टीकरण.**–या पोट-कलमान्वये समितीच्या सदस्यांची संख्या निर्धारित करणाऱ्या प्रयोजनाकरिता, कलम ७३-ख, ७३-खख अन्वये आणि या पोट-कलमान्वये जे सदस्य समितीवर निवडून आलेले आहेत, स्वीकृत करून घेण्यात आलेले आहेत, नामनिर्देशित करण्यात आलेले आहेत, नियुक्त करण्यात आलेले आहेत किंवा, अन्य प्रकारे समितीवर पद धारण करीत आहेत अशा सदस्यांचा समावेश केला जाणार नाही.]

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या राखीव जागा या, संस्थेच्या समितीवरील सदस्यांच्या संख्येव्यतिरिक्तच्या जादा जागा असतील :

[३][परंतु एखाद्या संस्थेच्या उप-विधिंमध्ये, तिच्या समितीवर महिलांसाठी जागा राखून ठेवण्यासंबंधात अगोदरच तरतूद करण्यात आली असेल त्या बाबतीत, महिलांसाठी अशा रीतीने राखून ठेवण्यात यावयाच्या जागांची एकूण संख्या, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जागांच्या संख्येएवढी असेल.]

(३) संस्थेची कोणतीही महिला सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीची महिला सदस्य, मग ती निवडून आलेली, स्वीकृत करून घेण्यात आलेली किंवा नियुक्त करण्यात आलेली असो, संस्थेच्या समितीवर राखून ठेवण्यात आलेल्या जागेवरील निवडणूक लढविण्यासाठी पात्र असेल. [४][आणि समितीच्या निवडणुकीमध्ये मतदान करण्यास हक्कदार असलेली प्रत्येक व्यक्ती, अशा कोणत्याही राखून ठेवण्यात आलेल्या जागेकरिता असलेल्या निवडणुकीत मतदान करण्यास हक्कदार असेल.]

(४) कोणतीही महिला सदस्य, किंवा, यथास्थिति, कोणत्याही महिला राखीव जागांवर निवडून आलेल्या नसतील त्याबाबतीत,—

(क) कोणतीही महिला सदस्य, किंवा यथास्थिति, कोणत्याही महिला सदस्या राखीव जागांवर निवडून आलेल्या नसतील त्याबाबतीत,—

(क) खंड (ख) आणि (ग) मध्ये नमूद केलेल्या संस्थेव्यतिरिक्त इतर संस्थेच्या बाबतीत सभापती, सचिव किंवा व्यवस्थापक अथवा इतर कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येणारा इतर कोणताही अधिकारी (या कलमात यापुढे सामुदायिकरीत्या ज्याचा निर्देश "सभापती" असा करण्यात आला आहे) यासारखा मुख्य कार्यकारी अधिकारी,

(ख) कलम ७३ एक ग अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या संस्थेच्या बाबतीत निबंधक, आणि

---

[१] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम २ अन्वये कलम ७३ खखख समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ८ (अ) अन्वये हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

[३] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ८ (ब) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[४] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(ग) कलम ७३ छ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थेच्या बाबतीत, जिल्हाधिकारी, पोट-कलम (३) अन्वये निवडणूक लढविण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तींमधून समितीवर महिला सदस्याला किंवा, यथास्थिति, महिला सदस्यांना स्वीकृत करून घेण्यासाठी, समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांची बैठक बोलावील, आणि ती संस्था, खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेली संस्था असल्यास अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी सभापती असेल किंवा ती अधिसूचित संस्था असल्यास अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी असेल किंवा ती विनिर्दिष्ट संस्था असल्यास अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी, जिल्हाधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी असेल, अशा बैठकीत कोणत्याही महिला सदस्यास स्वीकृत करण्यात आले नसेल त्या बाबतीत सभापती किंवा जिल्हाधिकारी किंवा अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी निबंधकाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला एखादा अधिकारी असेल तर यथास्थिति, असा अधिकारी, ही गोष्ट, अशा बैठकीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत निबंधकाला कळवील आणि त्यानंतर निबंधक, त्यास असा अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत किंवा निबंधकाने स्वतःच अशा बैठकीचे अध्यक्षपद भूषविले असेल त्या बाबतीत अशा बैठकीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत त्या समितीवर, पोट-कलम (३) अन्वये राखीव जागांसाठी निवडणूक लढविण्यास पात्र असणाऱ्या महिला सदस्यांमधून, यथास्थिति, एका किंवा अनेक महिला सदस्यांची नियुक्ती करील.

(५) या कलमातील कोणतीही गोष्ट कोणत्याही संस्थेच्या, केवळ पुरुष सदस्य असणाऱ्या किंवा यथास्थिति, केवळ महिला सदस्य असणाऱ्या समितीला लागू होणार नाही.

[१][(६) अशा अतिरिक्त राखीव जागांसाठी निवडणूक न घेता कोणत्याही संस्थेच्या समितीची निवडणूक घेण्यात आली असेल, त्या बाबतीत किंवा कलम १५७ अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांमुळे ३० सप्टेंबर, १९९२ रोजी किंवा त्यापूर्वी अशा अतिरिक्त जागांसाठी निवडणूक घेणे शक्य नसेल, तर, महिला सदस्यांकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या अशा अतिरिक्त जागांसह, समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झालेली नसेल तर किंवा समितीची निवडणूक होणार असेल किंवा व्हावयाची असेल आणि महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९९२ याच्या प्रारंभानंतर ती घेतली जाणार असेल तर समितीच्या अशा राखून ठेवलेल्या अतिरिक्त जागा, संस्थेच्या समितीकडून महिला सदस्यांना स्वीकृत करून घेऊन भरण्यात येतील.] १९९२ चा महा. २०.

(७) पोट-कलम (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९९१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत एखाद्या संस्थेच्या समितीची मुदत समाप्त व्हावयाची असेल त्याबाबतीत अशा अतिरिक्त राखीव जागांसाठीची कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही. १९९१ चा महा. ३०.

(८) संस्थेच्या उपविधिंद्वारे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे समितीच्या मुदतीबरोबरच समितीवर निवडून आलेल्या, स्वीकृत करण्यात आलेल्या किंवा, यथास्थिति, नियुक्त करण्यात आलेल्या अशा महिला सदस्यांचा पदावधी समाप्त होईल व त्यानंतरच्या प्रत्येक नवीन निवडणुकीच्या वेळी, या कलमाच्या तरतुदींनुसार महिला सदस्यांसाठी असलेल्या अतिरिक्त राखीव जागांसाठी निवडणूक घेण्यात येईल.

---

[१] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (ब) अन्वये पोट-कलम (६) दाखल करण्यात आले.

**७३ ग.** (१) एखाद्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या, शिखर सहकारी बँकेच्या बाबतीत, अशा बँकेच्या समितीवर [१][व्यक्तीगत सदस्यांनी आपल्यामधून निवडून द्यावयाचे एकाहून अधिक प्रतिनिधी] असणार नाहीत आणि असा प्रतिनिधी पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास किंवा नेमला जाण्यास पात्र असणार नाही. विवक्षित संस्थांच्या समित्यांवर सदस्यांच्या विवक्षित वर्गाने प्रतिनिधित्व करण्यावर व पदनिर्देशित अधिकारी होण्यावर निर्बंध.

(२) [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या किंवा राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] बाबतीत ज्या सदस्यांनी त्या बँकेकडून कोणतेही कर्ज घेतलेले नाही, अशा सदस्यांचे अशा बँकेच्या समितीवर एकाहून अधिक प्रतिनिधी असणार नाहीत आणि असा प्रतिनिधी पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास किंवा नेमला जाण्यास पात्र असणार नाही.

(३) व्यक्तींना पिके काढण्याकरिता कर्जे देणाऱ्या कृषिविषयक पत संस्थेच्या बाबतीत ज्या सदस्यांनी त्या संस्थेकडून कोणतेही कर्ज घेतलेले नाही अशा सदस्यांचे संस्थेच्या समितीवर एकाहून अधिक प्रतिनिधी असणार नाहीत आणि ज्या सदस्यांनी कर्जे घेतलेली नाहीत, अशा सदस्यांमधून तो प्रतिनिधी निवडला पाहिजे. [३][* * * * *] असा प्रतिनिधी पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास [३][* * * ] पात्र असणार नाही.

**७३ घ.** एखद्या संस्थेच्या ज्या सदस्यास दुसऱ्या कोणत्याही संस्थेवर तिचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले असेल, असा कोणताही सदस्य, ती दुसरी संस्था पहिल्या संस्थेची संघीय संस्था नसेल तर, त्या इतर संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास किंवा नेमला जाण्यास पात्र असणार नाही. संस्थेची अन्य संस्थेवरील नामनिर्देशित व्यक्ती, संघीय संस्थेखेरीज इतर संस्थेवर पदनिर्देशित अधिकारी होण्यास पात्र नसणे.

**७३ ङ.** राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या बाबतीत कोणताही सदस्य, अशा अधिसूचनेत वेळोवेळी घालून देण्यात येतील अशा आर्थिक मर्यादांपर्यंत संस्थेशी असलेल्या त्यांच्या व्यवहारासंबंधीच्या किमान शर्ती पूर्ण करीत नसेल तर, पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास किंवा नेमला जाण्यास पात्र असणार नाही. विवक्षित आर्थिक मर्यादांचे किमान संख्ये इतके व्यवहार नसलेल्या सदस्यांना विनिर्दिष्ट संस्थांमध्ये पदनिर्देशित अधिकारी होण्याचा हक्क नसणे.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३२ (अ) अन्वये "व्यक्तीगत सदस्यांचे प्रतिनिधी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३२ (ब) अन्वये "किंवा त्याची नेमणूक करण्यात येईल" आणि "किंवा नेमला जाण्यास" हा मजकूर वगळण्यात आला.

संस्थेकडून ज्या मालाच्या खरेदीसाठी कर्ज देण्यात येत असेल, त्या मालाचा व्यापार जो सदस्य करतो किंवा ज्याचा निकटचा नातेवाईक करतो तो सदस्य, अशा संस्थेच्या समितीवर राहण्यास पात्र नसणे.

**७३ च.** यंत्रसामग्री, अवजारे, सामग्री, विक्रेय वस्तू किंवा इतर माल खरेदी करण्यासाठी सदस्यांना कर्ज देणाऱ्या संस्थेच्या बाबतीत, [१][किंवा अशा मालाचा धंदा करणाऱ्या संस्थेच्या बाबतीत,] जो सदस्य किंवा ज्यांचा निकटचा नातेवाईक अशा मालाचा विक्रेता असेल किंवा अशा मालाचा धंदा करणारा कंपनीचा संचालक किंवा अशा भागीदारी संस्थेचा भागीदार असेल, असा कोणताही सदस्य अशा संस्थेच्या समितीवर सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नेमला जाण्यास पात्र असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " निकटचा नातेवाईक " या शब्दप्रयोगाचा अर्थ पत्नी, पती, वडील, आई, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून असा होतो.

समितीच्या सदस्यत्वासाठी निरर्हता.

[२][**७३ चच.** (१) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींना किंवा समितीच्या सदस्यत्वविषयक निरर्हतेसंबंधी त्याखाली केलेल्या नियमांना बाध न येता, कोणतीही व्यक्ती पुढील बाबतीत समितीचा सदस्य म्हणून नेमणूक होण्यास, नामनिर्दिष्ट होण्यास, निवडून येण्यास, स्वीकृत केली जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास पात्र असणार नाही, जर,—

(एक) ती व्यक्ती कोणत्याही संस्थेची कसूरदार असेल तर;

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनासाठी, " कसूरदार " या संज्ञेत पुढील व्यक्तींचा समावेश आहे:—

(क) प्राथमिक कृषि पत संस्थेच्या बाबतीत पीक कर्जाची नियत दिनांकास परतफेड करण्यात कसूर करणारा सदस्य ;

(ख) मुदती कर्ज देणाऱ्या संस्थेच्या बाबतीत, देण्यात आलेल्या कर्जाचा कोणताही हप्ता देण्यात कसूर करणारा सदस्य ;

(ग) कोणत्याही संस्थेच्या बाबतीत—

(एक) ज्याने अनामत किंवा अग्रिम घेतले असेल ; किंवा

(दोन) ज्याने संस्थेकडून कोणताही माल किंवा विक्रेय वस्तू उधारीवर खरेदी केल्या असतील किंवा ज्यासाठी आकार द्यावा लागत असेल, अशा कोणत्याही सेवा स्वतःसाठी उपलब्ध करून घेतल्या असतील आणि संबंधित संस्थेकडून त्याला मागणीची नोटीस मिळाल्यानंतर अथवा त्याने अनामत किंवा अग्रिम घेतल्यापासून अगर त्याच्याकडे माल सुपूर्द करण्यात आल्यापासून अगर त्याने सेवांचा उपभोग घेतल्यापासून तीस दिवस संपण्याच्या आत, यापैकी जी घटना आधी घडेल त्या घटनेच्या दिनांकापर्यंत अशा अनामतीची किंवा अग्रीमाची संपूर्ण रक्कम परत करण्यास अथवा मालाची किंवा विक्रेय वस्तूंची किंमत किंवा अशा सेवेचा आकार चुकता करण्यास चुकला असेल, असा सदस्य ;

(घ) बिगर कृषि पत संस्थेच्या बाबतीत, देण्यात आलेल्या कर्जाचा कोणताही हप्ता फेडण्यात ज्याने कसूर केली असेल, असा सदस्य ;

(ङ) (एक) गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत, संस्थांना देणे असलेल्या रकमांच्या प्रदानाची मागणी करणारी टपाल दाखली पाठविलेली लेखी नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत देय रकमा चुकत्या करण्यात ज्याने कसूर केली असेल असा सदस्य ;

(दोन) निबंधकाच्या मते, जर त्या व्यक्तीने पत कर्जाची सहकारी पणन किंवा सहकारी प्रक्रिया यांच्याशी सांगड घालण्याच्या संदर्भात सहकारी संस्थांविषयक अनुशासनाचा जाणूनबुजून भंग केला असेल तर ; किंवा

(तीन) जर त्या व्यक्तीला कलम ७९ किंवा ८८ खाली जबाबदार धरण्यात आले असेल किंवा कलम ८५ खाली चौकशीचा खर्च देण्यास जबाबदार धरण्यात आले असेल तर ; किंवा

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३४ अन्वये ७३ च च आणि ७३ च च च ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

(चार) जर त्या व्यक्तीवर या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमांखाली कोणतीही निरर्हता ओढवली असेल तर ; किंवा

(पाच) संस्था चालवीत असलेल्या धंद्यासारखाच धंदा त्या व्यक्तीने स्वतःच्या नावे किंवा आपल्या कुटुंबीयांपैकी कोणाच्याही नावे चालविला असला तर अथवा संस्था चालवीत असलेल्या धंद्यासारखाच धंदा चालविणाऱ्या अशा एका भागीदारी संस्थेत ती किंवा तिच्या कुटुंबीयांपैकी कोणताही सदस्य भागीदार असेल किंवा एखाद्या कंपनीत संचालक असेल तर ;

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, " कुटुंबीय " या शब्दप्रयोगाचा अर्थ पत्नी, पती, वडील, आई, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून असा असेल ; किंवा

(सहा) जर ती व्यक्ती कोणत्याही संस्थेची (खुद्द कर्मचाऱ्यांची संस्था असेल त्याहून अन्य संस्था) पगारी कर्मचारी असेल अथवा ती कोणत्याही संस्थेच्या अखत्याराखालील कोणतेही लाभपद धारण करीत असेल तर,—मात्र ती व्यवस्थापन संचालकाचे अधिकारपद किंवा ज्या अधिकारपदामुळे तिचा धारक त्याबाबतीत निरर्ह ठरत नाही, असे राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे घोषित केलेले असेल, असे इतर कोणतेही अधिकारपद धारण कीरत असेल किंवा त्या अधिकारपदावर तिची नेमणूक करण्यात आली असेल, तर—अथवा कलम ७३ खख खाली संस्थेच्या समितीवरील कोणत्याही राखीव जागेवर निवड होण्याचा किंवा निवडून येण्याचा तिला हक्क असेल किंवा तिची तशी निवड झाली असेल किंवा ती तशी निवडून आली असेल तर तेवढी बाब याला अपवाद राहील.

[१][(सात) दोनपेक्षा अधिक मुले असतील तर :

परंतु, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास, २००१ चा महा. ३४.
(यापुढे या खंडात ज्याचा निर्देश " अशा प्रारंभाचा दिनांक " असा करण्यात आला आहे), दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये ती निरर्ह ठरणार नाही ;

परंतु , आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(क) ज्या वेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्यानंतर, फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मूलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(ख) " मूल " या संज्ञेत, दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही.]

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही निरर्हता ओढवली असेल तर, तो सदस्य समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल आणि त्याची जागा यानंतर रिकामी झाल्याचे मानण्यात येईल.

समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक होण्यासाठी किंवा पुन्हा निवडून येण्यासाठी पात्रता.

**७३ चचच.** (१) कलम ७३ चच याच्या पोट-कलम (१), खंड (दोन) खाली निरर्हता ओढवल्याच्या कारणाने सदस्यत्व बंद झालेला समितीचा सदस्य, ज्या दिनांकाला याचे समितीवरील सदस्यत्व याप्रमाणे बंद झाले असेल, त्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक केली जाण्यास अथवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास किंवा स्वीकृत होण्यास किंवा पुन्हा निवडून येण्यास पात्र असेल.

(२) कलम ७३ चच याच्या पोट-कलम (१) खंड (तीन) खाली निरर्हता ओढवल्याच्या कारणाने सदस्यत्व बंद झालेला समितीचा सदस्य, ज्या दिनांकाला त्याचे समितीवरील सदस्यत्व याप्रमाणे बंद झाले त्या दिनांकापासून पाच वर्षांचा कलावधी संपल्यानंतर समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक केली जाण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास किंवा पुन्हा स्विकृत होण्यास किंवा पुन्हा निवडून येण्यास पात्र राहील.

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याचा कलम ६ अन्वये खंड सात जादा दाखल करण्यात आला.

(३) पोट-कलमे (१) आणि (२) यांमध्ये निर्देश केलेल्या निरर्हतीहून अन्य कोणतीही निरर्हता ओढवल्याच्या कारणाने सदस्यत्व बंद झालेला समितीचा सदस्य, या अधिनियमात अन्यथा विनिर्देशपूर्वक तरतूद केलेली नसेल तर, एरव्ही अशी निरर्हता संपताच समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास किंवा स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा नेमणूक केली जाण्यास किंवा पुन्हा निवडून येण्यास पात्र असेल.]

विवक्षित संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांच्या [३][व अधिकाऱ्यांच्या] निवडणुका घेण्याकरिता तरतूद आणि अशा समित्यांच्या सदस्यांचा पदावधी.

**७३ छ.** [१][(१) खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांची [२][आणि अशा संस्थांच्या समित्यांनी करावयाची पदाधिकाऱ्यांची] निवडणूक, प्रकरण ११ क च्या तरतुदींच्या अधीन असेल आणि त्या प्रकरणाद्वारे किंवा तदन्वये घालून दिलेल्या रीतीने ती घेण्यात येईल:—

(एक) शिखर, [४][संस्थांची] आर्थिक परिस्थिती व भाग भांडवल लक्षात घेऊन, राज्य शासन, राजपत्रातील सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा शिखर [५][संस्था] ;

(दोन) सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ;

[६][(तीन) सर्व जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका]

(चार) (क) सर्व जिल्हा सहकारी विक्री व खरेदी संघटना ;

(ख) सर्व तालुका विक्री व खरेदी संघटना ;

(पाच) सर्व सहकारी साखर कारखाने ;

(सहा) सर्व सहकारी सूत गिरण्या ;

(सात) [७][संस्था किंवा संस्थावर्ग] यांची आर्थिक परिस्थिती व भाग भांडवल लक्षात घेऊन, राज्य शासन राजपत्रातील सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी इत्तर कोणतीही [७][संस्था किंवा संस्थावर्ग.].

[८][ [९][(२) अशा कोणत्याही संस्थेच्या समितीच्या सर्व सदस्यांची निवडणूक एकाच वेळी घेण्यात येईल तेव्हा, अशा सार्वजनिक निवडणुकीत समितीवर निवडून आलेले सदस्य पहिली बैठक ज्या दिनांकास घेण्यात येईल त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करतील, मात्र, राज्य शासनाने हा कालावधी एका वर्षापेक्षा अधिक नसेल इतका, परंतु एकूण कालावधी सहा वर्षांपेक्षा अधिक होणार नाही अशा प्रकारे, त्याबद्दलची कारणे नमूद करून, त्या कारणास्तव वाढवला असेल तर ती बाब वेगळी.

---

[१] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आले.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १६ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३५ (अ) (एक) (ए) अन्वये " परिसंस्था " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियम कलम ३५ (अ) (एक) (बी) अन्वये " सहकारी संस्था " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३५ (अ) (दोन) अन्वये " परिसंस्था " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ (ब) (दोन) अन्वये पोट-कलमे (२) ते (५) व स्पष्टीकरण याऐवजी पोट-कलमे (२) आणि (३) दाखल करण्यात आली.

[९] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३५ (ब) अन्वये पोट-कलम (२) ऐवजी पोट-कलमे (२), (२क), (२ख) दाखल करण्यात आली.

(२क) समितीवर नेमणूक केलेले किंवा नामनिर्देशित केलेले किंवा स्वीकृत केलेले किंवा निवड केलेले किंवा निवडून दिलेले सदस्य-रिकामी जागा भरण्यासाठी नेमलेले सदस्यसुद्धा यांचा पदावधी पोट-कलम (१) अन्वये निवडून आलेल्या सदस्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल-मग त्यांची नेमणूक, नामनिर्देशन, स्वीकृती किंवा निवड किंवा निवडणूक-रिकामी जागा भरण्यासाठी झालेली नेमणूक धरून, झाल्याचा दिनांक कोणताही असला तरी हरकत नाही.

(२ख) विद्यमान समितीच्या सदस्यांची निवडणूक कोणत्याही कारणास्तव का होईना यथास्थिति, अवधी संपण्यापूर्वी किंवा वाढीव अवधी संपण्यापूर्वी घेण्यात आलेली नसेल किंवा घेता आली नसेल, तर समितीचे सदस्य (पदाधिकारीसुद्धा) यथास्थिती, समितीचा अवधी किंवा वाढीव अवधी संपताच पद धारण करण्याचे बंद होतील आणि त्यांची पदे रिकामी झालेली आहेत असे मानण्यात येईल.

[1][ * * * * * * ]

[2][परंतु, अशा कोणत्याही संस्थेच्या समितीची निवडणूक घेण्यात जिल्हाधिकाऱ्याने कसूर केली असेल, त्या बाबतीत त्या संस्थेच्या समितीच्या सदस्यांचा पदावधी हा नव्याने रचना करण्यात आलेल्या समितीची पहिली सभा ज्या दिनांकास भरेल, त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.]

(३) अशा कोणत्याही संस्थेच्या उपविधिमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केवळ व्यवस्थापन समितीच्या संस्थेच्या सदस्यांच्या अधिमंडळाद्वारे निवडण्यात येईल आणि उपविधिद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या इतर सर्व समित्यांची रचना व्यवस्थापन समितीचे सदस्यत्व असलेल्या व्यक्तींमधून निवड किंवा नेमणूक करून करता येईल आणि अशा सर्व समित्या व्यवस्थापन समितीच्या उपसमित्या असतील आणि त्या व्यवस्थापन समितीस दुय्यम असतील.

[3][७३ज. (१) प्रत्येक संस्थेच्या समितीने तिचा अवधी संपण्यापूर्वी तिच्या सदस्यांची निवडणूक घेण्याची व्यवस्था करणे, हे तिचे कर्तव्य असेल. अवधी संपण्यापूर्वी निवडणूक घेण्याची समितीची जबाबदारी.

(२) [4]["समितीने आपला पदावधी संपण्यापूर्वी आपली निवडणूक घेण्यात बुद्धीपुरस्सर कसूर केली असेल, त्या बाबतीत समिती "] तिचा पदावधी संपल्यानंतर काम करण्याचे बंद करील आणि तिचे सदस्य अधिकारपद धारण कारण्याचे बद करतील आणि निबंधकास संस्थेचे व्यवस्थापन आपल्याकडे घेता येईल किंवा प्रशासकाची (जिचा पदावधी संपाला आहे अशा समितीच्या सदस्यांमधील नसलेला) नेमणूक करता येईल आणि निबंधक किंवा प्रशासक सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेईल आणि तो कालावधी समाप्त होण्यापूर्वी समितीची रचना करण्यात येईल.]

---

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये पोट-कलम २ (ब) चे परंतुक वगळण्यात आले.

[2] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[3] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३६ अन्वये कलम ७३ ज समाविष्ट करण्यात आले.

[4] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ४ अन्वये " समिती या " मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

संस्थांचा व्यवस्थापक, सचिव आणि इतर अधिकारी आणि विवक्षित संस्थांसाठी असलेला मुख्य कार्यकारी अधिकारी व वित्त अधिकारी यांच्या अर्हता व नेमणुका.

[1][७४. (१) संस्थेचा किंवा संस्थावर्गाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त अधिकारी, व्यवस्थापक, सचिव, लेखापाल किंवा इतर कोणताही अधिकारी यांच्या नेमणुकीसाठी लागणाऱ्या अर्हता आणि त्यांच्या वित्तलब्धी व वेतनेतर परिलब्धी निबंधक वेळोवेळी निर्धारित करील त्यानुसार असतील.

(२) राज्य शासन राजपत्रात वेळोवेळी अधिसूचित करील अशा संस्थेत किंवा संस्थावर्गात एक मुख्य कार्यकारी अधिकारी आणि एक वित्त अधिकारी असेल व विहित करण्यात येतील अशा पाचपेक्षा अधिक नसतील अशा व्यक्तींच्या मंडळाने निवडलेल्या व्यक्तींच्या नामिकेतूनसुद्धा त्यांची नेमणूक करील.

(३) याप्रमाणे नेमलेला मुख्य कार्यकारी अधिकारी हा समित्यांचा पदसिद्ध सदस्य असेल, परंतु त्याला समित्यांच्या बैठकीत मतदान करण्याचा हक्क असणार नाही.]

वार्षिक सर्वसाधारण बैठक.

७५. (१) प्रत्येक संस्था त्या त्या वेळी अंमलात असलेल्या नियमानुसार त्या संस्थेचे वर्षाचे हिशेब पुरे करण्यासाठी नेमलेल्या दिनांकानंतर येणाऱ्या पुढील तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची एक सर्वसाधारण बैठक बोलावील.

[2][परंतु, निबंधकास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अशी बैठक बोलावण्याचा पुढील कालावधी जास्तीत जास्त तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल तथापि, विनिर्दिष्ट संस्था आणि नागरी सहकारी बँका यांच्या बाबतीत असा कालावधी वाढवून देण्यासंबंधीची कारणे अभिलिखित केल्यानंतर तसेच त्यासाठी शासनाची पूर्वमान्यता मिळविल्यानंतरच फक्त असा कालावधी वाढवून देण्यात येईल.]

परंतु, आणखी असे की, निबंधकाच्या मते अशा प्रकारची मुदतवाढ आवश्यक नसेल किंवा त्याने मंजुरी दिलेल्या वाजवी कालावधी (तसा असल्यास) संस्थेने अशी बैठक बोलाविली नसेल तर निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस विहित केलेल्या रीतीने अशी बैठक बोलाविता येईल आणि अशी बैठक ही [3][संस्थेने] योग्य रीतीने [4][बोलाविलेली सर्वसाधारण बैठक असल्याचे समजले जाईल आणि अशी बैठक बोलाविण्यासाठी आलेला खर्च संस्थेच्या निधीतून किंवा निबंधकाच्या मते सर्वसाधारण बैठक बोलाविण्यास नकार दिल्याबद्दल किंवा कसूर केल्याबद्दल जी व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती जबाबदार असेल/असतील ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती देतील, असा आदेश निबंधकास देता येईल.

(२) समितीने संस्थेच्या प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण बैठकीत, निबंधक सर्वसाधारण किंवा विशेष] आदेशाद्वारे संस्थेच्या कोणत्याही वर्गासाठी किंवा कोणत्याही वर्गासाठी विहित करील अशा रीतीने [3][समितीच्या सदस्यांपैकी कोणत्याही सदस्यास किंवा [5][लगतपूर्व वर्षात कोणत्याही समिती-सदस्याच्या कलम ७३-चच, पोटकलम (१), खंड (पाच) च्या स्पष्टीकरणात व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही कुटुंबियास (असा सदस्य किंवा त्याचा कुटुंबीय ज्या संस्थेचा, भागीदारी संस्थेचा किंवा, यथास्थिती, कंपनीचा सदस्य, भागीदार किंवा संचालक असेल, अशी संस्था, भागीदारी संस्था किंवा कंपनी धरून) दिलेल्या कर्जाचा (कोणताही असल्यास) तपशील दर्शविणारे विवरणपत्र आणि झालेल्या कर्जफेडीच्या आणि त्या वर्षअखेरीस येणे राहिलेल्या रकमेचा तपशील] आणि] त्या वर्षाचा ताळेबंद आणि नफ्यातोट्याचा हिशेब ठेवील.

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३७ अन्वये कलम ७४ बदली दाखल करण्यात आले.

[2] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये या परंतुका ऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[3] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १६ (अ) अन्वये "संस्थेने बोलाविलेली" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[4] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३८ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**—जी संस्था नफ्यासाठी व्यवहार करीत नसेल, त्या संस्थेच्या बाबतीत, संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीत नफ्यातोट्याच्या हिशेबाऐवजी प्राप्तीचा आणि खर्चाचा हिशेब ठेवण्यात येइल आणि या अधिनियमातील नफ्यातोट्याचा हिशेब व " नफा किंवा तोटा " यासंबंधीच्या सर्व उल्लेखांचा अर्थ, अशा संस्थेच्या संबंधात अनुक्रमे " खर्चाहून [1][अधिक] झालेली प्राप्ती " आणि " प्राप्तीहून अधिक झालेला खर्च " असा लावण्यात येईल.

(३) संस्थेच्या सर्वसाधारण बैठकीत ठेवण्यात आलेल्या प्रत्येक ताळेबंदाबरोबर संस्थेच्या समितीचा पुढील गोष्टीसंबंधातील अहवाल जोडण्यात येईल. (क) संस्थेच्या कामकाजाची स्थिती, (ख) संस्थेस जी रक्कम, तशी रक्कम असल्यास, अशा ताळेबंदातील किंवा कोणत्याही विशिष्ट ताळेबंदातील कोणत्याही राखीव निधीमध्ये दाखविण्याचा तिचा हेतू असेल ती रक्कम, आणि (ग) समिती मानसेवी कार्यकर्त्यास लाभांश, अधिलाभांश किंवा मानधन म्हणून जी रक्कम, तशी रक्कम असल्यास, देण्याबद्दल शिफारस करील अशी रक्कम, समितीच्या अहवालात ज्या वर्षासाठी हिशेब तयार करण्यात आले असतील, त्या वर्षामध्ये संस्थेच्या धंद्याच्या स्वरूपात जे कोणतेही बदल झालेले असतील ते बदलसुध्दा नमूद करण्यात येतील. समितीच्या अहवालावर तिचा सभापती किंवा समितीच्या वतीने सही करण्यास प्राधिकृत केलेला कोणताही इतर सदस्य सही करील.

(४) प्रत्येक वार्षिक सर्वाधारण बैठकीत ताळेब्रंद, नफ्यातोट्याचा हिशेब, [2][कलम ८१ अन्वये नेमलेल्या लेखा परीक्षकाने सादर केलेले लेखापरीक्षेचे ज्ञापन] व समितीचा अहवाल मान्यतेसाठी ठेवण्यात येईल आणि उपविधित नमूद करण्यात येईल असे आणि ज्याबद्दल योग्य नोटीस देण्यात आली असेल, असे इतर कामकाज करण्यात येईल.

(५) वर पोट-कलम (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीत किंवा, यथास्थिति, वाढविलेल्या कालावधीत सर्वसाधरण बैठक बोलाविण्यात किंवा पोट-कलमे (२), (३) किंवा (४) यांचे पालन करण्यात कसूर करण्यात आली तर, निबंधकास आदेशाद्वारे अशी बैठक बोलाविणे किंवा पोट कलमे (२), (३) किंवा (४) चे अनुपालन करणे, हे ज्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा समितीच्या सदस्याचे कर्तव्य होते व ज्याने वाजवी सबबीवाचून उपरिनिर्दिष्ट पोटकलमापैकी कोणत्याही पोटकलमाचे अनुपालन करण्यात कसूर केली तो अधिकारी किंवा समितीचा सदस्य उक्त आदेशात निबंधक विनिर्दिष्ट करील अशा तीन वर्षाहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी अधिकारी म्हणून किंवा समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह आहे, असे जाहीर करता येईल व जर तो अधिकारी संस्थेचा कर्मचारी असेल तर त्याला शंभर रुपयांहून अधिक नाही इतकी रक्कम दंडादाखल [3][भरण्याविषयी] फर्मावता येईल. या पोट-कलमान्वये आदेश देण्यापर्वी, निबंधक संबंधित व्यक्तीस, तसेच तिच्याबाबतीत जी कारवाई करण्याचे योजिले असेल तिच्याविरूध्द कारण दर्शविण्यास वाजवी संधी देईल किंवा अशी संधी देण्याची व्यवस्था करील.

१९७४ (६) पोट-कलम (५) अन्वये किंवा [4][कलम ७८] अन्वये बसविलेली कोणतीही शास्ती [5][फौजदारी प्रक्रिया
चा २. संहिता, १९७३] यात दंडाधिकाऱ्याने केलेला दंड वसूल करण्यासाठी जी रीत दिलेली आहे त्या रीतीने, जणू काही असा दंड स्वतः दंडाधिकाऱ्याने केला होता असे समजून, वसूल करता येईल.

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १६ (अ) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १६ (क) अन्वये " लेखापरीक्षकाचे प्रतिवेदन " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १६ (ड) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३८ (ब) (एक) अन्वये " लगतनंतरच्या कलमान्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ३८ (ब) (दोन) अन्वये " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

विशेष सर्वसाधारण बैठक.

७६. (१) सभापतीस किंवा समितीच्या बहुमताने कोणत्याही वेळी विशेष सर्वसाधारण बैठक बोलविता येईल, आणि ती—

(एक) अशा संस्थेच्या सदस्यांपैकी एक-पंचमाश सदस्य किंवा उपविधीमध्ये त्या प्रयोजासाठी जी संख्या विनिर्दिष्ट करण्यात आली असेल, त्या संख्येइतके सदस्य, या दोहोंपैकी जी संख्या कमी असेल तेवढ्या सदस्यांनी लेखी मागणी केली असता, किंवा

(दोन) निबंधकाच्या सूचनेवरून, किंवा

(तीन) जी संस्था संघीय संस्थेची सदस्य आहे तिच्या बाबतीत, अशा संस्थेच्या समितीच्या सूचनेवरून,

एक महिन्याच्या आत बोलाविली जाईल.

(२) अशी बैठक बोलाविणे हे ज्या समितीच्या अधिकाऱ्याचे किंवा सदस्यांचे कर्तव्य असेल त्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा समितींच्या सदस्याने, वाजवी सबबीवाचून, अशी बैठक बोलाविण्यात कसूर केली असेल त्याबाबतीत, निबंधकास आदेशाद्वारे अशा आदेशात तो निर्दिष्ट करील, अशा तीन वर्षांहून अधिक नसलेल्या कालावधींसाठी असा अधिकारी किंवा सदस्य हा, समितीचा सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह असल्याचे जाहीर करता येईल, आणि तर तो अधिकारी संस्थेचा कर्मचारी असेल तर त्याला शंभर रुपयांहून अधिक नाही इतक्या रकमेपर्यंतचा दंड करता येईल. या पोट-कलमान्वये आदेश देण्यापूर्वी, निबंधक संबंधित व्यक्तीस, तिच्या बाबतीत जी कारवाई करण्याचे योजिले असेल तिच्याविरूध्द कारण दर्शविण्यास वाजवी संधी देईल किंवा अशी संधी देण्याची व्यवस्था करील.

(३) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या मागणीनुसार संस्थेची विशेष सर्वसाधारण बैठक बोलाविण्यात आली नसेल तर, निबंधकास किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस अशी बैठक बोलाविण्याचा अधिकार असेल आणि अशी बैठक ही समितीने योग्य रीतीने बोलाविलेली बैठक आहे, असे समजण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये बैठक बोलाविण्यासाठी आलेला खर्च संस्थेच्या निधीतून किंवा निबंधकाच्या मते, बैठक बोलाविण्यास नकार दिल्याबद्दल किंवा कसूर केल्याबद्दल जी व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती जबाबदार असतील, त्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून देण्यात येईल असा आदेश देण्याचा निबंधकास अधिकार असेल.

संस्था, वगैरेंनी केलेली कृत्यें विवक्षित दोषांमुळे विधिअग्राह्य न होणे.

७७. (१) एखाद्या संस्थेने किंवा समितीने कोणत्याही अधिकाऱ्याने संस्थेच्या कामकाजास अनुसरून सद्भावपूर्वक केलेले कोणतेही कृत्य, संस्थेच्या प्रस्थापनेत किंवा समितीच्या रचनेत किंवा अधिकाऱ्याच्या नेमणुकीत किंवा निवडणुकीत मागाहून आढळून आलेल्या काही दोषांमुळे किंवा असा अधिकारी त्याच्या पदासाठी अनर्ह ठरविण्यात आला होता, केवळ याच कारणावरून विधिअग्राह्य आहे, असे समजले जाणार नाही.

(२) ह्या अधिनियमान्वये, नियमान्वये किंवा उपविधीअन्वये नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीने सद्भावनापूर्वक केलेले कोणतेही कृत्य हे या अधिनियमान्वये किंवा उपविधीअन्वये, मागाहून दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे किंवा उक्त आदेशाचा परिणाम म्हणून तिची नेमणूक रद्द झाली आहे, केवळ याच कारणावरून विधीअग्राह्य होणार नाही.

(३) संस्थेचे कामकाज करताना एखादे कृत्य सद्भावनापूर्वक केले किंवा कसे, हे निबंधक ठरवील व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

[१][७७क. (१) जर निबंधकाची खात्री होईल की,—

[२][(१-क) तात्पुरत्या समितीने, कलम ७३ च्या पोट-कलम (१-क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे तिची मुदत संपण्यापूर्वी पहिल्या समितीची रचना करण्यासाठी निवडणूक घेण्याकरिता आवश्यक व्यवस्था करण्यात कसूर केलेली आहे;]

समितीची रचना करण्यासाठी सदस्यांची निवड करण्यात कसूर झाली असेल किंवा समितीने पदग्रहण केले नसेल त्याबाबतीत समितीच्या सदस्याची, नवीन समितीची, किंवा प्रशासकाची नेमणूक.

(क) कोणत्याही संस्थेच्या समितीची प्रथम रचना करण्यात आली, त्यावेळी समितीचे सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसूर झाली आहे;

(ख) कोणत्याही संस्थेच्या समितीचा किंवा तिच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी [३][किंवा यथास्थिति, वाढीव पदावधी] संपला म्हणून किंवा इतर कोणत्याही कारणासाठी निवडणूक घेण्यात आली व त्यावेळी रिक्त जागा भरण्यासाठी आवश्यक असलेले सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसूर झाली आहे ;

(ग) कोणत्याही समितीस पदग्रहण करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे;

(घ) कोणत्याही नवीन समितीने, विद्यमान समितीचा पदावधी संपण्याच्या दिनांकास पदग्रहण करण्यात कसूर केली आहे ; किंवा

[४][ * * * * * * ]

[५][(च) संस्थेतील व्यक्तींचे एकापेक्षा अधिक गट समिती सदस्य म्हणून निवडणूक आल्याचा दावा करीत असतील आणि त्या संबंधातील कार्यवाही सहकारी न्यायालयात दाखल करण्यात आली असेल;] तर निबंधकास, स्वाधिकारे किंवा संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या अर्जावरून आदेशाद्वारे,—

(एक) रिक्त जागा भरण्यासाठी संस्थेच्या कोणत्याही सदस्याला किंवा सदस्यांना समितीचा सदस्य किंवा समितीचे सदस्य महणून नेमता येईल.

(दोन) नवीन समिती पदग्रहण करीपर्यंत संस्थचे कामकाज पाहण्यासाठी संस्थेचे तीनपेक्षा अधिक सदस्य मिळून बनलेली समिती किंवा एक किंवा अधिक प्रशासक नेमता येतील, प्रशासक हे संस्थेचे सदस्य असणे आवश्यक असणार नाही :

परंतु, असा आदेश काढण्यापूर्वी, निबंधक संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सूचना फलकावर प्रस्तावित आदेशाच्या संबंधातील हरकती व सूचना नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत मागविण्यासाठी नोटीस लावील आणि त्या कालावधीत त्याच्याकडे आलेल्या सर्व हरकती व सूचना यांवर विचार करील:

परंतु, आणखी असे की, त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे किंवा अशी नोटीश प्रस्द्धि करणे, वाजवीरीत्या व्यवहार्य नाही, याबद्दल निबंधकाची खात्री होईल, अशा कोणत्याही प्रकरणी अशी नोटीस प्रसिद्ध करणे आवश्यक असणार नाही.

(२) अशा प्रकारे नेमण्यात आलेल्या समितीस किंवा प्रशासकास निबंधकाच्या नियंत्रणास आणि तो वेळोवेळी देईल, अशा अनुदेशास अधीन राहून समितीची सर्व किंवा कोणतीही कामे किंवा संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याची कामे पार पाडण्याचा आणि संसथेच्या हितासाठी आवश्यक असेल अशी कोणतीही कार्यवाही करण्याचा अधिकार असेल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ५ अन्वये कलम ७७क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ६ अन्वये खंड (१-क) समाष्टि करण्यात आले.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३९ (अ) (एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ७ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३९ (अ) (दोन) अन्वये खंड (च) समाविष्ट करण्यात आला.

[1][(३) याप्रमाणे नेमण्यात आलेली समिती किंवा प्रशासक, संस्थेचे व्यवस्थापन हाती घेतल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीकरिता अधिकारपद धारण करील आणि उक्त कालावधीत नवीन समितीची रचना करण्याच्या दृष्टीने आणि नवीन समितीला—यामध्ये कायदेशीररीत्या निवडून येण्यासाठी न्यायालय निर्धारित करील, अशा पोट-कलम (१), खंड (च) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही नवीन समितीचा अंतर्भाव होतो- अधिकारपद ग्रहण करता येण्याच्या दृष्टीने आवश्यक ती व्यवस्था करील:]

[2][परंतु , समितीच्या किंवा प्रशासकाच्या नियंत्रणापलीकडील कोणत्याही कारणामुळे, समितीची मुदत किंवा प्रशासकाचा पदावधी समाप्त झाल्यानंतर नवीन समितीची रचना करण्यात आली नसेल किंवा रचना करता येत नसेल तर, नवीन समितीची यथोचितरीत्या रचना करण्यात येईपर्यंत यथास्थिति, त्या समितीची मुदत किंवा प्रशासकाचा पदावधी वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.]

[3][(४) निबधकास, पोट-कलम (१) खाली नेमलेली कोणतीही समिती किंवा तिचे कोणतेही किंवा सर्व सदस्य किंवा कोणतेही किंवा सर्व प्रशासक पोट-कलम (१) खाली काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वी स्वविवेकानुसार बदलण्याचा अधिकार असेल.

(५) कलम ७८, पोट-कलम (२क) च्या तरतुदी, पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या सदस्यांना किंवा प्रशासकांना द्यावयाचे पारिश्रमिक निश्चित करण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.]

[6][समितीस किंवा तिच्या सदस्यास दूर करण्याचा अधिकार.]

७८. [4][(१) निबंधकाच्या मते, कोणत्याही संस्थेची समिती किंवा अशा समितीचा कोणताही सदस्य कसूर करीत असेल अथवा या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये किंवा उपविधीअन्वये तिला किंवा त्याला नेमून देण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यात कसूर किंवा हयगय करीत असेल अथवा संस्थेच्या अथवा तिच्या सदस्यांच्या हितास बाधक अशी कोणतीही कृती करीत असेल अथवा राज्य शासनाने मान्य केलेले किंवा अवलंबिलेले सहकारविषयक धोरण किंवा विकास कार्यक्रम याची समुचितरीत्या अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने किंवा निबंधकाने काढलेल्या निदेशांची जाणूनबुजून अवज्ञा करीत असेल अथवा अन्यथा तिची किंवा त्याची कामे उचितरीत्या आणि साक्षेपाने पार पाडत नसेल [5][किंवा जेथे समिती किंवा अशा समितीचा कोणताही सदस्य तिची किंवा त्याची कार्ये पार पाडण्याचे नाकारीत असेल किंवा तिने किंवा त्याने ती पार पाडणे थांबवले असेल,अशी परिस्थिती उद्‌भवली असेल] आणि संस्थेचे कामकाज ठप्प झाले असेल किंवा होण्याची शक्यता असेल अथवा जेथे अशा समितीचा कोणताही सदस्य, या अधिनियमाखाली सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह झाला असेल तेथे, निबंधक समितीला किंवा यथास्थिति, सदस्याला नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत तिचे किंवा त्याचे कोणतेही आक्षेप असल्यास, अशा आक्षेपांविषयी निवेदन करण्याची संधी दिल्यानंतर आणि ती संस्था जिच्याशी संलग्न असेल, त्यासंबंधी संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर आदेशाद्वारे--

(क) (एक) त्या समितीला दूर करू शकेल, आणि

---

[1]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३९ (अ) अन्वये पोट-कलम (३) बदली दाखल करण्यात आले.
[2]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १० अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
[3]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३९ (क) अन्वये पोट-कलमे (४) व (५) जादा दाखल करण्यात आले.
[4]वरील अधिनियमाच्या कलम ४० अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आले.
[5]सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[6]सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १७ (ड) अन्वये ही समासटीप बदली दाखल करण्यात आली.

(दोन) सहा महिन्यांहून अधिक असणार नाही एवढ्या कालावधीकरिता संस्थेचा कारभार चालविण्यासाठी त्या समितीच्या जागी संस्थेच्या तीन किंवा अधिक सदस्यांचा (हे सदस्य याप्रमाणे दूर केलेल्या समितीचे सदस्य असणार नाहीत) समावेश असलेली एक समिती नेमू शकेल किंवा एक किंवा अधिक प्रशासक नेमू शकेल. हे प्रशासक संस्थेचे सदस्य असण्याची आवश्यकता असणार नाही मात्र ; ते अशाप्रकारे दूर केलेल्या समितीचे सदस्य असणार नाहीत ; हा कालावधी निबंधकाच्या स्वेच्छाधिकाराने तीन महिन्यांहून अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता आणखी वाढविता येईल. तथापि, हा कालावधी सर्व मिळून नऊ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, या पोट-कलमाखाली काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वीसुद्धा निबंधकाला समिती किंवा तिचा कोणताही सदस्य किंवा परिच्छेद (दोन) अन्वये नेमलेला किंवा नेमलेले प्रशासक स्वेच्छाधिकाराने बदलण्याचा अधिकार असेल ;

(ख) सदस्याला काढून टाकू शकेल त्याच्या जागी कोणत्याही व्यक्तीची अशा समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करू शकेल किंवा याप्रमाणे काढून टाकलेल्या सदस्यांच्या अधिकारपदाच्या उर्वरित कालावधीसाठी त्याच्या जागी एखाद्या सदस्याची निवडणूक करणे किंवा नेमणूक करणे यासाठी संस्थेला निर्देश देऊ शकेल :]

[1][परंतु, अशाप्रकारे ज्याला दूर करण्यात आलेले असेल तो सदस्य, त्याला अशा प्रकारे दूर करण्यात आल्याच्या दिनांकापासून समितीच्या पुढच्या एका संपूर्ण कालावधीची मुदत समाप्त होईपर्यंत किंवा यथास्थिती, कलम ७३-चचच किंवा १४४ ड यांच्या तरतुदींअन्वये ठरवून देण्यात येईल अशा कमी मुदतीपर्यंत, पुन्हा निवडून येण्यास, पुर्नियुक्त होण्यास, पुन्हा नामनिर्देशन केले जाण्यास किंवा पुन्हा स्वीकृत केला जाण्यास पात्र असणार नाही.]

[2][ (१-क) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही समितीविरुद्ध किंवा सदस्याविरुद्ध नोटीस देण्यात आली असेल तेव्हा, समितीने किंवा सदस्याने कोणत्याही पदाचा राजीनामा सादर केला असेल तर तो नोटीस दिल्याचा दिनांकापासून दोन महिने निघून जाईपर्यंत किंवा ती स्वीकारण्यास निबंधकाकडून परवानगी देण्यात येईपर्यंत यापैकी जो कालावधी अगोदरचा असेल त्या कालावधीपर्यंत विधीग्राह्य किंवा परिणामक असणार नाही.]

(२) अशा रीतीने नेमण्यात आलेल्या समितीस किंवा प्रशासकीय निबंधकाच्या नियंत्रणास आणि तो वेळोवेळी देईल अशा अनुदेशास अधीन राहून समितीच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही अधिका-यांच्या कामांपैकी सर्व किंवा कोणतेही काम पार पाडण्याचा अधिकार राहील आणि (ती/तो) संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असेल अशी सर्व प्रकारची कारवाई करील.

[3][पूर्वोक्त प्रमाणे नेमण्यात आलेल्या समितीस किंवा प्रशासकास, उपविधीत काहीही अंतर्भूत असले तरी, पूर्वीच्या समितीने बोलविलेल्या सर्वसाधारण बैठकीमध्ये घेतलेला निर्णय किंवा संमत केलेला ठराव यांचे पुनर्विलोकन किंवा त्यावर पुनर्विचार करण्यासाठी किंवा तिने केलेल्या कारवाईस पुष्टी देण्यासाठी संस्थेची सर्वसाधारण बैठक बोलविण्याचा अधिकार राहील.]

---

[1]सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ७ अन्वये दाखल करण्यात आलेल्या परंतुकाऐवजी सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ११ अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[2]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४ (ब) अन्वये पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

[3]सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ५७ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][(२क) निबंधक निश्चित करील त्यावेळी व त्या कालांतराने संस्थेच्या निधीतून प्रशासकांना देय असलेले पारिश्रमिक किंवा द्यावयाचा व्यवस्थापनाचा कोणताही खर्च निबंधकास निश्चित करता येईल आणि जर अशा अवधीत किंवा अशा कालांतराने असे पारिश्रमिक किंवा खर्च देण्यात आला नाही तर निबंधकास संस्थेचा निधी ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेत असेल त्या व्यक्तीस (जमीन महसूल, जमीन महसुलाची कोणतीही थकबाकी महणून संस्थेकडून वसुलीयोग्य असलेली कोणतीही रक्कम वगळता) इतर रकमा देण्यापेक्षा प्रशासकास असे पारिश्रमिक आणि असा खर्च प्राथम्याने देण्याविषयी निदेश देता येईल आणि अशा व्यक्तीने संस्थेकडे जमा असलेल्या निधीतून हा खर्च भागविणे शक्य असेल तेथवर निबंधकाच्या आदेशाचे पालन करण्यात येईल.]

(३) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कालावधीत किंवा वाढविलेल्या कालावधीत कोणत्याही वेळी वर म्हटल्याप्रमाणे संस्थेचे कामकाज चालू ठेण्याची शक्यता नाही, असे निबंधकास आढळून येईल तर त्यास [२][* * *] आदेशाद्वारे व्यवस्थापन समाप्त करण्याचा निदेश देता येईल आणि असा आदेश देण्यात आल्यानंतर संस्थेचे व्यवस्थापन रीतसर रचना केलेल्या नवीन समितीकडे सोपविण्यात येईल.

(४) समितीचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा प्रशासकाचा पदावधी संपल्यानंतर समिती किंवा प्रशासक संस्थेच्या उपविधीनुसार नवीन समितीच्या रचनेची व्यवस्था करील:

[३][परंतु, समितीचा कालावधी अथवा प्रशासकाचा पदावधी समाप्त झाल्यानंतर किंवा समाप्त करण्यात आल्यावर समितीच्या किंवा प्रशासकाच्या नियंत्रणाबाहेरच्या कोणत्याही कारणास्तव, नवीन समितीची रचना करण्यात आली नाही किंवा तसे करणे शक्य होत नसेल तर समितीचा किंवा यथास्थिति, प्रशासकाचा पदावधी नवीन समितीची रीतसर रचना करण्यात येईपर्यंत वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.]†

(५) ज्या कालावधीत संस्थेचे कामकाज पोट-कलम (१) अन्वये नेमण्यात आलेल्या समितीतर्फे किंवा प्रशासकातर्फे चालविण्यात येत असेल, त्या कालावधीत त्या समितीने किंवा प्रशासकाने केलेल्या किंवा केली असल्याने अभिप्रेत असलेल्या सर्व कृती या नवीन समितीवर बंधनकारक असतील.

आबंधने पार पाडण्यास फर्माविण्याचा निबंधकाचा अधिकार.

७९. (१) निबंधकास, कोणत्याही संस्थेत किंवा संस्थांच्या वर्गास, संस्थेला मिळालेल्या आणि तिने खर्च केलेल्या सर्व रकमा आणि ज्या बाबीसंबंधी रकमा मिळतील आणि खर्च होतील, अशा बाबी, संस्थेने केलेल्या मालाची सर्व विक्री व खरेदी आणि संस्थेची मत्ता आणि दायित्वे यांबाबत हिशेबांची योग्य पुस्तके ठेवण्याबद्दल आणि निबंधकास वेळोवेळी आवश्यक वाटतील, अशी विवरणपत्रे व विवरणे प्रस्तुत करण्याबद्दल आणि असे अभिलेख सादर करण्याबद्दल निदेश देता येईल आणि संस्थेच्या अधिका-यावर किंवा अधिका-यांवर त्यांच्या आदेशाचे त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पालन करणे, बंधनकारक राहील.

(२) या अधिनियमान्वये, नियमान्वये किंवा उपविधीन्वये कोणत्याही संस्थेस कोणतीही कारवाई करण्यास किंवा पूर्वगामी पोट-कलमान्वये दिलेल्या आदेशाचे पालन करण्यास फर्मविण्यात आले असेल आणि अशी कारवाई—

(क) या अधिनियमात, नियमात किंवा यथास्थिति, उपविधीत किंवा आदेशात तरतूद केलेल्या अवधीत, किंवा

---

[१]सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १७ (क) अन्वये पोट-कलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

[२]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४ (क) अन्वये "शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या" हा मजकूर वगळण्यात आला.

[३]सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम २ अन्वये या परंतुकाची भर नेहमीकरिता घातली असल्याचे मानण्यात येईल.

† कृतींना विधीग्राह्यता देण्याच्या संबंधात सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ याचे कलम ३ पहावे.

(ख) अशा कोणत्याही मुदतीची तरतूद करण्यात आली नसेल, त्याबाबतीत करावयाच्या कारवाईचे स्वरूप आणि तिची व्याप्ती विचारात घेऊन निबंधक लेखी नोटीशीद्वारे, विनिर्दिष्ट करील त्या अवधीत करण्यात आली नसेल तर, निबंधकास स्वतः किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत संस्थेच्या खर्चाने अशी कारवाई करता येईल आणि असा खर्च, जणू ती जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे संस्थेकडून वसुलीयोग्य असेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये निबंधक कारवाई करील, त्या बाबतीत त्यास, त्याच्या मते या अधिनियमाच्या, नियमाच्या किंवा उपविधीच्या किंवा पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशांचे पालन न करण्यास संस्थेचा जो अधिकारी किंवा संस्थेचे जे अधिकारी जबाबदार असतील त्यास किंवा त्यांना बोलविता येईल आणि अशा अधिका-यास किंवा अधिका-यांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्यावर कारवाई करण्यात त्याने किंवा त्यांनी कसूर केल्यामुळे संस्थेने राज्य शासनास, दिलेला किंवा द्यावयाचा खर्च संस्थेस देण्याबद्दल आणि निबंधकाच्या निदेशांचे पालन करण्यात येईपर्यंत प्रत्येक दिवसासाठी निबंधकास योग्य वाटेल अशी पंचवीस रुपयांहून अधिक नसेल इतकी रक्कम संस्थेच्या मत्तेत देण्याबद्दल त्यास किंवा त्यांना फर्मविता येईल.

[१][७९ क. (१) [२][निबंधकाकडून एखादे प्रतिवृत्त आल्यावर किंवा अन्यथा, राज्य शासनाची अशी खात्री झाली असेल की,] लोकहिताच्या दृष्टीने किंवा शासनाने मान्य केलेल्या किंवा हाती घेतलेल्या सहकारी उत्पादनविषयक किंवा इतर विकासविषयक कार्यक्रमाची योग्य रीतीने अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी किंवा सामान्यतः संस्थेच्या कामकाजाचे योग्य व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी किंवा संस्थेच्या सदस्यांच्या किंवा ठेविदारांच्या किंवा धनकोच्या हितास हानी पोहचेल अशा रितीने संस्थेचे कामकाज चालविले जाण्यास प्रतिबंध करण्याकरिता सर्वसाधारणपणे, संस्थेच्या कोणत्याही वर्गास किंवा विशेषतः कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांना निदेश देणे आवश्यक आहे, तर [३][राज्य शासनास वेळोवेळी त्यांना निदेश देता येईल] आणि सर्व संस्था किंवा यथास्थिति, संबंधित संस्था अशा निदेशांचे अनुपालन करण्यास बांधलेल्या राहतील.

लोकहिताच्या दृष्टीने निदेश देण्याचा [४][शासनाचा अधिकार.]

(२) पोटकलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशात [५][राज्य शासनास] फेरबदल करता येतील किंवा ते रद्द करता येतील] आणि अशा निदेशात फेरबदल करताना किंवा ते रद्द करताना [६][राज्य शासनास] योग्य वाटतील अशा शर्ती लादता येतील.]

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५ अन्वये कलम ७९ (क) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५ (अ) (एक) अन्वये "याबाबतीत केलेल्या नियमांस अधीन, जेव्हा निबंधकाची अशी खात्री झाली असेल की," या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५ (अ) (दोन) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) अन्वये "निबंधकाचा अधिकार" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (एक) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (दोन) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[1][(३) पोटकलम (१) व (२) अन्वये संस्थेस दिलेले किंवा फेरबदल करून दिलेले निदेश पाळण्यास जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीने सबळ कारणांशिवाय किंवा समर्थनाखेरीज त्या निदेशांचे पालन करण्यात कसूर केली आहे, याबद्दल निबंधकाची खात्री झाली असेल, त्या बाबतीत निबंधकास आदेशाद्वारे,-

(क) ती व्यक्ती संस्थेच्या समितीची सदस्य असल्यास, त्या सदस्यास समितीतून काढून टाकता येईल व तिच्या उर्वरित पदावधीसाठी अन्य कोणत्याही व्यक्तीची समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करता येईल आणि आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी ती व्यक्ती असा सदस्य होण्यास अनर्ह असल्याचे घोषित करता येईल;

(ख) ती व्यक्ती संस्थेचा सेवक असल्यास, तिला संस्थेच्या सेवेतून ताबडतोब काढून टाकण्याबद्दल समितीस निदेश देता येईल आणि समितीच्या कोणत्याही सदस्याने किंवा सदस्यांनी कोणत्याही सबळ कारणाशिवाय किंवा समर्थनाशिवाय या आदेशांचे पालन करण्यात कसूर केल्यास, त्या सदस्यांना काढून टाकून इतर व्यक्तींची सदस्य म्हणून नेमणूक करता येईल आणि वरील खंड (क) मध्ये तरतूद केल्यानुसार कसूर करण्या-या सदस्यांना अनर्ह ठरविता येईल :

परंतु, या पोट-कलमान्वये कोणताही आदेश काढण्यापूर्वी, निबंधक संबंधित व्यक्तीला किंवा व्यक्तींना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देईल आणि ज्या संघीय संस्थेशी ती संस्था संलग्न असेल तिच्याशी विचारविनिमय करील.

निबंधकाकडून या कलमान्वये देण्यात आलेला कोणताही आदेश अंतिम असेल.]

विनियम तयार करण्यासाठी निदेश देण्याचे निबंधकाचे अधिकार.

[2][**७९कक.** (१) संस्थेची आर्थिक स्थिती आणि त्यातील शासनाचा आर्थिक हितसंबंध लक्षात घेता त्या संस्थेचा उदीम किंवा धंदा चालविण्याची रीत विनियमित करणे आवश्यक आहे, असे निबंधकाचे किंवा जिल्हा उपनिबंधकापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा एखाद्या अधिका-याचे मत असल्यास, तो याबाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून अशा संस्थेला त्या बाबतीत विनिमय करण्याचे आणि ते आपणाकडे मान्यतेसाठी पाठविण्याचे निदेश देऊ शकेल.

(२) संस्थेने केलेले विनियम प्राप्त झाल्यानंतर निबंधक किंवा असा अधिकारी त्यात फेरबदल करून किंवा फेरबदल न करता त्यास मान्यता देऊ शकेल. अशा विनियमांना मान्यता मिळाल्यानंतर संस्था आपले कामकाज अशा विनियमांनुसार चालवील.

(३) कोणतीही संस्था, असे विनियम निबंधकाकडे किंवा अशा अधिका-याकडे पाठविण्याविषयी पोट-कलम (१) खाली त्याने निदेश दिला असता, निदेश दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आंत ते सादर करण्यास चुकली, तर निबंधक किंवा अधिकारी स्वतः असे विनियम करील किंवा करवून घेईल आणि संस्थेला अशा विनियमांनुसार आपले कामकाज चालविण्यास फर्मावील आणि लागोलाग अशा आवश्यक बाबींचे अनुपालन करणे, हे संस्थेवर बंधनकारक राहील.]

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ६ अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४१ अन्वये कलम ७९ कक समाविष्ट करण्यात आले.

[१][७९ख. (१) एखाद्या संस्करण संस्थेचा कोणताही उत्पादक-सदस्य संस्थेच्या उपविधींच्या तरतुदीस अनुसरून आपल्या शेतकी उत्पादनाचा संस्थेस पुरवठा करण्यात कसूर करील, त्या बाबतीत निबंधकास संस्थेने तक्रार केल्यावर किंवा स्वाधिकारे, सदस्यांच्या नावे नोटीस काढता येईल व त्याला अशा कसुरीबद्दल संस्थेच्या सदस्यत्वामधून का काढण्यात येऊ नये, याबद्दलचे कारण तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत दाखवण्यास सांगता येईल.

एखाद्या सदस्याने आपल्या शेतकी उत्पादनाचा संस्करण संस्थेस पुरवठा करण्यात कसूर केल्यास त्या सदस्यास काढून टाकण्याचा निबंधकाचा अधिकार.

(२) त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि सदस्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, जर निबंधकाची अशी खात्री होईल की, सदस्याने कोणत्याही सबळ कारणाशिवाय किंवा समर्थनाशिवाय उपविधीच्या तरतुदीनुसार संस्थेस आपल्या शेतकी उत्पादनाचा पुरवठा करण्यात कसूर केली आहे, तर त्यास आदेशाद्वारे तो विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून संस्थेचा सदस्य म्हणून संबंधित व्यक्तीस काढून टाकता येईल आणि लागोलाग ती व्यक्ती त्या दिनांकास किंवा त्या दिनांकापासून संस्थेचा सदस्य असण्याचे बंद होईल. या कलमान्वये निबंधकाने दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल.]

८०. (१) संस्थेची पुस्तके आणि अभिलेख दडवून टाकण्यात येण्याचा, त्यात अनधिकृत फिरवाफिरव करण्याचा किंवा ती नष्ट केली जाण्याचा संभव आहे किंवा संस्थेच्या निधीचा किंवा मालमत्तेचा अपहार होण्याचा किंवा त्याचे अपयोजन होण्याचा संभव आहे, या विषयी निबंधकाची खात्री होईल, त्या बाबतीत निबंधकास किंवा त्याने प्रधिकृत केलेल्या व्यक्तीस ज्याच्या अधिकारितेत अशी संस्था कार्य करीत असेल, त्या कार्यकारी दंडाधिका-याकडे संस्थेचे अभिलेख व मालमत्ता जप्त करण्यासाठी व त्याचा ताबा घेण्यासाठी अर्ज करता येईल.

अभिलेख, वगैरे जप्त करण्याचा निबंधकाचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेला अर्ज मिळाल्यावर [२][दंडाधिकारी अशा अर्जाचा ताबडतोब विचार करील व तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याबद्दल त्याची खात्री होईल तर त्यास], ज्या ठिकाणी असे अभिलेख आणि मालमत्ता ठेवण्यात आली असेल किंवा ठेवली असण्याचा संभव असेल त्या कोणत्याही ठिकाणी प्रवेश करण्यास व त्याची झडती घेण्यास आणि असे अभिलेख व मालमत्ता जप्त करण्यास आणि ती निबंधकाच्या किंवा यथास्थिति, त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या ताब्यात देण्यास फौजदाराचा दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-यास प्राधिकृत करता येईल.

[३][ (३) निबंधकाची किंवा जिल्हा उपनिबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या एखाद्या अधिका-याची (या कलमात यापुढे " उक्त अधिकारी " म्हणून निर्दिष्ट केलेल्या) अशी खात्री पटली की, तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे आणि अधिकारिता असणारा कार्यकारी दंडाधिकारी सतत तीन दिवस मुख्यालयात उपलब्ध असण्याची शक्यता नाही किंवा सहकारी संस्थेची पुस्तके व अभिलेख यात अनधिकृत फिरवाफिरव होण्याचा निकट धोका आहे किंवा संस्थेचे निधी व मालमत्ता यांचा अपहार किंवा अपयोजन होण्याचा निकट धोका आहे तर पोट-कलमे (१) व (२) यांत काहीही अंतर्भूत असले तरी, निबंधक किंवा अधिकारी एक तर स्वतः किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिका-यांमार्फत संस्थेची अशी पुस्तके, अभिलेख किंवा निधी सक्तीने ताब्यात घेण्यासाठी आदेश काढू शकेल आणि त्या प्रयोजनार्थ वाजवी नोटीस दिल्यानंतर निबंधकाला किंवा उक्त अधिका-याला किंवा अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या अधिका-याला अशी पुस्तके, अभिलेख किंवा निधी आहेत, असे त्याला वाटत असेल त्या ठिकाणी कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करून अधिपत्राशिवाय झडती घेता येईल व अशा पुस्तकांचे, अभिलेखांचे अथवा निधींचे निरीक्षण करून सक्तीने ताब्यात घेता येईल आणि अशा पुस्तकांच्या, अभिलेखांच्या किंवा निधींच्या अभिरक्षेस जबाबदार

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ७ अन्वये कलम ७९ख समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १८ अन्वये " दंडाधिका-यास " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४२ अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आला.

असणारा एक किंवा अनेक अधिकारी यांना अशी पुस्तके, अभिलेख किंवा निधी हे तात्काळ निबंधकाच्या उक्त अधिका-याच्या किंवा अशाप्रकारे अधिकृत करण्यात आलेल्या अधिका-याच्या स्वाधीन करावे लागतील व तो अशा रीतीने ताब्यात घेतलेली पुस्तके, अभिलेख किंवा निधी मिळाल्याची पावती देईल. निबंधक, उक्त अधिकारी किंवा याप्रमाणे प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी, उक्त आदेशाच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ आपणास आवश्यक ते सहाय्य देण्याबद्दल नजिकच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-यास विनंती करू शकेल आणि लागोलाग पोलीस अधिकारी असे सहाय्य देईल.]

प्रकरण आठ

## लेखापरीक्षा, चौकशी, निरीक्षण आणि पर्यवेक्षण.

लेखापरीक्षा. **८१.** [१][(१) (क) ज्या ज्या संस्थेला राज्य शासन [२][किंवा शासकीय उपक्रम यांच्या कडून वेळोवेळी] देण्यात आलेल्या हमीसह वित्त सहाय्य देण्यात आले असेल, [३][आणि शिखर संस्था, राज्य व जिल्हा स्तरावरील संघीय संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, सहकारी सूत गिरण्या, जिल्हा आणि तालुका सहकारी विक्री व खरेदी संघटना आणि राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही संस्था किंवा संस्थावर्ग यांच्या बाबतीत] निबंधक, प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा हिशेबांची लेखापरीक्षा करील किंवा याबाबतीत त्याने लेखी दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तींद्वारे ती करवून घेईल.

(ख) खंड (क) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या संस्थाहून अन्य संस्था, प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा निबंधकाने ठेवलेल्या लेखापरीक्षक नामिकेतील लेखापरीक्षकाद्वारे किंवा " इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकॉउन्टस ऑफ इंडिया " या संस्थेने दिलेले सहकार लेखापरीक्षा प्रमाणपत्र धारण करणा-या एखाद्या सनदी लेखापालाद्वारे आपल्या हिशेबांची लेखापरीक्षा करण्याची तजवीज करतील.

[३][ * * * * * ]:

परंतु, [४][*** निबंधक कारणे लेखी नमूद करून त्या कारणास्तव अशा कोणत्याही संस्थेची कोणत्याही वर्षीच्या लेख्याची कोणत्याही वेळी लेखापरीक्षा करू शकेल किंवा करवून घेऊ शकेल.]

[५][(२) पोट-कलम (१) खालील लेखापरीक्षेत खालील बाबींची तपासणी किंवा पडताळणी या गोष्टी अंतर्भूत असतील त्या अशा.—

(एक) कोणतीही ऋणे असल्यास, त्यांच्या बराच काळ थकलेल्या रकमा ;

(दोन) रोख शिल्लक व कर्जरोखे आणि संस्थेच्या मत्ता व दायित्वे यांचे मूल्यांकन ;

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४३ (अ) अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ८ अन्वये " शासकीय उपक्रम किंवा वित्तीय संस्था यांच्याकडून वेळोवेळी " आणि " अशा प्रत्येक संस्थेच्या बाबतीत तिच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४(अ) अन्वये पहिले परंतुक वगळण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) अन्वये दुस-या परंतुकातील 'आणखी असे की ' हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४३(ब) अन्वये पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

(तीन) प्रतिभूतींच्या आधारे संस्थेने दिलेले कर्ज व आगाऊ रकमा आणि घेतलेली ऋणें योग्य प्रकारे प्रतिभूत करण्यात आलेली आहेत किंवा कसे आणि अशा त-हेने दिलेली कर्जे किंवा आगाऊ रकमा किंवा घेतलेली ऋणे ज्या अटीवर देण्यात वा घेण्यात आली असतील, त्या अटी संस्थेला व तिच्या सदस्यांच्या हितसंबंधांना बाधक ठरणा-या आहेत किंवा कसे ;

(चार) केवळ पुस्तक नोंदीद्वारे संस्थेकडून केले जाणारे व्यवहार संस्थेच्या हितसंबंधाला बाधक ठरणारे आहेत किंवा कसे ;

(पाच) संस्थेने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा ठेवी म्हणून दाखविण्यात आल्या आहेत काय ;

(सहा) वैयक्तिक खर्च महसूली लेख्यावर भारित करण्यात आला आहे काय ;

(सात) आपल्या उद्दिष्टांच्या पुरःसरणार्थ संस्थेला काही खर्च आला आहे काय ;

(आठ) शासन किंवा शासकीय उपक्रम अथवा वित्त संस्था यांनी संस्थेला ज्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहाय्य दिले असेल, त्यांच्यासाठीच त्या सहाय्यांचा योग्यप्रकारे वापर संस्थेने केला आहे काय ;

(नऊ) संस्था सदस्यांबाबतची आपली उद्दिष्टे व आबंधने योग्यप्रकारे पार पाडत आहे किंवा कसे.]

[१][(२ क) राज्य शासनाच्या मते सुयोग्य व्यापारी तत्वे किंवा योग्य वाणिज्यिक प्रथा यांना अनुसरून कोणत्याही संस्थेचे किंवा संस्था वर्गाचे व्यवस्थापन होण्याची खात्रीशीर तजवीज करण्यासाठी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे आवश्यक असल्यास, राज्य शासन आदेशाद्वारे, [२][अशी संस्था किंवा असा संस्थावर्ग, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा नमुन्यात लेखे तयार करील व ठेवील आणि] त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा संस्थेची किंवा संस्थावर्गाची परिव्यय लेखपरीक्षा किंवा कार्य लेखापरीक्षा किंवा दोन्ही परीक्षा करण्यात याव्यात असा निर्देश देऊ शकेल.

(२ ख) पोट-कलम (२क) खाली कोणताही आदेश काढण्यात आला असेल त्याबाबीत, निबंधक अशा
१९५९ संस्थेची किंवा संस्थावर्गाची लेखापरीक्षा, परिव्यय आणि कार्य लेखापाल अधिनियम, १९५९ च्या कलम ३
चा २३. खाली स्थापन करण्यात आलेल्या भारतीय परिव्यय आणि कार्य लेखापाल संस्थेचा जो सदस्य असेल अशा परिव्यय लेखापालाद्वारे करवून घेईल.

(३) [३][(क)] निबंधकास किंवा प्राधिकृत व्यक्तीस, लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी संस्थेच्या मालकीची किंवा संस्थेच्या अभिरक्षेत असतील अशी पुस्तके, लेखा, दस्तऐवज, कागदपत्रे, रोखे, रोख रक्कम किंवा इतर मालमत्ता ही सर्व वेळी पहायला मिळतील आणि त्यास, अशी कोणतीही पुस्तके, लेखे, दस्तऐवज, कागदपत्रे, रोखे, रोख रक्कम किंवा इतर मालमत्ता ही ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल किंवा त्यांच्या अभिरक्षेबद्दल जी व्यक्ती जबाबदार असेल, त्या कोणत्याही व्यक्तीस, संस्थेच्या मुख्यालयाच्या किंवा तिच्या कोणत्याही शाखेच्या कोणत्याही जागी ती प्रस्तुत करण्याकरिता बोलविता येईल.

[३][(ख) संस्थेची किंवा संस्थांची पुस्तके, अभिलेख, लेखे आणि अशी इतर कागदपत्रे यांची तपासणी करण्यासाठी व रोख रकमेची पडताळणी करण्यासाठी वायुवेगी पथक पाठवण्यास निबंधक सक्षम असेल. पुढील कार्यवाही करणे आवश्यक झाल्यास त्या प्रयोजनास्तव वायुवेगी पथकाचा अहवाल हा लेखापरीक्षेचा अहवाल आहे असे समजण्यात येईल.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४३ (क) अन्वये पोट-कलमे (२ क) आणि (२ख) समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४३ (ड) अन्वये पोट-कलम (३) ला त्या कलमाचा खंड (क) असे नवीन अक्षरांकन देण्यात आले व खंड (ख) आणि (ग) जादा दाखल करण्यात आले.

(ग) निबंधकाला किंवा याबाबतीत त्याने प्रधिकृत केलेल्या व्यक्तीला कोणत्याही संस्थेच्या लेख्यांची चाचणी लेखापरीक्षा करता येईल किंवा करवून घेता येईल. या चाचणी लेखापरीक्षेत विहित करण्यात येतील अशा बाबींच्या तपासणीचा समावेश असेल.]

(४) जी व्यक्ती संस्थेचा अधिकारी किंवा कर्मचारी असेल किंवा जी कोणत्याही वेळी संस्थेचा अधिकारी किंवा कर्मचारी होती, अशी प्रत्येक व्यक्ती आणि संस्थेचा प्रत्येक सदस्य व माजी सदस्य संस्थेच्या व्यवहारासंबंधी व कामकाजासंबंधी, निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती फर्मावील त्याप्रमाणे माहिती पुरवील.

(५) पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या लेखापरीक्षकास संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीच्या सर्व नोटिसा आणि प्रत्येक.पत्रव्यवहार मिळण्याचा आणि अशा बैठकीस हजर राहण्याचा आणि बैठकीतील कामकाजाचा ज्या भागाशी लेखापरीक्षक म्हणून त्याचा संबंध येत असेल, त्या कोणत्याही भागासंबंधात आपली बाजू अशा बैठकीत मांडण्याचा हक्क असेल.

[१][(५क) कोणत्याही संस्थेच्या लेखापरीक्षेच्या ओघात जर काही लेखापुस्तकांमध्ये किंवा इतर दस्तऐवजांमध्ये संस्थेच्या माजी किंवा आजी अधिका-याला किंवा कर्मचा-याला गुन्ह्यांच्या आरोपात गोवणारा असा त्याच्याविरूद्ध कोणताही पुरावा अंतर्भूत आहे, अशी लेखापरीक्षकाची खात्री झाली असेल तर, लेखापरीक्षक ती बाब त्वरित निबंधकाला कळवील आणि निबंधकाच्या पूर्वपरवानगीने लेखापुस्तके किंवा दस्तऐवज अटकावून ठेवू शकेल आणि संस्थेला त्याची पोचपावती देऊ शकेल.

(५ख) लेखापरीक्षक त्याने तपासलेल्या लेख्यांवर आणि ज्या दिनांकास व ज्या कालावधीपर्यंत लेखापरीक्षा करण्यात आलेली आहे, त्या दिनांकास व त्या कालावधीपर्यंत असलेल्या स्थितीप्रमाणे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक यावर निबंधकाने विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपातील लेखापरीक्षाविषयक ज्ञापनावर रीतसर सही करून संस्थेला आणि निबंधकाला सादर करील आणि त्याच्या मते व त्याच्या अद्यायावत माहितीप्रमाणे आणि त्याला संस्थेने दिलेल्या खुलाशांनुसार, उक्त लेख्यावरून, अधिनियमाद्वारे किंवा त्याखालील आवश्यक केलेली सर्व माहिती मिळते काय आणि संस्थेच्या वित्तीय व्यवहाराबाबत यथातथ्य व स्वच्छ दृष्टीकोण होता किंवा कसे, याबाबत निवेदन करील.]

(६) निबंधकास, संस्थेच्या अर्जावरून किंवा अन्यथा संस्थेच्या कोणत्याही लेख्यांची पुन्हा लेखापरीक्षा करणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे, असे आढळून आल्यास, त्यास आदेशाद्वारे अशा प्रकारे पुन्हा लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करता येईल आणि संस्थेच्या लेखापरीक्षेच्या संबंधात लागू होणा-या या अधिनियमाच्या तरतुदी, अशा रीतीने पुन्हा करावयाच्या लेखापरीक्षेस लागू होतील.

लेख्यातील दोषांची दुरूस्ती.

८२. लगतपूर्ववर्ती कलमान्वये केलेल्या लेखापरीक्षेवरून संस्थेच्या कामकाजात कोणतेही दोष असल्याचे उघडकीस आले तर, संस्था, लेखापरीक्षेच्या अहवालाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत लेखापरीक्षकाने निदर्शनास आणलेले दोष किंवा नियमबाह्यता याबाबत निबंधकाकडे स्पष्टीकरण देईल आणि दोष दुरूस्त करण्यासाठी किंवा नियमबाह्यता दूर करण्यासाठी उपाययोजना करील आणि त्यावर तिने केलेली कार्यवाही निबंधकाला कळवील, तसेच निबंधकास आदेशाद्वारे, असे दोष सुधारण्यासांठी अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी उपाययोजना त्यात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत करण्याविषयी अशा संस्थेस किंवा तिच्या पदाधिका-यांस निदेश देता येईल, संबंधित संस्था ही एखाद्या संघीय संस्थेची सदस्य असेल त्याबाबतीत, असा आदेश अशा संघीय संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर देण्यात येईल.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४३ (ई) अन्वये पोट-कलमे (५ क) आणि (५ ब) समाविष्ट करण्यात आली.

८३. [१][(१) निबंधकास, वैयक्तिकरीत्या किंवा त्याने यथोचितरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे एखाद्या संस्थेची रचना, तिचे कामकाज व तिची आर्थिक स्थिती याची चौकशी स्वतः होऊन करता येईल आणि संस्थेच्या एक-तृतीयांश सदस्यांनी तसा अर्ज केल्यावर, तो वरील पद्धतीनुसार अशी चौकशी करील. निबंधकाने चौकशी करणे.

(२) अर्जावर अशी कोणतीही चौकशी करण्यापूर्वी, निबंधकास, चौकशीचा खर्च म्हणून, [२][अभिकथन आणि त्या अनुषंगाने करावी लागणारी चौकशी, यांचे स्वरूप विचारात घेऊन तो ठरवील अशी रक्कम आपल्याकडे अनामत ठेवण्यास अर्जदारास फर्मावता येईल.] अर्जात करण्यात आलेली अभिकथने, चौकशीच्या वेळी सारतःसिद्ध झाली तर, अर्जदाराला अनामत रक्कम परत करण्यात येईल आणि निबंधकास, कलम ८५ अन्वये त्या कलमामध्ये घालून देण्यात आलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर चौकशीचा खर्च कोणाकडून आणि कोणत्या मर्यादेपर्यंत वसूल करण्यात यावा, याबद्दल निदेश देता येईल. त्याचप्रमाणे अभिकथने खोटी, संतापजनक किंवा विद्वेषपूर्ण असल्याचे सिद्ध झाल्यास, निबंधकास, असा खर्च अर्जदाराकडून वसूल करण्यात यावा, असा निदेश देता येईल. अभिकथने ही खोटी किंवा संतापजनक किंवा विद्वेशपूर्ण नव्हती, परंतु तो तसे सिद्ध होऊ शकले नाही, असे चौकशीच्या निकालावरून दिसून आल्यास असा खर्च राज्य शासनाकडून सोसण्यास येईल.]

(३) (क) ज्या संस्थेच्या संबंधात चौकशी करण्यात येत असेल, अशा संस्थेचे सर्व अधिकारी, सदस्य आणि माजी सदस्य आणि चौकशी करणा-या अधिका-यांच्या मते संस्थेबाबत माहिती पुस्तके आणि कागदपत्रे ज्या व्यक्तींच्या ताब्यात आहेत, अशा इतर कोणत्याही व्यक्ती आपल्याजवळ असेल अशी कोणतीही माहिती पुरवतील आणि त्यांच्या अभिरक्षेत किंवा अधिकाराखाली असतील अशी संस्थेबाबतची सर्व पुस्तके आणि कागदपत्रे प्रस्तुत करतील, आणि अन्यप्रकारे चौकशीसंबंधी त्यांना वाजवीरीत्या देता येईल असे सर्व सहाय्य चौकशी करणा-या अधिका-यास देतील.

(ख) जर अशी कोणतीही व्यक्ती, जी पुस्तके आणि कागदपत्रे खंड (क) अन्वये प्रस्तुत करणे, तिचे कर्तव्य असेल, अशी कोणतीही पुस्तके किंवा कागदपत्रे, निबंधकाकडे किंवा पोट-कलम (१) अन्वये त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे प्रस्तुत करण्यास किंवा निबंधकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने उपखंड (क) अनुसार तिला विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार देईल तर, निबंधकास किंवा निबंधकाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस पुस्तके व कागदपत्रे प्रस्तुत करण्यास व उत्तर देण्यास तिने नकार दिला आहे, असे प्रमाणित करता येईल आणि बचावासाठी तिने दिलेले कोणतेही निवेदन ऐकून घेतल्यानंतर, निबंधकास, कसूर करणा-यास पाचशे रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाची शिक्षा देता येईल. या कलमान्वये दंड म्हणून लादलेली कोणतीही रक्कम निबंधकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने, अधिकारिता असणा-या दंडाधिका-याकडे अर्ज केल्यानंतर उक्त दंडाधिका-याकडून जणूकाही तो त्याने स्वतः बसविलेलाच दंड असल्याप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

(४) या कलमान्वये केलेल्या कोणत्याही चौकशीचा निकाल, ज्या संस्थेच्या कामाकाजाची तपासणी करण्यात आली असेल, त्या संस्थेस कळविण्यात येईल.

(५) निबंधक, ज्या अधिका-याकडे कोणतीही चौकशी करण्याचे काम सोपविण्यात आले असेल, अशा अधिका-याकडून कोणत्याही चौकशीचे काम काढून घेण्यास, आणि ते चौकशीचे काम स्वतः करण्यास किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीकडे ते सोपविण्यास सक्षम असेल.

८४. (१) संस्थेची धनको असलेली जी व्यक्ती— ऋणग्रस्त संस्थेच्या पुस्तकांचे निरीक्षण.

(क) आपले ऋण हे त्यावेळी येणे असलेली रक्कम असून, आपण आपल्या ऋणाच्या फेडीची मागणी केली होती व त्याची वाजवी वेळेच्या आत परतफेड झालेली नाही अशी निबंधकाची खात्री करून देईल, आणि

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १९ अन्वये पोट-कलमे (१) व (२) ही मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आली.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४४ अन्वये "१०० रुपयांची रक्कम निबंधकाकडे अनामत ठेवण्यास अर्जदारास फर्मावता येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) संस्थेच्या पुस्तकाच्या कोणत्याही निरीक्षणाच्या खर्चादाखल तारण म्हणून निबंधक सांगेल तितकी रक्कम निबंधकाकडे अनामत ठेवील,

अशा व्यक्तीने अर्ज केल्यावर, निबंधकास, त्यास आवश्यक वाटेल तर, अशा संस्थेच्या पुस्तकांचे निरीक्षण करता येईल किंवा याबाबत लेखी आदेश देऊन त्याने प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीस अशा पुस्तकांचे निरीक्षण करण्याविषयी निदेश देता येईल.

(२) निबंधक, अशा कोणत्याही निरीक्षणाचा निकाल अर्जदारास आणि ज्या संस्थेच्या पुस्तकांचे निरीक्षण करण्यात आले असेल त्या संस्थेस कळवील.

(३) निबंधक, ज्या अधिका-याकडे निरीक्षण करण्याचे काम सोपविले असेल त्या अधिका-यास दिलेल्या निरीक्षणाचा कोणताही आदेश काढून घेण्यास आणि स्वतः निरीक्षण करण्यास किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीकडे ते काम सोपविण्यास सक्षम असेल.

[१][(४) जी संस्था शासनाची ऋणी असेल किंवा जिचे भागभांडवल (संपूर्णतः किंवा अंशतः) शासनाकडून पुरविण्यात आलेले असेल किंवा अन्यथा जिच्यामध्ये शासनाचा कोणताही आर्थिक हितसंबंध अंतर्भूत असेल अशा कोणत्याही संस्थेच्या संबंधात, निबंधकास या कलमाद्वारे देण्यात आलेल्या निरीक्षणासंबंधीच्या अधिकारांचा स्वतःहून वापर करता येईल.]

चौकशीचा आणि निरीक्षणाचा खर्च.

८५. (१) कलम ८३ अन्वये चौकशी करण्यात येईल त्याबाबतीत किंवा निकटपूर्ववर्ती कलमान्वये निरीक्षण करण्यात येईल तेव्हा, निबंधकास अशा चौकशीचा किंवा निरीक्षणाचा खर्च किंवा त्यास योग्य वाटेल असा त्या खर्चाचा भाग, चौकशीची किंवा निरीक्षणाची मागणी करणारी संस्था, सदस्य किंवा धनको, संस्थेचे अधिकारी किंवा माजी अधिकारी आणि संस्थेचे सदस्य किंवा माजी सदस्य किंवा मृत सदस्य यांच्या संपदेमध्ये संविभाजित करता येईल :

परंतु,—

(क) या कलमान्वये खर्च संविभाजित करण्याबाबतचा कोणताही आदेश, अशा आदेशान्वये खर्च देण्याचे दायित्व असलेल्या संस्थेचे किंवा व्यक्तींचे किंवा मृत व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय किंवा तिला किंवा त्यांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिलेली असल्याशिवाय देता येणार नाही ;

(ख) निबंधकाने असा खर्च ज्या कारणांसाठी संविभाजित केला असेल ती कारणे तो लेखी नमूद करील.

(२) पूर्वगामी पोट-कलमान्वये दिलेल्या आदेशाविरूद्ध संस्थेव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीने सादर केलेल्या कोणत्याही अपिलाचा कोणताही खर्च भागविण्याकरिता संस्थेच्या निधीमधून कोणताही खर्च केला जाणार नाही.

खर्चाची वसुली.

८६. निकटपूर्ववर्ती कलमान्वये खर्चादाखल म्हणून निवाड्याद्वारे दिलेली रक्कम, ज्या व्यक्तीकडून ती मागण्यात आली असेल अशी व्यक्ती ज्या जागी राहत असेल किंवा धंदा चालवीत असेल त्या जागेवर अधिकारिता असलेल्या दंडाधिका-याकडे निबंधकाने अर्ज केला असता, तिच्याकडून वसूल करता येईल आणि असा दंडाधिकारी, अशी रक्कम जणू काही त्याने स्वतः लादलेला तो दंड आहे, असे समजून त्या रीतीनेच ती वसूल करण्याची कार्यवाही करील.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २० अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

८७. (१) जर कलम ८३ अन्वये केलेल्या कोणत्याही चौकशीच्या किंवा कलम ८४ अन्वये केलेल्या निरिक्षणाच्या निष्कर्षावरून संस्थेच्या घटनेत, कामकाजात किंवा आर्थिक स्थितीत किंवा पुस्तकात कोणतेही दोष असल्याचे उघडकीस आले तर, निबंधकास असे दोष संस्थेच्या निदर्शनास आणता येतील. तसेच त्यास, संस्थेस किंवा तिच्या अधिका-यास आदेश देऊन, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या वेळेच्या आत असे दोष दूर करण्यासाठी आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी उपाययोजना करण्याबद्दल निदेश देता येईल.

निबंधकाने चौकशीत अथवा निरीक्षणात उघडकीस आलेले दोष संस्थेच्या निदर्शनास आणणे.

(२) संबंधित संस्थेस, पूर्ववर्ती पोट-कलमान्वये निबंधकाने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, त्या आदेशाविरूद्ध राज्य शासनाकडे अपील करता येईल.

(३) राज्य शासनास, अपिलाचा निर्णय करताना, निबंधकाचा आदेश विलोपित करता येईल, तो बदलता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो कायम करता येईल.

(४) जर कलम ८१ अन्वये केलेल्या लेखापरीक्षेत किंवा त्याच्या परिणामी उघडकीस आलेले दोष दुरुस्त करण्यात किंवा निबंधकाने निदेश दिल्याप्रमाणे असे दोष दुरुस्त करण्यात संस्थेने कसूर केली असेल आणि आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत राज्य शासनाकडे कोणतेही अपील करण्यात आले नसेल किंवा अशा रीतीने केलेल्या अपिलात राज्य शासनाने आदेश विलोपित केला नसेल, तो बदलला नसेल किंवा त्यात फेरबदल केले नसतील तर, निबंधकास स्वतःच असे दोष दुरुस्त करून घेण्यासाठी उपाययोजना करता येईल आणि दोष दुरुस्त करण्यात त्याच्या मते, ज्याने किंवा ज्यांनी कसूर केली असेल, अशा संस्थेच्या एका किंवा अनेक अधिका-यांकडून खर्च वसूल करता येईल.

८८. (१) एखाद्या संस्थेची कलम ८१ अन्वये लेखापरीक्षा किंवा कलम ८३ अन्वये चौकशी किंवा कलम ८४ अन्वये निरिक्षण चालू असताना किंवा त्या संस्थेचे समापन होत असताना किंवा अशा लेखापरीक्षेच्या, चौकशीच्या, निरिक्षणाच्या किंवा समापनाच्या परिणामी लेखापरीक्षकाने किंवा कलम ८३ अन्वये चौकशी करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम ८४ अन्वये पुस्तकांचे निरीक्षण करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम १०५ अन्वये परिसमापकाने दिलेल्या अहवालाच्या आधारे किंवा अन्यथा, संस्थेच्या रचनेत किंवा व्यवस्थापनात जिने कोणताही भाग घेतला होता, अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेच्या कोणत्याही, मृत किंवा माजी किंवा विद्यमान अधिका-याने [१][अशा लेखापरीक्षेच्या किंवा चौकशीच्या, निरीक्षणाच्या किंवा समापनाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ]पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या कोणत्याही पैशाचे किंवा मालमत्तेचे अपयोजन केले आहे किंवा त्यांने असा पैसा किंवा मालमत्ता ठेवून घेतली आहे किंवा त्याच्या संबंधात, तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्याबद्दल तो दोषी झाला आहे, याबद्दल निबंधकाची खात्री होईल तर, निबंधकास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्तीविरुद्ध किंवा व्यक्तींविरुद्ध आरोप ठेवता येईल आणि संबंधित व्यक्तीस आणि मृत व्यक्तीच्या बाबतीत तिची मालमत्ता ज्याला वारसाने मिळाली असेल अशा तिच्या प्रतिनिधीस आरोपाबाबत उत्तर देण्याची वाजवी संधी दिल्यानंतर निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती या कलमानुसार ठरवतील त्या दराने जे व्याज होईल त्या व्याजासह, तो पैसा किंवा ती मालमत्ता किंवा त्या पैशाचा किंवा मालमत्तेचा कोणताही भाग, याची परतफेड करण्यास किंवा तो परत करण्यास किंवा असे अपयोजन केल्याबद्दल, ठेवून घेतल्याबद्दल, अपकार्याबद्दल किंवा विश्वासघात केल्याबद्दल भरपाई म्हणून निबंधक किंवा अशी व्यक्ती ठरवील, ती रक्कम संस्थेच्या मत्तेत भरण्याविषयी आदेश देता येईल.

अपचारी प्रवर्तक वगैरेंविरुद्ध नुकसानी आकारण्याचा निबंधकाचा अधिकार.

(२) निबंधकास किंवा पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस, या कलमान्वये कोणताही आदेश देताना, त्या आदेशात त्यास न्याय्य वाटेल त्याप्रमाणे खर्च किंवा त्याचा कोणताही भाग देण्याबद्दल तरतूद करता येईल आणि असा खर्च किंवा त्याचा कोणताही भाग, ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यात आला असेल, त्या व्यक्तीकडून वसूल करण्याबद्दल निदेश देता येईल.

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १८ अन्वये "अशा हिशेबतपासणीच्या चौकशीच्या, तपासणीच्या किंवा व्यवहार बंद केल्याबद्दलच्या आदेशाच्या तारखेपूर्वीच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) ज्याबद्दल संबंधित व्यक्तीविरुद्ध फौजदारी कार्यवाही करता येईल, असे हे कृत्य असले तरीही त्यास हे कलम लागू होईल.

चौकशीच्या फी पोटी जमा करावयाची रक्कम.

[१][८८क. निबंधक, कलम ८३ खाली स्वतः होऊन चौकशीचा निर्णय घेऊन आदेश देईल किंवा कलम ८८ अन्वये चौकशी सुरू करील किंवा चौकशी करण्यात प्राधिकृत करील, त्या बाबतीत अभिकथन आणि त्या अनुषंगाने करावी लागणारी चौकशी याचे स्वरूप विचारात घेऊन तो चौकशीच्या खर्चाच्या बाबतीत निर्धारित करील ती रक्कम स्वतःकडे जमा करण्यास संबंधित संस्थेला फर्मावू शकेल. संस्थेला रक्कम जमा करण्यासाठी फर्माविणारा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत जर अशी निर्धारित रक्कम निबंधकाकडे जमा करण्यात आली नाही, तर निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य राहील.]

उपस्थित वगैरे राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

८९. कलम ८३, ८४ किंवा ८८ अन्वये कार्य करताना, निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत ज्या उपाययोजनेची आणि पद्धतीची तरतूद करण्यात आली असेल त्याच उपाययोजनेद्वारे व त्याचरीतीने समन्स काढून कोणत्याही व्यक्तीस बोलविण्याचा आणि तिला उपस्थित राहण्यास भाग पाडण्याचा आणि [२][शपथेवर किंवा प्रतिज्ञेवर किंवा शपथपत्राद्वारे तिची तपासणी करण्याचा] किंवा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य महत्वाची वस्तू दाखल करण्यास भाग पाडण्याचा अधिकार असेल.

सन १९०८ चा ५.

संस्थेच्या कामकाजाचे निरीक्षण करण्याचा अधिकार.

[३][८९क. (१) (क) अधिनियम, नियम आणि संस्थेचे उपविधी यांच्या तरतुदींचे संस्था योग्य रीतीने अनुपालन करीत आहे ;

(ख) अभिलेख आणि लेखापुस्तके योग्य नमुन्यात ठेवलेली आहेत ;

(ग) संस्थेचा कारभार सुयोग्य व्यापारी तत्त्वानुसार चालवला जात आहे ;

(घ) संस्था सहकारी तत्त्वाचे आणि या अधिनियमांच्या तरतुदी आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम या अनुसार राज्य शासनाने दिलेल्या निदेशक तत्त्वांचे आणि निदेशांचे अनुपालन करीत आहे ;

याची खात्री करून घेण्यासाठी निबंधक संस्थेच्या कामकाजाचे निरीक्षण करण्यास समक्ष असेल :

परंतु, कलम ७३ छ खाली विनिर्दिष्ट केलेल्या संस्थेचे निरीक्षण करण्याचे काम, निबंधक किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला [४][उपनिबंधक], सहकारी संस्था यांच्यापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल असा अधिकारी हाती घेईल.

(२) संस्थांवर पर्यवेक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ निबंधकास पुढील अधिकार असतील:—

(क) कोणत्याही संस्थेचे अभिलेख आणि लेखापुस्तके यांचे निरीक्षण करणे त्या प्रयोजनार्थ त्याला संस्थेचे सर्व अभिलेख आणि लेखापुस्तके कोणत्याही वेळी पहावयास मिळतील ;

(ख) संस्थेचे अभिलेख आणि लेखापुस्तके ज्यांच्या अभिरक्षेत असतील अशा कोणत्याही अधिका-यास किंवा कर्मचा-यास ते अभिलेख व पुस्तके आपणासमोर हजर करण्यासाठी बोलावून घेणे ;

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४५ अन्वये कलम ८८ क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १९ अन्वये " पुरावा देण्यासाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४६ अन्वये कलम ८९ क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ९ अन्वये " सहनिबंधक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) संस्थेचे कार्यक्षेत्र, कामकाजाचे स्वरूप आणि संस्थेची उद्दिष्टे विचारात घेऊन, राज्यशासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी निश्चित करील, अशा दरांनी राज्य शासनास कोणत्याही संस्थेवर किंवा संस्थावर्गावर पर्यवेक्षण फी लादता येईल ;

(४) पोट-कलम (३) खाली लादण्यात आलेली फी देण्यास दायी असलेली प्रत्येक संस्था, राज्यशासन पोट-कलम (३) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील, त्या दिनांकास आणि त्या रीतीने अशी फी भरील ;

(५) कोणत्याही संस्थेची किंवा संस्थावर्गाची वित्तीय स्थिती विचारात घेतल्यावर, राज्य शासन **राजपत्रात** सर्वसाधारण किंवा विशेष आदेश प्रसिद्ध करून अशा आदेशात विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे तितक्या कालावधीसाठी अशा संस्थेला किंवा संस्थावर्गाला अशी फी भरण्यापासून माफी देऊ शकेल अथवा अशी फी पूर्णतः किंवा अंशतः कमी करू शकेल व त्या बाबतीत सूट देऊ शकेल.]

संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी संघीय प्राधिकरणाची रचना करणे किंवा त्यास मान्यता देणे.

**९०.** (१) राज्य शासनास एखाद्या संस्थेवर किंवा संस्थावर्गावर पर्यवेक्षण करण्यासाठी विहीत करण्यात येईल अशा रीतीने आणि राज्य शासन बसवील, अशा शर्तींना अधीन राहून, एका किंवा अधिक सहकारी संघीय प्राधिकरणाची रचना करता येईल किंवा त्यांना मान्यता देता येईल आणि अशा प्रकारच्या प्राधिकरणास अनुदान देण्याबद्दल नियम करता येतील.

(२) राज्य शासनास, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे संस्थांवर पर्यवेक्षक ठेवण्याच्या बाबतीत राज्य शासनास किंवा याबाबतीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने जो खर्च केला असेल किंवा जो खर्च होण्याचा संभव असेल तो खर्च भरून काढण्यासाठी निबंधक ठरवील अशा रकमेचे अंशदान दरवर्षी देण्याबद्दल अशा संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास भाग पाडता येईल.

(३) पोटकलम (२) ज्या संस्थेस लागू असेल, ती संस्था वाजवी मुदतीत विहित करण्यात येईल अशी फी अशा प्राधिकरणास देईल आणि अशी फी वाजवी मुदतीत देण्यात तिने कसूर केल्यास, अशा प्राधिकरणास उक्त रक्कम, जणू काही ती जमीनी महसुलाची थकबाकी, असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

## प्रकरण नऊ

## [१][**विवाद मिटणे**]

विवाद.

**९१.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यास [२][काहीही अंतर्भूत असले तरी,] संस्थेची रचना, [३][विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्या किंवा त्यांचे अधिकारी यांहून अन्य समित्यांच्या किंवा त्यांच्या अधिका-यांच्या निवडणुका] सर्वसाधारण बैठकीचे संचालन किंवा संस्थेचे व्यवस्थापन किंवा धंदा ह्या संबंधातील कोणताही विवाद, विवादातील दोन्ही पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराकडून किंवा संस्था ज्या संघीय संस्थेशी संलग्न असेल, त्या संस्थेकडून किंवा संस्थेच्या धनकोकडून [४][सहकारी न्यायालयाकडे] विचारार्थ निर्देशित करण्यात येईल. मात्र विवादामधील दोन्ही पक्षकार हे खालीलपैकी एक किंवा दुसरे असले पाहिजेतः—

(क) संस्था, तिची समिती, पुर्वीची कोणतीही समिती, कोणताही माजी किंवा विद्यमान अधिकारी, कोणताही माजी किंवा विद्यमान अभिकर्ता, कोणताही माजी किंवा विद्यमान कर्मचारी किंवा संस्थेच्या

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४७ अन्वये हे शीर्षक बदली दाखल करण्यात आले.

[२] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २० (अ) अन्वये " काहीही असले तरी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४८ (अ) अन्वये "त्यांच्या पदाधिका-यांच्या निवडणूका" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ३ (अ) अन्वये " निबंधकाकडे " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

कोणत्याही मृत अधिका-याची किंवा मृत कर्मचा-याची नामनिर्देशित व्यक्ती, वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी किंवा संस्थेचा परिसमापक [१][किंवा एखाद्या नोंदणी काढून घेतलेल्या संस्थेचा शासकीय अभिहस्तांकिती ;]

(ख) संस्थेचा सदस्य, माजी सदस्य अथवा संस्थेचा सदस्य, माजी सदस्य किंवा मृत सदस्य यांच्यामार्फत दावा सांगणारी व्यक्ती किंवा संस्थेची सदस्य असलेली संस्था, [२][किंवा संस्थेचा सदस्य म्हणून दावा सांगणारी व्यक्ती ;]

[३][(ग) कलम ४३, ४४ किंवा ४५ अन्वये लादलेले, केलेले किंवा विहित केलेले कोणतेही निर्बंध किंवा विनियम ज्या कोणत्याही व्यवहारासंबंधी असतील ते व्यवहार संस्थेने, संस्थेची सदस्य नसेल अशा ज्या व्यक्तीशी केले असतील, ती व्यक्ती व अशा व्यक्तीमार्फत दावा सांगणारी कोणतीही व्यक्ती ;

(घ) सदस्याचा, माजी सदस्याचा किंवा मृत सदस्याचा जामीनदार किंवा कलम ४५ अन्वये ज्या व्यवहारासंबंधी कोणतेही निर्बंध विहित करण्यात आले असतील ते व्यवहार, संस्थेने संस्थेची सदस्य नसेल, अशा व्यक्तीशी केले असतील, अशा इतर व्यक्तीचा जामीनदार, मग असा जामीनदार किंवा अशी व्यक्ती सदर संस्थेची सदस्य असो वा नसो ;]

(ङ) इतर कोणतीही संस्था किंवा अशा संस्थेचा परिसमापक [४][किंवा एखाद्या नोंदणी काढून घेतलेल्या संस्थेचा शासकीय अभिहस्तांकिती ;

[५][परंतु औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ याच्या कलम २, खंड (ट) मध्ये व्याख्या केलेला एखादा औद्योगिक विवाद किंवा कलम ७३ एक ग खाली अधिसूचित केलेल्या संस्थेहून अन्य कोणत्याही संस्थेचा किंवा कलम ७३ छ अन्वये किंवा त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या एखाद्या संस्थेच्या समितीच्या निवडणुकीचे नामनिर्देशनपत्र फेटाळणे किंवा सदस्यत्वासाठी अर्हता असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा अर्ज संस्थेने नाकारणे, [६][किंवा कलम १०१ च्या पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये किंवा कलम १३७ च्या पोट-कलम (१) अन्वये निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्रावर नमूद केलेली रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यासाठी केलेली कोणतीही कार्यवाही किंवा निबंधकाने किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिका-याने किंवा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या व ज्याला कलम १५६ च्या पोट-कलम (१) अन्वये निबंधकाने अधिकार प्रदान केलेले आहेत अशा संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने वसुलीसाठी केलेली कोणतीही कार्यवाही] [७][किंवा ज्यांच्या विरुद्ध कलम १५२ किंवा १५२ क अन्वये अपिल करण्याची आणि अधिनियमाच्या १५४ खालील पुनरिक्षण करण्याची तरतूद केली आहे असे निबंधकाचे कोणतेही आदेश, निर्णय, निवाडा व कार्यवाही] हे या कलमाच्या प्रयोजनार्थ विवाद विषय म्हणून मानण्यात येणार नाहीत.]

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १७ (अ) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६ (अ) (एक) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १६ (अ) (दोन) अन्वये खंड (क) आणि (ड) मधील मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १७ (अ) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४८ (ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १७ (अ) (तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][ * * * * * * ]

(३) [२][कलम ९३, पोट-कलम (२)] यात अन्यथा तरतूद केली असेल, त्याव्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयास पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही विवादाच्या बाबतीत कोणताही वाद किंवा इतर कार्यवाही दाखल करून घेण्याची अधिकारिता असणार नाही.

**स्पष्टीकरण**.१.-संस्थेचा परिसमापक [३][किंवा नोंदणी काढून घेतलेल्या संस्थेचा शासकीय अभीहस्तांकिती] आणि त्याच संस्थेचे [४][सदस्य (माजी सदस्य किंवा मृत सदस्याच्या नामनिर्देशित व्यक्ती, वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी धरून)] यांच्यामधील विवाद पोट-कलम (१) च्या तरतुदीअन्वये [५][सहकारी न्यायालयाकडे] विचारार्थ निर्देशित करता येणार नाहीत.

**स्पष्टीकरण** २.—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी विवादामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव होईल :—

(एक) संस्थेस एखाद्या सदस्याकडून येणे असलेल्या किंवा संस्थेकडून एखाद्या सदस्यास, माजी सदस्यास किंवा मृत सदस्यांच्या नामनिर्देशित व्यक्तीस, वारसास किंवा कायदेशीर प्रतिनिधीस किंवा नोकरास किंवा कर्मचा-यास येणे असलेल्या कोणत्याही ऋणाच्या किंवा मागणीच्या बाबतीत संस्थेने किंवा संस्थेविरूद्ध केलेला दावा—मग असे ऋण किंवा मागणी स्वीकृत केलेली असो किंवा नसो;

(दोन) संस्थेने दिलेल्या कर्जाच्या संबंधात कर्ज घेणा-या मूळ व्यक्तीकडून येणे असलेल्या किंवा कर्ज घेणा-या मूळ व्यक्तीच्या कसुरीमुळे जामीनदाराकडून वसूल केलेल्या कोणत्याही रकमेबद्दल किंवा मागणीबद्दल जामीनदाराने केलेला दावा—मग अशी रक्कम किंवा मागणी स्वीकृत केलेली असो किंवा नसो;

(तीन) एखाद्या सदस्याने, माजी सदस्याने किंवा मृत सदस्याने, कोणत्याही अधिका-याने, माजी अधिका-याने किंवा मृत अधिका-याने कोणत्याही अभिकर्त्याने, माजी अभिकर्त्याने किंवा मृत अभिकर्त्याने किंवा कोणत्याही नोकराने, माजी नोकराने किंवा मृत नोकराने किंवा संस्थेच्या माजी किंवा विद्यमान समितीने संस्थेची कोणतीही नुकसानी केली असल्यास, त्याबद्दल संस्थेने केलेला दावा—मग असे नुकसान स्वीकृत करण्यात आलेले असो किंवा नसो;

(चार) एखाद्या सदस्याने, माजी सदस्याने किंवा मृत सदस्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने, वारसाने किंवा कायदेशीर प्रतिनिधीने अभिहस्तांकनाच्या शर्तीचा भंग केल्याबद्दल संस्थेने आपल्याकडे परत घेतलेल्या जमिनीचा किंवा इतर कोणत्याही मत्तेचा कब्जा संस्थेस देण्यास दिलेला नकार किंवा केलेली कसुरी.

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६ (ब) अन्वये पोट-कलम (दोन) वगळण्यात आले.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४८ (क) अन्वये "कलम ९३ चे पोट-कलम (३)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १७ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २० (ब) अन्वये "सदस्य" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ३ (ब) अन्वये "निबंधकाकडे" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सहकारी न्यायालयाची रचना.

[१][९१क. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एका किंवा अधिक सहकारी न्यायालयांची कलम ९१ किंवा कलम १०५ किंवा या अधिनियमाच्या इतर तरतुदी याअन्वये [२][त्यांच्याकडे निर्देशित केलेल्या] विवादाच्या अभिनिर्णयासाठी रचना करता येईल.

(२) सहकारी न्यायालय, राज्य शासनाने नेमलेल्या व विहित करण्यात येतील अशा अर्हता असलेल्या एका सदस्याचे मिळून बनलेले असेल.

(३) सहकारी न्यायालयास, संपूर्ण राज्यभर किंवा पोट-कलम (१) खालील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा त्यांच्या कोणत्याही भागावर अधिकारिता असेल.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९७३ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी [३][निबंधकापुढे किंवा या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे निबंधकाचे अधिकार जिच्याकडे सोपवण्यात आले असतील अशा कोणत्याही व्यक्तीपुढे] अनिर्णीत असलेले सर्व विवाद आणि इतर कामकाज, हे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही सहकारी न्यायालयाकडे त्याजकडून हस्तांतरित करण्यात येईल; आणि जणू मूलतः त्या न्यायालयापुढेच ते दाखल करण्यात आले असल्याप्रमाणे, त्या न्यायालयाकडून त्यांची सुनावणी करण्यात येईल आणि ते निकालात काढण्यात येतील. त्या न्यायालयास असे कामकाज हे अशारीतीने हस्तांतरित करण्यात येण्यापूर्वी ते ज्या टप्प्यापर्यंत पूर्ण झाले असेल, त्या टप्प्यापासून पुढे त्याची सुनावणी करून, ते निकालात काढता येईल, किंवा नव्याने त्याच्या सुनावणीस प्रारंभ करता येईल.] १९७४ चा महा. ३.

[४][(५) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९८२ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी निबंधकाकडे किंवा या अधिनियमाअन्वये किंवा तदन्वये करण्यात आलेल्या नियमाअन्वये निबंधकाचे अधिकार ज्याच्याकडे सोपविण्यात आले असतील अशा व्यक्तीपुढे प्रलंबित असलेले सर्व विवाद व इतर कामकाज, हे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्याबाबतीत निबंधकाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही सहकारी न्यायालयाकडे, त्याजकडून हस्तांतरित करण्यात येईल आणि जणू मूलतः त्या न्यायालयांपुढेच ते दाखल करण्यात आले असल्याप्रमाणे त्या न्यायालयाकडून त्याची सुनावणी करण्यात येईल आणि ते निकालात काढण्यात येतील. त्या न्यायालयास असे कामकाज हे अशा रीतीने हस्तांतरित करण्यात येण्यापूर्वी ते ज्या टप्प्यापर्यंत आले असेल, त्या टप्प्यापासून पुढे त्याची सुनावणी करून ते निकालात काढता येईल किंवा नव्याने त्याच्या सुनावणीस प्रारंभ करता येईल.] १९८२ चा महा. १८.

मुदत.

९२. (१) [५][मुदत अधिनियम, १९६३] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमात केलेल्या विनिर्दिष्ट तरतुदींच्या अधीन राहून निकटपूर्ववर्ती कलमान्वये [६][सहकारी न्यायालयाकडे] निर्देशित केलेल्या विवादांच्या बाबतीतील मुदतमर्यादा.— १९६३ चा ३६.

(क) जेव्हा विवाद हा संस्थेस तिच्या सदस्यींकडून व्याजासह येणे असलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीसंबंधातील असेल तेव्हा ज्या दिनांकास असा सदस्य मरण पावला असेल किंवा संस्थेचा सदस्य असण्याचे बंद झाला असेल, त्या दिनांकापासून संगणित करण्यात येईल;

(ख) जेव्हा संस्था किंवा तिची समिती आणि कोणतीही माजी समिती, कोणताही माजी अथवा विद्यमान अधिकारी, किंवा माजी अथवा विद्यमान अभिकर्ता किंवा माजी अथवा विद्यमान नोकर

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २२ अन्वये कलम ९१ क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ४ (अ) अन्वये " निबंधकाकडे निर्देशित केलेल्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ४ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४९ (क) अन्वये " भारतीय मुदत अधिनियम, १९०८ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ५ (अ) अन्वये " ७८ निबंधकाकडे " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

किंवा संस्थेचा मृत अधिकारी, मृत अभिकर्ता किंवा मृत नोकर याची नामनिर्देशित व्यक्ती, वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी किंवा सदस्य किंवा माजी सदस्य किंवा मृत सदस्यांची नामनिर्देशित व्यक्ती, वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी यांमधील विवाद, आणि जेव्हा तो विवाद, त्या मधील कोणत्याही पक्षकाराच्या कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील असेल तेव्हा ज्या संबंधात विवाद उद्‌भवला असेल ती कृती किंवा अकृती ज्या दिनांकाला घडली असेल त्या दिनांकापासून सहा वर्षे राहील;

(ग) कलम १०२ अन्वये ज्या संस्थेचे समापन करण्याबद्दल आदेश देण्यात आला असेल किंवा ज्याच्या संबंधात [१][७७ क किंवा ७८] अन्वये नामनिर्देशित समिती किंवा प्रशासक नेमण्यात आला असेल त्या संस्थेची रचना, व्यवस्थापन किंवा कामकाज या संबंधातील कोणत्याही गोष्टीबाबत विवाद असेल तेव्हा, कलम १०२ किंवा यथास्थिति, [१][कलम ७७ क किंवा ७८] अन्वये ज्या दिनांकास आदेश देण्यात आला असेल त्या दिनांकापासून सहा वर्षे असेल;

(घ) जेव्हा असा विवाद संस्थेच्या एखाद्या [२][समितीच्या किंवा अधिका-याच्या] निवडणुकीबाबतीत असेल तेव्हा निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आल्याच्या दिनांकापासून [३][दोन महिन्यांची] असेल.

(२) पूर्वगामी पोट-कलमात उल्लेखिलेले विवाद खेरीजकरून, निकटपूर्वीच्या कलमान्वये [४][सहकारी न्यायालयाकडे] निर्देशित करावयाच्या इतर कोणत्याही विवादाच्या बाबतीत अशा मुदत मर्यादेची जणू काही उक्त विवाद हा वादच असल्याप्रमाणे आणि [४][सहकारी न्यायालय] हे दिवाणी न्यायालय असल्याप्रमाणे
१९६३ चा ३६. [५][मुदत अधिनियम, १९६३] च्या तरतुदीअन्वये नियमन होईल.

(३) पोट-कलमे (१) आणि (२) यांमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, अशा मुदतीत आपण पुरेशा कारणामुळे विवाद निर्देशित करू शकलो नाही, याबद्दल अर्जदार [४][सहकारी न्यायालयाची] खात्री करून देईल तर, अशी मुदत मर्यादा समाप्त झाल्यावर सुद्धा [४][सहकारी न्यायालयात] विवाद दाखल करून घेता येईल आणि अशा रीतीने दाखल केलेला विवाद हा, मुदत मर्यादा संपल्याच्या कारणावरून ज्यास प्रतिबंध होणार नाही, असा विवाद असेल.

एका सहकारी न्यायालयाकडून दुस-या सहकारी न्यायालयाकडे विवाद हस्तांतरित करणे व विवक्षित प्रकरणांमधील कामकाज तहकूब करणे.

[६][९३. (१) कोणत्याही सहकारी न्यायालयाकडे कोणताही, विवाद विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या बाबतीत सहकारी अपील न्यायालयाच्या अध्यक्षास कोणत्याही वेळी कारणे लेखी नमूद करून, असा विवाद त्या न्यायालयातून काढून घेता येईल व त्यास योग्य वाटेल, अशा इतर कोणत्याही न्यायालयाकडे तो निर्णयार्थ पाठविता येईल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी संस्था आणि दावाकार यांच्यामधील किंवा निरनिराळ्या दावाकारांमधील वादप्रश्न हा, कायदा आणि वस्तुस्थिती यांची गुंतागुंत अंतर्भुत असलेला प्रश्न असेल त्या बाबतीत, पक्षकारांपैकी कोणाही एकाने किंवा त्या संस्थेने दाखल केलेल्या रीतसर दाव्यामध्ये अशा प्रश्नांची न्याय चौकशी होईपर्यंत सहकारी न्यायालयास, वादालील पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराने त्याच्याकडे अर्ज केल्यावर त्यास योग्य वाटल्यास कोणत्याही विवादासंबंधाची कोणतीही कार्यवाही निलंबित करता येईल. सहकारी न्यायालयाच्या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत एखाद्या दिवाणी न्यायालयात जर असा कोणताही दावा दाखल करण्यात आला नाही तर, उक्त न्यायालय उक्त कार्यवाही चालू ठेवील आणि त्या विवादाचा निर्णय करील.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४९ (अ) अन्वये "कलम ७८" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४९ (ब) अन्वये "पदाधिका-यांच्या" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ५ (ब) अन्वये "एक महिन्याची" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५अ अन्वये "निबंधकाकडे" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४९ (क) अन्वये "भारतीय मुदत अधिनियम, १९०८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ६ अन्वये ९३, हे कलम बदली दाखल करण्यात आले.

विवादाची तडजोड करण्याची कार्यरीती आणि [४][सहकारी न्यायालयाचे अधिकार.]

९४. (१) निकटपूर्ववर्ती कलमान्वये विवादाची सुनावणी करणारे [१][सहकारी न्यायालय] विहित रीतीने विवादाची सुनावणी करील आणि त्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत तरतूद केली असेल त्याच उपाययोजनांद्वारे आणि शक्य असेल तेथवर त्याचरीतीने साक्षीदारांना (यात हितसंबंध असलेले पक्षकार किंवा त्यांच्यापैकी कोणीही यांचा समावेश आहे.) समन्स काढून बोलविण्याचा आणि त्यास हजर राहण्यास आणि शपथेवर, प्रतिज्ञेवर किंवा शपथपत्र करून देऊन साक्ष देण्यास भाग पाडण्याचा आणि दस्तऐवज प्रस्तुत करण्यास भाग पाडण्याचा अधिकार असेल.

१९०८ चा ५.

[२][(१क) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून एरव्ही कोणत्याही निवडणुकीच्या संबंधातील प्रत्येक विवादाची सुनावणी व निर्णय हा सहकारी न्यायालय शक्य तितक्या शीघ्रतेने करील व असा विवाद न्यायालयात दाखल करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्याची सुनावणी व निर्णय पूर्ण होण्याकरिता प्रयत्नांची शिकस्त करण्यात येईल.]

(२) [३][सहकारी न्यायालयाच्या] परवानगीशिवाय विवादाच्या सुनावणीच्यावेळी कोणत्याही पक्षकाराचे प्रतिनिधित्व विधी व्यवसायीकडून करता येणार नाही.

(३) (क) जर [४][सहकारी न्यायालयाची] अशी खात्री होईल की, विवादामध्ये जी पक्षकार आहे अशा व्यक्तीच्या मालमत्तेमध्ये एखाद्या व्यक्तीने-मग ती संस्थेची सदस्य असो किंवा नसो-कोणताही हितसंबंध संपादित केला आहे तर, [५][सहकारी न्यायालयास] जिने मालमत्तेत हितसंबंध संपादित केले आहेत अशा व्यक्तीस पक्षकार म्हणून विवादात सामील होता येईल, असा आदेश देता येईल आणि [४][सहकारी न्यायालयाने] त्यांच्याकडे निर्देशित केलेल्या बाबींवर दिलेला कोणताही निर्णय अशा रीतीने सामील झालेल्या पक्षकारांवर, जणू काही विवादातील मूळ पक्षकार असल्याप्रमाणे, त्याचरीतीने बंधनकारक राहील.

(ख) एखादा विवाद चुकीच्या व्यक्तीच्या नावे दाखल करण्यात आला असेल त्या बाबतीत किंवा ज्यात सर्व प्रतिवादींचा समावेश करण्यात आला नसेल त्याबाबतीत वास्तविक चूक झाल्याबद्दल [६][सहकारी न्यायालयाची] खात्री होईल तर विवादाच्या सुनावणीच्या कोणत्याही अवस्थेत त्याला [७][सहकारी न्यायालयास न्याय्य वाटेल] अशा अटीवर इतर कोणत्याही व्यक्तीचे नाव वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून त्याजागी बदली करण्याबद्दल किंवा जादा दाखल करण्याबद्दल आदेश देता येईल.

---

[१] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ७ (१) अन्वये "निबंधक किंवा सहकारी न्यायालय" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५० अन्वये पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, याच्या कलम ७ (२) अन्वये "निबंधकाच्या किंवा यथास्थिति सहकारी न्यायालयाच्या " या मजुकराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (ब) (एक) अन्वये " निबंधक किंवा सहकारी न्यायालयाचे " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (अ) (दोन) अन्वये " मूळ " या शब्दांऐवजी " सहकारी न्यायालयास " हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (ब) (एक) अन्वये " मूळ " शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (ब) (दोन) अन्वये " त्यास न्याय्य वाटेल " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(ग) [१][सहकारी न्यायालयास]कार्यवाहीच्या कोणत्याही अवस्थेत, कोणत्याही एका पक्षकाराच्या अर्जावरुन किंवा अर्जाशिवाय [२][सहकारी न्यायालयास] न्याय्य वाटेल अशा अटीवर विवादात वादी म्हणून असो वा प्रतिवादी म्हणून असो, अयोग्यरीत्या सामील केलेल्या कोणत्याही पक्षकारांचे नाव काढून टाकण्याबद्दल आणि ज्या व्यक्तीस वादी म्हणून असो वा प्रतिवादी म्हणून असो, सामील करावयास पाहिजे होते अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव [३][सहकारी न्यायालयास विवादात] अंतर्भूत असलेल्या सर्व प्रश्नांचा प्रभावीपणे व पूर्णपणे न्यायनिवाडा व तडजोड करणे शक्य व्हावे म्हणून, [१][सहकारी न्यायालयासमोर] ज्या व्यक्तीने हजर राहणे आवश्यक असेल, अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव त्यात दाखल करण्याबद्दल आदेश देता येईल;

(घ) विवादामध्ये जी व्यक्ती, पक्षकार असेल आणि जिला एकाच वादकारणाच्या संबंधात एकाहून अधिक अनुतोष मिळण्याचा हक्क असेल, अशा कोणत्याही व्यक्तीस, अशा सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही अनुतोषावर दावा सांगता येईल, परंतु तिने असे सर्व अनुतोष मागितले नाही तर तिला अशा रीतीने न मागितलेल्या कोणत्याही अनुतोषासाठी [४][सहकारी न्यायालयाच्या] परवानगीशिवाय दावा सादर करता येणार नाही.

[५][(३क) सहकारी न्यायालयाने एखाद्या विवादात कोणत्याही व्यक्तीविरुद्ध एकतर्फी निर्णय दिला असेल अशा कोणत्याही प्रकरणांत त्या व्यक्तीला अशा निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तो रद्द करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल. विवाद सुनावणीसाठी घेण्यात येऊन त्याची सुनावणी ज्यावेळी करण्यात आली, त्यावेळी त्या व्यक्तीला हजर न राहण्यास पुरेसे कारण होते याबदल तिने न्यायालयाची खात्री पटविली तर, न्यायालय त्या व्यक्तीविरुद्धचा निर्णय रद्द करणारा आदेश काढील आणि त्यासाठीचा खर्च, न्यायालयात किंवा अन्यथा भरणा करण्याबाबत त्याला योग्य वाटणा-या अटी घालील आणि विवादाचा तिच्याशी संबंध येत असेल तेथवर त्या विवादाची सुनावणी व निर्णय करण्यासाठी दिवस निश्चित करील.]

[६][(४) कोणत्याही प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गाच्या बाबतीत राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला असेल त्या खेरीजं, प्रत्येक विवादाचा निर्णय हा विहित करण्यात येईल, अशा संक्षिप्त रीतीने आणि शक्य तितक्या त्वरेने करण्यात येईल.]

---

[१] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ७ (३) (क) (एक) अन्वये "निबंधक किंवा सहकारी न्यायालयास" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (क) (दोन) अन्वये "निबंधक किंवा यथास्थिति, सहकारी न्यायालयास" या मजकुराऐवजी "सहकारी न्यायालय" हा मजकुरं दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (क) (तीन) अन्वये "निबंधकास किंवा सहकारी न्यायालयास विवादात" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (ड) अन्वये "निबंधक किंवा यथास्थिती सहकारी न्यायालये यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७ (४) अन्वये पोट-कलम (३-क) समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २४ (ब) अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

निवाड्यापूर्वीची किंवा आदेशापूर्वीची जप्ती आणि अंतर्वादिक आदेश.

[1][९५. (१) एखादा विवाद कलम ९३ अन्वये किंवा कलम १०५ अन्वये सहकारी न्यायालयाकडे निर्देशित करण्यात आला असेल किंवा कलम ८ अन्वये जिच्याविरुद्ध दोषारोप करण्यात आले असतील अशा व्यक्तीचे म्हणणे निबंधक किंवा त्या कलमान्वये प्राधिकृत केलेली व्यक्ती (या कलमात यापुढे जिचा निर्देश "प्राधिकृत व्यक्ती" असा करण्यात आला आहे) ऐकून घेईल त्याबाबतीत चौकशी केल्यावर किंवा अन्यथा यथास्थिति, सहकारी न्यायालय किंवा निबंधक किंवा प्राधिकृत व्यक्ती यांची अशी खात्री होईल की, अशा विवादातील पक्षकार किंवा कलम ८८ अन्वये जिच्याविरुद्धची कार्यवाही प्रलंबित आहे अशी व्यक्ती, कोणत्याही निवाड्याची किंवा कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी विफल करण्याच्या, त्यात विलंब लावण्याच्या किंवा त्यात अडथळे आणण्याच्या हेतूने,—

(क) आपल्या संपूर्ण मालमत्तेची किंवा तिच्या कोणत्याही भागाची विल्हेवाट लावण्याच्या बेतात आहे, अथवा—

(ख) सहकारी न्यायालयाच्या वा निबंधकाच्या वा प्राधिकृत व्यक्तीच्या अधिकारितेबाहेर आपली संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग हलवण्याच्या बेतात आहे, तर सहकारी न्यायालयास, निबंधकास किंवा यथास्थिति, प्राधिकृत व्यक्तीस अशी मालमत्ता पुरेशी तारण देण्यात न आल्यास सशर्त जप्त करण्याविषयी नोटीस देता येईल आणि अशी जप्ती, जणू ती एखाद्या सक्षम दिवाणी न्यायालयानेच केली असल्याप्रमाणे परिणामक्षम असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये मालमत्ता जप्त करण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत सहकारी न्यायालयाने किंवा निबंधकाने किंवा यथास्थिति, प्राधिकृत व्यक्तीने ज्या व्यक्तीची मालमत्ता अशारीतीने जप्त करावयाची असेल त्या व्यक्तीला नोटीस पाठवून विनिर्दिष्ट मुदतीत, त्याच्या मते पुरेसे होईल असे तारण देण्यास फर्माविले पाहिजे आणि अशारीतीने मागणी करण्यात आलेले तारण देण्यात ती व्यक्ती कसूर करील तर नोटीस काढणा-या प्राधिका-यास उक्त आदेश कायम करता येईल, आणि त्या विवादाचा निर्णय झाल्यानंतर किंवा कलम ८८ खालील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, दावा मान्य करण्यात आला असेल तर, त्या दाव्यादाखल, अशारीतीने जप्त केलेल्या मालमत्तेचा विनियोग करण्याचा निदेश देता येईल.

(३) ज्या कार्यवाहीच्या संबंधात जप्ती आणली असेल त्या कार्यवाहीत पक्षकार नसलेल्या व्यक्तीचे मालमत्ता जप्त करण्यापूर्वी जे हक्क असतील त्या हक्कांवर या कलमान्वये केलेल्या जप्तीचा परिणाम होणार नाही किंवा ज्या व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्यात आली असेल त्या व्यक्तीविरुद्ध हुकूमनामा धारण करणा-या कोणत्याही व्यक्तीस, अशा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीदाखल मालमत्तेची विक्री करण्यात यावी म्हणून अर्ज करण्यास रोध होणार नाही.

(४) सहकारी न्यायालय, निबंधक किंवा यथास्थिती, प्राधिकृत व्यक्ती यास न्यायदानाचे उद्दिष्ट विफल होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या विवादाचा निर्णय होईतोपर्यंत त्यास न्याय्य व सोयीस्कर वाटतील असे अंतर्वादिक आदेश देता येतील.]

सहकारी न्यायालयाचा निर्णय.

[2][९६. एखादा विवाद लवादाकडे निर्देशित करण्यात येईल तेव्हा, विवादातील पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर, सहकारी न्यायालय त्या विवादावरील कार्यवाहीच्या संबंधात विवादातील पक्षकारांना कराव्या लागलेल्या खर्चावर व सहकारी न्यायालयाला द्यावयाची फी आणि खर्च यांबाबत निवाडा देऊ शकेल. एखाद्या सदस्याविरुद्ध संस्थेने दाखल केलेल्या पैशाच्या हक्क मागणीच्या बाबतीत निवाड्याने दिलेली रक्कम ही त्यावर व्याजाच्या संविदामान्य दरानुसार उपर्जित होणा-या व्याजाच्या रकमेपेक्षा कमी असणार नाही. मात्र अशा पैशाच्या हक्क मागणीचा कलम ४४ क मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही कर्जाशी संबंध असेल त्याबाबतीत त्या कलमाच्या तरतुदी कलम ४४ क खालील कर्जाच्या रकमांना त्या जशा लागू होतात, तशाच त्या अशा पैशांच्या हक्क मागण्यांना लागू होतील.]

---

[1] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ८ अन्वये कलम ९५ बदली दाखल करण्यात आले.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५१ अन्वये कलम ९६ बदली दाखल करण्यात आले.

९७. पूर्ववर्ती कलमान्वये [२][सहकारी न्यायालयाने] दिलेल्या कोणत्याही निर्णयामुळे किंवा कलम ९५ अन्वये [३][सहकारी न्यायालयाने किंवा निबंधकाने किंवा प्राधिकृत व्यक्तीने] दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही पक्षकारास अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत [४][सहकारी अपील न्यायालयाकडे] अपील करता येईल. [१][कलम ९६ खालील निर्णय व कलम ९५ खालील आदेश यांविरूद्ध अपील.]

९८. [५][कलम २१ क, पोट-कलम (३) अन्वये नोंदणी काढून घेतलेल्या संस्थेच्या शासकीय अभिहस्तांकितीने दिलेला प्रत्येक आदेश] किंवा निबंधकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने कलम ८८ खाली किंवा निबंधकाने [६][किंवा सहकारी न्यायालयाने कलम ९५ खाली [७][किंवा सहकारी न्यायालयाने कलम ९६ खाली] दिलेला प्रत्येक आदेश] निकटपूर्वीच्या कलमान्वये अपिलात दिलेला प्रत्येक आदेश, कलम १०५ खाली परिसमापकाने दिलेला प्रत्येक आदेश, कलम १०५ खाली दिलेल्या आदेशाविरूद्ध राज्य शासनाने दिलेला प्रत्येक आदेश आणि कलम १५४ खाली पुनरीक्षणात दिलेला प्रत्येक आदेश यांची अंमलबजावणी झाली नाही तर,— पैसे कसे वसूल करावेत.

(क) [८][शासकीय अभिहस्तांकितीने किंवा] निबंधकाने [७][किंवा सहकारी न्यायालयाने] किंवा परिसमापकाने सही करून प्रमाणपत्र दिले असता असा आदेश एखाद्या दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा म्हणून समजण्यात येईल आणि अशा न्यायालयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी ज्या रीतीने करण्यात येते त्याच रीतीने त्याची अंमलबजावणी करण्यात येईल, किंवा

(ख) जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्याबाबत त्या त्या वेळी जो कायदा व जे नियम अमलात असतील त्या कायद्यानुसार व त्या नियमांखाली अशा आदेशाची अंमलबजावणी करण्यात येईल :

परंतु, अशी कोणतीही रक्कम अशा रीतीने वसूल करण्यासाठी करावयाचा कोणताही अर्ज जिल्हाधिकारी करील व त्यासोबत निबंधकाने [९][ * * * ] सही केलेले प्रमाणपत्र जोडील. असा अर्ज आदेशात निश्चित केलेल्या दिनांकापासून आणि असा कोणताही दिनांक निश्चित केलेला नसेल तर आदेशाच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या आत करील.

---

[१] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १० (क) अन्वये मूळ समासटीपे ऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १० (अ) अन्वये " निबंधक किंवा सहकारी न्यायालय " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २७ (ब) अन्वये " न्यायाधिकरण " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १८ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २६ (अ) व २८ अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ११ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १८ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[९] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २२ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

प्रमाणपत्र दिल्यानंतर संपत्तीचे खाजगी हस्तांतरण संस्थेविरुद्ध निरर्थक ठरेल.

९९. कलम ९८ अन्वये निबंधकाने, [1][सहकारी न्यायालयाने], परिसमापकाने किंवा यथास्थिती, सहायक निबंधकाने प्रमाणपत्र दिल्यानंतर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण करण्यात आले किंवा ती दुस-याच्या स्वाधीन करण्यात आली किंवा तिच्यावर कोणताही बोजा किंवा भार निर्माण करण्यात आला तर या सर्व गोष्टी ज्या संस्थेच्या अर्जावरून उक्त प्रमाणपत्र देण्यात आले, होते त्या संस्थेविरुद्ध निरर्थक ठरतील.

विकणे शक्य नसलेल्या मालमत्तेचे हस्तांतरण.

१००. (१) कलम ९८ अन्वये अंमलबजावणी करावयाच्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करताना [2][किंवा कलम १०१ किंवा १३७ अन्वये कोणत्याही रकमेची वसुली करताना] खरेदीदार नसल्यामुळे कोणतीही मालमत्ता विकणे शक्य होत नसेल व ती मालमत्ता कसूर करणा-या व्यक्तीच्या किंवा तिच्या वतीने इतर एखाद्या व्यक्तीच्या भोगवट्यात असेल किंवा कलम ९८ च्या खंड (क) किंवा (ख) अन्वये [2][किंवा कलम १०१ किंवा १३७ अन्वये ] निबंधकाने, [3][न्यायालयाने] परिसमापकाने किंवा सहायक निबंधकाने प्रमाणपत्र दिल्यानंतर कसूर करणा-या व्यक्तीने निर्माण केलेल्या हक्कांअन्वये दावा सांगणा-या एखाद्या व्यक्तीच्या भोगवट्यात असेल तर, त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयास किंवा जिल्हाधिका-यास किंवा यथास्थिति, निबंधकास, उक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत ज्या संस्थेने अर्ज केला असेल त्या संस्थेकडे उक्त मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग विहित रीतीने हस्तांतरित करण्यात यावा, असा निदेश देता येईल.

(२) पूर्वगामी पोटकलमान्वये मालमत्ता संस्थेकडे हस्तांतरित करण्यात आली असेल तर, किंवा कलम ९८, [4][१०१ किंवा १३७] अन्वये मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल तर, न्यायालयास, जिल्हाधिका-यास किंवा यथास्थिति, निबंधकास अशा रीतीने हस्तांतरित केलेली किंवा विक्री करण्यात आलेली मालमत्ता नियमांनुसार संस्थेच्या किंवा यथास्थिति, खरेदी करणा-या व्यक्तीच्या कब्जात देता येईल.

(३) याबाबतीत जे नियम करण्यात येतील त्या नियमांस, तसेच कोणत्याही व्यक्तीच्या वतीने कोणतेही हक्क, बोजे, भार किंवा समन्यायिके कायदेशीररीत्या अस्तित्वात असतील, त्यास अधीन राहून अशी मालमत्ता किंवा तिचा भाग, पोट-कलम (१) अन्वये न्यायालय किंवा जिल्हाधिकारी, यथास्थिति, निबंधक व उक्त संस्था यांच्या दरम्यान संमत करण्यात येतील, अशा अटींवर व शर्तीवर उक्त संस्था धारण करील. राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, जिल्हाधिका-यास किंवा निबंधकास या कलमान्वये त्यांना ज्यांचा वापर करता येईल, असे अधिकार, सहाय्यक जिल्हाधिकारी, किंवा उपजिल्हाधिकारी किंवा सहायक निबंधक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिका-यास प्रत्यायोजित करता येतील.

---

[1] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २९ (अ) (एक) आणि (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २९ (ब) अन्वये हा मजकूर मुळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

१०१. [1][(१) कलमे ९१, ९३ आणि ९८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७ यात व्याख्या केल्याप्रमाणे पिकांसाठी वित्त व्यवस्था व हंगामी वित्त व्यवस्था करण्याचे काम हाती घेतलेल्या [2][किंवा अठरा महिन्यांपेक्षा कमी नसेल आणि पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल, अशा मुदतीमध्ये परतफेड करण्याजोगी, शेतीच्या इतर प्रयोजनांसाठी कर्जे देणा-या] साधन संस्थेने आपल्या सदस्यांना पिकांसाठी केलेली वित्त व्यवस्था किंवा हंगामी वित्त व्यवस्था यासाठी [3][किंवा पूर्वोक्तप्रमाणे शेतीच्या इतर प्रयोजनासाठी ] आगाऊ दिलेल्या कोणत्याही रकमेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर किंवा पीक संरक्षण संस्थेने आपल्या सदस्यांकडून किंवा (ज्यांनी सदस्य होण्यास नकार दिला असेल अशा) प्रस्तावात समाविष्ट असलेल्या जमीनींच्या मालकाकडून देय असेल अशा प्रारंभिक खर्चाच्या किंवा पीक संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या सेवा मिळविण्यासाठीच्या कोणत्याही अंशदानाच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर किंवा उद्धरण सिंचन सहकारी संस्थेने आपल्या सदस्यांकडून त्यांना पाणी पुरविण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा त्यांनी मिळविल्याबद्दल देय असलेल्या कोणत्याही वर्गणीच्या थकबाकीच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर, [5][किंवा तालुका किंवा गटपातळीवरील कारागिरांना कर्ज देणा-या किंवा त्यांच्यासाठी रोख पत-पुरवठ्याची सोय करणा-या ग्रामीण कारागीर बहुउद्देशीय संस्थेने आपल्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी [6][किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेने तिच्या येणे असलेल्या रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा कर्जे देणा-या एखाद्या सहकारी दुग्ध व्यवसाय संस्थेने तिच्या कोणत्याही सदस्याला दिलेल्या रकमेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या नागरी सहकारी बँकेने तिच्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या वेतनधारीच्या सहकारी संस्थेने तिच्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या सहकारी मत्स्यव्यवसाय संस्थेने तिच्या येणे रकमांच्या वसुलीसाठी [7][किंवा, राज्य शासन, वेळोवेळी राजपत्रात अधिसूचित करील अशा कोणत्याही संस्थेने किंवा संस्थावर्गाने अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या सदस्यांना दिलेल्या कोणत्याही आगाऊ रकमेच्या, किंवा त्यांच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही वर्गणीच्या किंवा अन्य कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी] अर्ज केल्यावर] आणि संबंधित सहकारी संस्थेने थकबाकीच्या संबंधातील लेख्यांचे विवरणपत्र सादर केल्यावर निबंधकास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्यात थकबाकी म्हणून देय असल्याचे नमूद केलेल्या रकमांच्या वसुलीसाठी एक प्रमाणपत्र देता येईल.]

१९४७ चा मुंबई २८.

[4][विवक्षित सहकारी संस्थेची देय थकबाकी जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसूल करणे.]

[8][**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी " इतर शेतकी प्रयोजने " या शब्दप्रयोगामध्ये दुग्धव्यवसाय, मत्स्यसंवर्धन व कुक्कुटपालन यांचा समावेश होतो.]

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी पोटकलम (१) दाखल करण्यात आले.

[2] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, याच्या कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर १ जुलै, १९७१ रोजी समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर १ जुलै १९७१ रोजी समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात आले.

[4] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७ (ड) अन्वये ही समासटीप दाखल करण्यात आली.

[5] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५२ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[8] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५२ (ब) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

(२) [१][थकबाकी म्हणून देय असलेल्या कोणत्याही रकमेसंबंधी पूर्ववर्ती पोटकलमान्वये कोणतीही कारवाई करण्यात संबंधित सहकारी संस्थेने कसूर केली आहे] याबाबत निबंधकाची खात्री झाली असेल तर, निबंधकास त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, थकबाकी म्हणून देय असलेली जी रक्कम त्यात विनिर्दिष्ट केली असेल ती वसूल करण्यासाठी स्वतः होऊन प्रमाणपत्र देता येईल, आणि असे प्रमाणपत्र हे जणू संबंधित संस्थेने केलेल्या अर्जावरून देण्यात आले आहे, असे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (१) किंवा (२) अन्वये निबंधकाने दिलेले प्रमाणपत्र अंतिम असेल व ते त्यात देय म्हणून नमूद केलेल्या थकबाकीच्या संबंधात अंतिम आणि निर्णायक पुरावा असेल, आणि ही थकबाकीची रक्कम जमीन महसूल वसूल करण्यासाठी त्या त्यावेळी जो कायदा अंमलात असेल त्यास अनुसरून वसूल करण्यायोग्य असेल.

(४) [२][संबंधित संस्थेस] देय असलेली थकबाकी व व्याजाची रक्कम अशी थकबाकी वसूल करण्यासाठी आलेला कोणताही आनुषंगिक खर्च याची फेड होईपर्यंत किंवा निबंधकाचे समाधान होईल, अशारीतीने अशा थकबाकीच्या फेडीबाबत तारण देण्यात येईपर्यंत जिल्हाधिकारी व निबंधक यांनी *मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ यातील कलमे १४० ते १४४ अन्वये किंवा त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा तत्सम तरतुदीन्वये प्राधिकृत केलेल्या खबरदारीच्या उपाययोजना करणे, हे कायदेशीर असेल. १८७९ चा मुंबई ५.

प्रकरण १०

## परिसमापन

१०२. (१) जर निबंधकास,—

(क) कलम ८३ अन्वये चौकशी केल्यावर किंवा कलम ८४ अन्वये निरीक्षण केल्यावर किंवा संस्थेच्या लेख्यांची लेखा परीक्षा करणाऱ्या लेखा परीक्षकांचा अहवाल मिळाल्यावर, किंवा

(ख) त्या प्रयोजनासाठी बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण बैठकीत उपस्थित असलेल्या संस्थेच्या सदस्यांपैकी तीनचतुर्थांश सदस्यांनी ठराव संमत करून केलेला अर्ज मिळाल्यावर, किंवा

(ग) ज्या संस्थेने,—

(एक) काम सुरू केलेले नाही, किंवा

(दोन) काम करण्याचे बंद केले आहे, किंवा

(तीन) पाचशे रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या किंमतीचे भाग किंवा सदस्यांच्या अनामत रकमा अशा संस्थेच्या ताब्यात आहेत, किंवा—

(चार) या अधिनियमातील किंवा नियमांतील किंवा उपविधीतील नोंदणी व व्यवस्थापन यांबाबतच्या कोणत्याही शर्तीचे अनुपालन करणे बंद केले आहे ;

अशा संस्थेच्या बाबतीत, स्वतःहोऊन संस्थेचे समापन करण्यात येईल, असे निबंधकास वाटत असेल तर त्यास अंतरिम आदेश देऊन अशा संस्थेस समापन करण्यास सांगता येईल.

(२) पोट-कलम (१) [३][ * * * *] अन्वये दिलेल्या अशा आदेशाची एक प्रत त्या संस्थेकडे विहित रीतीने पाठविली पाहिजे, आणि असा आदेश काढल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संस्थेने आपले स्पष्टीकरण निबंधकाकडे सादर करण्यास त्या संस्थेस फर्माविले पाहिजे, आणि संस्थेस [४][आणि संस्थेच्या कोणत्याही असल्यास, धनकोस] आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावर, निबंधकास अंतरिम आदेश विलोपित करणारा, किंवा कायम करणारा अंतिम आदेश देता येईल.

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १७ (क) अन्वये "साधन संस्थेची" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २३ अन्वये "खंड (अ) किंवा खंड (क) चा उप-खंड (चार)" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, याच्या कलम ९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ [१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१] पहा.

१०३. एखाद्या संस्थेच्या समापनासाठी निकटपूर्ववर्ती कलमान्वये अंतरिम आदेश देण्यात आला असेल किंवा त्यासाठी त्या कलमान्वये अंतिम आदेश देण्यात आला असेल तेव्हा, निबंधकास नियमांनुसार त्या संस्थेचा परिसमापक म्हणून एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल व त्याचे पारिश्रमिक ठरविता येईल. परिसमापकाची नियुक्ती.

(२) अंतरिम आदेश देण्यात आल्यावर संस्थेचे अधिकारी ज्या मालमत्तेवर, चीजवस्तूंवर आणि कारवाईयोग्य दाव्यांवर संस्थेचा हक्क असेल किंवा तिला हक्क असल्याचे आढळून येईल, ती सर्व मालमत्ता, चीजवस्तू किंवा कारवाईयोग्य दावे तसेच संस्थेच्या धंद्याच्या संबंधातील सर्व पुस्तके, अभिलेख व इतर दस्ताऐवज यांच्या अभिरक्षेची व नियंत्रणाची व्यवस्था परिसमापकाच्या स्वाधीन करतील आणि त्यानंतर त्यांना त्यांपैकी कोणतीही गोष्ट मिळू शकणार नाही.

(३) अंतरिम आदेश कायम करणारा अंतिम आदेश देण्यात आल्यावर संस्थेचे अधिकारी आपली पदे सोडतील आणि समापनाचा आदेश अंमलात असेपर्यंत संस्थेचे अभिमंडळ आपल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करणार नाही.

(४) या कलमान्वये परिसमापक म्हणून नेमण्यात आलेली व्यक्ती निबंधकाच्या सर्वसाधारण नियंत्रणाला अधीन राहून, कलम १०५ मध्ये नमूद केलेल्या अधिकारांपैकी सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करील. निबंधकाला कोणतेही कारण न देता अशा व्यक्तीस काढून टाकता येईल आणि तिच्या बदली दुस-या व्यक्तीला नेमता येईल.

(५) या कलमान्वये परिसमापकाची नेमणूक करण्यात आल्यावर संस्थेची संपूर्ण मत्ता अशा परिसमापकाकडे निहित होईल आणि त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, संस्थेच्या वतीने परिसमापकाने कोणतीही स्थावर मालमत्ता धारण केली असेल तर, अशा परिसमापकाच्या पदाच्या नावाने नोंदबदल करण्यात येताच, जमिनीवरील हक्क परिपूर्ण होईल आणि कोणत्याही न्यायालयात अशी मालमत्ता ताब्यात काढून घेण्यात आली आहे, कब्जाचा अभाव किंवा तिचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला नाही, या कारणावरून उक्त हक्काबाबत आक्षेप घेता येणार नाही.

(६) अंतरिम आदेश विलोपित करण्यात आला असता परिसमापक म्हणून नेमण्यात आलेली व्यक्ती, संस्थेची मालमत्ता, चीजवस्तू व कारवाईयोग्य दावे आणि पुस्तके, कागदपत्रे आणि इतर दस्तऐवज ही ज्या अधिका-यांनी तिच्या स्वाधीन केली होती, त्या अधिका-यांच्या हवाली करील. परिसमापकाने केलेली कृत्ये किंवा चालवलेली कार्यवाही त्या संस्थेवर बंधनकारक राहील आणि संस्थेचा अधिकारी अशी कार्यवाही पूर्ववर्ती कलमान्वये अंतरिम आदेश रद्द करण्यात आल्यानंतरही चालू ठेवील.

१०४. [१][(१) ज्या संस्थेस समापनाचा आदेश देण्यात आला असेल त्या संस्थेच्या समितीस किंवा तिच्या कोणत्याही सदस्यास, समापनाच्या अंतिम आदेशाविरूद्ध,— समापनाच्या आदेशाविरूद्ध अपील.

(क) असा आदेश निबंधकाकडून किंवा ज्यास निबंधकाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत अशा विशेष किंवा अपर किंवा सहनिबंधकाकडून देण्यात आला असेल त्याबाबतीत राज्य शासनाकडे ;

(ख) असा आदेश, निबंधक, किंवा ज्यास निबंधकाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत असा, विशेष किंवा अपर किंवा सहनिबंधक यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडून देण्यात आला असेल त्याबाबतीत, निबंधकाकडे ; कलम १०२ अन्वये तो आदेश काढण्यात आल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत अपील दाखल करता येईलः

परंतु, कलम १०२ च्या पोट-कलम (१), खंड (ग) च्या उप खंड (एक), (दोन) किंवा (तीन) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाविरूद्ध कोणतेही अपील दाखल करता येणार नाही.]

(२) या कलमान्वये एखाद्या सदस्याचे कोणतेही अपील जर त्याबरोबर अपिलाची सुनावणी करण्याचा खर्च म्हणून विहित करण्यात येईल अशी तारणाची रक्कम देण्यात आली नसेल, तर स्वीकारले जाणार नाही.

[१]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १२ अन्वये पोटकलम (१) दाखल करण्यात आले.

परिसमापकाचे अधिकार.

१०५. [1][(१)] कलम १०३ अन्वये नेमलेल्या परिसमापकास नियमांना व निबंधकाची सर्वसाधारण देखरेख, नियंत्रण, आणि निदेश यांना अधीन राहून, पुढील गोष्टी करण्याचा अधिकार राहील:—

(क) संस्थेतर्फे कोणताही वाद व इतर दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कार्यवाही आपल्या पदाच्या नावाने दाखल करणे व त्यात बचाव करणे ;

(ख) संस्थेचे समापन फायदेशीर रीतीने करण्याकरिता आवश्यक असेल तेथवर संस्थेचे कामकाज चालविणे ;

(ग) संस्थेची स्थावर व जंगम मालमत्ता आणि कारवाईयोग्य दावे ही, त्यांच्या संपूर्ण किंवा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीला किंवा निगम निकायाला हस्तांतरित करण्याच्या किंवा भागशः विकण्याच्या अधिकारासह जाहीर लिलाव करून किंवा खाजगी कराराद्वारे विकणे ;

[2][(ग-एक) तशाच उद्दिष्टांसह नोंदणी करण्यात आलेल्या एखाद्या संस्थेकडे किंवा परिसमापनाधीन असलेल्या संस्थेच्या धंद्यासारखाच धंदा करणा-या शासकीय उपक्रमांकडे बाजार भावानुसार मूल्यांकन केलेल्या मत्तांची विक्रि करून तिचे हस्तांतरण करणे ;

(ग-दोन) परिसमापनाधीन असलेल्या संस्थेच्या धंद्यासारखाच धंदा करण्यासाठी संस्थेची मालमत्ता निबंधकाच्या पूर्वमान्यतेने अन्य संस्थांना किंवा शासकीय उपक्रमांना भाडेपट्ट्याने देणे;]

(घ) संस्थेच्या मत्तेच्या तारणावर आवश्यक असेल तितका पैसा उभा करणे;

(ङ) संस्थेविरूद्ध असलेल्या सर्व दाव्यांचे अन्वेषण करणे आणि या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून अशा दाव्यातून निर्माण होणा-या प्राथम्याचा प्रश्नाचा निर्णय करणे आणि कोणत्याही एका किंवा अनेक वर्गातील धनकोंची देणी पूर्णपणे किंवा अशा कर्जाच्या रकमांस अनुसरून प्रमाणशीर दराने देणे व बाकी रक्कम निबंधक जो दर ठरवील त्या दराने परिसमापनाच्या दिनांकापासून व्याज देण्याच्या कामी लावणे, परंतु हा दर संविदा दराहून अधिक असणार नाही ;

(च) धनकोंबरोबर किंवा धनको असल्याचा दावा सांगणा-या व्यक्तींबरोबर किंवा ज्या विद्यमान किंवा भावी दाव्यांबद्दल संस्था जबाबदार असेल, असा कोणताही दावा असणा-या किंवा आहे असे म्हणणा-या व्यक्तीबरोबर कोणतीही तडजोड किंवा व्यवस्था करणे;

(छ) सर्व मागण्या किंवा मागण्या व ऋणे यांची दायित्वे आणि ऋणात पर्यवसान होऊ शकतील अशी दायित्वे आणि संस्था व संस्थेस अंशदान देणारा किंवा अंशदान देणार आहे असे म्हणणे असलेला किंवा इतर ऋणको किंवा संस्थेला आपण जबाबदार आहे असे समजणारी व्यक्ती यांच्या दरम्यानचे विद्यमान किंवा भावी, निश्चित किंवा घटनापेक्ष, अस्तित्वात असलेले किंवा अस्तित्वात आहेत असे समजण्यात येणारे सर्व दावे आणि संस्थेच्या मत्तेशी किंवा संस्थेच्या समापनाशी कोणत्याही रीतीने संबंध असलेले किंवा त्यावर परिणाम करणारे सर्व प्रश्न यांच्याबाबतीत मान्य होतील अशा अटींवर तडजोड करणे आणि अशा कोणत्याही मागणीच्या, दायित्वाच्या, ऋणाच्या किंवा दाव्याच्या फेडीसाठी कोणतेही तारण घेणे आणि त्याबाबतीत संपूर्ण ऋणमुक्ती देणे;

(ज) सदस्यांनी किंवा माजी सदस्यांनी किंवा मृत सदस्यांच्या संपत्तीतून किंवा त्यांची नामनिर्देशित व्यक्ती किंवा त्यांचे वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी यांनी किंवा कोणत्याही अधिका-याने, माजी अधिका-याने किंवा मृत अधिका-याने संपत्तीतून किंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती किंवा तिचे वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी यांनी संस्थेच्या मत्तेसाठी द्यावयाचे किंवा घ्यावयाचे राहिलेले अंशदान, अशा अंशदानात अशा सदस्यांकडून किंवा अधिका-यांकडून देय असलेल्या ऋणांचा समावेश होईल—दाव्याच्या रकमेबाबत त्यांनी आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावर वेळोवेळी निश्चित करणे ;

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३० (१) अन्वये १०५ या कलमास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात आला.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५३ अन्वये खंड (ग-एक), (ग-दोन) समाविष्ट करण्यात आले.

(झ) कलम ९८ अन्वये मागण्या पाठविणे.

[1][(ञ) कोणताही विवाद निर्णयासाठी सहकारी न्यायालयाकडे निर्देशित करणे किंवा निर्देशित करविणे;]

(ट) परिसमापनाचा परिव्यय कोणत्या व्यक्तींनी व कोणत्या प्रमाणात सोसला पाहिजे, ते ठरविणे ;

(ठ) ज्या मुदतीत धनकोंनी आपली ऋणे व दावे सिद्ध केले पाहिजेत किंवा ती ऋणे किंवा दावे सिद्ध होण्यापूर्वी केलेल्या कोणत्याही वाटणीच्या फायद्यासाठी त्याचा समावेश केला पाहिजे, अशी एक किंवा अधिक मुदत ठरविणे ;

१९०८ चा ५. (ड) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयांच्या बाबतीत ज्या उपाययोजनांची व रीतीची तरतूद केली आहे, त्याच उपाययोजनांद्वारे व त्याच रीतीने साक्षीदारांना समन्स काढून बोलाविणे आणि त्यांना हजर राहण्यास भाग पाडणे आणि संस्थेच्या मालकीची किंवा तिच्या अभिरक्षेत असलेली कोणतीही पुस्तके, लेखे, दस्तऐवज, रोखे, रोख रक्कम किंवा इतर मालमत्ता प्रस्तूत करण्यास भाग पाडणे ;

(ढ) अशा प्रकारच्या समापनासाठी आवश्यक असतील त्या सर्व कृती करणे आणि संस्थेच्या नावाने व वतीने सर्व विलेख, पावत्या आणि इतर दस्तऐवज करून देणे ;

(ण) संस्थेची पुनर्रचना करणे शक्य आहे असे सकारण वाटत असेल तर निबंधकाच्या पूर्वमान्यतेने कलम १९ अन्वये आवश्यक असेल ती उपाययोजना करणे.

[2][ (२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, परिसमापकास इतर कोणत्याही संस्थेच्या, समितीच्या सदस्यांच्या किंवा अधिका-यांच्या निवडणुकीच्या वेळी परिसमापनाधीन संस्थेच्या वतीने मत देण्याचाही हक्क असणार नाही.]

**१०६.** कलम १०२, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशाविरूद्ध अपील करण्याची मुदत संपल्यावर किंवा अपील फेटाळण्यात आले असेल, त्याबाबतीत समापनासाठी दिलेला आदेश हा, असा आदेश जणू काही संस्थेचे धनको आणि संस्थेस अंशदान देणा-या व्यक्ती यांनी केलेल्या संयुक्त अर्जावरून देण्यात आला आहे असे समजून प्रभावी राहील आणि तो त्या सर्व धनकोंच्या आणि अंशदान देणा-या सर्व व्यक्तींच्या बाजूने अमलात येईल. जेव्हा समापनाचा आदेश प्रभावी होईल तेव्हा परिसमापक विक्रीद्वारे किंवा अन्यथा संस्थेच्या मत्तेची रोख किंमत वसूल करून घेण्याची कार्यवाही करील आणि निबंधकाच्या परवानगीवाचून व तो ज्या अटी लादील त्यांना अधीन राहून संस्थेविरुद्ध कोणताही विवाद सुरू करता येणार नाही किंवा समापनाच्या आदेशाच्या दिनांकास तो अनिर्णीत असेल, तर तिची कार्यवाही पुढे चालू ठेवता येणार नाही. तथापि, निबंधकास संस्थेने केलेला किंवा संस्थेविरूद्ध असलेला कोणताही विवाद स्वतः होऊन दाखल करून घेता येईल किंवा निकालात काढता येईल.

समापनाच्या आदेशाचे परिणाम.

**१०७.** या अधिनियमात स्पष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करून, या अधिनियमाखालील संस्थेच्या समापनाशी किंवा विसर्जनाशी संबंध असलेल्या कोणत्याही बाबीची कोणतेही दिवाणी न्यायालय दखल घेणार नाही; आणि समापनाचा आदेश देण्यात आला असेल तेव्हा निबंधकाच्या परवानगी वाचून व तो ज्या अटी लादील, त्यांना अधीन राहून अशा संस्थेविरूद्ध किंवा परिसमापकाविरूद्ध कोणताही वाद किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही, किंवा पुढे चालू ठेवता येणार नाही :

समापनाच्या किंवा विसर्जनाच्या बाबतीत वादास प्रतिबंध.

---

[1] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १४ अन्वये मूळ खंड (ज) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३० (२) अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

परंतु, समापनाचा आदेश रद्द करण्यात आला असेल त्याबाबतीत, संस्थेवर किंवा तिच्या सदस्यांवर दावे लावण्यासंबंधीच्या संस्थेच्या आणि तिच्या सदस्यांच्या दायित्वाच्या बाबतीत या कलमाच्या तरतुदीची अंमलबजावणी समाप्त होईल, परंतु, परिसमापक म्हणून काम करणा-या व्यक्तींच्या बाबतीत या तरतुदी लागू असणे चालू राहील.

परिसमापकाच्या लेख्याची लेखापरीक्षा.

**१०८.** (१) परिसमापक आपल्या पदावधीत विहित करण्यात येतील त्या त्या वेळी, परंतु दरवर्षी कमीतकमी दोन वेळा परिसमापक म्हणून त्यास मिळालेल्या आणि त्याने दिलेल्या रकमांचा लेखा विहित केलेल्या नमुन्यात निबंधकाकडे सादर करील. निबंधक त्यास योग्य वाटेल त्या रीतीने त्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेण्याची व्यवस्था करील आणि परिसमापक लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी निबंधकास किंवा त्याने नेमलेल्या व्यक्तीस लागतील ती प्रमाणके आणि ती माहिती पुरवील.

(२) परिसमापक लेखापरीक्षीत लेख्यांचा सारांश तयार करून घेण्याची व्यवस्था करील व अशा सारांशाची एक प्रत अंशदान देणा-या प्रत्येक व्यक्तीकडे पाठवील.

(३) परिसमापक विहित केलेल्या रीतीने, त्याने ठेवलेल्या लेख्यांची आणि पुस्तकांची तपासणी करण्यासाठी निबंधक निदेश देईल त्याप्रमाणे फी भरील.

(४) संस्थेचा कारभार हाती घेतल्यानंतर परिसमापकाने केलेल्या व्यवहारांच्या बाबतीत लेखापरीक्षेत किंवा लेखापरीक्षेच्या परिणामी आढळून आलेल्या कोणत्याही प्रकारच्या नियमबाह्य गोष्टीबाबत तो जबाबदार असल्याचे समजण्यात येईल आणि जणू काही अशी नियमबाह्य गोष्ट हे, कलम ८८ अन्वये कार्यवाही करण्यायोग्य कृत्य आहे, असे समजून त्याच्याविरुद्ध कार्यवाही करता येईल :

परंतु, अशा नियमबाह्य गोष्टीमुळे संस्थेचे नुकसान झाले नसेल किंवा होण्याचा संभव नसेल आणि त्या गोष्टीमुळे कर्तव्ये व कामे पार पाडताना अक्षम्य हयगय केल्यामुळे किंवा त्या गोष्टी कर्तव्ये व कामे पार पाडण्याबाबतच्या अकृतीमुळे घडून आल्या नसतील तर, अशी कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

परिसमापनाची कार्यवाही बंद करणे.

**१०९.** (१) निबंधकाने मुदतवाढ केली नसेल तर, [१][कलम १०३, पोट-कलम (२) खाली ज्यासाठी संस्था हक्कदार असेल किंवा हक्कदार असल्याचे दिसून येईल, ती सर्व मालमत्ता, चीजवस्तू आणि कारवाईयोग्य दावे आणि संस्थेच्या कामकाजाशी संबंधित असलेली पुस्तके, अभिलेख आणि इतर दस्तऐवज परिसमापक आपल्या अभिरक्षेत आणि नियंत्रणाखाली ठेवील,] त्या दिनांकापासून [२][सहा वर्षाच्या आत व्यवहार्य होईल तितक्या लवकर] संस्थेच्या समापनाची कार्यवाही बंद करण्यात येईल :

परंतु, निबंधक एकाच वेळी एक वर्षाहून आणि एकूण चार वर्षाहून अधिक होईल इतकी मुदतवाढ मंजूर करणार नाही आणि [३][पूर्वोक्त] दिनांकापासून [४][दहा वर्षाची] मुदत संपल्यावर लगेच परिसमापनाची कार्यवाही समाप्त झाली आहे, असे समजून तो परिसमापनाची कार्यवाही समाप्त करण्याविषयी आदेश देईल.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५४ (अ) अन्वये " समापनाच्या आदेशाच्या " या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ (अ) अन्वये " तीन वर्षाच्या आत " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५४ (ब) अन्वये " संस्थेच्या समापना विषयी दिलेल्या आदेशाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ (ब) अन्वये " सात वर्षाची " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१][**स्पष्टीकरण**—महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८५ च्या प्रारंभास जी संस्था समापनाखाली असेल, त्या संस्थेच्या बाबतीतील सहा वर्षांचा कालावधी परिसमापक ज्या दिनांकास उपरोक्तप्रमाणे ताबा घेईल किंवा नियंत्रण ठेवील त्या दिनांकापासून सुरू झाल्याचे समजण्यात येईल.]

(२) पूर्वगामी पोट-कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, परिसमापकाकडून अंतिम अहवाल मिळाल्यावर निबंधक परिसमापनाची कार्यवाही समाप्त करील, परिसमापकाच्या अंतिम अहवालात संस्थेच्या परिसमापनाची कार्यवाही समाप्त झाली आहे, ही गोष्ट आणि समापनाचे काम कशारीतीने चालविण्यात आले आणि संस्थेच्या मालमत्तेचा कोणत्या प्रकारे विनियोग केला किंवा दावे कशारीतीने निकालात काढण्यात आले, हे नमूद करण्यात येईल : आणि त्यात परिसमापनाचा खर्च, सदस्यांचा भाग किंवा हितसंबंध यांसह दायित्वाच्या रकमा दिल्यावर परिसमापित संस्थेच्या नावे जमा असलेली रक्कम (तशी रक्कम असल्यास) यांसहित समापनाच्या हिशेबाचा सारांश दर्शवणारे विवरणपत्र आणि अधिशेष रकमेचा कशाप्रकारे विनियोग करण्यात यावा, याबाबत सूचना यांचा समावेश असेल.

(३) परिसमापकाकडून अंतिम अहवाल मिळाल्यानंतर निबंधक, परिसमापकास त्यांच्या अंतिम अहवालाची नोंद करण्यासाठी संस्थेच्या सदस्यांची सर्वसाधारण बैठक बोलविण्याचा निदेश देईल.

**११०.** समापित करण्यात आलेल्या संस्थेच्या परिसमापकाच्या अंतिम अहवालात दर्शविलेली अधिशेष मत्ता, निबंधकास राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेऊन, विहित करण्यात येईल, अशा रीतीने संस्थेच्या सदस्यांमध्ये विभाजित करता येईल किंवा संस्थेच्या उपविधीत तरतूद केलेल्या कोणत्याही एका किंवा अधिक उद्दिष्टांसाठी तिचा विनियोग करता येईल. मात्र अशा संस्थेच्या उपविधीत अशी अधिशेष मत्ता विशिष्ट प्रयोजनाकरिता उपयोगात आणावी किंवा दोन्ही प्रयोजनांसाठी उपयोगात आणावी, ते विनिर्दिष्ट केलेले असले पाहिजे. अधिशेष मत्तेची अशारीतीने सदस्यांमध्ये विभागणी करण्यात आली नसेल व त्या संस्थेचे असे कोणतेही उपविधी नसतील, तेव्हा ती अधिशेष मत्ता निबंधकाकडे निहित होईल आणि तो अशी अधिशेष मत्ता विश्वस्त म्हणून धारण करील आणि तत्सम उद्दिष्टांसाठी नोंदणी झालेल्या आणि त्या अधिशेष मत्तेची मालकी असणारी संस्था ज्या क्षेत्रात काम करीत होती, जवळजवळ त्याच क्षेत्रात काम करणा-या नवीन संस्थेच्या राखीव निधीकडे ती हस्तांतरित करील ;

अधिशेष मत्तेचा विनियोग.

परंतु, अशी कोणतीही संस्था अस्तित्वात नसेल किंवा ज्या संस्थेची अतिरिक्त मत्ता निबंधकाकडे निहित झाली नसेल, ती संस्था रद्द करण्यात आल्यापासून ३ वर्षांच्या आत अशी कोणतीही संस्था नोंदविण्यात आली नसेल, तर, निबंधकास अशी अधिशेष मत्ता त्यास सर्वात चांगली वाटेल त्यारीतीने पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही उद्दिष्टांसाठी वाटून देता येईल :—

(क) पूर्वगामी कलमान्वये बोलावण्यात आलेल्या सर्वसाधारण बैठकीत सदस्य ज्यांची शिफारस करतील त्याप्रमाणे सार्वजनिक उपयुक्ततेच्या आणि स्थानिक हिताच्या उद्दिष्टांसाठी ;

(ख) रद्द करण्यात आलेली संस्था ही तत्सम उद्दिष्टे असलेल्या ज्या संघीय संस्थेशी संलग्न होण्यास पात्र असेल त्या संघीय संस्थेस किंवा संघीय संस्था अस्तित्वात नसेल त्या बाबतीत राज्य शासन या बाबतीत अधिसूचित करील अशा राज्य संघीय संस्थेस ; आणि

१८९० चा ६. (ग) धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० चे कलम २ यात व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही धर्मादाय प्रयोजनासाठी.

[१]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५४ (क) अन्वये हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

[1][प्रकरण दहा—क

## विमा उतरविलेली सहकारी बँक

विमा उतरविलेल्या सहकारी बँकेचे समापन करणे, तिची पुनर्रचना करणे, तिची समिती निष्प्रभावित करणे वगैरे संबंधीचा आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेची मंजुरी किंवा मागणी यावाचून न देणे.

**११०क.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही विमा उतरविलेल्या सहकारी बँकेच्या बाबतीत—

(एक) बँकेच्या समापनाचा आदेश किंवा तडजोड अथवा व्यवस्था अथवा एकत्रीकरण किंवा (विभागणी अथवा पुनर्रचना धरुन) त्यांची पुनर्निर्मिती यासंबधीची योजना मंजूर करणारा आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेच्या लेखी पूर्वमंजुरीने करता येईल ;

(दोन) ठेव विमा महामंडळ अधिनियम, १९६१ यांच्या कलम १३ घ मध्ये उल्लेखलेल्या परिस्थितीत भारतीय रिझर्व्ह बँकेने तसे फर्माविले असेल तर [2][निबंधकांकडून] बँकेच्या समापनाचा आदेश देण्यात येईल; १९६१ चा ४७.

(तीन) लोकहितासाठी किंवा ठेवीदारांच्या हितसंबंधास हानिकारक असेल अशा रीतीने बँकेचा कारभार चालविला जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा बँकेचे समुचित व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी भारतीय रिझर्व बँकेने तसे फर्माविले असेल तर [2][निबंधकांकडून] समिती निष्प्रभावित करण्यासाठी (काढून टाकण्यासाठी) व भारतीय रिझर्व्ह बँक वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा एकूण पाच वर्षापेक्षा अधिक नसलेल्या मुदतीसाठी किंवा मुदतींसाठी तिच्याऐवजी प्रशासकाची नेमणूक करण्याचा आदेश देण्यात येईल आणि अशा रीतीने नेमलेला प्रशासक, त्याचा पदावधी संपल्यानंतर नवीन समितीच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत त्या पदावर काम करण्याचे चालू ठेवील ;

(चार) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वमंजुरीने किंवा तिच्या मागणीवरून दिलेला बँकेच्या समापनाचा आदेश किंवा तडजोड अथवा व्यवस्था अथवा एकत्रीकरण किंवा (विभागणी किंवा पुनर्रचना धरून) पुनर्निर्मिती, यासंबंधी योजना मंजूर करणारा आदेश किंवा समिती निष्प्रभावित करण्याचा (काढून टाकण्याचा व तिच्या ऐवजी प्रशासकाची नेमणूक करणारा आदेश कोणत्याही रीतीने हरकत घेतली जाण्यास पात्र ठरणार नाही,) आणि ;

(पाच) परिसमापक किंवा विमा उतरविलेली सहकारी बँक किंवा यथास्थिति, हस्तांतरिती बँक ही, ठेव विमा महामंडळ अधिनियम, १९६१ याच्या कलम २१ मध्ये निर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत, अशा मर्यादेपर्यंत व अशा रीतीने त्या अधिनियमाखाली प्रस्थापित केलेल्या ठेव विमा महामंडळाला अधिदान करण्यास बांधलेली असेल.

[3][**स्पष्टीकरण.**—या कलमात,—

(क) " विमा उतरविलेली सहकारी बँक " या शब्दप्रयोगाचा अर्थ, ठेव विमा महामंडळ अधिनियम, १९६१ च्या तरतुदीखाली जी विमा उतरविलेली बँक असेल ती संस्था ; १९६१ चा ४७.

(ख) " हस्तांतरिती बँक " या शब्दाप्रयोगास त्या अधिनियमामध्ये नेमून दिलेला तोच अर्थ असेल.]]

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४; कलम २ अन्वये प्रकरण दहा-क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ९ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) अन्वये मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

## प्रकरण अकरा

## [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका]

[२][१११. हे प्रकरण पुढील प्रकारच्या संस्थाना लागू होईल— प्रकरण अकरा [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांना] लागू करणे.

(क) [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेला] (यात यापुढे [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुद्देशीय विकास बँक] म्हणून निर्दिष्ट) किंवा तिच्यामार्फत यात यापुढे नमूद केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी अल्प मुदती कर्जाहून अन्य कर्जे देणारी कोणतीही सहकारी बँक किंवा बँका,

उक्त प्रयोजने अशी,—

(एक) कृषि विकास किंवा ग्रामीण विकास ;

(दोन) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये कुळांनी, भोगवटादारांनी आणि अभिहस्तांकितींनी शेत जमिनीतील मालकी हक्क खरेदी किंवा संपादन करणे ;

(तीन) शेतक-यांना शासनाने किंवा परिसंस्थांनी दिलेली अशी आणि अन्य प्रतिभूत ऋणे फेडणे;

[३][(चार) ग्रामीण भागात निवासी घरांचे संपादन, बांधकाम, पुनर्बांधकाम किंवा दुरूस्ती करणे.]

(ख) ज्या संस्थेस निबंधकाने [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] म्हणून काम करण्यासाठी कलम १४२ अन्वये परवानगी दिलेली असेल अशी अन्य कोणतीही संस्था.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,

(एक) "अल्प मुदती कर्ज" म्हणजे १८ महिन्यांपेक्षा कमी अवधीसाठी दिलेले कर्ज ; आणि

(दोन) "कृषि विकास किंवा ग्रामीण विकास" म्हणजेच, कृषि विकासाशी व ग्रामीण विकासाशी संबंधित असे कोणतेही काम, बांधकाम किंवा कार्य होय, आणि त्यात पुढील गोष्टीचा समावेश होतो; त्या अशा—

(एक) कृषि विषयक प्रयोजनासाठी किंवा कृषि विषयक कामांवर लावलेल्या माणसांच्या व गुरांच्या उपयोगासाठी पाण्याचा साठा, पुरवठा किंवा वाटप करण्याकरिता विहिरी (कूपनलिकांसह), तलाव आणि अन्य बांधकामे करणे आणि त्यांची दुरूस्ती करणे,

(दोन) कृषि जमीन लागवडीसाठी योग्य करणे, जलसिंचनाच्या साधनांच्या विकासासह जमिनीची सुधारणा करणे,

(तीन) पूर्वोक्त बांधकामांपैकी कोणत्याही बांधकामाचे नवीकरण किंवा पुनर्बांधणी करणे किंवा त्यात फेरफार करणे किंवा त्यात भर घालणे,

(चार) लाभक्षेत्र विकासासह पाटबंधा-यासाठी जमीन तयार करणे,

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम (८) अन्वये "कृषि आणि ग्रामीण विकास बँक" या मजकुराऐवजी त्याच्या व्याकरणीक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ३ अन्वये उपखंड जादा दाखल करण्यात आला.

(पाच) नद्या किंवा अन्य जलाशय यांमध्ये जलनिस्सारणाची व्यवस्था करणे किंवा त्याखाली बुडालेल्या जमिनीचे पुन:प्रापण करणे अथवा पुरापासून किंवा धूप होण्यापासून किंवा पाण्यामुळे होणा-या इतर हानीपासून जमिनींचे संरक्षण करणे,

(सहा) बांध घालणे आणि त्यासारख्या इतर सुधारणा करणे,

(सात) कृषिविषयक प्रयोजनासाठी जमिनींचे पुन:प्रापण करणे, ती साफ करणे आणि जमिनीला कुंपण घालणे किंवा त्या जमिनीवर कायम स्वरूपाची सुधारणा करणे,

(आठ) फलोत्पादन करणे,

(नऊ) या ठिकाणी नमूद केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी तेल, इंजिन, पंपसंच किंवा विद्युतचलित मोटर्स यांसह हत्यारे, अवजारे व यंत्रसामग्री यांची खरेदी करणे,

(दहा) कर्षित्रे किंवा पॉवर टिलर किंवा शेतीची अन्य यंत्रसामाग्री खरेदी करणे,

(अकरा) शेतीच्या जमिनीची उत्पादनक्षमता वाढविणे,

(बारा) शेतघरे, गुरांचे गोठे, आणि कृषिविषयक किंवा कुटीर उद्योगाच्या, ग्रामोद्योगाच्या उत्पादित वस्तुंच्या प्रक्रियेसाठी किंवा दुरूस्तीसाठी छप-या बांधणे, त्यांची पुनर्बांधणी किंवा दुरूस्ती करणे,

(तेरा) कृषि उत्पन्नावर प्रक्रिया कररण्यासाठी यंत्रसामग्री खरेदी करणे,

(चौदा) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या संबद्ध कायद्याखालील धारण जमिनीच्या एकत्रीकरणासाठी जमीन विकत घेणे,

(पंधरा) पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय, उदा. दुभती जनावरे खरेदी करणे, संकरित कालवडींची जोपासना, गुरांची पैदास, शेळ्यामेंढ्यांची जोपासना, सूकरालय, कुक्कुट पालन आणि बैल खरेदी करणे,

(सोळा) वृक्षरोपणासहित लागवड,

(सतरा) वन व्यवस्थापन,

(अठरा) गोड्या पाण्यातील व समुद्रातील मत्स्य व्यवसाय विकास, मासेमारी आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक अशा इतर सर्व कार्यासह मत्स्यसंवर्धन,

(एकोणीस) रेशीम उत्पादन किंवा मधुक्षिका पालन,

(वीस) कृषि उत्पन्न, कुटीर औद्योगिक उत्पादने यांचे पणन, तसेच ग्रामीण वखारी, गोदामे, शीतगृहे यांसहित साठवण आणि वाहतूक, अशा कामाच्या संबंधातील अवजारे व यंत्रसामग्री तसेच प्राण्यांनी ओढावयाच्या गाड्या यांचे संपादन,

(एकवीस) कृषि उत्पन्नासाठी बाजार तळ,

(बावीस) बायो-गॅस संयंत्रे,

(तेवीस) कर्ज घेणा-यांना खेळते भांडवल किंवा उत्पादन पत कर्जाच्या रकमा किंवा गुंतवणुकीसाठी पत कर्जाच्या रकमा देणे,

(चोवीस) कुटीर उद्योग व ग्रामोद्योग स्थापन करणे,

(पंचवीस) सहकारी साखर कारखान्यांचे व कोणत्याही कृषि उत्पादन प्रक्रिया उद्योगातील शेअर खरेदी करणे,

(सव्वीस) सामाजिक वनीकरण,

(सत्तावीस) कृषि किंवा ग्राम विकास प्रयोजने म्हणून राज्य शासन वेळोवेळी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित करील अशी इतर कोणतीही प्रयोजने, किंवा

(अठ्ठावीस) उपरोक्त प्रयोजनाशी आनुषंगिक किंवा सहाय्यभूत असणारी सर्व कामे.]

[४][राज्य व इतर जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका.]

११२. [१][(१) महाराष्ट्र राज्यासाठी एक [२][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका] असेल. राज्य शासनास लोकहिताच्या दृष्टीने किंवा सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक वाटल्यास एक किंवा अधिक [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका] असू शकतील; परंतु या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे कोणत्याही [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका] प्रस्थापित करणे किंवा त्या चालू ठेवणे भाग आहे असे समजण्यात येणार नाही.]

(२) राज्यात त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा संलेखात भू-तारण बँकांबाबत [५][किंवा भू-विकास बँकाबाबत [६][किंवा कृषि आणि ग्रामीण विकास बँकेबाबत]] करण्यात आलेला निर्देश हा या अधिनियमाच्या प्रारंभापासून या प्रकरणाच्या अर्थान्तर्गत [४][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँका] बाबतचा निर्देश आहे असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभापासून आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी राज्यात कार्य करीत असलेल्या भूतारण बँकांच्या [७][किंवा भू-विकास बँकांच्या [८][किंवा कृषि आणि ग्रामीण विकास बँकांच्या]] आणि संस्थांच्या नावात [४][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका] असा बदल करण्यात येईपर्यंत त्यांनी केलेली सर्व कृत्ये किंवा त्यांनी किंवा त्यांच्या नावाने करून दिलेली गहाणे व करून दिलेले इतर दस्तऐवज आणि त्यांनी किंवा त्यांच्याविरुद्ध दाखल केलेले सर्व वाद व इतर कार्यवाही ही यथास्थिति [४][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँका] म्हणून त्यांनी केलेली कृत्ये आहेत किंवा करून दिलेली गहाणे किंवा करून दिलेले दस्तऐवज आहेत किंवा दाखल केलेले वाद व कार्यवाही आहे, असे समजण्यात येईल.

[१] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ३ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १९ अन्वये " राज्य व इतर भू-विकास बँका " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[५] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २० (अ) द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ९(क) अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २० (ब) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ९ (ख) अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

जिल्हा कर्ज समिती, तिची रचना, प्रतिनिधींचा पदावधी, नैमित्तिक रिक्त जागा, अशा समितीचे अधिकार इत्यादी.

[१][११२क. (१) या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांत किंवा [२][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांच्या] उपविधींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी—

(क) मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा वगळून प्रत्येक जिल्ह्याकरिता एकेक [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] असेल,

(ख) प्रत्येक [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] ही पुढील [३][[४][ *]सदस्यांची] मिळून बनलेली असेल, जसे—

[५][(एक) जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामधून प्रत्येकी एक याप्रमाणे निवडून द्यावयाचे प्रतिनिधी ];

[६][(एक-क) [७][जिल्ह्यामधून निवडून देण्यात येतील] असे, अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्तींमधून एक सदस्य आणि दुर्बल घटकातील व्यक्तींमधून एक सदस्य याप्रमाणे दोन सदस्य;]

(दोन) संबंधित जिल्ह्याचा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था--पदसिद्ध;

(तीन) संबंधित विभागाचा [२][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा] विभागीय अधिकारी-पदसिद्ध ;

[८][(चार) जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेचा व्यवस्थापक पदसिद्ध] तो [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा] सचिव म्हणून देखील काम करील :

[९][परंतु, जिल्ह्यामध्ये सातपेक्षा अधिक तालुके असतील व महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९९३ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, उप-खंड (एक) ज्या स्वरुपात अस्तित्वात होता त्या स्वरुपातील त्या उपखंडाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे, [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय बँकेवर] सात प्रतिनिधी निवडून देण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुका, अगोदरच घेण्यात आलेल्या असतील त्या बाबतीत, राज्य शासन अशा प्रतिनिधींची एकूण संख्या अशा जिल्ह्यातील तालुक्यांच्या संख्येइतकी करण्यासाठी, जेथून कोणतेही प्रतिनिधी निवडून देण्यात आलेले नसतील अशा तालुक्यांमधून आवश्यक असेल त्याप्रमाणे अशा समितीवर नामनिर्देशन करील :

१९९४ चा महा. १३.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये कलमे ११२क, ११२ख आणि ११२ग समाविष्ट करण्यात आली.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम २ (१) (अ) अन्वये " दहा सदस्य " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १० (१) (अ) (एक) अन्वये " बारा " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १० (१) (अ) (दोन) अन्वये मूळ उपखंड (एक) ऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

[६] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम २ (१) (ब) अन्वये उपखंड (एक क) समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १० (१) (अ) (तीन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम १० अन्वये हे उपखंड दाखल करण्यात आले.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १० (१) (अ) (चार) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

परंतु आणखी असे की, पूर्वोक्तानुसार निवडणूक घेतल्यानंतर, उप-खंड (एक क) त्यावेळी ज्या स्वरूपात अस्तित्वात होता त्या स्वरुपातील त्या उपखंडान्वये निबंधकाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य तोपर्यंत निबंधकाने नामनिर्देशित केलेले नसतील तर निबंधक असे दोन सदस्य नामनिर्देशित करील ;

परंतु आणखी असेही की, अशा सर्व नामनिर्देशित सदस्यांच्या पदावधीची मर्यादा अशाप्रकारे निवडून देण्यात आलेल्या अशा सात प्रतिनिधींच्या पदावधी इतकीच असेल :

१९९४ चा महा.१३. परंतु तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९९३ याच्या प्रारंभानंतर घेण्यात आलेल्या कोणत्याही निवडणुकीच्या वेळी जिल्ह्यातल्या [१][राज्य सहकारी कृषि व ग्राम बहुद्देशीय विकास बँकेचा] अनुसूचित जातीमधील किंवा अनुसूचित जमातीमधील किंवा, यथास्थिति, दुर्बल गटातील कोणताही सदस्य अशी निवडणूक लढवण्यास पात्र असेल ;]

[२][**स्पष्टीकरण.**—उप-खंड (एक-क) च्या प्रयोजनासाठी, खंड (ख) च्या तरतुदी आणि कलम ७३ ख च्या स्पष्टीकरणाच्या खंड (ग) अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदी त्याअन्वये निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या संबंधात लागू होतील ;]

[३][(ग) खंड (ख) च्या उप-खंड (एक) व (एक-क) अन्वये निवडून द्यावयाचे प्रतिनिधी व सदस्य हे [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] सदस्यांद्वारे प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून देण्यात येतील.]

(घ) या कलमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल तेवढे खेरीज करून प्रतिनिधी [४][आणि सदस्य] निवडून देण्यासाठी होणारी प्रत्येक निवडणूक प्रकरण ११ क च्या तरतूदींना अधीन असेल आणि ती त्या प्रकरणान्वये किंवा त्याखाली नेमून देण्यात आलेल्या रीतीने घेण्यात येईल :

परंतु, त्या प्रकरणात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमात आलेला विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीच्या सदस्याच्या किंवा सदस्यांच्या निवडणुकीबाबतचा एखादा निर्देश हा, [५][ खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रतिनिधीच्या किंवा सदस्यांच्या] निवडणुकीबाबतचा निर्देश असल्याचे मानण्यात येईल.

(२) प्रत्येक [१][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा] एक सभापती असेल व [६][तिचे निवडून देण्यात आलेले प्रतिनिधी व सदस्य यांनी] आपल्यामधून त्यास निवडून दिलेले असेल.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १० (१) (अ)(पाच) अन्वये हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० (१) (ब) अन्वये खंड (ग) दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १० (१) (क) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १० (१) (क) (दोन) अन्वये " राज्य कृषि आणि ग्रामीण विकास बँकेच्या प्रतिनिधींच्या किंवा प्रतिनिधीच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १० (२) अन्वये " उपखंड (१) अन्वये निवडून देण्यात आलेल्या आणि पोट-कलम (१) खंड (ब) च्या उपखंड (एक अ) अन्वये नामनिर्देशित केलेल्या प्रतिनिधींनी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) प्रतिनिधीचा [१][आणि पोट-कलम (१) खालील सदस्यांच्या] निवडणुकीच्या दिनांकापासून [२][ * * * * ] १५ दिवसांच्या आत त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, सभापतीच्या निवडणुकीकरिता [३][ प्रतिनिधींची आणि * * * * सदस्यांची ] पहिली बैठक बोलावील. याप्रमाणे प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी अशा बैठकीचा अध्यक्ष राहील, मात्र त्यास मतदान करण्यचा हक्क असणार नाही.

(४) [४][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे ] पदसिध्द सदस्य सोडून इतर सदस्यांचा पदावधी पाच वर्षांचा असेल व पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून त्याचा प्रारंभ झाला असल्याचे मानण्यात येईल आणि सभापतींचा पदावधी अशा सदस्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल व त्यांचा पदावधी संपल्यावर त्यांनी आपली अधिकारपदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल.

(५) [४][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेत] निवडून आलेल्या [५][ प्रतिनिधींची, सदस्यांची ] किंवा सभापतीची जागा नैमित्तिकरीत्या रिक्त होईल त्याबाबतीत, मग ती कोणत्याही कारणाने रिक्त झालेली असो, रिक्त झाल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर अशी जागा निवडणूकीद्वारे [६][ * * * * ] भरण्यात येईल :

परंतु, [७][ अशा प्रतिनिधीचा किंवा यथास्थिति, सदस्याचा ] पदावधी संपण्याच्या दिनांकाच्या चार महिने आधी अशी जागा रिक्त झाली तर निबंधकाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, अशी रिक्त जागा भरण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, एखादी रिक्त जागा भरण्यासाठी निवडून देण्यात [८][ आलेला प्रतिनिधी, सदस्य ] किंवा सभापती [९][ * * * * ] हा त्याच्या जागी त्याला निवडून देण्यात [१०][ * * * * ] आले असेल, [८][ त्या प्रतिनिधीने, सदस्याने ] किंवा सभापतीने रिक्त झाले नसते तर किंवा सभापतीने जितक्या काळापर्यंत ते अधिकारपद धारण केले असते, तेवढ्याच काळापर्यंत ते अधिकारपद धारण करील.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १०(३) (अ) अन्वये "किंवा पोटकलम (१) खालील सदस्यांच्या नामनिर्देशिनाच्या तारखेपासून यापैकी जी नंतरची असेल त्या तारखेपासून" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १०(३) (ब) अन्वये "नामनिर्देशित" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम २(३) (ब) अन्वये "प्रतिनिधींची सभा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १०(४) (अ) अन्वये "सदस्याची, नामनिर्देशित सदस्याची" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १०(४) (ब) अन्वये "किंवा, यथास्थिती, नामनिर्देशनाद्वारे" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १०(४) (क) अन्वये "अशा सदस्याचा" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १०(४) (ड) (एक) अन्वये "आलेला सदस्य" व "त्या सदस्याने" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १०(४) (ड) (दोन) अन्वये "किंवा नामनिर्देशित सदस्य" हा मजकूर वगळण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम १०(४) (ड) (तीन) अन्वये "किंवा यथास्थिती नामनिर्देशित करण्यात" हा मजकूर वगळण्यात आला.

(६) [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेची] समिती वेळोवेळी विनिर्दिष्ट करील, अशा व्याप्तीपर्यंत व अशा प्रयोजनासाठी [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेला] यथास्थिति, स्वतःच कर्जे मंजूर करण्याचा किंवा कर्जे मंजूर करण्याबाबत [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेच्या] समितीकडे शिफारस करण्याचा अधिकार असेल, आणि ही समिती बँकेची समिती वेळोवेळी तिच्याकडे सोपवील अशी अन्य कार्येही पार पाडील.

[३][(७) कलमे ७३-एक-घ, ७३-क, ७३-चच, ७७-क, ७८ कलम १४६ चे खंड (ञ) व (ट), कलम १४७ चे खंड (ञ) व (ट), कलमे १६० (क) व १६० (ख) यांच्या तरतुदी, त्या ज्याप्रमाणे एखाद्या संस्थेच्या समितीला लागू होतात त्याचप्रमाणे योग्य त्या फेरफारांसह [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँकेला] लागू होतील.]

[४][**११२कक.** (१) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा यांमधील [५][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे] सदस्य बँकेच्या सदस्यांच्या प्रत्येक अधिसभेसाठी त्यांच्यामधून एका प्रतिनिधींची निवड करतील. मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा यामधील [५][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा] सदस्य म्हणून प्रतिनिधींची निवड करणे.

(२) कलम १४ च्या तरतुदींना अधीन राहून [५][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे], पोटकलम (१) अन्वये प्रतिनिधींची निवड करण्याच्या प्रयोजनासाठी उपविधी तयार करील.

(३) पोटकलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेला उपविधी तयार करण्याचा अधिकार हा, निबंधकाची पूर्वमान्यता घेऊन हे उपविधी तयार करण्यात येतील, या शर्तीला अधीन आहे.]

**११२ख.** (१) या अधिनियमामध्ये किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये किंवा [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,– [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे] अधिमंडळ व समिती.

(क) कलम ११२ क चे पोटकलम (१) च्या खंड (ग) व (घ) [६][आणि कलम ११२ क-क च्या पोट-कलम (१)] च्या तरतुदींअनुसार निवडून दिलेले प्रतिनिधी [७][आणि सदस्य] मिळून कलम ७२ च्या प्रयोजनार्थ [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] सदस्यांचे एक अधिमंडळ तयार होईल.

(ख) [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बहुउद्देशीय विकास बँकेची] समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :–

(एक) सर्व [२][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे] सभापती ;

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ८ अन्वये या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये "जिल्हा कर्ज समितीला" या मजकुराऐवजी व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ३ अन्वये पोट-कलम (७) जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २१ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[५] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये "कृषि व ग्रामीण विकास बँक" या मजकुराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २२(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, याच्या कलम ११ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][(दोन) जिल्हाधिकारी किंवा त्याने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी यांनी बोलाविलेल्या पहिल्या बैठकीमध्ये समितीकडून स्वीकृत करण्यात यावयाचे [2][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] सदस्यांमधील,—

(क) अनुसूचीत जाती किंवा अनुसूचित जमाती व दुर्बल घटक यामधून प्रत्येकी एक याप्रमाणे, दोन सदस्य, आणि

(ख) तीन महिला सदस्य,]

मात्र जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी यांना अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी असताना मतदान करण्याचा हक्क असणार नाही, आणि जर अशाप्रकारे सदस्याला किंवा सदस्यांना स्वीकृत करून घेण्यात समितीने कसूर केली असेल तर जिल्हाधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी अशा बैठकीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीमध्ये अशा कसूरीबाबत निबंधकाला कळवील आणि लगोलाग निबंधक त्यास असे वृत्त मिळाल्यापासून सात दिवसांच्या कालावधीमध्ये स्वीकृत केले जाण्यास पात्र असलेल्या सदस्यांमधून अशा सदस्याची किंवा सदस्यांची समितीवर नेमणूक करील ;

**स्पष्टीकरण.—** या उपखंडाच्या प्रयोजनांसाठी कलम ७३(ख) च्या स्पष्टीकरणामधील खंड (ख) आणि (ग) यांच्या तरतुदी आणि खंड (ग) अनुसार काढलेले कोणतेही आदेश या खंडाखाली स्वीकृत करावयाच्या किंवा नेमावयाच्या सदस्यांच्या बाबतीत लागू होतील.

(तीन) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा सभापती (किंवा त्याचा प्रतिनिधी)— पदसिध्द;

(चार) [2][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] कर्मचा-यांच्या मान्यताप्राप्त संघाने किंवा संघांनी अशा कर्मचा-यांमधून निवड करावयाचे दोन प्रतिनिधी [3][जेथे मान्यताप्राप्त संघ नसेल किंवा नसतील किंवा जेथे संघच नसेल तेथे कर्मचारी, त्यांच्यामधून प्रतिनिधी निवडतील या अधिनियमाच्या प्रकरण अकरा-क मधे नमूद केलेल्या रीतीने जिल्हाधिकारी निवडणूक घेईल,]

(पाच) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य (किंवा त्यांचा प्रतिनिधी)– पदसिध्द ;

(सहा) ज्याने विशेष कार्य अधिका-याचे किंवा शासनाच्या उपसचिवाच्या पदापेक्षा कमी दर्जाचे नसलेले कोणतेही अन्य पद धारण केलेले असेल असा, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयचा कृषि व सहकार विभागाचा अधिकारी,– पदसिध्द ;

(सात) [2][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा] व्यवस्थापन संचालक,– पदसिध्द, तो समितीचा सचिव म्हणूनही काम पाहील.

(२) पोटकलम (१), खंड (ख), उपखंड (एक) मध्ये निर्देशिलेले सदस्य हे [4][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे] सभापती म्हणून त्यांचा पदावधी संपण्याच्या दिनांकास, समितीचे सदस्य असण्याचे बंद होईल आणि त्यांनी आपली अधिकारपदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल आणि

---

[1] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम (३) अन्वये "राज्य कृषि आणि ग्रामीण विकास बँकेच्या" या मजकुराने सुरू होणा-या आणि "स्वीकृत करण्यात यावयाचे दोन सदस्य" या मजकुराने समाप्त होणा-या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम (८) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम (१३) अन्वये "अशा कर्मचा-यांमधून निवड करावयाचे दोन प्रतिनिधी "या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ द्वारे "जिल्हा कर्ज समितीचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

पोटकलम (१), खंड (ख) च्या उपखंड (दोन) व (चार) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांचा पदावधी हा पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या उपखंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल आणि त्याचप्रमाणे त्यांचा पदावधी समाप्त होताच ते समितीचे सदस्य असण्याचे बंद होईल आणि त्यांनी आपली अधिकारपदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल.

(३) [१][(क)] समितीचा एक सभापती [१][व एक उपसभापती] असेल, जिल्हाधिकारी किंवा त्याने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी, पोटकलम (१), खंड (ख), उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दोन सदस्यांना स्वीकृत केल्यानंतर किंवा नेमल्यानंतर १५ दिवसांच्या आत पोटकलम (१), खंड (ख), उपखंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांमधून सभापतीची [१][आणि उपसभापतीची] निवड करण्यासाठी समितीच्या सदस्यांची बैठक बोलावील आणि अशा बैठकीत जिल्हाधिकारी किंवा असा प्राधिकृत अधिकार अध्यक्षस्थानी राहील, मात्र असा अधिकारी आणि पोटकलम (१), खंड (ख), उपखंड (तीन), (चार), (पाच), (सहा) आणि (सात) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांना अशा बैठकीत मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

१९८८ चा महा. १०.

[२][(ख) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९८८, याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी किंवा त्याने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी, उपसभापतीची निवड करण्यासाठी समितीच्या सदस्यांची एक बैठक बोलावील व हा उपसभापती पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या उपखंड (एक) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या सदस्यांपैकी असेल व जिल्हाधिकारी किंवा असा प्राधिकृत अधिकारी हा त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल, परंतु असा अध्यक्षस्थानी असलेला अधिकारी व पोटकलम (१) च्या खंड (ख) चे उपखंड (तीन ते सात) यांमध्ये निर्दिष्ट केलेले सदस्य यांना अशा बैठकीत मत देण्याचा अधिकार असणार नाही. अशा रीतीने निवड करण्यात आलेला उपसभापती पोटकलम (४) च्या तरतुदींना अधीन राहून असा उपसभापती म्हणून पद धारण करील.]

**स्पष्टीकरण**.— या पोटकलमाच्या प्रयोजनांकरिता " जिल्हाधिकारी " या शब्दप्रयोगाला कलम १४४ क च्या पोटकलम (२), खंड (क) मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

(४) पोटकलम (३) च्या तरतुदींना बाध न आणता, जिल्हाधिकारी किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी सहकार वर्षाच्या समाप्तीनंतर एक महिन्याच्या आत बोलावील अशा समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये प्रत्येक वर्षी सभापतीची [३][ व उपसभातीची] निवड करण्यात येईल आणि कोणत्याही कारणामुळे निर्माण झालेली रिक्त जागा भरण्यासाठी सभापती [३][किंवा उपसभापती] निवडून देण्यात यावयाचा असेल तर जिल्हाधिकारी किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, रिक्त जागा निर्माण झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समितीची बैठक बोलावील आणि पोटकलम (३) च्या तरतुदी अशा बैठकींना योग्य त्या फेरबदलांसह लागू असतील.

पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) खाली निवडून देण्यात आलेला सभापती [३][आणि उपसभापती] सहकार वर्षाच्या समाप्तीनंतर सभापती [३][आणि उपसभापती] यांच्या निवडीसाठी भरणा-या समितीच्या बैठकीच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास सभापती [३][आणि उपसभापती] असण्याचे बंद होईल व तो आपले पद रिक्त करील.

(५) कोणत्याही कारणास्तव पोटकलम (१), खंड (ख), उपखंड (दोन) व (चार) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांची नैमित्तिक रिक्त जागा ही अशी रिक्त जागा झाल्यापासून दोन महिन्यांच्यां आत समितीने सदस्य स्वीकृत करून किंवा यथास्थिति कर्मचा-यांच्या मान्यताप्राप्त संघटनेने अथवा, अनेक संघटनांनी

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २२ (ब) अन्वये पोटकलम (३) ला उक्त पोटकलमाचा खंड (क) असा फेर क्रमांक देण्यात आला आणि "एक सभापती" या शब्दानंतर "व एक सभापती" हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २२(क) अन्वये खंड (ख) समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २२(ड) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

निवड करून भरण्यात येईल, आणि असे करण्यात समितीने किंवा यथास्थिति, अशा संघटनेने अथवा संघटनांनी कसूर केल्यास निबंधक ती रिक्त जागा नेमणुकीने भरेल :

परंतु, अशा सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकास संपत असेल त्याच्या लगतपूर्वीच्या चार महिन्यांत एखादी जागा रिक्त झाल्यास, निबंधकाने अन्यथा निदेश दिलेले नसतील तर ती रिक्त जागा भरण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, एखादी रिक्त जागा भरण्यासाठी स्वीकृत केलेला, निवड करण्यात आलेला किंवा नेमलेला सदस्य हा, ज्याच्या जागी त्यास स्वीकृत करण्यात आले असेल, त्याची निवड करण्यात आली असेल किंवा नेमणूक करण्यात आली असेल त्याची जागा रिक्त झाली नसती तर, त्या सदस्यांनी जितक्या काळपर्यंत ते अधिकारपद धारण केले असते, तेवढ्याच काळपर्यंत ते अधिकारपद धारण करील.

(६) कोणतेही अधिकारपद धारण केल्यामुळे किंवा स्वतः कर्मचारी असल्यामुळे एखादी व्यक्ती समितीचा सदस्य झाल्यास, यथास्थिति, ती त्या अधिकारपदाचा धारक असण्याचे बंद झाल्याबरोबर किंवा असा कर्मचारी असण्याचे बंद झाल्याबरोबर, समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(७) समिती, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या ] उपविधीअन्वये तिला प्रदान करण्यात येतील असे अधिकार वापरील आणि तिच्याकडे सोपविण्यात येतील अशी कामे पार पाडील.

(८) समितीच्या बैठकीतील कार्यपद्धतीविषयी त्याबाबतीत केलेले नियम किंवा उपविधी याअन्वये नेमून दिलेल्या असतील अशा इतर तरतुदींना बाध न येता, समितीच्या एकूण सदस्य संख्येच्या एकतृतीयांश इतके सदस्य हे समितीच्या कोणत्याही बैठकीच्या वेळी गणपूर्ती होण्यास पुरेसे असतील.

११२. ग. [२][* * * * * *].

विश्वस्ताची नेमणूक, अधिकार व कार्य.

११३. (१) निबंधक किंवा राज्य शासनाने या बाबतीत नेमलेली कोणतीही इतर व्यक्ती ही [३][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने]काढलेली ऋणपत्रे धारण करणाऱ्या व्यक्तींच्या संबंधातील [३][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] बंधनाचे निश्चितपणे पालन करवून घेण्याच्या प्रयोजनांकरिता विश्वस्त असेल.

(२) विश्वस्ताची नेमणूक ज्या ऋणपत्राच्या संबंधात करण्यात आली असेल त्या ऋणपत्रांचा विश्वस्त म्हणून विश्वस्ताच्या नावाचा एकमात्र निगम असेल, त्याची अखंड परंपरा राहील व त्याचा एक सामाईक शिक्का राहील आणि त्याच्या निगमाच्या नावाने त्याला आणि त्याच्याविरुद्ध दावा लावता येईल.

(३) विश्वस्ताचे अधिकार आणि कार्ये यांचे नियमन, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये आणि [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] व विश्वस्त यांच्यामध्ये निष्पादित झालेल्या न्यास संलेखात [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] व विश्वस्त यांच्या परस्पर संमतीने वेळोवेळी फेरबदल करुन करण्यात येईल.

ऋणपत्रे काढणे.

११४. (१) [४][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] म्हणून आपली कामे पार पाडतांना, [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस ] राज्य शासन आणि विश्वस्त यांच्या पूर्वमंजुरीने आणि राज्य शासन ज्या अटी व शर्ती लादील त्यांना अधीन राहून, अंशतः धारण केलेल्या किंवा अंशतः संपादन करावयाच्या, [५][ बँकेच्या नावे निर्माण करण्यात आलेल्या तारण गहाणाच्या, हमीच्या, तारणाच्या किंवा भाराच्या संलेखाच्या किंवा संपादन करावयाच्या गहाणांच्या, तारण गहाणांच्या, हमीच्या, तारणाच्या किंवा भारांच्या संलेखांच्या किंवा अंशतः गहाणांच्या किंवा उपरोक्त लेखांपैकी कोणत्याही संलेखांच्या ]

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये "राज्य कृषि आणि ग्रामीण विकास बँक" या मजकुराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २३ अन्वये कलम ११२ ग वगळण्यात आले.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये "विकास बँक" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये " कृषि आणि ग्रामीण विकास बँक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दिनांक १-१२-८७ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

गहाणांच्या आणि [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांची ] मालमत्ता व इतर मत्ता यांच्या तारणावर तिला इष्ट वाटेल त्या किंमतीची, त्या मुदतीची आणि त्या व्याजाच्या दराने ऋणपत्रे काढता येतील.

(२) प्रत्येक ऋणपत्रात ते काढण्यात आल्याच्या दिनांकापासून, ज्या कालावधीत तिचे विमोचन करता येईल असा तीस वर्षांहून अधिक न होणारा कालावधी निश्चित करण्यासंबंधीची किंवा कमीत कमी तीन महिन्यांच्या मुदतीची लेखी नोटीस देऊन ऋणपत्रासाठी निश्चित केलेल्या दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी ते विमोचित करण्याच्या अधिकार समितीकडे राखून ठेवण्यासंबंधीची अट अंतर्भूत करता येईल.

(३) [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने ] काढलेल्या ऋणपत्रांवर देय असलेली व कोणत्याही वेळी देणे बाकी असलेली एकूण रक्कम ही,—

(क) जर ऋणपत्रे, धारण केलेल्या गहाणांच्या [२][तारण गहाणाच्या, हमीच्या, तारणाच्या किंवा भाराच्या संलेखाच्या ] आधारावर काढली असतील तर, —

(एक) गहाणांबाबत [३][आणि उपरोक्तपैकी कोणत्याही किंवा सर्व संलेखांच्या बाबतीत ] देय असलेल्या रकमा ;

(दोन) कलम १२१ अन्वये, [१][जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी ] [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे ] हस्तांतरित केलेल्या किंवा हस्तांतरित केली आहे असे समजण्यात येणा-या व त्यावेळी अस्तित्वात असलेल्या मालमत्तेचे आणि इतर मत्तांचे मूल्य ; आणि

(तीन) उपरोक्त गहाणांखाली [४][आणि इतर संलेखांखाली] दिलेल्या रकमा आणि [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या ] किंवा विश्वस्ताच्या हाती त्यावेळी असलेल्या तारणरहित रकमा ; यांच्या एकूण रकमेहून अधिक असणार नाही.

(ख) जर धारण केलेल्या गहाणांच्या [५][किंवा उपरोक्त संलेखांच्या ] आधारावर अशी ऋणपत्रे न काढता ती इतर प्रकारे काढली असतील तर ऋणपत्रांवर मिळालेल्या रकमेपैकी जो भाग गहाणाच्या [६][तारण गहाणाच्या, हमीच्या, तारणाच्या किंवा भाराच्या संलेखाच्या ] कक्षेत येत नसेल त्या भागाइतकी रक्कम मिळवून खंड (क) अन्वये हिशेब करून काढलेल्या एकूण रकमेहून अधिक होणार नाही.

**११५.** पूर्ववर्ती कलमान्वये काढलेल्या ऋणपत्रांचे मुद्दल व त्यावरील व्याज किंवा त्यांचा कोणताही विनिर्दिष्ट भाग याबाबत, राज्य शासनास, ते निश्चित करील अशा कमाल रकमेपर्यंत आणि त्यास लादणे योग्य वाटेल त्या शर्तींना अधीन राहून हमी देता येईल. राज्य शासनाने हमी देणे.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४ (एक) (अ) अन्वयें हा मजकूर दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (एक) (ब) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (एक) (क) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (दोन) (अ) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (दोन) (ब) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

विश्वस्ताकडे मालमत्ता निहित होणे आणि ऋणपत्रे धारण करणा-या व्यक्तीचा मत्तेवरील भार.

**११६.** कलम ११४ च्या तरतुदीअन्वये ऋणपत्रे काढल्यानंतर, [१][तसेच संलेखाच्या कक्षेत येणा-या मालमत्तेसहित] त्या कलमाच्या पोट-कलम (३) मध्ये उल्लेखिलेली, [२][राज्य सहकारी कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँकेने] धारण केलेली गहाण मालमत्ता व इतर मत्ता विश्वस्तांकडे निहित होईल ; आणि अशा सर्व [३][गहाणांवर, संलेखांवर आणि मत्तांवर] तसेच अशा गहाणांवर [४][आणि अशा संलेखांवर] दिलेल्या व [२][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] किंवा विश्वस्तांच्या हाती राहिलेल्या रकमांवर ऋणपत्र धारण करणा-या व्यक्तींचा तरता भार राहील.

कर्जे देण्याचे व जमिनी धारण करण्याचे [२][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांचे] अधिकार.

**११७.** या अधिनियमाच्या आणि तद्न्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने कलम १११ मध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनांसाठी कर्जे देण्यास आणि या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये ज्यांचा ताबा [२][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांकडे] हस्तांतरित करण्यात आला आहे त्या जमिनी [५][किंवा ग्रामीण भागातील निवासी घरे] धारण करण्यास [२][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँका] सक्षम असतील.

**११८.** [६][* * * *]

कर्जे मंजूर करणारा आदेश विवक्षित बाबतीत निर्णायक असणे.

**११९.** जमिनीच्या फायद्यासाठी म्हणून यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कामे पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या उत्पादक हेतूसाठी [७][किंवा ग्रामीण भागातील निवासी घराच्या प्रयोजनासाठी] [२][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] किंवा उक्त बँकेच्या उपविधीअन्वये कलम १११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी कर्जे देण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्ती किंवा समिती यांनी, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर आदेशात नमूद केलेल्या व्यक्तीस किंवा तिच्या संमतीने कर्जे मंजूर करण्यासाठी, दिलेला लेखी आदेश हा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टींच्या बाबतीत म्हणजेच :–

(क) वर्णन करण्यात आलेले काम किंवा ज्या प्रयोजनांसाठी कर्ज मंजूर करण्यात आले असेल ते प्रयोजन, कलम १११ च्या अर्थांतर्गत सुधारणा किंवा यथास्थिति, उत्पादक प्रयोजन [७][किंवा ग्रामीण भागातील निवासी घराचे प्रयोजन] आहे ;

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ कलम ५(अ) अन्वये हे शब्द दि. १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ५ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दिनांक १-१२-१९८७ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २४ अन्वये कलम ११८ वगळण्यात आले.

[७] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ७(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(ख) आदेशाच्या दिनांकास त्या व्यक्तीस, अशी सुधारणा करण्याचा किंवा यथास्थिति, उत्पादक प्रयोजनासाठी [१][किंवा ग्रामीण भागातील निवासी घराच्या प्रयोजनासाठी] खर्च करण्याचा अधिकार होता ; आणि

(ग) प्रस्तुत असेल त्याप्रमाणे, करण्यात येणारी सुधारणा ही विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनीच्या [२][किंवा निवासी घराच्या] फायद्यासाठी आहे आणि उत्पादक प्रयोजन [१][किंवा ग्रामीण भागातील निवासी घराचे प्रयोजन] हे, तारण म्हणून देऊ केलेल्या जमिनीशी [२][किंवा निवासी घराशी] किंवा त्याच्या कोणत्याही भागाशी संबध्द आहे ; यांबाबत निर्णायक असेल.

**गहाणाचा अग्रक्रम.**

१२०. (१) एखाद्या [३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेल्या गहाणाला जमीन सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३ अन्वये किंवा शेतकरी कर्ज अधिनियम, १८८४ अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये गहाणखत करून दिल्यावर देण्यात आलेल्या कर्जामुळे उत्पन्न होणा-या शासनाच्या कोणत्याही दाव्यांवर अग्रक्रम राहील.

१८८३ चा १९. १८८४ चा १२.

(२) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही तत्सम कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी [३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेले ग्रहाण हे खरेदीदार कुळाचे किंवा कुळांचे हितसंबंध असणा-या जमिनीबाबतचे असेल तर असे गहाण अशा हितसंबंधाच्या तारणावर करून देता येईल आणि खरेदीदार कुळाने किंवा कुळांनी अशा कायद्यान्वये आवश्यक असलेल्या गोष्टींचे पालन न केल्यामुळे गहाणदाराच्या अधिकारांना बाध येणार नाही आणि अशा कायद्यान्वये त्या जमिनीची आणि तिच्यातील त्याच्या हितसंबंधाची विक्री ही [३][सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] अगोदरच्या भाराच्या अधीन राहील.

१९४८ चा मुंबई ६७.

**[३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेली गहाणे. [४][आणि इतर संलेख] [३][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेमध्ये] निहित असतील.**

१२१. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा तदनंतर [३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउंदेशिय विकास बँकेच्या] सदस्यांनी [३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेली गहाणे [४][तारण गहाणांचे, हमीचे, तारणाचे किंवा भाराचे संलेख व इतर लेख] आणि त्यांनी बँकेकडे हस्तांतरित केलेली इतर सर्व मत्ता ही, अशा रीतीने गहाण करून देण्याच्या किंवा हस्तांतरणाच्या दिनांकापासून अशा [३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे] हस्तांतरित केली असल्याचे समजण्यात येईल आणि ती, राज्य [३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेमध्ये] निहित होतील.

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ७(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ८(अ) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[2][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेल्या गहाणाची, भाडेपट्टा इत्यादींची नोंदणी.

[1][१२२. भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, [2][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेल्या गहाणखताची, भाडेपट्ट्याची, तारण, गहाण विलेखाची, कर्जाच्या बंधपत्राची, जामीनपत्राची, हमीच्या विलेखाची, वचनपत्राची किंवा कर्जाच्या करारनाम्याची नोंदणी करणे, हे त्या बँकेने संबंधित नोंदणी प्राधिका-याला अशा संलेखाची एक प्रत विहित करण्यात येईल अशा मुदतीच्या आत आणि अशा रीतीने पाठविलेली असेल तर आवश्यक असणार नाही आणि ती प्रत मिळाल्यावर नोंदणी प्राधिकारी ती, नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये विहित केलेल्या संबंधित पुस्तकात फाईल करील : १९०८ चा १६.

परंतु, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९८९ राजपत्रात प्रसिध्द होण्यापूर्वी, बँकेच्या नावे करून दिलेला असा कोणताही संलेख, अशा दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत संबंधित नोंदणी प्राधिका-याकडे पाठवता येईल.] १९९० चा महा. ५.

गहाणकार [3][किंवा निष्पादक] नादार झाल्यास गहाणांवर [4][आणि इतर संलेखांवर] आक्षेप न घेणे.

१२३. इलाख्या शहर नादारी अधिनियम, १९०९ किंवा प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० किंवा यात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी [2][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेल्या गहाणांच्या [5][किंवा कर्जाला पुष्टी देणा-या अन्य कोणत्याही संलेखाच्या बाबतीत] असे गहाण किंमती मोबदल्यादाखल सदभावनापूर्वक करून दिलेले नव्हते किंवा ते गहाणकाराच्या [6][किंवा संलेखाच्या निष्पादकाच्या] इतर धनकोपेक्षा बँकेस अधिमान मिळावा म्हणून करून दिले होते या कारणावरून आक्षेप घेता येणार नाही. १९०९ चा ३. १९२० चा ५.

१२४. [7][ * * * ]

---

[1] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १२२, दिनांक १-१२-१९८७ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १०(अ) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १०(क) (दोन) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १०(क) (एक) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[7] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २५ अन्वये कलम १२४ वगळण्यात आले.

१२५. (१) शेतजमिनीत किंवा लागवडीच्या पद्धतीत सुधारणा करण्यासाठी किंवा जमिनीची उत्पादनक्षमता वाढवण्याच्या इतर कोणत्याही उपायांकरीता वित्तसहाय्य देण्यासाठी, किंवा जमीन खरेदी करण्यासाठी, [२][किंवा नवीन जंगम किंवा स्थावर मत्ता निर्माण करण्यासाठी किंवा ग्रामीण भागात निवासी घर संपादन करणे, त्याचे बांधकाम करणे, पुनर्बांधकाम करणे किंवा त्याची दुरूस्ती करणे या प्रयोजनासाठी] [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] किंवा [३][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा तद्नंतर दिलेल्या कर्जाच्या संबधात, संयुक्त हिंदू कुटुंबाच्या व्यवस्थापकाने करून दिलेली गहाणे, [४][ आणि इतर संलेख] तद्विरूद्ध कोणताही कायदा असला तरी अशा संयुक्त हिंदू कुटुंबाच्या प्रत्येक व्यक्तीस बंधनकारक राहतील. संयुक्त हिंदू कुटुंबाच्या व्यवस्थापकाने करून दिलेली गहाणे [४][ आणि इतर लेख.]

(२) इतर बाबतीत, [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] किंवा [३][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा तद्नंतर करून दिलेल्या गहाणाबाबत, [५][ किंवा इतर संलेखांबाबत] असे गहाण [४][ किंवा इतर संलेख] संयुक्त हिंदू कुटुंबाच्या व्यवस्थापकाने त्या कुटुंबातील व्यक्तीस (मग त्या सज्ञान असोत वा नसोत) बंधनकारक नसलेल्या प्रयोजनासाठी करून दिले आहे या कारणास्तव आक्षेप घेण्यात आला असेल तर, तद्विरूद्ध कोणताही कायदा असला तरी ती गोष्ट सिद्ध करण्याचा भार, असे अभिकथन करणा-या पक्षकारावर राहील.

१९५६ चा ३२. १२६. हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ याचे कलम ८ हे [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे करून दिलेल्या गहाणांना [६][ किंवा इतर संलेखांना] लागू होईल, परंतु, ते अशा फेरबदलाच्या अधीन असेल की, त्यात न्यायालयाबाबत असलेला उल्लेख हा जिल्हाधिका-याबाबत किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीबाबत असलेला उल्लेख आहे असा त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल, आणि जिल्हाधिका-याच्या किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीच्या आदेशावर आयुक्ताकडे अपील करता येईल. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३२ याचे कलम ८ हे, विवक्षित फेरबदलाच्या अधीन [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय बँकांनी] करून दिलेल्या गहाणांना [५][ आणि इतर लेखांना] लागू होणे.

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ११ (अ) (दोन) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ११ (अ) (एक) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ११ (क) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये हे शब्द दिनांक १-१२-१९८७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

भाडेपट्ट्यावर निर्बंध.

**१२७.** (१) संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ यात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे] मालमत्ता, गहाण ठेवलेल्या कोणत्याही गहाणकारास अशा बँकेच्या लेखी पूर्वसंमतीने आणि बँक लादील त्या अटींना आणि शर्तींना अधीन राहून असेल त्याखेरीज, अशी कोणतीही मालमत्ता भाडेपट्ट्याने देता येणार नाही किंवा तीवर कोणतेही कुळवहीवाटीचे हक्क निर्माण करता येणार नाहीत : १८८२ चा ४.

परंतु, खरेदीदार कूळ, पट्टेदार किंवा यथास्थिति, कूळ जणू काही स्वतःच गहाणकार आहे असे समजून त्याच्याविरूद्ध [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस] आपल्या अधिकारांची अंमलबजावणी करता येईल.

(२) [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे] कब्जेगहाण म्हणून ठेवलेली जमीन कुळाच्या प्रत्यक्ष ताब्यात असेल त्याबाबतीत गहाणकार किंवा [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] असा भाडेपट्टा व गहाण चालू राहिल त्या मुदतीत कुळाने [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस] खंड देण्याबाबत नोटीस देईल, आणि अशी नोटीस दिल्यावर, त्या कुळाचे [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे] अन्यांगीकरण झाले असल्याचे समजण्यात येईल.

[१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] पैसे स्विकारणे आणि ऋणमुक्ती देणे.

**१२८.** कलम १२१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] किंवा विश्वस्त यांनी अन्यथा निदेश दिला असेल आणि तो गहाणकारास कळवला असेल ते खेरीज करून, गहाणाखाली येणे असलेला सर्व पैसा गहाणकार [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस] देईल आणि गहाणाचे अशा रीतीने हस्तांतरण करण्यात आलेले नाही असे समजून असे प्रदान हे विधिग्राह्य ठरेल आणि [१][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] किंवा विश्वस्ताने तद्विरूद्ध कोणताही विशिष्ट निदेश देऊन तो बँकेस कळवला नसेल तर, [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस] अशा गहाणाबाबत दावा लावण्याचा किंवा गहाणाखालील येणे असलेला पैसा वसूल करण्यासाठी इतर कोणतीही कार्यवाही करण्याचा हक्क राहील.

गहाण ठेवलेली मालमत्ता नष्ट झाली असेल किंवा प्रतिभूती अपुरी झाली असेल तर त्याबाबतचे [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे] अधिकार.

[२][**१२९.** [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे] गहाण ठेवलेली किंवा कोणत्याही इतर प्रकारे भारग्रस्त असलेली कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता संपूर्णपणे किंवा अंशतः नष्ट झाली असेल किंवा कोणत्याही कारणामुळे प्रतिभूती किंवा जामीन अपूरा पडला असेल, आणि ऋणकोस, सर्व प्रतिभूती किंवा यथास्थिति, जामीन पुरेशा प्रमाणात होईल, इतकी आणखी प्रतिभूती किंवा जामीन देण्याची किंवा कर्जाच्या, बँक ठरवील त्या कोणत्याही भागाची परतफेड करण्याची बँकेने वाजवी संधी दिल्यानंतर त्याने अशी प्रतिभूती किंवा जामीन देण्यात किंवा कर्जाच्या अशा भागाची परतफेड करण्यात कसूर केलेली असेल, तेव्हा, संपूर्ण कर्ज एकदम देय झाले आहे, असे समजण्यात येईल आणि त्याच्या वसुलीसाठी अशा ऋणकोविरूद्ध कलम १३२ किंवा १३३ अन्वये उपाययोजना करण्याचा बँकेस हक्क राहील.

**स्पष्टीकरण**.—जर गहाण ठेवलेल्या किंवा भारग्रस्त केलेल्या मालमत्तेची (त्यांवर केलेल्या सुधारणांसहित) किंमत, गहाणावर किंवा भारावर त्यावेळेस देय असलेल्या रकमेपेक्षा [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नियमांत, विनियमांत किंवा उपविधीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या प्रमाणापेक्षा अधिकतर होत नसेल तर, या कलमाच्या अर्थानुसार प्रतिभूती अपुरी असल्याचे समजले जाईल.]

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

**गहाण ठेवलेली मालमत्ता विकत घेण्याचा [३][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा. ]**

१३०. (१) [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी ] कलम १३३ (३) अन्वये खरेदी केलेल्या आणि कलम १०० अन्वये उक्त बँकेकडे हस्तांतरित केलेल्या मालमत्तेचा अशा बँकांना, विश्वस्ताकडून निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत विक्री करून विनियोग करता येईल. मात्र अशी विक्री, मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनीयम, १९४८ अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याअन्वये जमीन धारण करण्यास पात्र असलेल्या शेतक-यांनाच [२][ जर अशी मालमत्ता जनजातीच्या व्यक्तीच्या मालकीची असेल तर जनजातीच्या व्यक्तीलाच ] फक्त करण्यात येईल किंवा राज्य शासनाकडून वेळोवेळी घालून देण्यात येतील त्या अटींना व शर्तींना अधीन राहून, त्या बँकांना अशी मालमत्ता भाडेपट्ट्यावर देता येईल.

१९४८ चा मुंबई ६७.

[४][ **स्पष्टीकरण.**—हे पोट-कलम आणि कलम १३३ क यांच्या प्रयोजनासाठी " जनजातीची व्यक्ती" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसून संहिता, १९६६ च्या कलम ३६ च्या स्पष्टीकरणाच्या अर्थांतर्गत अनुसूचित जमातीतील व्यक्ती असा होतो आणि त्यामध्ये तिच्या हितसंबंधातील उत्तराधिका-यांचा समावेश होतो.]

१९६६ चा महा. ४१.

(२) या कलमान्वये [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी ] जमीन संपादन करण्याच्या किंवा ती धारण करण्याच्या बाबतीत शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा निश्चित करण्याबाबत त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

**[३][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी] कर्जाची वसुली करणे.**

**१३१.** [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकस बँकांनी ] दिलेली सर्व कर्जे, त्यावर आकारावयाचे सर्व व्याज (तसे व्याज असल्यास) आणि ती देताना आलेला खर्च (तसा खर्च असल्यास) देय झाल्यानंतर संबंधित [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस ] वसूल करता येईल.

**माल अटकावून ठेवण्याचा अधिकार.**

[५][ **१३२.** (१) [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या ] नावाने निष्पादित केलेले गहाणखत, तारणगहाण, कर्जबंधपत्र, जामीनखत किंवा इतर संलेख याबाबत कोणताही देय हप्ता किंवा अशा हप्त्याचा कोणताही भाग, तो ज्या दिनांकास देय झाला असेल, त्या दिनांकापासून एक महिन्यापेक्षा अधिक काळ देण्यात आला नसेल तर, अशा बँकेस, उपलब्ध असलेल्या ईतर कोणत्याही उपाययोजनेव्यतिरिक्त गहाण ठेवलेल्या किंवा अन्यथा भारग्रस्त केलेल्या जमिनीचे उत्पन्न आणि अशा जमिनी व त्यावरील मालमत्ता, त्या जमिनीवरील उभ्या पिकांसहित किंवा तारणगहाण खताखाली किंवा कर्जबंधपत्राखाली, भारग्रस्त, केलेल्या जंगम मालमत्तेसहित, अटकावून ठेवूनच आणि त्याची विक्री करून असे हप्ते किंवा त्याचे भाग वसूल करण्यासाठी निबंधकाकडे अर्ज करता येईल. असे देय हप्ते किंवा त्याचा कोणताही भाग, ऋणकोला बँकेने ज्या मालमत्तेसाठी कर्ज मंजूर केले होते, त्या मूळ जंगम मालमत्तेचे रुपांतर करून नव्याने निर्माण केलेल्या नवीन मालमत्तेची अटकावणी करून आणि विक्री करूनही वसूल करण्यायोग्य असेल.

१८८२ चा ४.

(२) असा अर्ज मिळाल्यानंतर, निबंधक, संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या उत्पन्नाची किंवा मालमत्तेची अटकावणी आणि विक्री करण्याच्या प्रयोजनार्थ विहित केलेल्या पद्धतीने कारवाई करील :

परंतु, ज्या दिनांकास हप्ता देय झाला असेल, त्या दिनांकापासून बारा महिन्यांची मुदत पूर्ण झाल्यावर अशा प्रकारे कोणतीही अटकावणी करता येणार नाही. ]

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये "कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकूराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १४ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ८ अन्वये, "विकास बँक" या मजकूराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १४ (ब) अन्वये या स्पष्टीकरणाची भर घालण्यात आली.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

गहाण ठेवलेल्या किंवा भारग्रस्त असलेल्या मालमत्तेची विक्री.

[1][१३३. (१) संपत्ती हस्तांतरण अधिनियम,१८८२ यात काहीही अंतर्भूत असले तरीही, गहाणाबाबत येणे असलेली रक्कम किंवा कर्जाची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग याची परतफेड करण्यात कसूर करण्यात आली असेल त्या बाबतीत [1][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बॅंकेस ] किंवा याबाबतीत तिने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, बँकेस उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपाययोजनेबरोबरच आणखी गहाण ठेवलेली किंवा अन्यथा भारग्रस्त असलेली मालमत्ता ज्या गावात स्थित आहे त्या गावात किंवा अगदी जवळच्या सार्वजनिक ठिकाणी, न्यायालयाच्या हस्तक्षेपाशिवाय, जाहीर लिलावाने विक्रीस काढण्याचा अधिकार असेल : १८८२ चा ४.

परंतु,—

(क) ऋणकोने किंवा ऋणकोंनी जे कोणतेही आक्षेप घेतले असतील ते ऐकून घेऊन या पोट-कलमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्याबाबत [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुद्देशीय विकास बँकेस ] पूर्वीच प्राधिकृत करण्यात आले असल्याखेरीज आणि तसे करण्यात येईपर्यंत ;

(ख) अशी ऋणांची किंवा कर्जाची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग देण्यास फर्मावणारी लेखी नोटीस,—

(एक) ऋणकोवर किंवा ऋणकोंपैकी प्रत्येकावर;

(दोन) बँकेस माहीत असेल तेथवर, अशा मालमत्तेत कोणताही हितसंबंध असणा-या किंवा तीवर किंवा अशी मालमत्ता विमोचित करण्याच्या अधिकारावर भार निर्माण केलेल्या कोणत्याही व्यक्तीवर;

(तीन) ऋण किंवा कर्ज किंवा त्याचा कोणताही भाग चुकता करण्याबाबत जामीन असलेल्या कोणत्याही जामीनदारावर;

(चार) ऋणकोच्या ज्या धनकोने आपल्या मालमत्तेच्या प्रशासनासाठी दाखल केलेल्या वादात, सबंधित मालमत्तेच्या विक्रीबाबतचा हुकूमनामा मिळवला असेल, अशा धनकोवर,

बजावण्यात आली असल्याखेरीज आणि ती बजावण्यात येईतोपर्यंत;

(ग) नोटीस बजावल्यानंतर तीन महिन्यांपर्यंत अशा ऋणाची किंवा कर्जाची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग चुकता करण्यात कसूर करण्यात आली असल्याखेरीज आणि ती करण्यात येईपर्यंत,

या पोटकलमान्वये कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही आणि अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यात येणार नाही.

(२) कलम १२९ किंवा १३२ अन्वये किंवा या कलमान्वये, कसूर करणा-या व्यक्तींविरुद्ध [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने ] कोणतीही कारवाई करण्यात कसूर केली तर, विश्वस्तास अशी कारवाई करता येईल. अशी कारवाई विश्वस्ताकडून करण्यात आली असेल तर, या प्रकरणातील किंवा विहित केलेल्या कोणत्याही नियमातील तरतुदी उक्त तरतुदीतील [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुद्देशीय विकास बँकेबाबतचे ] सर्व निर्देश हे जणू काही विश्वस्ताच्या संबंधात केलेले निर्देश आहेत, असे समजून अशा बाबतीत लागू होतील.

(३) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, या प्रकरणान्वये विकलेली कोणतीही गहाण किंवा भारग्रस्त मालमत्ता [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] खरेदी करणे, हे कायदेशीर असेल. ]

जनजातीतील व्यक्तींची गहाण किंवा भारग्रस्त मालमत्ता, कलम १३३ अन्वये जाहीर लिलावात जनजातीतर व्यक्तीला न विकणे.

[3][ १३३क. या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असणा-या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, गहाण असलेली किंवा भारग्रस्त केलेली मालमत्ता जनजातीतील व्यक्तीच्या मालकीची असते तेव्हा ती, कलम १३३ अन्वये जाहीर लिलावात, कोणत्याही जनजातीतर-बोलीदाराला विकला येणार नाही किंवा या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये जनजातीतर व्यक्तीकडे अन्यथा हस्तांतरित करता येणार नाही. ]

---

[1] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १६ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १३३ दाखल करण्यात आले.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये "कृषि व ग्रामिण विकास बँक" या मजकूराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[3] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

१३४. (१) [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने ] कलम १३३ अन्वये विक्री केल्यावर उक्त बँक, ज्या रीतीने विक्री करण्यात आली असेल ती रीत व विक्रीचा परिणाम नमूद करणारा अहवाल, विहित केलेल्या रीतीने, [२][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे ] आणि निबंधकाकडे सादर करील आणि [२][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस] निबंधकाच्या मान्यतेने, ती विक्री कायम किंवा रद्द करता येईल. विक्री कायम करणे.

(२) [२][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] किंवा विश्वस्ताने कलम १३३ अन्वये विक्री केली असेल त्याबाबतीत [२][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] किंवा यथास्थिति, विश्वस्त, ज्या रीतीने विक्री करण्यात आली असेल ती रीत व विक्रीचा परिणाम नमूद करणारा अहवाल, विहित केलेल्या रीतीने निबंधकाकडे सादर करील आणि निबंधकास, अशी विक्री कायम किंवा रद्द करता येईल.

१३५. कलम १३३ अन्वये केलेल्या आणि पुर्ववर्ती कलमान्वये कायम केलेल्या प्रत्येक विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग प्रथम, विक्रीच्या किंवा विक्री करण्याच्या प्रयत्नाच्या संबंधात आलेला सर्व परिव्यय, आकार आणि खर्च चुकता करण्यासाठी, त्यानंतर, ज्यामुळे गहाण [३][ किंवा अन्यथा भारग्रस्त] मालमत्ता विकण्यात आली अशा गहाणाच्या [४][ किंवा भारांच्या ] कारणास्तव देय झालेले कोणतेही किंवा सर्व व्याज भरण्यासाठी आणि नंतर गहाणाबाबत देय असलेली मुद्दलाची रक्कम, वसुलीच्या अनुषंगाने झालेला परिव्यय व आकारधरुन चुकती करण्यासाठी केला जाईल. विक्रीच्या उत्पनाचा विनियोग.

विक्रीच्या उत्पन्नातून कोणतीही रक्कम शिल्लक राहिल्यास, शिल्लक रक्कम, विक्री करण्यात आलेल्या मालमत्तेत आपला हितसंबंध असल्याचे ज्या व्यक्तीने सिध्द केले असेल त्या व्यक्तीस दिली जाईल ; किंवा अशा व्यक्ती एकापेक्षा अधिक असतील तर, अशी रक्कम [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] ठरवील अशा व्यक्तींना त्यांची संयुक्त पावती घेऊन किंवा त्या मालमत्तेतील त्यांच्या त्यांच्या हितसंबंधानुसार दिली जाईल :

परंतु, अशी कोणतीही रक्कम देण्यापुर्वी, —

(क) गहाणकारांकडून [५][ किंवा ऋणकोकडून ] [१] [ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस ] देय असलेल्या तारणरहित रकमा समायोजित करता येतील, आणि

(ख) गहाणकार [५][ किंवा ऋणका] ज्या कोणत्याही सदस्याचा किंवा माजी सदस्याचा ऋणी असेल त्या सदस्याकडून देय असलेल्या तारणरहित रकमा देखील अशा सदस्याने किंवा माजी सदस्याने दिलेल्या लेखी प्राधिकारान्वये आणि आवश्यक वाटत असेल अशी चौकशी केल्यानंतर, समायोजित करता येतील.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये "कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये "राज्य कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १८ (ब) अन्वये " गहाण मालमत्ता" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १८ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १८ (क) अन्वये हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आले.

खरेदीदारास प्रमाणपत्र देणे, मालमत्ता स्वाधीन करणे आणि मालकी हक्क प्रदान करणे.

**१३६.** (१) गहाण मालमत्तेची विक्री कलम १३४ अन्वये पूर्ण झाली असेल आणि [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेला] विक्रीचे उत्पन्न पूर्णपणे मिळाले असेल तेव्हा बँक, खरेदीदारास विहित नमुन्यात एक प्रमाणपत्र देईल व त्यात, विकण्यात आलेली मालमत्ता, विक्रिची किंमत, मालमत्तेच्या विक्रीचा दिनांक विक्री करण्याचेवेळी ज्या व्यक्तीस खरेदीदार म्हणून जाहीर केले असेल त्या व्यक्तीचे नाव आणि खरेदी पूर्ण झाल्याचा दिनांक नमूद करील आणि असे प्रमाणपत्र सादर केल्यावर, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये नियुक्त केलेला आणि ज्यांच्या अधिकारितेच्या मर्यादेत प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेली सर्व मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग स्थित असेल असा दुय्यम निबंधक, त्यावर मालमत्तेच्या संबंधात ठेवण्यात आलेल्या आपल्या नोंदवहीत अशा प्रमाणपत्रातील मजकुरांची नोंद करील. १९०८ चा १६.

(२) (क) विकण्यात आलेली गहाण मालमत्ता ही, गहाणकाराच्या किंवा त्याच्या वतीने एखाद्या व्यक्तीच्या किंवा गहाणकाराने [२][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] किंवा [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] नावे गहाण करून दिल्यानंतर निर्माण केलेल्या मालकी हक्कान्वये दावा सांगणा-या एखाद्या व्यक्तीच्या भोगवट्यात असेल आणि पूर्वगामी पोट-कलमान्वये त्याबाबत प्रमाणपत्र देण्यात आले असेल तर, जिल्हाधिकारी खरेदीदाराचा अर्ज आल्यावर, अशा खरेदीदारास किंवा तो आपल्या वतीने मालमत्ता कब्जात घेण्यासाठी नेमील त्या कोणत्याही व्यक्तीस त्या मालमत्तेचा कब्जा देऊन ती मालमत्ता स्वाधीन करण्याबद्दल आदेश देईल.

(ख) विकण्यात आलेली गहाण मालमत्ता ही कुळाच्या किंवा तिचा भोगवटा करण्याचा हक्क असणा-या अन्य व्यक्तीच्या भोगवट्यात असेल आणि पूर्वगामी पोट-कलमान्वये त्याबाबत प्रमाणपत्र देण्यात आले असेल तर, जिल्हाधिकारी खरेदीदाराचा अर्ज आल्यावर व अशा कुळांना व अन्य व्यक्तींना नोटीस दिल्यावर, विक्रीच्या प्रमाणपत्राची एक प्रत मालमत्तेच्या ठळक जागी लावून आणि गहाणकाराचा अशा मालमत्तेवरील अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध खरेदीदाराकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत असे एखाद्या सोईस्कर जागी, दवंडीद्वारे किंवा अन्य प्रचलित साधनाद्वारे, भोगवटदारास जाहिर करून, ती मालमत्ता स्वाधीन करण्याबाबत आदेश देईल.

(३) कलम १३३ खालील विक्री करण्याच्या अधिकाराचा वापर किंवा अभिप्रेत वापर करून जर कोणतीही मालमत्ता विकण्यात आली असेल तर अशी विक्री प्राधिकृत करण्यास आवश्यक अशी परिस्थिती निर्माण झाली नव्हती, विक्रीची वाजवी नोटीस दिली नव्हती किंवा विक्री करण्याच्या अधिकाराचा अन्यथा अयोग्य रीतीने किंवा नियमबाह्य रीतीने वापर केला होता या कारणावरून, खरेदीदाराच्या हक्कासंबंधी आक्षेप घेता येणार नाही :

परंतु, अशा अधिकाराचा अनधिकृतपणे, अयोग्यपणे किंवा नियमबाह्यपणे वापर करण्यात आल्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे नुकसान झाले असेल तर, अशा व्यक्तीस [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेविरुध्द] नुकसानभरपाईची उपाययोजना करता येईल.

निबंधकाने प्रमाणपत्र दिल्यावर कर्जाची वसुली.

**१३७.** (१) कलम ९१ आणि ९८ यांत काहीही अंतर्भूत असले तरी, [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने] आपल्या कोणत्याही सदस्यांना दिलेल्या कोणत्याही रकमेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी बँकेने अर्ज केल्यावर आणि अशा थकबाकीच्या संबंधात हिशेबाचे विवरणपत्र प्रस्तुत केल्यावर, निबंधकास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, विवरणपत्रात देय असलेली थकबाकी म्हणून जी रक्कम नमूद केली असेल त्या रकमेच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र देता येईल.

(२) देय असलेल्या थकबाकीसंबंधी निबंधकाने पोट-कलम (१) अन्वये दिलेले प्रमाणपत्र अंतिम व निर्णायक असेल. त्यात देय म्हणून नमूद करण्यात आलेली थकबाकी ही, जमीन महसुलाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार वसूल करण्यायोग्य असेल.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये "कृषि व ग्रामिण विकास बँक" किंवा "कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकूराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये "राज्य कृषि आणि ग्रामिण विकास बँकेच्या" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस ] देय असलेली थकबाकी, तीवरील व्याज आणि अशा थकबाकीच्या वसुलीसाठी आलेला कोणताही आनुषंगिक खर्च यांसह ती देण्यात येईपर्यन्त किंवा अशा थकबाकीबाबत निबंधकाचे समाधान होईल अशा प्रतिभूती देण्यात येईपर्यंत, जिल्हाधिका-याने, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ *, याच्या कलम १४० ते १४४ अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या तत्सम कायद्याद्वारे किंवा तरतुदीद्वारे प्राधिकृत केलेल्या सावधगिरीच्या उपाययोजना करणे हे कायदेशीर असेल.

१८७९ चा मुंबई ५.

(४) तसेच [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस ] देय असलेली थकबाकी, तीवरील व्याज व अशा थकबाकीच्या वसुलीसाठी आलेला कोणताही आनुषंगिक खर्च यांसह ती देण्यांत येईपर्यन्त किंवा अशा थकबाकीच्या प्रदानाबाबत निबंधकाचे समाधान होईल अशा प्रतिभूती देण्यात येईपर्यंत, गहाणकारांची मालमता सशर्त जप्त करण्याविषयी निदेश देण्यास निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती सक्षम असेल आंणि अशा मालमत्तेच्या या कलमान्वये केलेल्या किंवा करावयाच्या सशर्त जप्तीस कलम ९५ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होती.

१३८. [२][ * * * * * * ]

[३][जिल्हाधिका-याकडून केल्या जाणा-या वसुलीची पध्दत.]

(२) [१][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने याबाबत अर्ज केल्यावर अशा बँकेस (वसुलीचा खर्च धरून) देय असलेली कोणतीही रक्कम ] जिल्हाधिका-यास किंवा त्याने याबाबत विशेषरीत्या प्राधिकृत केलेल्या [४][ [१][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] अधिका-यासह ] कोणत्याही अधिका-यास पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही पध्दतीने वसूल करता येईल—

(क) कर्ज घेण्या-याकडून–ती रक्कम त्याच्याकडून देय असलेली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे ;

(ख) ज्या जमिनीच्या फायद्यासाठी कर्ज मंजूर करण्यात आले असेल त्या जमिनीबाबत देय असलेली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अशा जमिनीतून ;

(ग) (जमीनदार कोणी असल्यास) तो जणू काही जमीन महसुलाची देय थकबाकी असल्याप्रमाणे, त्याच्याकडून ;

(घ) सांपार्श्विक प्रतिभूती (तशी प्रतिभूती असल्यास) समाविष्ट असलेल्या मालमत्तेतून, ज्या जमिनीबाबत जमीन महसूल देय असेल त्या जमिनीव्यतिरिक्त इतर स्थावर मालमत्तेची विक्री करून जमीन महसूल वसूल करण्याच्या कार्यपध्दतीनुसार.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ८ अन्वये "कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २७ (अ) अन्वये पोट-कलम (१) वगळण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २७ (क) अन्वये मूळ समासटीपे ऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[४] सन १९८८चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २६ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

* आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६चा महाराष्ट्र ४१) पहा.

लिलावाद्वारे करावयाच्या विक्रीत अधिकारी किंवा त्यांच्या कुटुंबियांनी बोली न बोलणे.

[1][१३९. या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये करण्यात येणा-या जंगम किंवा स्थावर मालमत्तेच्या, कोणत्याही विक्रीच्या वेळी, [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या ] कोणत्याही अधिका-यास किंवा कर्मचा-यास किंवा अशा अधिका-याच्या किंवा कर्मचा-याच्या कुटुंबियांपैकी कोणत्याही व्यक्तीस आणि तो ज्या बँकेचा अधिकारी किंवा कर्मचारी असेल त्या बँकेच्या वतीने असेल ते खेरीज करून एरव्ही आणि अशा विक्रीच्या संबंधातील कोणतेही कर्तव्य पार पाडावयाचे असणा-या कोणत्याही व्यक्तीस अशा मालमत्तेतील कोणत्याही हितसंबंधाकरिता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या बोली बोलता येणार नाही किंवा असा हितसंबंध संपादन करता येणार नाही किंवा संपादनाचा प्रयत्न करता येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, " कुटुंबीय व्यक्ती " म्हणजे पत्नी, पती, वडील, आई, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून. ]

[2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या ] नांवे करून दिलेल्या अन्य संक्रमणास सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याचे कलम ४० लागू नसणे.

१४०. [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या ] नावे करून दिलेल्या कोणत्याही अन्य संक्रमणास मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७ याचे कलम ४० यातील किंवा राज्याच्या कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्यातील कोणताही मजकुर लागू होणार नाही. १९४७ चा मुंबई २८.

विवक्षित नुकसान भरून काढण्यासाठी हमी निधींची तरतूद.

१४१. (१) स्थावर मालमत्तेवरील जे मालकी हक्क मागाहून सदोष असल्याचे आढळून येतील अशा मालकी हक्कांच्या आधारे [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडून ] देण्यात आलेल्या कर्जाच्या परिणामी जे होऊ शकेल असे नुकसान भरून काढण्याच्या प्रयोजनासाठी किंवा या प्रकरणातील इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वेगळ्या हमी निधीची तरतूद करणे किंवा असा निधी निर्माण करणे, राज्य शासनाच्या मते आवश्यक असेल तर, राज्य शासन, त्यास योग्य वाटेल अशा अटींवर आणि शर्तींवर एका किंवा अधिक हमी निधींची स्थापना करण्यास सक्षम असेल.

(२) [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका ] आणि [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका ] अशा निधीस विहित करण्यात येईल त्या दराने अंशदान देतील आणि राज्य शासनाकडून याबाबत विहित करण्यात येतील अशा नियमांद्वारे अशा निधीची रचना, व्यवस्था आणि उपयोग या गोष्टीचे नियमन होईल.

कोणत्याही [4][संस्थेस] किंवा [5][संस्थांच्या वर्गास] [2][सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक] म्हणून काम करण्यास परवानगी देण्याचा निबंधकाचा अधिकार.

१४२. निबंधकास योग्य वाटेल अशा अटींवर आणि शर्तींवर आणि अशा कालावधीसाठी, कोणत्याही [4][ संस्थेस ] किंवा [5][ संस्थांच्या वर्गास ] [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] म्हणून काम करण्यासाठी परवानगी देण्यास निबंधक सक्षम असेल.

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५६ अन्वये हे कलम बदली दाखल करण्यात आले.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ८ अन्वये "कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकूराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये "राज्य कृषि आणि ग्रामिण विकास बँका" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५७ अन्वये " सहकारी बँकेस " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[5] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २७ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

१८८२ चा ४. **१४३.** या प्रकरणान्वये बजावावयाच्या सर्व नोटिशींच्या बाबतीत संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ याची कलमे १०२ व १०३ यांच्या तरतुदी आणि कलम १०४ अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदी, शक्य तेथवर लागू होतील. नोटीस बजावणे.

१९४२ चा मुंबई २८. [1][ **१४३ क.** (१) मुंबई जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९४२ अन्वये अंमलात आलेल्या एखादा जमीन सुधारणा योजनेत अंतर्भूत केलेली कोणतीही कामे, राज्य शासनाच्या खर्चाने किंवा अंशतः खर्चाने पार पाडण्यात आली असतील आणि असा खर्च त्या अधिनियमाच्या कलम १३ अन्वये तयार केलेल्या विवरणपत्रात किंवा कलम १३ क अन्वये तयार केलेल्या [2][ अंतरिम किंवा अंतिम विवरणपत्रात ] दर्शविल्याप्रमाणे, योजनेत अंतर्भूत केलेल्या जमिनींच्या मालकाकडून (शासनाव्यतिरिक्त) वसूल करावयाचा असेल त्याबाबतीत, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जमीन मालकाकडून असा खर्च किंवा अंशतः असा खर्च वसूल करण्याबाबतचे राज्य शासनाचे सर्व हक्क व दायित्वे अशा जमीन मालकांच्या संबंधात आणि राज्य शासन व अशी [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] यांच्यामध्ये परस्पर संमत करण्यात येतील अशा अटीच्या व शर्तीच्या (राज्य शासनाने कोणतीही हमी देण्याबाबतची कोणतीही शर्त धरून) अधीनतेने अशा [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे ] हस्तांतरित होतील व असा करार करण्याकरिता प्रत्येक जमीन मालक अशा योजनेत समाविष्ट केलेल्या त्याच्या जमिनीसंबंधीचे बँक फर्मावील असे सर्व दस्तऐवज व इतर पुरावे बँकेसमोर प्रस्तुत करील. सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ अन्वये मंजुरी दिलेल्या योजनांच्या संबंधात शासनाच्या हक्कांचे व दायित्वांचे हस्तांतरण करणे.

(२) राज्य शासनाच्या हक्कांचे व दायित्त्वांचे असे हस्तांतरण झाल्यानंतर [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] अशा करारान्वये तिने स्वीकारलेल्या दायित्त्वाच्या मर्यादेइतकी रक्कम राज्य शासनास देईल व राज्य शासन अशा हस्तांतरणाबद्दल संबंधित जमीन मालकांना कळवील आणि लागोलाग या अधिनियमाच्या व त्याखालील नियमांच्या तरतुदीत कर्ज देण्याविषयी (मालमत्ता गहाण टाकण्याविषयीची तरतूद करून) व त्याची वसुली करण्याविषयी जेथवर तरतूद केली आहे, त्या तरतुदी असा मालक हा जणू काही [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा ] सदस्य असल्याप्रमाणे कर्जे देण्याचा व (व्याज धरून) त्यांच्या वसुलीच्या बाबतीत जशा लागू होतात तशा, प्रत्येक जमीन मालकांकडून वसूल करावयाच्या खर्चाच्या रकमेच्या संबंधात लागू होतील. हक्क व दायित्वे यांचे हस्तांतरण व तद्नुसार दिलेली रक्कम यामुळे जमीन मालक, मुंबई जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९४२ अन्वये राज्य शासनास द्यावयाच्या रकमेसंबंधातील त्यांच्या दायित्त्वातून मुक्त होतील, पण त्यांची अशी मुक्तता ही बँकेने स्वीकारलेल्या त्यांच्या संबंधित दायित्वापुरतीच मर्यादित राहील. ] १९४२ चा मुंबई २८.

**१४४.** [4][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या ] समितीला [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांवर ] देखरेख ठेवण्याचा सर्वसाधारण अधिकार असेल, तसेच तिला राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने या अधिनियमाशी किंवा त्याअन्वये केलेल्या नियमाशी विसंगत नसतील असे, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी विनिमय करता येतील— [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांवर] देखरेख ठेवण्याचा व विनियम करण्याचा [4][राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या] समितीचा अधिकार.

(क) [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांची ] लेखा पुस्तके आणि त्यांच्या कामकाजाची तपासणी करणे ;

(ख) अशा बँकांनी आपल्या व्यवहाराच्या संबंधात विवरण आणि अहवाल सादर करणे ;

(ग) राज्य [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेकडे ] हस्तांतरित केलेल्या गहाणांवर [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी ] वसूल केलेल्या रकमा देण्यासंबंधी राज्य [3][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] आणि अशा बँका यांचेमधील हिशेब नियतकालाने चुकते करणे ;

(घ) अशा बँकांकडे कर्जासाठी करावयाचा अर्जाचा नमुना आणि अशा कर्जासाठी तारण म्हणून देऊ केलेल्या मालमत्तेचे मूल्यमापन करणे ;

(ङ) गहाणकारांकडून वसूल केलेला पैसा गुंतविणे ;

(च) अशा बँकांच्या कर्मचारी वर्गाच्या सेवेच्या शर्ती ;

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ अन्वये कलम १४३ क हे समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये " किंवा अंतिम विवरणपत्रात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८ अन्वये "कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये "राज्य कृषि आणि ग्रामिण विकास बँकेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(छ) कर्जे देण्यासाठी अशा बँकानी अनुसरावयाचा कार्यक्रम व धोरण ;

(ज) कर्जे देण्यासाठी अशा बँकांनी घ्यावयाच्या तारणाचे स्वरूप आणि त्याची मर्यादा ;

(झ) सर्वसाधारणपणे पक्षकारांच्या हितसंबंधाचे संरक्षण करणे, अशा बँकांच्या कार्याचे पुरःसरण आणि या प्रकरणाची प्रयोजने पार पाडणे ;

लोकहित, इत्यादीच्या दृष्टिने [2][ सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांची] पुनर्रचना, त्यांचे एकत्रीकरण किंवा विभाजन.

[1][ **१४४-एक क.** (१) या अधिनियमात किंवा त्याअन्वये केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी यांमध्ये काहीही असले तरी, एकतर सर्व किंवा [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांपैकी ] कोणत्याही [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे, ] [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांशी ] एकत्रीकरण करून किंवा अन्यथा [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांच्या ] पुनर्रचनेसाठी, किंवा आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे ] एक किंवा अधिक [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकां ] असे विभाजन करण्यासाठी, किंवा सर्व किंवा कोणत्याही [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांचे) ] आपापसात एकत्रीकरण करण्यासाठी किंवा त्यांचे विभाजन करण्यासाठी, राज्य शासनाने कलम १८ च्या तरतुदी अन्वये व तदनुसार केलेल्या आदेशाद्वारे वेळोवेळी तरतूद करणे हे विधिसंमत असेल. त्यानुसार, या कलमाच्या प्रयोजनास्तव, कलम १८ मध्ये व तदन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमामध्ये जेथे जेथे " निबंधक " हा शब्द आढळेल तेथे तेथे त्याऐवजी " राज्य शासन " हा शब्द दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(२) राज्यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात कोणतीही [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] नसेल किंवा [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका ] [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेत ] विलिन करण्यात आलेल्या असतील त्याबाबतीत, [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस, ] आवश्यक वाटतील तेवढ्या शाखा स्थापन करून त्या चालविता येतील. तसेच ती राज्यात सर्वत्र किंवा यथास्थिती, संबंधित क्षेत्रात, [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ] म्हणून सुद्धा काम करील. हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा किंवा कोणताही सलेख यामधील [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेसंबंधातील ] कोणताही निर्देश हा संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेसंबंधीचा ] किंवा तिच्या संबंधीत शाखेसंबंधीचा निर्देश असल्याचे समजण्यात येईल किंवा कोणत्याही [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांच्या ] अभावी किंवा [2][ जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे ] किंवा बँकांचे [3][ राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेत ] विलिनीकरण झाल्याने आवश्यक असतील अशा फेरबदलांस अधीन राहून अशा निर्देशाचा अर्थ लावण्यात येईल.]

**१४४. एक ख** [4][ * * * ]

### [5][ प्रकरण अकरा-क ]

### [6][ विवक्षित संस्थांच्या समित्यांच्या व अधिकाऱ्यांच्या निवडणुका. ]

हे प्रकरण लागू होणे व व्याख्या.

**१४४क.** (१) [7][ हे प्रकरण ] [8][ फक्त कलम ७३ छ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील संस्थांच्या समित्यांवरील निवडणूकांस लागू असेल. ]

---

[1] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ४ अन्वये कलम १४४ एक-क हे समाविष्ट करण्यात आले.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, त्याच्या कलम ८ अन्वये "प्राथमिक कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये "राज्य कृषि आणि ग्रामिण विकास बँक" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २८ अन्वये कलम १४४ एक-ख वगळण्यात आले.

[5] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २० अन्वये आणि सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ अन्वये प्रकरण ११ क समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३२ अन्वये मूळ शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ३३ (अ) अन्वये "हे प्रकरण लागू होईल" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[8] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २९ (अ) अन्वये "कलम १४४ व्यतिरिक्त हे कलम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या प्रकरणातील— व्याख्या.

(क) " जिल्हाधिकारी " याचा अर्थ, संबंधित संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय ज्या स्थानिक क्षेत्रात स्थित असेल त्या स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असणारा जिल्हाधिकारी, असा होतो, [१] [ आणि त्यामध्ये, अपर जिल्हाधिका-याचा आणि या प्रकरणाखालील जिल्हाधिका-याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाकडून नियुक्ती करण्यात येईल अशा उपजिल्हाधिका-याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणा-या कोणत्याही अधिका-याचा सुद्धा समावेश होतो; ]

(ख) " निवडणूक " याचा अर्थ, विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीच्या सदस्याची किंवा सदस्यांची [२] [ किंवा अधिका-याची किंवा अधिका-यांची ] निवडणूक असा होतो ;

(ग) " विनिर्दिष्ट संस्था " याचा अर्थ, कलम ७३ छ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गांपैकी कोणत्याही प्रवर्गाची संस्था असा होतो.

**१४४ ख.** निवृत्त होणा-या सदस्याच्या किंवा सदस्यांच्या पदाची मुदत ज्या दिनांकास समाप्त होणार असेल त्या दिनांकांच्या पूर्वी शक्य होईल तेव्हा, प्रत्येक निवडणूक घेण्यात येईल. इतर कोणत्याही कारणास्तव एखादी जागा रिकामी झाली तर ती व्यवहार्य होईल तितक्या लवकर भरण्यात येईल. निवडणुका केव्हा घ्याव्यात.

**१४४ ग.** (१) अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, जिल्हाधिकारी निश्चित करील अशा दिनांकास किंवा दिनांकांस प्रत्येक निवडणूक घेण्यात येईल आणि जिल्हाधिकारी याबाबत नेमील अशा निर्वाचन अधिका-यांकडून व इतर अधिका-यांकडून त्यांच्या नियंत्रणाखाली निवडणुका घेण्यात येतील. निवडणुका पार पाडणे.

(२) एखाद्या संस्थेस कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीचा सदस्य म्हणून एखाद्या नामनिर्देशित व्यक्तीस पाठवावयाचे असेल अशा सर्व प्रकरणी, अशा नामनिर्देशित व्यक्तीच्या निवडणुकीचे कामकाज हे नामनिर्देशित व्यक्ती पाठविणा-या संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याच्या नियंत्रणाखाली चालविण्यात येईल.

(३) एखाद्या विनिर्दिष्ट संस्थेच्या उपविधीअन्वये शासनाने नामनिर्देशित केलेली किंवा वित्तव्यवस्था संस्थेने नामनिर्देशित केलेली व्यक्ती संस्थेच्या समितीची सदस्य म्हणून प्राधिकृत करण्यात आली असेल अशा सर्व प्रकरणी, अशा प्रयोजनासाठी कोणतीही निवडणूक घेणे आवश्यक असणार नाही.

(४) प्रत्येक निवडणुकीतील मतदान हे गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात येईल.

**१४४ घ.** (१) निवडणुकीसंबंधातील अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि निवडणुकीसंबंधीची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीचे प्रवास भत्ते, दैनिक भत्ते व इतर परिश्रमिक, तसे असल्यास देणे या गोष्टी धरून, कोणतीही निवडणूक घेण्याचा परिव्यय, संबंधित विनिर्दिष्ट संस्थेकडून करण्यात येईल. निवडणुका घेण्याचा खर्च.

(२) या प्रयोजनार्थ, जिल्हाधिका-यास निवडणुका पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी रक्कम त्यांच्याकडे अनामत ठेवण्याबद्दल विनिर्दिष्ट संस्थेस फर्माविता येईल. जिल्हाधिका-याकडून असा निदेश मिळाल्यापासून आठ दिवसांच्या आत, ती संस्था विनिर्दिष्ट रक्कम जिल्हाधिका-याकडे अनामत ठेवील.

(३) जिल्हाधिकारी निवडणुकीसंबंधात असलेल्या खर्चाचा हिशेब ठेवील आणि निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत, तो संबंधित संस्थेस देईल, आणि खर्च न झालेली कोणतीही शिल्लक रक्कम असल्यास, ती संस्थेस परत करील. जर खर्च अनामत रकमेपेक्षा अधिक झाला असेल तर जिल्हाधिकारी, त्यांच्याकडून निदेश मिळाल्यापासून आठ दिवसांच्या आत ती विनिर्दिष्ट करील अशी जादा रक्कम देण्याबद्दल संस्थेस फर्माविल आणि संस्था अशा निदेशांचे पालन करील.

(४) विनिर्दिष्ट संस्थेने, पूर्वोक्त अनामत रक्कम किंवा जादा रक्कम देण्यात कसूर केल्यास, जिल्हाधिका-यास, ती रक्कम तीवरील दरसाल १२ टक्के दराच्या व्याजासह जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे संस्थेकडून वसूल करता येईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३३ (ब) अन्वये हा मजकुर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २९ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

सदस्यत्वाकरिता अनर्हता.

**१४४ ङ** (१) जी कोणतीही व्यक्ती,—

[१] [ (क) (खुद्द कर्मचा-यांचीच असलेली संस्था वगळून) कोणत्याही संस्थेचा वेतनी कर्मचारी असेल किंवा राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ज्या पदावरील पदधारकास अनर्ह ठरत नसल्याचे घोषित केले असेल असे, व्यवस्थापन संचालकाचे किंवा इतर कोणतेही पद जेव्हा ती धारण करीत असेल किंवा तिची उक्त पदावर नेमणूक झाली असेल किंवा कलम ७३ खख अन्वये एखाद्या संस्थेच्या समितीवरील राखीव जागेवर निवडून येण्याचा, नेमणूक होण्याचा किंवा स्वीकृत केले जाण्याचा तिला अधिकार असेल किंवा ती अशा रीतीने निवडून आली असेल, तिची नेमणूक झाली असेल किंवा तिला स्वीकृत करून घेण्यात आले असेल त्याशिवाय, कोणत्याही संस्थेच्या अधीन कोणतेही लाभपद धारण करीत असेल ; ]

(ख) भारतीय दंड संहितेचे कलम १५३ क किंवा कलम १७१ ङ किंवा कलम १७१ च किंवा कलम ५०५ च्या पोट-कलम (२) अन्वये किंवा पोट-कलम (३) अन्वये किंवा या अधिनियमाचे कलम १४४ थ किंवा १४४ द चे पोट-कलम (२), खंड (क) खालील शिक्षापात्र अपराधाबद्दल जिला सिद्धापराध ठरविण्यात आले असेल व जिला सिद्धापराध ठरविण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा वर्षांची मुदत समाप्त झालेली नसेल ; १८६० चा ४५.

(ग) भारतातील कोणत्याही न्यायालयाकडून कोणत्याही अपराधाबद्दल जिला सिद्धापराध ठरविण्यात येऊन कमीत कमी दोन वर्षांच्या कैदेची शिक्षा झाली असेल व ती मुक्त होऊन पाच वर्षाची मुदत समाप्त झालेली नसेल ;

(घ) भ्रष्टाचाराबद्दल दोषी असल्याचे विभागाच्या आयुक्तास आढळून आले असल्यास, आयुक्ताचा निर्णय अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा वर्षांची मुदत समाप्त झालेली नसेल ;

[२] [ (घ-१) तिला दोनपेक्षा अधिक मुले असतील तर :

परंतु, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (यापुढे या खंडात ज्याचा निर्देश "अशा प्रारंभाचा दिनांक" असा करण्यात आला आहे), दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणा-या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडाअन्वये ती निरर्ह ठरणार नाही : २००१ चा महा. ३४.

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

**स्पष्टीकरण**.—या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(क) ज्या वेळी एखाद्या जोडप्याला अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(ख) "मूल" या संज्ञेत, दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही. ]

(ङ) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीद्वारे किंवा तदन्वये ती अशा रीतीने अनर्ह ठरविण्यात आली असेल तर ;

ती व्यक्ती कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीवर सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा राहण्यास अनर्ह ठरेल.

(२) पोट-कलम (१), खंड (क) च्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीस पूरक भत्ता किंवा दरवर्षी सहा हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतके, कलम ६५, पोट-कलम (२) अन्वये देय असलेले मानधन या व्यतिरिक्त कोणतेही पारिश्रमिक मिळत नसेल तर, ती व्यक्ती एखाद्या संस्थेच्या अधीन असलेले लाभपद धारण करीत असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमातील, "पूरक भत्ता" या संज्ञेचा अर्थ, उक्त पदधारक म्हणून कामे करताना वैयक्तिक खर्च भागविण्याच्या प्रयोजनार्थ पदधारकास देण्यात येतो असा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा इतर भत्ते, असा होतो.

(३) पोट-कलम (१) च्या खंड (ख) किंवा (ग) यात काहीही अंतर्भूत असले तरी, जी व्यक्ती अपराधसिद्धीच्या दिनांकास कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेची सदस्य असेल त्या व्यक्तीच्या बाबतीत, वरीलपैकी कोणत्याही एका खंडाखालील अनर्हता, उक्त दिनांकापासून तीन महिन्यांची मुदत संपेपर्यंत किंवा जर अपराधसिद्धी अथवा शिक्षादेश यांच्या संबंधात उक्त मुदतीत अपील किंवा पुनरीक्षणासाठी अर्ज सादर करण्यात आला असेल तर न्यायालयाकडून ते अपील किंवा तो अर्ज निकालात काढण्यात येईतोपर्यंत अंमलात येणार नाही.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३४ (१) अन्वये खंड (क) हा नेहमीकरिता दाखल करण्यात आला आहे, असे मानण्यात आले. व्यावृत्तीसाठी कलम ३४ (२) पहा.

[२] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, याच्या कलम १० अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

**१४४ च.** (१) निवडणुकीतील प्रत्येक उमेदवार, निवडणुकीच्या संबंधात केलेल्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवील. निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब, त्याची कमाल मर्यादा व हिशेब सादर करणे.

(२) हिशेबामध्ये विहित करण्यात येईल असा तपशील असेल.

(३) उक्त एकूण खर्च, राज्य शासन, राजपत्रातील सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक होणार नाही.

(४) निवडणूक लढविणारा प्रत्येक उमेदवार, निवडून आलेल्या उमेदवाराच्या निवडणुकीच्या दिनांकापासून किंवा निवडणुकीमध्ये एकपेक्षा अधिक निवडून आलेले उमेदवार असतील व त्यांच्या निवडणुकींचे दिनांक वेगवेगळे असतील, तर उक्त दोन दिनांकापैकी नंतरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, आपल्या निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करील. हा हिशेब, त्याने पोट-कलम (१) अन्वये ठेवलेल्या हिशेबाची खरी प्रत असेल.

[१] [ (५) प्रत्येक निर्वाचन अधिकारी, निवडणुकीच्या वेळी निवडणुकीच्या संबंधात करण्यात आलेल्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र आणि अचूक हिशेब ठेवील.

(६) हिशेबामध्ये, निवडणूक घेण्यासाठी होणाऱ्या खर्चासंबंधीच्या सर्व तपशिलांचा अंतर्भाव असेल.

(७) निवडणूक खर्चाची एकूण रक्कम, राज्य शासनाकडून, राजपत्रात सर्वसाधारण किंवा विशेष आदेश प्रसिद्ध करून विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(८) प्रत्येक निर्वाचन अधिकारी, निवडणुकीच्या वेळी निर्वाचित उमेदवारांच्या निवडणुकीच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, पोट-कलम (५) अन्वये त्याने ठेवलेल्या निवडणूक हिशेबाची सत्य प्रत असेल असा निवडणूक खर्चाचा हिशेब, यथास्थिती, जिल्हाधिकाऱ्याकडे, निबंधकाकडे किंवा संबंधित संस्थेकडे दाखल करील. जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिति, निबंधक, निर्वाचन अधिकाऱ्याकडून निवडणूक खर्चाचा हिशेब त्यास मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांचे आत, संबंधित संस्थेकडे असा निवडणूक खर्च अभिहस्तांतरित करील.

(९) निर्वाचन अधिकारी, पोट-कलम (८) मध्ये तरतूद केलेली कर्तव्ये पार पाडण्यात कसूर करीत असेल तर, तो, निवडणूक घेण्यासाठीच्या पारिश्रमिकाची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही आणि निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, निवडणुकीसाठी संस्थेकडून अग्रिम म्हणून त्याने घेतलेली सर्व रक्कम परत करण्यास देखील तो पात्र असेल :

परंतु, निर्वाचन अधिकाऱ्याविरूद्ध, निवडणूक घेण्यासाठीचे पारिश्रमिक नाकारणारा आणि निवडणूक घेण्याकरिता अग्रिम म्हणून घेतलेली रक्कम परत करण्याचा निदेश त्याला देणारा असा आदेश काढण्यापूर्वी संबंधित प्राधिकारी, त्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल. ]

**१४४ छ.** एखाद्या व्यक्तीने,— निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब सादर करण्यात कसूर केल्याबद्दल अनर्हता.

(क) पूर्ववर्ती कलमान्वये आवश्यक असेल अशा वेळात आणि अशा रीतीने, निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब सादर करण्यात कसूर केली आहे, आणि

(ख) अशा कसुरीबद्दल तिच्याकडे संयुक्तिक किंवा समर्थनीय कारण नाही,

याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांची खात्री झाल्यास, तो, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे उक्त व्यक्ती कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेची सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा अशी सदस्य राहण्यास अनर्ह असल्याचे घोषित करील, आणि अशी कोणतीही व्यक्ती, आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीकरिता अनर्ह ठरेल.

**१४४ ज.** राज्य शासनास, लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव, या प्रकरणातील कोणतीही अनर्हता दूर करता येईल किंवा अशा अनर्हतेचा कालावधी कमी करता येईल. अनर्हता दूर करणे किंवा अनर्हतेचा कालावधी कमी करणे.

**१४४ झ.** या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टी भ्रष्टाचार असल्याचे समजण्यात येईल :— भ्रष्टाचार.

(१) "लाचलुचपत" याचा अर्थ,—

(क) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे,—

(क) निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याविषयी किंवा उभे न राहण्याविषयी किंवा निवडणुकीतून उमेदवारी मागे घेण्याविषयी किंवा उमेदवारी मागे न घेण्याविषयी एखाद्या व्यक्तीस प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने, किंवा

(ख) निवडणुकीत मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी एखाद्या मतदारास प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने, किंवा

(एक) एखाद्या व्यक्तीस, निवडणुकीत अशा प्रकारे उभे राहिल्याबद्दल किंवा न राहिल्याबद्दल किंवा आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दल किंवा मागे न घेतल्याबद्दल ; किंवा

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ११ अन्वये ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

(दोन) एखाद्या मतदारास मत दिल्याबद्दल किंवा मत न दिल्याबद्दल बक्षीस म्हणून कोणतीही देणगी देणे, देऊ करणे किंवा कोणताही परितोष देण्याचे अभिवचन देणे ;

**(ख)** (क) एखाद्या व्यक्तीने, उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी किंवा न राहण्यासाठी किंवा उमेदवारी मागे घेण्यासाठी किंवा उमेदवारी मागे न घेण्यासाठी ; किंवा

(ख) कोणत्याही व्यक्तीने स्वतः किंवा दुस-या कोणत्याही व्यक्तीने मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी किंवा कोणत्याही मतदारास मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी किंवा कोणत्याही उमेंदवारास आपली उमेदवारी मागे घेण्याविषयी किंवा आपली उमेदवारी मागे न घेण्याविषयी प्रवृत्त करण्यासाठी किंवां प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्यासाठी,

प्रेरणा किंवा बक्षीस म्हणून कोणताही परितोष घेणे किंवा परितोष घेण्याविषयी करार करणे, असा होतो.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनांसाठी " परितोष " ही संज्ञा, आर्थिक परितोष किंवा पैशाच्या स्वरूपात ठरविण्यात येण्याजोगा परितोष यापुरतीच मर्यादित नाही आणि तीत बक्षीस म्हणून केलेल्या सर्व प्रकारच्या सरबराईचा व सेवायोजनाच्या सर्व प्रकारांचा समावेश होतो. परंतु, तीत कोणत्याही निवडणुकीत किंवा निवडणुकीसाठी खरोखर केलेल्या व कलम १४४ च मध्ये उल्लेखिलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात ज्यांची यथोचित रीतीने नोंद करण्यात आली आहे अशा प्रदान केलेल्या रकमांचा समावेश होत नाही.

(२) गैरवाजवी दडपण, म्हणजे उमेदवाराने, किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही निवडणूक अधिकाराचा मुक्त वापर करण्याच्या कामी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने केलेला कोणताही हस्तक्षेप किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न होय;

परंतु,—

(क) या खंडाच्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, त्यात विनिर्दिष्ट केलेली जी कोणतीही व्यक्ती,—

(एक) कोणत्याही उमेदवारास किंवा मतदारास किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीविषयी उमेदवारास किंवा मतदारास आस्था आहे अशा व्यक्तीस समाज बहिष्कृत व जाती बहिष्कृत करणे किंवा तिला जातीतून किंवा जमातीतून काढून टाकणे यांसह कोणत्याही प्रकारची इजा पोचवण्याची धमकी देईल, किंवा

(दोन) उमेदवारावर किंवा मतदारावर किंवा तो ज्या व्यक्तीविषयी आस्था बाळगतो त्या व्यक्तीवर, दैवी अवकृपा होईल किंवा तीला पाप लागेल किंवा ती अशा अवकृपेस पात्र ठरवली जाईल किंवा पापी ठरवली जाईल या गोष्टींवर विश्वास ठेवण्यास कोणत्याही उमेदवाराला किंवा मतदाराला प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील,

ती व्यक्ती, ह्या खंडाच्या अर्थांतर्गत उमेदवाराने किंवा मतदाराने निवडणूक अधिकाराचा मुक्त वापर करण्याच्या कामी हस्तक्षेप करीत असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) सार्वजनिक धोरण जाहीर करणे अथवा सार्वजनिक कृती करण्याचे अभिवचन देणे किंवा निवडणूक अधिकारात हस्तक्षेप करण्याच्या हेतूशिवाय केवळ एखाद्या कायदेशीर अधिकाराचा वापर करणे, हे या खंडाच्या अर्थांतर्गत हस्तक्षेप करणे असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवारांच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, कोणतेही वाहन किंवा गलबत, पैसे देऊन किंवा अन्य रीतीने, भाड्याने घेणे किंवा मिळविणे किंवा (स्वतः उमेदवार, त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी याव्यतिरिक्त) इतर कोणत्याही मतदारास कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा अशा केंद्रापासून मोफत ने-आणीसाठी अशा वाहनाचा किंवा गलबताचा उपयोग करणे ;

परंतु, एखाद्या मतदाराने किंवा अनेक मतदारांनी त्यास किंवा त्यांना अशा कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा मतदान केंद्रापासून ने-आणीच्या प्रयोजनासाठी त्याच्या किंवा त्यांच्या सामाईक खर्चाने एखादे वाहन किंवा गलबत भाड्याने घेणे हे या खंडान्वये भ्रष्टाचाराचे कृत्य समजले जाणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणत्याही मतदाराने अशा कोणत्याही मतदान केंद्राकडे जाण्याच्या किंवा मतदान केंद्रापासून येण्याच्या प्रयोजनासाठी स्वतःच्या खर्चाने, कोणतेही सार्वजनिक वाहतुकीचे बाह्न्य किंवा गलबत किंवा कोणताही रेल्वेचा डबा यांचा उपयोग करणे हे या खंडान्वये भ्रष्टाचाराचे कृत्य समजले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या खंडात आणि लगत पुढच्या खंडात " वाहन " या संज्ञेचा अर्थ, रस्त्यावरील वाहतुकीच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणलेले किंवा उपयोगात आणणे शक्य असलेले कोणतेही वाहन, असा होतो— मग ते यांत्रिक शक्तीने चालणारे असो किंवा अन्य रितीने चालणारे असो-आणि ते इतर वाहने ओढण्याकरिता वापरण्यात येत असो किंवा अन्य रीतीने वापरण्यात येत असो.

(४) कोणत्याही निवडणुकीच्या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट संस्थेच्या मालकीच्या वाहनाचा वापर.

(५) कलम १४४ च चे उल्लंघन करून खर्च करणे किंवा खर्च प्राधिकृत करणे.

(६) निवडणुकीसंबंधीच्या कार्यक्रमाच्या घोषणेचा दिनांक आणि निवडणुकीच्या निकालाचा दिनांक या दरम्यानच्या काळात कोणत्याही मतदारास किंवा मतदारांच्या गटास विशेष आगाऊ कर्जे देणे किंवा त्यावर अन्यथा अनुग्रह करणे.

मतदानाची गुप्तता राखणे.

**१४४ ञ.** (१) एखाद्या निवडणुकीत मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्या संबंधातील कोणतेही कर्तव्य पार पाडीत असेल असा प्रत्येक अधिकारी, लिपिक, अभिकर्ता, किंवा इतर व्यक्ती, मतदानासंबंधी गुप्तता राखील अणि ती राखण्यास सहाय्य करील आणि त्याने किंवा त्या व्यक्तीने (कोणत्याही कायद्याने किंवा कायद्यान्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता असेल त्याव्यतिरिक्त) ज्यामुळे अशा गुप्तेतेचा भंग होईल अशी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीस कळविणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिध्दीनंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकांमधील अधिकारी, इत्यादींनी उमेदवारांसाठी काम न करणे किंवा मतदानाबाबत दडपण न आणणे.

**१४४ ट.** (१) जी कोणतीही व्यक्ती, निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असेल किंवा निवडणुकीच्या संबंधात कोणतेही कर्तव्य पार पाडण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांजकडून नेमण्यात आलेला एखादा अधिकारी किंवा लिपिक असेल अशी व्यक्ती, निवडणुकी घेत किंवा घेण्याची व्यवस्था करीत असताना, उमेदवाराच्या निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढविण्यासाठी कोणतेही कृत्य (मत देण्याखेरीज इतर) करणार नाही.

(२) वर निर्दिष्ट केलेली अशी कोणतीही व्यक्ती आणि पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती,—

(क) निवडणुकीत आपले मत देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(ख) निवडणुकीत आपले मत न देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(ग) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीच्या मतदानावर कोणत्याही रीतीने दडपण आणण्याचा प्रयत्न करणार नाही.

(३) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिध्दीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(४) पोट-कलम (३) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई.

**१४४ ठ.** (१) कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मतदान केंद्रात ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकास मतदान घेण्यात येईल त्या दिनांकास किंवा दिनांकांस मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्रापासून १०० मीटर अंतरातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पुढील कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करणार नाही :-

(क) मते मिळविण्यासाठी प्रचार करणे ; किंवा

(ख) कोणत्याही मतदारास मत देण्याची विनंती करणे ; किंवा

(ग) कोणत्याही विशिष्ट उमेदवारास मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे ; किंवा

(घ) निवडणुकीत मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे ; किंवा

(ङ) निवडणुकीसंबंधी कोणतीही नोटीस किंवा चिन्ह (अधिकृत नोटिशीखेरीज इतर) प्रदर्शित करणे ;

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिध्दीनंतर अडीचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

मतदान केंद्रामध्ये किंवा मतदान केंद्राजवळ बेशिस्त वर्तणूक केल्याबद्दल शास्ती.

**१४४ ड.** (१) कोणत्याही व्यक्तीने, ज्या दिनांकास किंवा दिनांकांस कोणत्याही मतदान केंद्रात मतदान घेण्यात येईल त्या दिनांकास किंवा दिनांकांस मतदानाकरीता मतदान केंद्रावर येणा-या कोणत्याही व्यक्तीस त्रास होईल किंवा मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिका-यांच्या व इतर व्यक्तींच्या कामात हस्तक्षेप होईल अशा रीतीने,-

(क) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यांसारखे, मनुष्याचा आवाज मोठा करण्यासाठी किंवा तो पुन्हा निर्माण करण्यासाठी कोणतेही साधन वापरणार नाही किंवा उपयोगात आणणार नाही ; किंवा

(ख) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, ओरडणार नाही किंवा इतर प्रकारे बेशिस्त रीतीने वागणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील किंवा त्यांचे उल्लंघन करण्यास जाणूनबुजून मदत करील किंवा अपप्रेरणा देईल तिला, अपराध सिध्दीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) जर एखाद्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षास एखादी व्यक्ती ह्या कलमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने केला आहे असे सकारण वाटत असेल तर त्यास, अशा व्यक्तीस अटक करण्याबद्दल कोणत्याही पोलीस अधिका-यास निदेश देता येईल आणि लागोलाग तो पोलीस अधिकारी उक्त व्यक्तीस अटक करील.

(४) कोणत्याही पोलीस अधिका-यास, पोट-कलम (१) च्या तरतुदीच्या कोणत्याही उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी वाजवीरित्या आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील व अशा बलाचा वापर करता येईल आणि अशा उल्लंघनाकरिता वापरण्यात आलेले कोणतेही साधन जप्त करता येईल.

मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती.

**१४४ ढ.** (१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रात मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळेमध्ये गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर, त्या व्यक्तीस, मतदान केंद्राध्यक्षाकडून किंवा कामावरील कोणत्याही पोलिस अधिका-यांकडून किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तींकडून मतदान केंद्रातून काढून टाकता येईल.

(२) ज्या मतदारास मतदान केंद्रात मतदान करण्याचा अन्यथा हक्क असेल अशा कोणत्याही मतदारास, उक्त केंद्रात मतदान करण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करता येणार नाही.

(३) जर मतदान केंद्रातून अशा रीतीने घालवून देण्यात आलेली कोणतीही व्यक्ती मतदान केंद्राध्यक्षाच्या परवानगीशिवाय मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश करील तर, तिला अपराध सिध्दीनंतर, तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(४) पोट-कलम (३) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

**१४४ ण.** निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात कलम १४४ झ, खंड (३) किंवा (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही भ्रष्टाचाराचे कृत्य केल्याबद्दल दोषी असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अपराध सिध्दीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

निवडणुकांत बेकायदेशीर रीतीने वाहने भाड्याने घेणे किंवा मिळविणे या बद्दल शास्ती.

**१४४ त.** (१) हे कलम लागू असलेली जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही वाजवी कारणाशिवाय आपल्या कर्तव्याचा भंग होईल असे एखादे कृत्य केल्याबद्दल किंवा न केल्याबद्दल दोषी असेल तिला अपराध सिध्दीनंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

निवडणुकीच्या संबंधातील अधिकृत कर्तव्याचा भंग.

(२) पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

(३) वर म्हटल्याप्रमाणे असे कोणतेही कृत्य केल्यामुळे किंवा न केल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल अशा कोणत्याही व्यक्तीविरूध्द कोणताही वाद किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(४) हे कलम लागू असणा-या व्यक्ती म्हणजे निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे किंवा उमेदवारी मागे घेणे किंवा निवडणुकीच्या वेळी मतनोंदणी किंवा मतमोजणी करणे यासंबंधातील कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही व्यक्ती होत, आणि या कलमाच्या प्रयोजनार्थ " अधिकृत कर्तव्य " या शब्दप्रयोगाचा अर्थ, तद्नुसार लावण्यात येईल. परंतु, त्यात या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये असेल त्या खेरीज अन्यथा लादण्यात आलेल्या कर्तव्यांचा समावेश होणार नाही.

**१४४ थ.** (१) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, मतदान केंद्राबाहेर मतपत्रिका लबाडीने घेऊन जाईल किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करील किंवा असे कृत्य करण्यास जाणूनबुजून मदत करील किंवा असे कृत्य करण्यास अपप्रेरणा देईल तिला अपराध सिध्दीनंतर, एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

मतदान केंद्रावरुन मतपत्रिका बाहेर नेणे हा अपराध असणे.

(२) जर कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे एखाद्या मतदान केंद्राध्यक्षास सकारण वाटत असेल तर, अशा अधिका-यास, अशा व्यक्तीस, तिने मतदान केंद्र सोडण्यापूर्वी अटक करता येईल किंवा तिला अटक करण्याविषयी पोलीस अधिका-यास निदेश देता येईल आणि अशा व्यक्तीची झडती घेता येईल किंवा पोलीस अधिका-याकडून तिची झडती घेवविता येईल :

परंतु, जेव्हा एखाद्या स्त्रीची झडती घेण्याची आवश्यकता असेल तेव्हा सदर झडती दुस-या स्त्रीकडून सभ्यतेचे दक्षतापूर्वक पालन करून घेण्यात येईल.

(३) अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची झडती घेण्यात आल्यावर तिच्याजवळ कोणतीही मतपत्रिका सापडल्यास, ती मतदान केंद्राध्यक्ष सुरक्षित अभिरक्षेसाठी पोलीस अधिका-याच्या स्वाधीन करील, किंवा सदर झडती पोलीस अधिका-याकडून घेण्यात आली असेल तेव्हा असा अधिकारी, अशी मतपत्रिका सुरक्षित अभिरक्षेत ठेवील.

(४) पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

इतर अपराध व त्यांबद्दलच्या शास्ती.

**१४४ द.** (१) कोणत्याही निवडणुकीच्या वेळी पुढीलपैकी कोणतेही कृत्य करणारी कोणतीही व्यक्ती, निवडणुकीबाबतच्या अपराधाबद्दल दोषी असेल,—

(क) कोणतेही नामनिर्देशनपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे ; किंवा

(ख) निवडणूक निर्णय अधिका-याच्या प्राधिकाराद्वारे किंवा तदन्वये लावलेली कोणतीही यादी, नोटीस किंवा इतर कागदपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे, किंवा ते काढून टाकणे, किंवा

(ग) कोणतेही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह किंवा ओळख पटवून देण्याबाबतचे प्रतिज्ञापन किंवा डाकेने मतपत्रिका पाठविण्यासंबंधात वापरलेले अधिकृत पाकीट लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे ; किंवा

(घ) योग्य प्राधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीस मतपत्रिका पुरविणे किंवा कोणत्याही व्यक्तीकडून मतपत्रिका स्वीकारणे किंवा कोणतीही मतपत्रिका जवळ बाळगणे ; किंवा

(ङ) मतपेटीत जी मतपत्रिका टाकण्याचा कायद्याने अधिकार असेल त्या मतपत्रिकेव्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तू लबाडीने तीत टाकणे; किंवा

(च) निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्यावेळी उपयोगात आणलेल्या कोणत्याही मतपेट्यांचा किंवा मतपत्रिकांचा योग्य प्राधिकारावाचून नाश करणे किंवा त्या घेऊन जाणे किंवा उघडणे किंवा त्यात इतर रीतीने हस्तक्षेप करणे; किंवा

(छ) लबाडीने किंवा यथास्थिति, योग्य प्राधिकारावाचून कोणतीही पूर्वोक्त कृत्ये करण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी कृत्ये करण्यास जाणूनबुजून मदत करणे किंवा अशी कृत्ये करण्यास अपप्रेरणा देणे.

(२) या कलमान्वये निवडणुकीबाबतच्या अपराधाबद्दल दोषी असलेली कोणतीही व्यक्ती,—

(क) जर ती निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणुकीच्या संबंधातील कोणत्याही अधिकृत कामावर नेमलेला इतर कोणताही अधिकारी, किंवा लिपिक असेल तर, तिला, अपराध सिद्धीनंतर, दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(ख) जर ती इतर कोणतीही व्यक्ती असेल तर तिला, अपराध सिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) या कलमाच्या प्रयोजनाकरिता, मतमोजणी धरुन निवडणुकीचे काम किंवा निवडणुकीच्या कामाचा भाग पार पाडताना त्यात भाग घेणे किंवा निवडणुकीनंतर अशा निवडणुकांच्या संबंधात वापरलेल्या मतपत्रिका व इतर कागदपत्रे यांच्याबद्दल जबाबदार राहणे हे एखाद्या व्यक्तीचे कर्तव्य असेल तर, ती व्यक्ती अधिकृत कामावर आहे असे मानण्यात येईल. परंतु, " अधिकृत काम " या संज्ञेत, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये असेल त्याखेरीज अन्यथा लादलेल्या कोणत्याही कामांचा समावेश होणार नाही.

(४) पोट-कलम (२) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

या प्रकरणाखालील अपराधांस विवक्षित फेरबदलांच्या अधीन, कलम १४८ लागू असणे.

**१४४ ध.** जिल्हाधिका-याच्या पूर्वमंजूरीखेरीज या प्रकरणाखालील शिक्षापात्र अपराधाबद्दल कोणताही खटला दाखल करता येणार नाही, [१] [या फेरबदलास] अधीन राहून, कलम १४८ च्या तरतुदी, या प्रकरणाखालील अपराधास लागू होतील.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१४४ न.** (१). या अधिनियमाचे कलम ९१ किंवा इतर कोणत्याही तरतुदी यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही निवडणुकीसंबंधीचा कोणताही विवाद, जेथे अशी निवडणूक घेण्यात आली असेल त्या विभागाच्या आयुक्ताकडे [१][किंवा याबाबतीत राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा अतिरिक्त विभागीय आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याकडे (या कलमात यापुढे संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे त्यांच्यापैकी प्रत्येकाला "विनिर्दिष्ट अधिकारी" असे संबोधण्यात आले आहे)] निर्देशित करण्यात येईल. निवडणुकी संबंधीचे विवाद आयुक्ताकडे [१][किंवा इतर विनिर्दिष्ट अधिका-याकडे] सादर करणे.

(२) असा विवाद निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, व्यथित पक्षकारास [२][विनिर्दिष्ट अधिका-यांकडे], निवडणूकविषयक विनंतीअर्ज सादर करून निर्देशित करता येईल :

परंतु, असा अर्जदार, उक्त मुदतीत विनंतीअर्ज सादर न केल्याबद्दलच्या वाजवी कारणासंबंधी [२][विनिर्दिष्ट अधिका-यांची] खात्री पटवून देईल तर, [२][विनिर्दिष्ट अधिका-यास] उक्त मुदत संपल्यानंतरही कोणताही विनंती अर्ज दाखल करून घेता येईल.

(३) या प्रकरणाद्वारे किंवा तदन्वये [२][विनिर्दिष्ट अधिका-यास] प्रदान करण्यात आलेली कामे पार पाडताना, त्यास पुढील गोष्टींच्या बाबतीत न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात ते अधिकार असतील,—

(क) शपथपत्राद्वारे वस्तुस्थिती सिद्ध करणे ;

(ख) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे व हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ग) दस्तऐवज शोधून काढण्यास किंवा ते सादर करण्यास भाग पाडणे ; आणि

(घ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

अशा कोणत्याही शपथपत्राच्या बाबतीत, [२][विनिर्दिष्ट अधिका-याने] याबाबत नेमलेल्या कोणत्याही अधिका-यास जबानीदारास शपथ देवविता येईल.

(४) राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, अशा कोणत्याही विनंती अर्जाची [२][विनिर्दिष्ट अधिका-याद्वारे] शक्य तितक्या त्वरेने सुनावणी केली जाईल व तो निकालात काढला जाईल. अशा विनंती अर्जावर [२][विनिर्दिष्ट अधिका-याने] दिलेला आदेश हा अंतिम व निर्णायक असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेता येणार नाही.

**१४४ प.** लगतपूर्वीच्या कलमान्वये निवडणूक विषयक विनंतीअर्ज सादर करणारा अर्जदार, अशा अर्जाच्या सुनावणीचा खर्च म्हणून आयुक्त निदेश देईल त्यानुसार रुपये ५०० पेक्षा अधिक नसेल, एवढी रक्कम अनामत ठेवील. विनंतीअर्जदाराने, उपरोक्तप्रमाणे अशी रक्कम अनामत ठेवली नाही तर, असा अर्ज संक्षिप्त चौकशी करून फेटाळण्यात येईल. विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, विनंती अर्जावर निर्णय देतेवेळी, आयुक्त अर्जाच्या सुनावणीचा खर्च निर्धारित करील व विनंतीअर्जदाराला किंवा उत्तरवादीला, किंवा यथास्थिति, दोघांनाही अशा प्रकारे ठेवलेल्या अनामत रकमेसह अर्जाच्या खर्चाची संपूर्णपणे किंवा त्याला योग्य वाटेल तेवढ्या प्रमाणात फेड करण्यास सांगण्यात येईल. आयुक्ताने अशा अर्जाच्या सुनावणीप्रीत्यर्थ शासनास द्यावयाचा खर्च म्हणून निर्धारित केलेली (परंतु कोणत्याही बाबतीत रू.५०० पेक्षा अधिक होणार नाही अशी) रक्कम शासनाच्या खाती जमा करण्यात येईल. सुनावणीच्या खर्चाबाबत ठेवावयाची अनामत रक्कम व खर्चाचा निवाडा देण्याविषयीचा अधिकार.

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ कलम ११ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) अन्वये "आयुक्त" शब्दाऐवजी हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ११ (क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

विनंती अर्जातील तपशील.

**१४४ फ.** (१) निवडणूकविषयक विनंतीअर्जामध्ये,—

(क) ज्या महत्त्वाच्या गोष्टींवर विनंतीअर्जदार विसंबत असेल त्या महत्त्वाच्या गोष्टींचे संक्षिप्त निवेदन असेल ;

(ख) विनंतीअर्जदार अभिकथन करीत असलेल्या कोणत्याही भ्रष्टाचाराच्या कृत्यांचा संपूर्ण तपशील, त्यात, असा भ्रष्टाचार ज्यांनी केला असेल असे अभिकथित असेल त्या पक्षकारांची नावे आणि असा प्रत्येक भ्रष्टाचार झाल्याचा दिनांक आणि जागा याबद्दलचे शक्य तितके संपूर्ण निवेदन दिलेले असेल ; आणि

(ग) त्यावर विनंतीअर्जदारांची सही असेल आणि वाद प्रतिवादांच्या सत्यापनासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये घालून दिलेल्या रीतीने त्यांचे सत्यापन केलेले असेल : १९०८ चा ५.

परंतु, विनंतीअर्जदाराने कोणत्याही भ्रष्टाचाराचे अभिकथन केले असेल त्या बाबतीत, अशा भ्रष्टाचाराच्या पुष्ट्यर्थ शपथपत्र व भ्रष्टाचाराचा तपशील विनंतीअर्जासोबत जोडलेला असेल.

(२) विनंती अर्जासोबतच्या अनुसूचीवर किंवा जोडपत्रावर अशा अर्जदाराने सही केलेली असेल आणि अशा अर्जाच्या बाबतीत सांगितलेल्याच रीतीने त्यांचे सत्यापन केलेले असेल.

विनंती अर्जदाराला ज्याची मागणी करता येईल, असे सहाय्य.

**१४४ ब.** विनंती अर्जदाराला सर्व निर्वाचित उमेदवारांची किंवा कोणत्याही निर्वाचित उमेदवारांची निवडणूक अवैध आहे, असे जाहीर करण्याची मागणी करण्याबरोबरच, तो स्वतः किंवा इतर कोणताही उमेदवार हा यथोचितरीत्या निवडून आला आहे, असे जाहीर करण्याचीही आणखी मागणी करता येईल.

या प्रकारणाच्या प्रयोजनासाठी नियम करण्याचा अधिकार.

**१४४ भ.** या अधिनियमात इतरत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या इतर कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता, राज्य शासनास, निवडणुकीच्या विविध अवस्थासंबंधीच्या [१] [मतदारांची यादी तयार करण्यासह] सर्व किंवा कोणत्याही इतर बाबींची सर्वसाधारणपणे तरतूद करण्यासाठी व त्यांचे नियमन करण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

विनिर्दिष्ट संस्थांच्या पदाधिका-यांच्या निवडणुकीसाठी विशेष तरतूद.

[२] [**१४४ म.** (१) हे कलम, कलम ७३ छ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांनी करावयाच्या पदाधिका-यांच्या निवडणुकीसच केवळ लागू होईल.

(२) [३] [समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीनंतर आणि आवश्यक असेल त्याबाबतीत कलम ७३ ख अन्वये राखीव जागांवर, सदस्य यथास्थिति, स्वीकृत करून घेण्यात किंवा नेमण्यात आल्यानंतर] किंवा अशी निवडणूक होणार असेल तेव्हा अशा कोणत्याही संस्थेच्या अधिका-याची किंवा अधिका-यांची निवडणूक तिच्या उपविधींमध्ये तरतूद केली असेल त्याप्रमाणे घेण्यात येईल. परंतु, या प्रयोजनासाठी समितीच्या कोणत्याही बैठकीस जिल्हाधिकारी, किंवा याबाबतीत त्याने नामनिर्दिष्ट केलेला अधिकारी अध्यक्ष म्हणून काम करील.]

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३५ अन्वये हे शब्द नेहमीकरिता दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये कलम १४४ म समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण बारा

## अपराध व शास्ती

**१४५.** (१) या अधिनियमान्वये नोंदणी झालेली किंवा नोंदणी झाली आहे असे समजण्यात येणारी संस्था आणि हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास एखादी व्यक्ती ज्या नावाने किंवा उपाधीने व्यापार करीत होती किंवा धंदा चालवीत होती, त्या नावात किंवा उपाधीत हितसंबंध असणारी कोणतीही व्यक्ती किंवा तिचा उत्तराधिकारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस "सहकारी" हा शब्द किंवा त्याचा कोणत्याही भारतीय भाषेतील पर्याय ज्या नावाचा किंवा उपाधीचा भाग असेल अशा कोणत्याही नावाखाली किंवा उपाधीखाली, राज्य शासनाच्या मंजुरीवाचून काम किंवा व्यापार करता येणार नाही, किंवा धंदा चालविता येणार नाही. "सहकारी" या शब्दाचा वापर करण्यास मनाई.

(२) पूर्ववर्ती पोटकलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणा-या प्रत्येक व्यक्तीस, अपराध सिद्धीनंतर पाचशे रुपयांपर्यन्त असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा दिली जाईल.

**१४६.** पुढील गोष्टी या अधिनियमान्वये अपराध ठरतील :— अपराध.

(क) संस्थेच्या कोणत्याही सदस्याने कलम ४७ च्या पोटकलम (२) चे उल्लंघन करून कोणतीही मालमत्ता किंवा अशा मालमत्तेतील हितसंबंध हस्तांतरीत करणे किंवा कोणत्याही व्यक्तीने अशी मालमत्ता जाणूनबुजून संपादन करणे किंवा अशा प्रकरणी संपादन करण्यास अपप्रेरणा देणे ; किंवा

(ख) कोणत्याही मालकाने किंवा अशा मालकाच्या वतीने काम करणा-या प्रत्येक संचालकाने, व्यवस्थापकाने, चिटणिसाने, किंवा अन्य अधिका-याने किंवा अभिकर्त्याने पुरेशा कारणाशिवाय कलम ४९ च्या पोटकलम (२) चे पालन करण्यास कसूर करणे ; किंवा

(ग) एखाद्या संस्थेच्या समितीने किंवा तिच्या एखाद्या अधिका-याने किंवा सदस्याने कलम ७० अन्वये आवश्यक असलेल्या रीतीने अशा संस्थेचे निधी गुंतवण्यात कसूर करणे ; किंवा

(घ) एखाद्या संस्थेची रचना होत असताना तिच्यासाठी शेअरचा पैसा गोळा करणा-या कोणत्याही व्यक्तीने वाजवी मुदतीच्या आत, तो पैसा राज्य सहकारी बँकेत किंवा मध्यवर्ती सहकारी बँकेत किंवा नागरी सहकारी बँकेत किंवा डाक बचत बँकेत जमा न करणे ; किंवा

(ङ) एखाद्या संस्थेची रचना होत असताना तिच्यासाठी भाग भांडवलाचा पैसा गोळा करणा-या कोणत्याही व्यक्तीने नोंदणी व्हावयाच्या संस्थेच्या नावाने किंवा अन्यथा कोणताही धंदा चालविण्यासाठी किंवा व्यापार करण्यासाठी अशा रीतीने उभारलेल्या निधीचा उपयोग करणे ; किंवा

[1][(ङ १) कोणत्याही व्यक्तीने नोंदणी व्हावयाच्या संस्थेच्या नावाने, सदस्यांनी किंवा भावी सदस्यांनी अपवेदनाद्वारे शेअरची रक्कम किंवा अन्य कोणतीही रक्कम किंवा संस्थेची नोंदणी झाल्यानंतर अपवेदनाद्वारे किंवा अन्यथा अशी रक्कम वसूल करणे ; किंवा

(ङ २) एखाद्या व्यक्तीने हेतुपुरस्सर कलम ७३ चच, पोटकलम (१), खंड (एक) मधील स्पष्टीकरणातील शब्दप्रयोगाच्या अर्थांतर्गत ही व्यक्ती "कसूरदार आहे" किंवा "कसूरदार नाही" अशा आशयाचे कोणत्याही नमुन्यात खोटे प्रमाणपत्र देणे ; किंवा ].

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५९ अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

(च) एखाद्या संस्थेच्या समितीने किंवा तिच्या अधिका-याने किंवा सदस्याने कलम ७५, पोटकलमे (२), (३) किंवा (४) यांच्या तरतुदींचे पालन करण्यात कसूर करणे ; किंवा

(छ) एखाद्या संस्थेबाबतची माहिती, पुस्तके व अभिलेख ताब्यात असणा-या तिच्या कोणत्याही अधिका-याने किंवा सदस्याने कलमे ७८, ८१, ८४, ९४ किंवा १०३ अन्वये राज्य शासनाने किंवा निबंधकाने नियुक्त किंवा प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशी माहिती देण्यात किंवा अशा व्यक्तीकडे अशी पुस्तके आणि कागदपत्रे प्रस्तूत करण्यात किंवा तिला सहाय्य करण्यात कसूर करणे ; किंवा

(ज) एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने तो ज्या संस्थेचा अधिकारी असेल, त्या संस्थेच्या मालकीची पुस्तके, अभिलेख, रोख रकमा, रोखे आणि इतर मालमत्ता अभिरक्षेसाठी कलम ७८ किंवा कलम १०३ अन्वये नेमलेल्या व्यक्तीकडे सोपविण्यात कसूर करणे ; किंवा

(झ) पन्नास हजार रुपये किंवा त्याहून अधिक खेळते मांडवल असलेल्या एखाद्या संस्थेच्या समितीने किंवा अशा संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने अथवा सदस्याने या अधिनियमान्वये जी कोणतीही नोटीस देणे किंवा जे कोणतेही विवरण किंवा दस्तऐवज पाठविणे किंवा जी कोणतीही गोष्ट करणे किंवा करू देणे आवश्यक असेल ती देण्यात, पाठविण्यात, करण्यात किंवा करू देण्यात किंवा कलम ७९ अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही सबबीवाचून कसूर करणे ; किंवा

(ञ) निबंधकाने किंवा याबाबत त्याने यथोचितरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जे कोणतेही कृत्य करण्याविषयी फर्माविले असेल ते कृत्य करण्यात किंवा जी कोणतीही माहिती पुरवण्याविषयी फर्माविले असेल, ती पुरविण्यात एखाद्या संस्थेच्या समितीने किंवा तिच्या अधिका-याने किंवा सदस्याने जाणूनबुजून हयगय करणे किंवा तसे करण्यास नकार देणे ; किंवा

(ट) एखाद्या संस्थेच्या समितीने किंवा तिच्या अधिका-याने किंवा सदस्याने जाणूनबुजून खोटे विवरण तयार करणे, किंवा खोटी माहिती पुरवणें किंवा योग्य हिशोब ठेवण्यात कसूर करणे ; किंवा

(ठ) एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने, सदस्याने, अभिकर्त्याने किंवा सेवकाने कलम ८१, पोटकलम (४) मधील आवश्यकतांचे पालन करण्यात कसूर करणे ; किंवा

(ड) एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने किंवा सदस्याने कलम [1][९६] अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयाचे, निवाड्याचे किंवा आदेशाचे पालन करण्यात जाणूनबुजून कसूर करणे ; किंवा

(ढ) एखाद्या संस्थेच्या सदस्याने संस्थेचा अग्रहक्क असलेल्या मालमत्तेची लबाडीने विल्हेवाट लावणे किंवा एखाद्या सदस्याने किंवा अधिका-याने किंवा कर्मचा-याने किंवा कोणत्याही व्यक्तीने संस्थेची देणी टाळण्याच्या लबाड उद्देशाने विक्री, हस्तांतरण, गहाण, देणगी याद्वारे किंवा अन्यथा आपल्या मालमत्तांची विल्हेवाट लावणे ; किंवा

(ण) एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने आपल्या स्वतःच्या वैयक्तिक उपयोगासाठी किंवा फायद्यासाठी किंवा त्याला आस्था असलेल्या एखाद्या व्यक्तीच्या उपयोगासाठी किंवा फायद्यासाठी दुस-या कोणत्याही व्यक्तीच्या नावाने जाणूनबुजून कर्ज देण्याची शिफारस करणे किंवा कर्ज मंजूर करणे ; किंवा

(त) एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने किंवा सदस्याने कोणतीही पुस्तके, कागदपत्रे किंवा कर्जरोख नष्ट करणे, त्यात खोडाखोड करणे, अनधिकृत फिरवाफिरव करणे, अन्यथा त्यात फेरफार करणे

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २८ अन्वये "९३" या आकड्याऐवजी हा आकडा दाखल करण्यात आला.

किंवा ती खोटी करणे किंवा लपवून ठेवणे किंवा अशा प्रकारे नष्ट करण्यात खोडा-खोड करण्यात, फेरफार करण्यात, खोटे करण्यात किंवा लपवून ठेवण्यात सहभागी होणे किंवा त्या संस्थेच्या मालकीच्या कोणत्याही नोंदवहीत लेखापुस्तकात किंवा दस्तऐवजात कोणतीही खोटी किंवा लबाडीची नोंद करणे किंवा असे करण्यात सहभागी होणे ; किंवा

(थ) एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने किंवा कोणत्याही व्यक्तीने नियमान्वये अपराध म्हणून जाहीर केलेले कोणतेही कृत्य करणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता, या कलमात निर्दिष्ट केलेला अधिकारी किंवा सदस्य, यांत माजी पदाधिकारी आणि यथास्थिति, माजी सदस्य यांचा समावेश होतो.

**१४७.** प्रत्येक संस्था, संस्थेचा प्रत्येक अधिकारी किंवा माजी अधिकारी, सदस्य किंवा माजी सदस्य, कर्मचारी किंवा माजी कर्मचारी किंवा इतर कोणतीही व्यक्ती कलम १४६ खाली अपराध करील, तर अपराध सिद्धीनंतर तिला तो अपराधः— कलम १४६ खालील अपराधांबद्दल शिक्षा.

(क) त्या कलमाच्या खंड (क) खालील अपराध असल्यास, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ख) त्या कलमाच्या खंड (ख) खालील अपराध असल्यास [१] [तीन वर्षांपर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ग) त्या कलमाच्या खंड (ग) खालील अपराध असल्यास, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(घ) त्या कलमाच्या खंड (घ) खालील अपराध असल्यास, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(ङ) त्या कलमाच्या खंड (ङ) खालील अपराध असल्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील ;

[२] [(ङ १) त्या कलमाच्या खंड (ङ १) खालील अपराध असल्यास, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील ;

(ङ २) त्या कलमाच्या खंड (ङ २) खालील अपराध असल्यास, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील ; ]

(च) त्या कलमाच्या खंड (च) खालील अपराध असल्यास, २५० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(छ) त्या कलमाच्या खंड (छ) खालील अपराध असल्यास, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६० (अ) अन्वये "एक महिन्यापर्यंत" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६० (ब) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

(ज) त्या कलमाच्या खंड (ज) खालील अपराध असल्यास, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(झ) त्या कलमाच्या खंड (झ) खालील अपराध असल्यास, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(ञ) त्या कलमाच्या खंड (ञ) खालील अपराध असल्यास, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ट) त्या कलमाच्या खंड (ट) खालील अपराध असल्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ठ) या कलमाच्या खंड (ठ) खालील अपराध असल्यास, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(ड) त्या कलमाच्या खंड (ड) खालील अपराध असल्यास, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ढ) त्या कलमाच्या खंड (ढ) खालील अपराध असल्यास, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ण) त्या कलमाच्या खंड (ण) खालील अपराध असल्यास, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(त) त्या कलमाच्या खंड (त) खालील अपराध असल्यास, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(थ) त्या कलमाच्या खंड (थ) खालील अपराध असल्यास, २५० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

अपराधाची दखल घेणे.

१४८. (१) [१] [महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी ] याच्या न्यायालयापेक्षा कमी दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

[२] [* * *]

[३] [(३) या अधिनियमातील कोणताही खटला निबंधकाच्या पूर्वमंजुरीशिवाय दाखल करण्यात येणार नाही. ]

सहकारी न्यायाधिकरणाचा आणि सहकारी अपील न्यायाधिकरणाचा अवमान.

[४] [१४८ क. (१) जर कोणतीही व्यक्ती,—

(क) सहकारी न्यायाधिकरणाकडून किंवा सहकारी अपील न्यायाधिकरणाकडून तसा आदेश देण्यात येईल तेव्हा कोणताही दस्तऐवज सादर करण्यात किंवा स्वाधीन करण्यात किंवा जी माहिती देणे तिच्यावर कायदेशीररीत्या बंधनकारक असेल अशी माहिती देण्यात, जाणूनबुजून कसूर करील; किंवा

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६१ (अ) अन्वये "इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६१ (ब) अन्वये पोटकलम (२) वगळण्यात आले.

[३] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १४ अन्वये पोट-कलम (३) दाखल करण्यात आले.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३७ अन्वये कलम १४८ क समाविष्ट करण्यात आले.

(ख) अशा कोणत्याही न्यायाधिकरणाकडून ख-या निवेदनासंबंधी शपथेद्वारे किंवा दृढकथनाद्वारे स्वतःस बंधन घालून घेण्याबद्दल फर्माविण्यात येईल, तेव्हा तसे करण्याचे नाकारील ;

(ग) अशा कोणत्याही न्यायाधिकरणास कोणत्याही विषयांसंबंधी सत्यकथन करण्यास कायद्याने बद्ध असताना अशा विषयाच्या संबंधातील कोणत्याही प्रश्नाच्या उत्तराची त्या न्यायाधिकरणाकडून मागणी करण्यात आल्यावर उत्तर देण्याचे नाकारील ; किंवा

(घ) अशा कोणत्याही न्यायाधिकरणाचा जाणूनबूजून कोणत्याही रीतीने अवमान करील किंवा त्याच्या न्यायिक कामकाजाच्या कोणत्याही अवस्थेत त्यात व्यत्यय आणील,

तर, त्या व्यक्तीस अपराध सिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यन्त असू शकेल, इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल, इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) सहकारी न्यायाधिकरणाकडून किंवा सहकारी अपील न्यायाधिकरणाकडून तसे फर्माविण्यात येईल, तेव्हा कोणतीही व्यक्ती आपण केलेल्या निवेदनावर सही करण्याचे नाकारील, तर तिला अपराध सिद्धीनंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल, इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) संबंधित न्यायाधिकरणाच्या देखतच किंवा त्या न्यायाधिकरणामध्येच पोट-कलम (१) किंवा (२) खालील कोणताही अपराध घडला असेल तर, उक्त न्यायाधिकरणास अपराध ज्या परिस्थितीत घडला
१९७४ असेल, ती परिस्थिती आणि [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] मध्ये तरतूद केल्याप्रमाणेच आरोपीचे
चा २. निवेदन नमूद केल्यानंतर, त्या अपराधाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिका-याकडे ते प्रकरण पाठविता येईल आणि अशा दंडाधिका-यापुढे आरोपी व्यक्ती उपस्थित राहील, याबद्दल जामीन द्यावयास भाग पाडता येईल आणि पुरेसा जामीन देण्यात आला नाही तर, उक्त न्यायालय अशा व्यक्तीस अभिरक्षेत अशा दंडाधिका-याकडे पाठवील. ज्या दंडाधिका-याकडे असे कोणतेही प्रकरण पाठविण्यात
१९७४ येईल, तो दंडाधिकारी [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] मध्ये तरतूद केलेल्या रीतीने आरोपी व्यक्तीविरुद्धच्या
चा २. तक्रारीच्या सुनावणीस प्रारंभ करील.

(४) जर कोणतीही व्यक्ती, सहकारी न्यायाधिकरण किंवा सहकारी अपील न्यायाधिकरण यावर अनुचित दडपण आणण्याच्या दृष्टीने, अशा कोणत्याही न्यायाधिकरणाचा किंवा त्याच्या सदस्यांचा दुर्लौकिक किंवा अवमान होईल किंवा न्यायाधिकरणाच्या किंवा सदस्यांच्या प्राधिकाराला कमीपणा येईल किंवा उक्त प्राधिका-याच्या कायदेशीर कामात व्यत्यय येईल, या उद्देशाने, कोणतेही कृत्य करील किंवा कोणतेही लिखाण प्रसिद्ध करील तर, अशी व्यक्ती उक्त प्राधिका-याच्या अवमानाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल.

(५) स्वतःचा अवमान झाल्याच्या बाबतीत, सहकारी अपील न्यायाधिकरण, असा अवमान ज्या परिस्थितीत झाला असेल ती परिस्थिती नमूद करील आणि त्या बाबतीत उच्च न्यायाधिकरणाकडे प्रतिवृत्त पाठवील.

(६) सहकारी न्यायाधिकरणाचा अवमान झाल्याच्या बाबतीत, सहकारी न्यायाधिकरण असा अवमान ज्या परिस्थितीत झाला असेल, ती परिस्थिती नमूद करील आणि त्यांबाबतीत सहकारी अपील न्यायाधिकरणाकडे प्रतिवृत्त पाठवील आणि लागोलाग त्या न्यायाधिकरणास तसे करणे इष्ट वाटेल तर ते न्यायाधिकरण ते प्रतिवृत्त उच्च न्यायालयाकडे पाठवील.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६२ अन्वये " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(७) पोट-कलम (५) किंवा (६) अन्वये, उच्च न्यायालयास, कोणत्याही अवमानासंबंधात कोणतीही सूचना किंवा प्रतिवृत्त मिळेल तेव्हा, उच्च न्यायालय असा अवमान हा स्वतःचा अवमान असल्याप्रमाणे त्यावर कार्यवाही करील आणि स्वतःचा अवमान झाल्याच्या बाबतीत, त्यास जी अधिकारिता, अधिकार, प्राधिकार असतील व उक्त न्यायालय त्यांचा ज्या कार्यपद्धतीनुसार व प्रथेनुसार वापर करीत असेल व करील त्याच अधिकारिता, तेच अधिकार व प्राधिकार उक्त न्यायालयास उक्त प्रकरणात असतील आणि त्याच कार्यपद्धतीनुसार व प्रथेनुसार उक्त न्यायालय उक्त प्रकरणी त्यांचा वापर करील.]

## प्रकरण तेरा

## अपिले, पुनर्विलोकन व पुनरीक्षण

महाराष्ट्र राज्य सहकारी [५] [अपील न्यायालय.]

**१४९.** [१] [(१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये न्यायालयास देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कार्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय नावाचे एक न्यायालय याद्वारे घटित करण्यात येत आहे.]

(२) असे [२] [सहकारी अपील न्यायालय ] हे अध्यक्ष आणि विहित करण्यात येतील अशा अर्हता [३] [ज्यांच्याजवळ असतील अशा व राज्य शासनाला वेळोवेळी आवश्यक वाटतील इतक्या, इतर सदस्यांचे मिळून होईल.] [४] [अध्यक्ष आणि इतर सदस्य हे विहित करण्यात येईल अशा मुदतीपर्यंत किंवा अशा निरनिराळ्या मुदतीपर्यंत पद धारण करतील. ]

(३) [२] [सहकारी अपील न्यायालयाच्या ] कोणत्याही सदस्याची रिकामी झालेली जागा राज्य शासनाकडून भरली जाईल.

[६] [(४) सहकारी अपील न्यायालयाचे सर्व किंवा कोणतेही अधिकार व कार्ये यांचा वापर करणे व ती पार पाडणे, हे अध्यक्ष ठरवील त्याप्रमाणे, न्यायालयाच्या सदस्यांपैकी कोणाही सदस्यांस एकट्याने किंवा न्यायपीठाच्या स्वरूपात करता किंवा पार पाडता येतील.]

(५) अशा न्यायपीठात दोन किंवा अधिक सदस्य असतील.

(६) [७] [न्यायपीठाच्या घटकभूत असणाऱ्या विषम संख्येतील सदस्यांनी ] एखाद्या बाबीची सुनावणी केल्यास बहुमत हे अधिभावी होईल आणि बहुमतानुसार निर्णय देण्यात येईल. सम संख्येतील सदस्यांनी सुनावणी केली असेल आणि त्यांची मते सारखी विभागली गेली असतील तेव्हा अध्यक्ष हा सदस्यांपैकी एक सदस्य असल्यास, अध्यक्षाचे मत अधिभावी होईल, आणि इतर बाबतीत ती बाब सुनावणीसाठी अध्यक्षाकडे निर्देशित केली जाईल आणि त्यांच्या निर्णयानुसार त्या बाबतीत निकाल देण्यात येईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३८ (अ) अन्वये पोटकलम (१) हे बदली दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमांच्या कलम ३८ (क) अन्वये "न्यायाधिकरण" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३८ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३८ (ई ) अन्वये "न्यायाधिकरण " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम १२ (अ) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब ) अन्वये "तीन सदस्यांनी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(७) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीच्या अधीनतेने [१] [सहकारी अपील न्यायालय] आपल्या कार्यपद्धतींचे नियमन करण्यासाठी व कामकाज निकालात काढण्यासाठी या अधिनियमांच्या व तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असे विनियम तयार करील.

(८) पोट-कलम (७) अन्वये केलेले विनियम राजपत्रात प्रसिद्ध केले जातील.

(९) [१] [सहकारी अपील न्यायालयास] ज्या कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात त्याच्याकडे अपील करण्यात आले असेल, त्या कार्यवाहीत दिलेल्या निर्णयाचा किंवा आदेशाचा कायदेशीरपणा किंवा औचित्य यांविषयी स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, अशा कार्यवाहीचा अभिलेख मागवता येईल व तपासता येईल. जर कोणत्याही प्रकरणी, अशा कोणत्याही निर्णयात किंवा आदेशात फेरबदल करण्यात यावा किंवा तो विलोपित करण्यात यावा किंवा बदलण्यात यावा असे [१] [सहकारी अपील न्यायालयास] वाटले तर त्यास [१] [सहकारी अपील न्यायालयास] त्याबाबतीत, न्याय्य वाटेल असा आदेश देता येईल.

(१०) [२] [या अधिनियमान्वये [१] [सहकारी अपील न्यायालयाकडे] अपील किंवा अर्ज करण्यात आला असेल] तेव्हा, न्यायदानाचा अंतिम हेतू विफल होऊ नये म्हणून अपिलाचा [३] [किंवा यथास्थिति, अर्जाचा] निर्णय लागेपर्यंत, त्यास न्याय्य व सोईस्कर वाटतील असे अंतर्वादिक आदेश देता येतील किंवा न्यायदानाचा अंतिम हेतू साधण्यासाठी किंवा [१] [सहकारी अपील न्यायालयाच्या] आदेशिकेचा दुरुपयोग होऊ नये म्हणून, आवश्यक असतील असे आदेश देता येतील.

(११) अपिलात किंवा पोट-कलम (९) अन्वये पुनरीक्षणात किंवा कलम १५० अन्वये पुनर्विलोकनात [१] [सहकारी अपील न्यायालयाने] दिलेला आदेश अंतिम व निर्णायक असेल व कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयात त्यावर आक्षेप घेता येणार नाही.

१९०८ चा ५. **स्पष्टीकरण**—या अधिनियमान्वये अपिलाची सुनावणी करणारे [१] [सहकारी अपील न्यायालय] दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम ९७ अन्वये आणि तिच्या प्रथम अनुसूचीतील नियमावली ४१ अन्वये अपील न्यायालयास दिलेल्या सर्व अधिकारांचा वापर करील.

१९७४ चा महा. ३. [४] [(१२) (क) महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९७३ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी काम करत असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी न्यायाधिकरणाचा अध्यक्ष आणि इतर सदस्य हे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालयाचा अनुक्रमे अध्यक्ष आणि त्याचे इतर सदस्य असल्याचे समजण्यात येईल आणि उक्त न्यायाधिकरणापुढील सर्व अनिर्णीत अपिले आणि इतर कामकाज यांची अशा प्रारंभापूर्वी ते ज्या अवस्थेपर्यंत आले असतील त्या अवस्थेपासून उक्त न्यायालयाकडून सुनावणी करण्यात येईल आणि ती निकालात काढण्यात येतील.

(ख) उक्त न्यायाधिकरणाने (दिलेले कोणतेही आदेश किंवा केलेले विनियम धरून) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, उक्त न्यायालयाने केलेली गोष्ट किंवा कृती असल्याचे समजण्यात येईल आणि तीत यथोचितरीत्या फेरबदल करण्यात येईतोपर्यंत किंवा ती विलोपित करण्यात येईतोपर्यंत अंमलात राहील.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३८ (क) अन्वये " न्यायाधिकरण " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २९ (अ) अन्वये " कलम ९७ अन्वये न्यायाधिकरणाकडे अपील करण्यात आले असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३८ (ड) अन्वये पोट-कलम (१२) जादा दाखल करण्यात आले.

(ग) त्यावेळी अंमलात असलेला कोणताही कायदा किंवा लेख यामधील उक्त न्यायाधिकरणासंबंधीच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९७३ याच्या प्रारंभापासून उक्त न्यायालयासंबंधीचा निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल. १९७४ चा महा. ३.

[1][सहकारी अपील न्यायालयाच्या] आदेशांचे पुनर्विलोकन.

१५०. (१) [1][सहकारी अपील न्यायालयास] निबंधकाने किंवा कोणत्याही हितसंबंधित पक्षकाराने अर्ज केला असता, कोणत्याही प्रकरणात आपल्या स्वतःच्या आदेशांचे पुनर्विलोकन करता येईल व त्यास अनुलक्षून त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईलः

परंतु, पुराव्याची एखादी नवीन व महत्त्वाची बाब उघडकीस आली आहे व ती तत्परता दाखवूनही अशा अर्जदारास कळणे शक्य नव्हते किंवा [1][सहकारी अपील न्यायालयाने] आदेश दिला त्यावेळी ती बाब प्रस्तुत करणे त्यास शक्य नव्हते किंवा अभिलेखावरून उघड दिसून येणारी एखादी चूक किंवा प्रमाद झालेला आहे अशी [1][सहकारी अपील न्यायालयाची] खात्री झाल्याखेरीज किंवा इतर कोणतेही पुरेसे कारण असल्याखेरीज हितसंबंधित पक्षकाराने केलेला कोणताही अर्ज दाखल करून घेता येणार नाही :

परंतु आणखी असे की, हितसंबंधित पक्षकाराने हजर होऊन अशा आदेशाच्या पुष्ट्यर्थ आपली बाजू मांडण्याविषयी नोटीस दिल्याशिवाय अशा कोणत्याही आदेशात फेरबदल करण्यात येणार नाही किंवा त्याचे पुनरीक्षण करण्यात येणार नाही.

(२) कोणत्याही पक्षकाराने पूर्वगामी पोटकलमान्वये पुनर्विलोकनासाठी करावयाचा अर्ज, [1][सहकारी अपील न्यायालयाचा] आदेश त्यास कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत करण्यात येईल.

[1][सहकारी अपील न्यायालयास] दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे.

१५१. (१) या अधिनियमांद्वारे किंवा तद्नुसार [1][सहकारी अपील न्यायालयाकडे] दिलेली कामे पार पाडताना, [1][सहकारी अपील न्यायालयास] पुढील बाबींच्या संबंधात दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील :—

(क) शपथपत्राद्वारे वस्तुस्थिती सिद्ध करणे ;

(ख) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे, तिला हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ग) दस्तऐवजांचा शोध लावण्यास किंवा ते सादर करण्यास भाग पाडणे; आणि

(घ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

(२) अशा कोणत्याही शपथपत्राच्या बाबतीत [1][सहकारी अपील न्यायालयाने] याबाबत नेमलेल्या कोणत्याही अधिका-यास जबानीदाराला शपथ देवविता येईल.

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४० अन्वये " न्यायाधिकरण " या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

१५२. (१) [१][संस्थेला भरपाई देण्यासंबंधीच्या आदेशाविरूद्ध करावयाच्या अपिलासह ] [२][कलमे ४, ९, ११, १२, १३, १४, १७, १८, १९, २१, २१क, २९, ३५, ७७क, [१][७८, ७९, ८५, ८८ व १०५ ] अन्वये ] दिलेल्या आदेशाविरूद्ध किंवा निर्णयाविरूद्ध करावयाचे अपील,— अपिले.

(क) जर असा आदेश किंवा निर्णय निबंधकाने किंवा ज्यास निबंधकाने अधिकार दिले असतील, अशा अपर निबंधकाने किंवा सहनिबंधकाने दिलेला असेल किंवा मंजूर केलेला असेल किंवा मान्य केलेला असेल तर, राज्य शासनाकडे करण्यात येईल.

(ख) जर असा आदेश किंवा निर्णय निबंधकाव्यतिरिक्त किंवा निबंधकाचे अधिकार ज्यास दिले आहेत, अशा अपर निबंधकाव्यतिरिक्त किंवा सह निबंधकाव्यतिरिक्त अन्य व्यक्तीने दिलेला असेल किंवा मंजूर केलेला असेल तर निबंधकाकडे करण्यात येईल.

[३][(२) कोणत्याही आदेशाविरूद्ध किंवा निर्णयाविरूद्ध सहकारी अपील न्यायालयाकडे अपील करण्याची या अधिनियमान्वये तरतूद करण्यात आली असेल त्या बाबतीत, असे अपील, सहकारी अपील न्यायालयाकडे करण्यात येईल. ]

(३) पोटकलम (१) किंवा (२) अन्वये करावयाचे अपील हे, आदेश किंवा निर्णय कळवल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आंत दाखल करण्यात येईल.

[४][(४) स्पष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करून, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार दिलेला कोणताही आदेश, निर्णय किंवा निवाडा याविरूद्ध कोणतेही अपील करता येणार नाही आणि असा प्रत्येक आदेश, निर्णय किंवा निवाडा हा स्पष्टपणे तरतूद केलेली असो किंवा नसो, अंतिम असेल, परंतु तो नेहमीच या अधिनियमातील पुनरीक्षणाच्या तरतुदींना अधीन असेल आणि ज्याबाबतीत अपील करण्याची तरतूद करण्यात आली असेल, त्याबाबतीत अपिलांवर दिलेला आदेश हा त्याप्रमाणेच अंतिम राहील, मात्र तो अशा पुनरीक्षणाच्या तरतुदींना अधीन राहील. ]

[५][१५२क. (१) या अधिनियमात अथवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा उपविधी यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ७३छ अन्वये किंवा त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संस्थेहून अन्य कोणत्याही संस्थेच्या समितीच्या निवडणुकीत उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत निबंधकांकडे अपिल दाखल करता येईल. निबंधक, असे अपील मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत असे अपील निकालात काढील आणि या अपिलामध्ये निबंधकाने दिलेला निर्णय अंतिम असेल व अशा निर्णयावर आणखी अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करता येणार नाही. [६][कलम ७३ छ द्वारे किंवा अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थेच्या बाबतीत, असे अपील, विभागीय आयुक्ताकडे दाखल करण्यात येईल आणि विभागीय, आयुक्त ते अपील मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत निकालात काढील आणि या अपिलामध्ये आयुक्ताने दिलेला निर्णय अंतिम असेल व अशा निर्णयावर आणखी अपील किंवा पुनरीक्षण करता येणार नाही. ] निवडणुकीत नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्यास, त्याविरूद्ध अपील करणे.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १२ (अ) अन्वये प्रारंभीचा मजकूर आणि "७८ आणि १०५" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३० अन्वये "कलम ९, १२, १३, १४, १७, १८, १९, २१, २९, ३५, ७८, आणि १०५ अन्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १२ (ब) अन्वये पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम २ अन्वये पोट-कलम (४) हे मूळ पोटकलमा ऐवजी दाखल करण्यात आले आणि उक्त पोट-कलम हे या स्वरुपात नेहमीसाठीच अधिनियमित करण्यात आले आहे, असे मानण्यात येईल.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६३ अन्वये कलम १५२ क समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) या अधिनियमात किंवा त्याखाली तयार करण्यात आलेले नियम किंवा उपविधी यांत काहीही अंतर्भूत असले तरी, कायदेशीरपणे नामनिर्देशित करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी पोट-कलम (१) खाली दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही अपिलावरील निर्णयाच्या अधीन असेल आणि नामनिर्देशनपत्रांच्या छाननीचा दिनांक व उमेदवारी मागे घेण्याचा शेवटचा दिनांक यामधील कालावधी पंधरा दिवसांपेक्षा कमी असणार नाही. ]

विवक्षित प्रकरणांत अपील प्राधिका-याने मुदत मर्यादा वाढविणे.

**१५३.** कोणत्याही निर्णयांविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध विनिर्दिष्ट मुदतीत अपील करता येईल, अशी ज्या प्रकरणात या अधिनियमान्वये तरतूद केलेली असेल, त्या सर्व प्रकरणांत अशा मुदतीत अपील दाखल न करण्यास आपणास पुरेसे कारण होते, अशी अपिलकाराने अपील प्राधिका-याची खात्री करून दिल्यास, अपील प्राधिका-यास मुदत संपल्यानंतरही असे अपील दाखल करून घेता येईल.

राज्य शासनाचे आणि निबंधकाचे पुनरीक्षणविषयक अधिकार.

[१] [**१५४.** (१) कोणत्याही दुय्यम अधिका-याने कोणताही निर्णय किंवा आदेश दिला असेल आणि असा निर्णय किंवा आदेश याविरुद्ध कोणतेही अपील करता येत नसेल, त्याबाबतीत राज्य शासनास किंवा निबंधकास स्वाधिकारे किंवा अर्ज केल्यावर अशा कोणत्याही निर्णयाचा किंवा आदेशाचा कायदेशीरपणा किंवा त्याचे औचित्य आणि अशा कार्यवाहीची नियमितता यासंबंधी स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी कलम १४९, पोट-कलम (९) मध्ये निर्दिष्ट केलेल्या असतील त्याव्यतिरिक्त कोणत्याही बाबीसंबंधीच्या कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागविता येईल आणि त्याची तपासणी करता येईल. अशा रीतीने मागवण्यात आलेला कोणताही निर्णय किंवा आदेश यामध्ये फेरबदल करावा, तो विलोपित करावा किंवा तो बदलावा, असे कोणत्याही बाबतीत राज्य शासनास किंवा निबंधकास आढळून येईल तर, राज्य शासनास किंवा यथास्थिति, निबंधकास त्याचा परिणाम झालेल्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, राज्य शासनास किंवा निबंधकास न्याय्य वाटेल असे आदेश देता येतील.

(२) या कलमान्वये निबंधकाने, अपर निबंधकाने किंवा सह निबंधकाने निर्णय किंवा आदेश दिला असल्यास, राज्य शासनाकडे आणि इतर कोणत्याही अधिका-याने तो दिला असल्यास, निबंधकाकडे पुनरीक्षणाकरिता अर्ज करता येईल.

[२] [(२क) अर्जदाराने, एकूण वसुलीयोग्य देय रकमेच्या पन्नास टक्के इतकी रक्कम संबंधित संस्थेकडे जमा केल्याखेरीज, कलम १०१ अन्वये निबंधकाने दिलेल्या वसुली प्रमाणपत्राच्या पुनरीक्षणासाठीचा कोणताही अर्ज, विचारार्थ स्वीकारला जाणार नाही. ]

(३) निर्णय किंवा आदेश कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यानंतर पुनरीक्षणासाठी कोणताही अर्ज करण्यात येईल तर, तो दाखल करून घेतला जाणार नाही. वाजवी कारणास्तव आपणास अशा मुदतीत अर्ज करता आला नाही याबद्दल अर्जदाराने पुनरीक्षण प्राधिका-याची खात्री करून दिल्यास, अशा प्राधिका-यास अशा कालावधीनंतर असा कोणताही अर्ज दाखल करून घेता येईल.

(४) राज्य शासनास, आदेशाद्वारे या कलमान्वये त्यास देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीमध्ये आणि अशा शर्ती अन्वये, तशा शर्ती असल्यास, शासनाच्या सचिवाच्या दर्जाच्या अधिका-यासही करता येईल, असा निदेश देता येईल.]

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १५४ दाखल करण्यात आले.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ५ अन्वये पोट-कलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

## [1] [प्रकरण तेरा–क

### महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद

१५४-क (१) महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद या नावाने संबोधण्यात येणारी एक परिषद असेल आणि ती, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांसह जितके सदस्य राज्य शासन वेळोवेळी निश्चित व नामनिर्देशित करील तितके सदस्य मिळून बनलेली असेल. राज्य सहकारी परिषदेची घटना, तिची कार्ये, इत्यादी.

(२) राज्य शासन, परिषदेच्या सचिवाची नेमणूक करील.

(३) पोट-कलम (१) खाली घटित करण्यात आलेल्या परिषदेची कार्ये पुढीलप्रमाणे असतील, ती अशी :—

(क) सहकारी चळवळीशी संबंधित अशा सर्व बाबींवर राज्य शासनाला सल्ला देणे ;

(ख) सहकारी चळवळीचा आढावा घेणे व राज्यातील सहकारी संस्थांच्या कार्याचा समन्वय साधण्याचे मार्ग सुचवणे ;

(ग) सहकारी संस्थांना येणा-या अडचणी दूर करण्यासाठी मार्ग व उपाय सुचवणे ;

(घ) राज्य शासन परिषदेकडे निर्देशित करील अशा सर्व बाबींवर राज्य शासनाला अहवाल देणे ;

(ङ) राज्यातील सहकारी चळवळीच्या विकासाबाबतच्या योजना व धोरणे यांची शिफारस करणे ;

(च) विशेषतः समाजातील मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग यांच्या विकासासाठी असलेल्या सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठी असलेल्या विद्यमान परियोजनांचे मूल्यांकन करणे व नवीन परियोजना सुचवणे ;

(छ) सहकारी पद्धतीद्वारे आर्थिक विकास करण्याच्या विशेष परियोजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाला सल्ला देणे ; आणि

(ज) विभागामार्फत किंवा खास स्थापन केलेल्या मंडळांमार्फत उपरोक्त कोणत्याही प्रयोजनासाठी अभ्यास करण्याचे काम हाती घेणे.

(४) राज्य शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(क) परिषदेच्या बैठकी बोलावणे व अशा बैठकींची कार्यपद्धती ;

(ख) परिषदेच्या सचिवांची कर्तव्ये ;

(ग) परिषदेच्या उपसमित्या किंवा समित्या ;

(घ) परिषदेच्या सदस्यांचा पदावधी व परिषदेच्या सदस्यांना अनुज्ञेय असलेले प्रवास व दैनिक भत्ते.]

## प्रकरण चौदा

### संकीर्ण

**१५५.** (१) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केली असेल त्याशिवाय, संस्थेकडून किंवा संस्थेचा अधिकारी, सदस्य किंवा माजी सदस्य किंवा मृत सदस्य म्हणून त्यांच्याकडून शासनाला देय असलेल्या सर्व रकमा, जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्यासाठी त्यावेळी जो कायदा व जे नियम अंमलात असतील, त्या कायद्यानुसार व त्या नियमांन्वये वसूल करता येतील. शासनास देय असलेल्या रकमांची वसुली.

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६४ अन्वये प्रकरण तेरा-क समाविष्ट करण्यात आले.

(२) संस्थेकडून शासनाला देय असलेल्या आणि पूर्वगामी पोट-कलमान्वये वसूल करता येतील अशा रकमा प्रथमतः अशा संस्थेच्या मालमत्तेतून द्वितीयतः, ज्या संस्थेच्या सदस्यांचे दायित्व मर्यादित आहे, त्या संस्थेच्या बाबतीत सदस्यांच्या दायित्वांच्या मर्यादेच्या अधीनतेने, अशा सदस्यांकडून किंवा माजी सदस्यांकडून किंवा मृत सदस्यांच्या संपदेतून आणि तृतीयतः दायित्व अमर्यादित असलेल्या संस्थेच्या बाबतीत सदस्यांकडून किंवा माजी सदस्यांकडून किंवा मृत सदस्यांच्या संपदेतून वसूल करता येतील.

(३) माजी सदस्यांचे किंवा मृत सदस्यांच्या संपदेचे दायित्व हे सर्व बाबतीत कलम ३३ च्या तरतुदीच्या अधीन असेल.

मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून विवक्षित रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार.

१५६. (१) निबंधकास किंवा त्यास दुय्यम असलेला व या बाबतीत त्याने ज्यास अधिकार प्रदान केले आहेत, अशा कोणत्याही अधिका-यास [1][किंवा या बाबतीत निबंधकाने ज्याला अधिकार प्रदान केले असतील अशा, राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल त्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-यास] राज्य शासनाकडून करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, परंतु या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद करण्यात आलेल्या वसुलीच्या कोणत्याही इतर पद्धतीस बाध येऊ न देता,—

(क) संस्थेने मिळविलेल्या दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार येणे असलेली कोणतीही रक्कम ;

(ख) निबंधक, [2][सहकारी न्यायालय] किंवा परिसमापक किंवा [2][सहकारी अपील न्यायालय] यांचा निर्णय, निवाडा किंवा आदेश याअन्वये येणे असलेली कोणतीही रक्कम ;

(ग) या अधिनियमान्वये खर्च म्हणून निवाड्याने दिलेली रक्कम ;

(घ) संस्थेच्या मत्तेस अंशदान म्हणून या अधिनियमान्वये जी रक्कम देण्यासाठी आदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही रक्कम ;

[3][(ङ) कलम १०१ च्या पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये किंवा कलम १३७ च्या पोट-कलम (१) अन्वये निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार येणे असलेली कोणतीही रक्कम ; ]

आणि अशा रकमेवर किंवा एकूण रकमेवर कोणतेही व्याज देय असल्यास, असे व्याज आणि [4][निबंधकाने वेळोवेळी घालून दिलेल्या फीच्या प्रमाणानुसारचा] आदेशिकेचा खर्च ज्या व्यक्तीविरुद्ध असा हुकूमनामा, निर्णय, निवाडा किंवा आदेश मिळविण्यात किंवा देण्यात आला असेल अशा व्यक्तीच्या मालमत्तेवर जप्ती आणून, तिची विक्री करून किंवा जप्तीशिवाय तिची विक्री करून वसूल करता येईल.

(२) निबंधक किंवा त्याने अधिकार प्रदान केलेला अधिकारी हे पूर्वगामी पोट-कलमान्वये अधिकारांचा वापर करताना किंवा अशा वसुलीसाठी त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावर कोणताही आदेश देताना
१९६३ चा ३६. [5][मुदत अधिनियम, १९६३ च्या अनुसूचीतील बाब १३६] च्या प्रयोजनाकरिता दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल.

---

[1] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम २ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४३ अन्वये अनुक्रमे " लवाद " व " न्यायाधिकरण " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३१ अन्वये खंड (ङ) समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम २ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६५ अन्वये " मुदत मर्यादा अधिनियम १९०८ याच्या प्रथम अनुसूचीतील अनुच्छेद १८२ " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आले.

**अधिनियमाच्या तरतुदींपासून संस्थांना सूट देण्याचा अधिकार.**

१५७. राज्य शासनास, [1] [* * * *] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास या अधिनियमाच्या [2] [किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या] कोणत्याही तरतुदीपासून सूट देता येईल किंवा अशा तरतुदी, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा अधिनियमांच्या किंवा नियमांच्या आशयास बाध येणार नाही अशा फेरफारानिशी अशा संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास लागू होतील, असा निदेश देता येईल :

परंतु, कोणत्याही संस्थेस बांधक ठरेल, असा कोणताही आदेश, अशा संस्थेस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावाचून काढण्यात येणार नाही.

**निबंधकाच्या अधिकारांचे [3] [विवक्षित प्राधिकरणाकडे व अधिका-यांकडे] प्रत्यायोजन.**

१५८. राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि त्यास लादणे योग्य वाटेल अशा अटींना (तशा अटी असल्यास) अधीन राहून, या अधिनियमाखालील निबंधकाच्या अधिकारांपैकी सर्व किंवा कोणतेही अधिकार त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या कोणत्याही संघीय प्राधिकरणाकडे किंवा त्याच्या एखाद्या अधिका-याकडे [6] [किंवा इतर कोणत्याही प्राधिका-याकडे] [4] [किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये रचना केलेल्या जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अधिका-याकडे प्रत्यायोजित करता येतील आणि [5] [अशी प्राधिकरणे] व जिल्हा परिषदेचे अधिकारी निबंधकाच्या सर्वसामान्य मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करतील.]

**राज्याबाहेरील संस्थांच्या शाखा, वगैरे.**

१५९. (१) निबंधकाच्या परवानगीशिवाय कोणत्याही संस्थेस महाराष्ट्र राज्याबरोबर आणि कोणत्याही कायद्यान्वये अन्य कोणत्याही राज्यात नोंदणी झालेल्या कोणत्याही सहकारी संस्थेस महाराष्ट्र राज्यात आपली कोणतीही शाखा किंवा कामकाजाचे ठिकाण उघडता येणार नाही.

(२) अन्य कोणत्याही राज्यात कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी झालेल्या आणि पूर्वगामी पोटकलमान्वये जिला महाराष्ट्र राज्यात आपली शाखा किंवा कामकाजाचे ठिकाण उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी महाराष्ट्र राज्यात जिची शाखा किंवा कामकाजाचे ठिकाण आहे अशा प्रत्येक सहकारी संस्थेने अशी शाखा, किंवा यथास्थिति, कामकाजाचे ठिकाण उघडल्यापासून किंवा या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन महिन्यांच्या आत, उपविधी व सुधारणा यांची एक प्रमाणित प्रत आणि जर असे उपविधी व सुधारणा इंग्रजी भाषेत लिहिलेल्या नसतील तर, त्यांच्या इंग्रजीतील किंवा हिंदीतील भाषांतराची एक प्रमाणित प्रत, निबंधकाकडे सादर केली पाहिजे आणि ज्या राज्यात अशा संस्थेची नोंदणी करण्यात आली असेल, त्या राज्याच्या निबंधकास सादर केलेली विवरणे व माहिती या व्यतिरिक्त आणखी महाराष्ट्र राज्यातील या अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या तत्सम संस्थांकडून जी विवरणे, माहिती सादर करण्यात येते, तशी विवरणे व माहिती निबंधकास सादर केली पाहिजे.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २२ (अ) अन्वये " राजपत्रात प्रसिद्ध करावयाचा " हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २२ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६६(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २८६ दहावी अनुसूची अन्वये हा भाग समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ६६ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६६ (क) अन्वये " संघीक प्राधिकरणाकडे " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

कागदपत्रे व मालमत्ता निवडणूक झाल्यावर नवीन सभापतीच्या स्वाधीन करणे.

**१६०.** (१) नवीन समिती व तिचा सभापती यांची निवडणूक झाल्यावर, नवीन सभापती ज्याच्या जागी निवडून आला असेल, तो मावळत्या सभापती समितीच्या कार्यालयाचा कार्यभार आणि समिती किंवा तिचा कोणताही अधिकारी यांच्या ताब्यात असलेली समितीची कागदपत्रे व मालमत्ता, तशी असल्यास, समितीच्या नवीन सभापतीच्या स्वाधीन करील.

(२) जर मावळता सभापती कार्यभार स्वाधीन करण्यात कसूर करील किंवा तसे करण्यास नकार देईल अथवा वर सांगितल्याप्रमाणे संस्थेची कागदपत्रे व मालमत्ता ही स्वाधीन करण्यात कसूर करील किंवा तसे करण्यास नकार देईल तर, निबंधकास किंवा या बाबतीत त्याने अधिकार दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस असा कार्यभार व मालमत्ता ही ताबडतोब स्वाधीन करण्याबाबत लेखी आदेशाद्वारे त्या मावळत्या सभापतीस निदेश देता येईल.

(३) ज्यास वर सांगितल्याप्रमाणे निदेश देण्यात आला आहे, अशा मावळत्या सभापतीने अशा निदेशाचे पालन केले नाही तर, त्यास अपराधसिद्धीनंतर एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील आणि मावळत्या सभापतीने अशा निदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास, निबंधकास कलम ८० मध्ये तरतूद केलेल्या रीतीने कागदपत्रे व मालमत्ता जप्त करण्यासाठी आणि ती नवीन सभापतीच्या स्वाधीन करण्यासाठी आदेश घेता येईल.

राज्य विधान मंडळाचे व विवक्षित स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य हे जर संस्थांचे पदधारक असतील तर त्यांना पारिश्रमिक न देणे.

[1] [**१६०-क.** या अधिनियमात किंवा तदन्वये केलेल्या नियमांत किंवा उपविधींत काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य विधानमंडळाच्या सदस्यास किंवा हैद्राबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ खालील एखाद्या समितीचा सदस्य किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ या खालील जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही सदस्यास, ज्या पदावर राज्य शासनाकडून नियुक्ती केली जाते अशा संस्थेच्या सभापतीचे किंवा सदस्याचे पद किंवा परिसमापकाचे पद किंवा निबंधकाची नामनिर्देशित व्यक्ती म्हणून पद धारण करणा-या कोणत्याही व्यक्तीस—मग अशी नेमणूक व्यक्तीशः केलेली असो किंवा नामनिर्देशित व्यक्तींच्या मंडळावर केलेली असो,—समितीच्या किंवा मंडळाच्या बैठकीस हजर राहण्यासाठी किंवा अशा पदांची इतर कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा व्यक्तिगत खर्च भागवण्यासाठी असे पद धारण करणा-या व्यक्तीस जे इतर भत्ते देण्यात येतात त्याच्याव्यतिरिक्त इतर कोणतेही पारिश्रमिक मिळण्याचा हक्क असणार नाही.]

१९५६ चा हैद्राबाद १८. १९६२ चा महा. ५.

विहित केलेल्या कमाल दराहून अधिक दराने प्रवासभत्ता, दैनिक भत्ता, वगैरे मिळण्याचा हक्क समितीच्या सदस्यांना नसणे.

[2] [**१६०-ख.** कलम १६० ख च्या तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही संस्थेच्या समितीच्या कोणत्याही सदस्यास, कोणत्याही संस्थेच्या समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी किंवा समितीचे सदस्य म्हणून इतर कोणतीही कामे पार पाडण्यासाठी देण्यात येणारा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा असे इतर भत्ते किंवा फी याबाबत विहित केलेल्या कमाल दराहून अधिक दराने भत्ते किंवा फी त्या संस्थेकडून मिळण्याचा हक्क असणार नाही आणि निरनिराळ्या सहकारी संस्थांसाठी किंवा संस्थांच्या वर्गासाठी किंवा निरनिराळ्या प्रयोजनांसाठी निरनिराळे कमाल दर विहित करता येतील.]

---

[1] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ६ अन्वये कलम १६०-क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २३ अन्वये कलम १६०-ख समाविष्ट करण्यात आले.

[1][१६१. निबंधक, निबंधकाच्या अधिकारांचा वापर करणारी व्यक्ती, कलम २ च्या खंड (२०) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला अधिकारी अथवा कलम २१ क च्या पोटकलम (२) खाली शासकीय अभिहस्तांकिती म्हणून किंवा कलम ७७क किंवा ७८ खाली प्रशासक म्हणून नेमण्यात आलेली एखादी व्यक्ती किंवा कलम ८० च्या पोटकलम (३) खाली संस्थेची पुस्तके, अभिलेख किंवा निधी सक्तीने ताब्यात घेण्यास किंवा कलम ८१ खाली एखाद्या संस्थेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यास किंवा कलम ८३ खाली रीतसर चौकशी करण्यास किंवा कलम ८४ किंवा ८९ क खाली निरीक्षण करण्यास किंवा कलम ८८ खाली
१८६० आदेश काढण्यास प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती अथवा कलम ९१-क खाली सहकारी अपील
चा ४५. न्यायालयाच्या किंवा कलम १४९ खाली सहकारी अपील न्यायालयाचा सदस्य म्हणून किंवा कलम १०३ खाली परिसमापक म्हणून नेमण्यात आलेली व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.] निबंधक आणि इतर अधिकारी लोकसेवक असणे.

१६२. निबंधकाने किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा त्याने दिलेल्या प्राधिकारानुसार काम करणा-या व्यक्तीने या अधिनियमानुसार किंवा तदन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल निबंधकाविरूद्ध कोणताही वाद, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल हानिरक्षण.

१६३. (१) या अधिनियमात स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याखेरीज, कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयास पुढील बाबतीत कोणतीही अधिकारिता असणार नाही,— न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध.

(क) संस्थेची किंवा तिच्या उपविधीची नोंदणी किंवा तिच्या उपविधींची सुधारणा किंवा संस्थेच्या समितीचे विसर्जन किंवा संस्थेचे विसर्जन झाल्यानंतर तिचे व्यवस्थापन; किंवा

(ख) [2][सहकारी न्यायालयाकडे] निर्णयासाठी निर्देशित करणे आवश्यक असलेला कोणताही विवाद; किंवा

(ग) संस्थेच्या समापनाशी व तिच्या विसर्जनाशी संबंधित कोणतीही बाब.

(२) संस्थेचे समापन होत असताना, निबंधकाच्या परवानगीशिवाय आणि तो लादील अशा अटींना अधीन राहून, संस्था किंवा तिचा कोणताही सदस्य यांच्याविरूद्ध किंवा संस्थेच्या कामकाजाशी संबंध असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत कोणताही वाद किंवा इतर कायदेशीर कार्यवाही पुढे चालविता येणार नाही किंवा दाखल करून घेतली जाणार नाही.

(३) हा अधिनियम किंवा नियम यानुसार देण्यात आलेले सर्व आदेश, निर्णय किंवा निवाडे हे या अधिनियमातील अपील किंवा पुनरीक्षण याविषयीच्या तरतुदींना अधीन राहून, अंतिम असतील आणि [3][* * *] गुणावगुणांवरून किंवा कोणत्याही इतर कारणावरून असा कोणताही आदेश, निर्णय किंवा निवाडा, त्यावर, कोणत्याही न्यायालयात हरकत घ्यावयास, तो रद्द करावयास, त्यात फेरबदल करावयास, त्याची फेरतपासणी करावयास किंवा तो निरर्थक ठरविला जाण्यास पात्र असणार नाही.

१६४. संस्थेविरूद्ध किंवा तिच्या कोणत्याही अधिका-याविरूद्ध, अशा संस्थेच्या कामकाजाशी संबंध असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणताही वाद, त्याबाबत एक लेखी नोटीस निबंधकाच्या स्वाधीन केल्यानंतर किंवा त्यांच्या कार्यालयात दिल्यानंतर दोन महिन्यांची मुदत संपेपर्यंत दाखल करता येणार वादाच्या बाबतीत नोटीस आवश्यक.

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६७ अन्वये कलम १६१ बदली दाखल करण्यात आले.

[2] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १५ अन्वये " निबंधक किंवा सहकारी न्यायालय यांच्याकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २५ अन्वये " क्षेत्राधिकाराच्या अभावी असेल त्याव्यतिरिक्त " हा मजकूर दाखल करण्यात आला.

नाहीं. अशा नोटिशीत वादाचे कारण, वादीचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण व तो मागत असलेला अनुतोष या गोष्टी नमूद करणे आणि वादपत्रात अशी नोटीस अशा रीतीने स्वाधीन करण्यास किंवा देण्यात आली आहे या अर्थाचे निवेदन असणे आवश्यक आहे.

नियम. **१६५.** (१) राज्य शासनास संपूर्ण राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी व कोणत्याही संस्थेसाठी किंवा संस्थांच्या वर्गासाठी, अशी संस्था किंवा संस्थांचे वर्ग यांचे कामकाज चालवणे व त्यांचे नियमन करणे यांसाठी आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सामान्यतेस बाध न येऊ देता, अशा नियमात पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल. :—

[1] [(एक) कलम ३ च्या तरतुदींना अधीन राहून, निबंधकाकडे निहित असलेल्या अधिकारांचा जे अधिकारी वापर करतील त्याचे पदनाम विहित करणे ; ]

(दोन) कलम ८ अन्वये संस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज करताना वापरावयाचा नमुना व पालन करावयाच्या शर्ती आणि अशा अर्जाच्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

(तीन) ज्या बाबतीत संस्थेस उपविधी करता येतील किंवा उपविधी करण्यासाठी निबंधकास संस्थेला आदेश देता येईल, त्या बाबी आणि उपविधी तयार करताना, त्यात फेरफार करताना व त्याचे निराकरण करताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि अशा रीतीने उपविधी तयार करण्यापूर्वी, त्यात फेरफार करण्यापूर्वी किंवा त्यांचे निराकरण करण्यापूर्वी पूर्तता करावयाच्या शर्ती विहित करणे ;

(चार) संस्थेच्या नावात किंवा दायित्वात बदल करणे, तिचे एकत्रीकण, हस्तांतरण, विभागणी, रूपांतर किंवा तिची पुनर्रचना यांसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती व पाळावयाच्या शर्ती विहित करणे ;

(पाच) कलम १९ अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना व त्याबाबतची कार्यपद्धती आणि त्या कलमान्वये संस्थेची पुनर्रचना करण्याची कार्यपद्धती विहित करणे ;

[2] [(पाच-क) शासकीय अभिहस्तांकिती, कलम २१ क (३) याखाली ज्या शर्तींना अधीन राहून मत्तेचे रोखीत रुपांतर करील आणि दायित्वांचे परिसमापन करील, त्या शर्ती विहित करणे ;

(पाच-ख) जाहीर नोटीस देण्याची पद्धती आणि कलम २१ क (१) आणि २१ क (४) खाली शासकीय अभिहस्तांकितीला द्यावयाचे पारिश्रमिक व भत्ते विहित करणे ;

(पाच-ग) कलम २३ (१क) खाली अर्जाचा नमुना विहित करणे ;]

[3] [(पाच-घ) कोणत्याही संस्थेत किंवा संस्थांना कोणताही धंदा चालवण्यासाठी कोणत्याही शासकीय उपक्रमाशी किंवा शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही उपक्रमाशी सहयोग करण्याकरिता पद्धती विहित करणे ; ]

(सहा) सदस्य म्हणून प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करणा-या किंवा प्रवेश मिळालेल्या व्यक्तीने पालन करावयाच्या शर्ती विहित करणे आणि सदस्याची निवडणूक व प्रवेश यांसाठी आणि सदस्यत्वाच्या हक्काचा वापर करण्यापूर्वी द्यावयाची रक्कम व संपादन करण्यात येणारे हितसंबंध यासाठी तरतूद करणे ;

(सात) संघीय संस्था किंवा संघीय संस्थांचा वर्ग यांच्या बाबतीत अशा संस्थेतील किंवा संस्थांच्या वर्गातील सदस्य व्यक्तीचे सदस्य संस्थेशी असावयाचे प्रमाण आणि अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या समितीतील सदस्य व्यक्तींचे सदस्य संस्थांशी असावयाचे प्रमाण विहित करणे ;

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३२ (अ) अन्वये खंड (एक) बदली दाखल करण्यात आला.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६८ (अ) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३२ अन्वये खंड (पाच-घ) समाविष्ट करण्यात आला.

(आठ) कलम २८ च्या तरतुदींना अधीन राहून, एखाद्या सदस्यास धारण करता येतील, अशा संस्थेच्या भागांची कमाल संख्या किंवा संस्थेच्या भांडवलातील असा कमाल हिस्सा विहित करणे ;

(नऊ) संयुक्त सदस्य, अविभक्त अशा संयुक्त हिंदू कुटुंबातील सदस्य आणि मृत सदस्याच्या भागाचा अथवा हितसंबंधाचा वारसा मिळवणारी अज्ञान आणि विकलमनस्क व्यक्ती यांना प्रवेश देण्यासाठी कार्यपद्धती विहित करणे आणि त्यांचे हक्क व दायित्व यांसाठी तरतूद करणे ;

(दहा) सदस्यांनी आपले सदस्यत्व परत घेणे, त्यांना सदस्यत्वावरून दूर करणे व त्यांची सदस्यत्वावरून हकालपट्टी करणे यांकरिता आणि त्यांना रकमा देण्याकरिता आणि माजी सदस्यांची आणि मृत सदस्यांच्या संपदेची दायित्वे यांकरिता तरतूद करणे ;

(अकरा) भाग किंवा हितसंबंध यांच्या हस्तांतरणाच्या शर्ती व कार्यपद्धती विहित करणे ;

(बारा) जिला मृत सदस्याचा भाग किंवा हितसंबंध देता किंवा हस्तांतरित करता येईल अशा व्यक्तीचे नामनिर्देशन करण्याची तरतूद करणे ;

(तेरा) माजी सदस्य किंवा मृत सदस्य यांचा भाग किंवा हितसंबंध यांचे मूल्य ठरवण्यासाठी तरतूद करणे ;

(चौदा) कर्जासाठी अर्ज करणाऱ्या सदस्यांनी द्यावयाच्या रकमा आणि पाळावयाच्या शर्ती, ज्या मुदतीसाठी कर्जे देण्यात येतील अशी मुदत आणि प्रत्येक सदस्य व्यक्तीस जी रक्कम कर्जाऊ देता येईल, ती रक्कम विहित करणे ;

(पंधरा) निबंधकाच्या कार्यालयातील दस्तऐवजांचे निरीक्षण आणि त्यांच्या प्रमाणित प्रती देण्यासाठी आकारावयाची फी यांसाठी तरतूद करणे ;

(सोळा) संस्थेच्या पत्त्याची आणि त्यात झालेल्या बदलाची नोंद करण्याविषयीच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे ;

(सतरा) सदस्यांची नोंदवही आणि जेथे सदस्यांचे दायित्व हे भागांनी मर्यादित असेल, तेथे भागांची नोंदवही व सदस्यांची यादी तयार करणे व ती ठेवणे यांसाठी तरतूद करणे ;

(अठरा) भागाचे अधिमूल्यन होणार नाही आणि संस्थेस जरूरीप्रमाणे आवश्यक ते भांडवल उपलब्ध होईल याची ज्या रीतीने खात्री करून घेणे आवश्यक असेल, त्या रीतीने कोणत्याही संस्थेच्या भाग भांडवलात फेरफार करून घेण्यासाठी तरतूद करणे ;

(एकोणीस) मर्यादित दायित्व असलेल्या संस्थेने आपले भाग भांडवल कमी करण्यासाठी स्वीकारावयाच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे ;

(वीस) ज्या मुदतीसाठी आणि ज्या अटींवर संस्थांना सरकारी मदत देता येईल ती मुदत व त्या अटी आणि ज्या अटींनुसार राज्य शासन संस्थांच्या भाग भांडवलास अंशदान देईल आणि संस्थांनी काढलेल्या ऋणपत्राचे मुद्दल आणि त्यावरील व्याज देण्याबाबत हमी देईल, त्या अटी विहित करणे ;

(एकवीस) संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास, भाग किंवा ऋणपत्रे याद्वारे किंवा अन्यथा ज्या रीतीने निधी उभारता येईल, ती रीत आणि अशाप्रकारे उभारलेल्या निधीचे प्रमाण यांचे नियमन करणे ;

(बावीस) निरनिराळ्या प्रकारच्या तारणांवर किंवा तारणाशिवाय संस्थेने किंवा संस्थांच्या वर्गाने द्यावयाच्या कर्जाची मर्यादा आणि कर्ज देण्याची कार्यपद्धती विहित करणे ;

(तेवीस) कर्जे परत मागण्याची रीत विहित करणे ;

(चोवीस) पतेतर संस्थेने किंवा पतेतर संस्थांच्या वर्गांनी पतमूल्यांवर द्यावयाच्या कर्जाची मर्यादा विहित करणे ;

(पंचवीस) ज्या प्रतिबंधांना व निर्बंधांना अधीन राहून संस्थांना सदस्य नसलेल्या व्यक्तीशी व्यापार किंवा व्यवहार करता येईल, ते प्रतिबंध व निर्बंध विहित करणे ;

(सव्वीस) संस्थेच्या नावे असलेल्या कोणत्याही माराची पूर्तता ज्या शर्तीवर करण्यात येईल, त्या शर्ती आणि ज्या मर्यादेपर्यंत आणि ज्या क्रमानुसार असा भार असलेली संपत्ती भाराच्या पूर्ततेसाठी उपयोगात आणली जाईल, ती मर्यादा आणि तो क्रम विहित करणे ;

(सत्तावीस) कलम ४८ अन्वये भारासंबंधीची वाजवी नोटीस देण्याची तरतूद करणे ;

(अठ्ठावीस) संस्था ज्या पद्धतीने बुडीत ऋणांची गणना करील व ती निर्लेखित करील, ती कार्यपद्धती विहित करणे ;

[1] [(एकोणतीस) संस्था ज्या पद्धतीने आपली वार्षिक वित्तीय विवरणे तयार करील, ती पद्धती आणि कलम ६५ खाली संस्था आपल्या निव्वळ लाभांचा ज्या प्रयोजनासाठी विनियोग करील, ती इतर प्रयोजने ; ]

(तीस) राखीव निधी उभारणे आणि तो ठेवणे आणि ज्या उद्दिष्टांसाठी असा निधी उपयोजित करण्यात येईल ती उद्दिष्टे आणि संस्थेच्या नियंत्रणाखाली असलेला राखीव निधी धरून कोणताही निधी गुंतवणे व त्याचा उपयोग करणे, यांकरिता तरतूद करणे ;

(एकतीस) ज्या शर्तीनुसार संस्थेचे सदस्य व सदस्येतर व्यक्ती यांच्यामध्ये लाभांश आणि अधिलाभांश म्हणून नफा वाटण्यात येईल त्या शर्ती विहित करणे ;

(बत्तीस) कलम ६८ अन्वये राज्य संघीय संस्थेच्या शिक्षण निधीस संस्था ज्या दराने अंशदान देईल तो दर विहित करणे ;

[2] [(बत्तीस-क) संस्था (इतर निगम निकाय धरून) कलम ६९-क अन्वये ज्या दराने किंवा दरांनी आणि ज्या रीतीने सहकारी राज्य संवर्ग सेवायोजन निधीस अंशदान देतील तो दर किंवा ते दर किंवा ती रीत विहित करणे ; ]

(तेहत्तीस) ज्या सहकारी प्रयोजनासाठी संस्था कलम ६९ अन्वये आपला निधी उपयोगात आणील ती सहकारी प्रयोजने निश्चित करणे ;

(चौतीस) कलम ७० अन्वये संस्थेचा निधी गुंतवण्याची पद्धती आणि कोणत्याही रोख्यात किंवा रोख्यांच्या वर्गात गुंतवण्याच्या रकमेचे प्रमाण विहित करणे ;

(पस्तीस) संस्थेने नेमलेल्या अधिका-यांच्या आणि कर्मचा-यांच्या फायद्यासाठी संस्थेकडून स्थापन करण्यात येणा-या कोणत्याही भविष्य निर्वाह निधीस अंशदान देणे आणि अशा भविष्य निर्वाह निधीच्या प्रशासनासाठी तरतूद करणे ;

[3] [(पस्तीस-क) कलम ७३-१ ग (१) खाली अधिसूचित संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यपद्धती विहित करणे ;

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६८ (ब) अन्वये खंड (एकोणतीस) बदली दाखल करण्यात आला.

[2] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ४ अन्वये खंड (बत्तीस-क) समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६८ (क) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

(पस्तीस-ख) कलम ७३-१ ग (२) खाली निबंधकाने अधिसूचित संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी करण्यात आलेला खर्च वसूल करण्याची पद्धती विहित करणे ;

(पस्तीस-ग) कलम ७३-१ घ अन्वये ज्या नमुन्यात आणि ज्या पद्धतीने अविश्वासाचा ठराव आणता येऊ शकेल, ती पद्धती विहित करणे;

(पस्तीस-घ) कलम ७३ ख ख (१) खाली निवडीद्वारे किंवा कर्मचा-यांनी घेतलेल्या निवडणुकीद्वारे कर्मचा-यांसाठी राखून ठेवलेल्या जागा भरण्याची पद्धती विहित करणे ;

(पस्तीस-ङ) कलम ७४ (२) खाली, खाली नेमणूक करण्याकरिता असलेल्या नामिकेवर व्यक्तीची निवड करण्याकरिता व्यक्तींचे मंडळ विहित करणे ; ]

(छत्तीस) या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा संघीय संस्थेने वापर करण्याची कार्यपद्धती व शर्ती विहित करणे ;

(सदतीस) सदस्यांच्या सर्वसाधारण बैठकी, अशा बैठकीतील कार्यपद्धती आणि अशा बैठकींनी वापर करावयाच्या अधिकारांसाठी तरतूद करणे ;

(अडतीस) ज्या शर्तीनुसार संस्थेच्या सदस्यास मतदानास अपात्र ठरविता येईल त्या शर्ती विहित करणे;

(एकोणचाळीस) [१] [समितीला किंवा तिच्या सदस्यांना ] आणि इतर अधिका-यांना [१] [काढून टाकणे आणि त्यांची नेमणूक करणे ] यासाठी आणि कलम ७८ अन्वये प्रशासकाच्या नेमणुकीबाबत तरतूद करणे, तसेच समितीच्या बैठकीतील कार्यपद्धती व समितीने, प्रशासकाने व इतर अधिका-याने वापरावयाचे अधिकार आणि त्यांनी पार पाडावयाची कर्तव्ये विहित करणे ;

(चाळीस) समितीचा सदस्य, संस्थेचे किंवा संस्थांच्या वर्गाचे कर्मचारी यांकरिता लागणारी अर्हता [२] [अशा सदस्यांनी पार पाडावयाची कर्तव्ये आणि त्याबद्दलची त्यांची पृथक व संयुक्त दायित्वे ] आणि ज्या सेवा शर्तींना अधीन राहून संस्थांना कर्मचा-यांची नेमणूक करता येईल, त्या सेवाशर्ती विहित करणे;

[३] [(चाळीस-क) संस्थेची रोकड, रोखे किंवा मालमत्ता ज्यांना हाताळावी लागत असेल अशी कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या कोणत्याही अधिका-याने किंवा कर्मचा-याने द्यावयाच्या प्रतिभूतीची रक्कम आणि तिचे स्वरुप, कोणत्याही अधिका-याने किंवा कर्मचा-याने एका वेळी जी कमाल रक्कम हाताळावी किंवा जवळ ठेवावी ती कमाल रक्कम आणि ज्या रकमेपेक्षा अधिक रक्कम, सर्व देणी संस्थेने किंवा संस्थेच्या वतीने धनादेशाद्वारे दिली पाहिजेत, ती रक्कम विहित करणे ; ]

(एकेचाळीस) संस्थेने निबंधकास सादर करावयाची विवरणे विहित करणे आणि ज्या व्यक्तींकडून व ज्या नमुन्यात अशी विवरणे सादर करण्यात येतील, अशा व्यक्तींची व नमुन्यांची तरतूद करणे;

(बेचाळीस) ज्या व्यक्तींकडून व ज्या नमुन्यात संस्थांच्या दस्तऐवजांच्या प्रती आणि पुस्तकांतील नोंदी प्रमाणित करण्यात येतील त्या व्यक्ती आणि नमुना आणि त्यांच्या प्रती पुरवण्यासाठी बसवावयाचे आकार यांसाठी तरतूद करणे ;

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३२ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३२ (क) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २६ अन्वये खंड (चाळीस-क) समाविष्ट करण्यात आला.

(त्रेचाळीस) एखादा संस्थेची किंवा जिच्या सभासदांचा निबंधकाने किंवा त्यासाठी पात्र असलेल्या व्यक्तीने आदेश दिला असेल अशा संस्थेची पुस्तके, दस्तऐवज, रोखे, रोख रकमा आणि इतर मालमत्ता यांचा ताबा घेण्याच्या कामात प्रतिबंध किंवा अडथळा करण्यात येईल तेव्हा निबंधकाने अंगीकारावयाच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे ;

(चौरेचाळीस) ज्या प्रकरणात निधीचो अफरातफर, विश्वासघात किंवा लबाडी करण्यात आली असेल किंवा पुस्तके, दस्तऐवज, रोखे, रोख रकमा आणि इतर मालमत्ता यांत अनधिकृत फिरवाफिरव करण्याचा किंवा ती नष्ट करण्याचा किंवा हलविण्यात येण्याचा संभव असल्याचा संशय किंवा धास्ती असेल अशा बाबतीत, कलमे ८१, ८३ आणि ८४ यानुसार काम पाहणाऱ्या व्यक्तीने संस्थेची पुस्तके, दस्तऐवज, रोखे, रोख रकमा आणि इतर मालमत्ता ताब्यात घेताना अंगीकारावयाच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे ;

(पंचेचाळीस) संस्था किंवा संस्थांचा वर्ग यांनी ठेवावयाचे लेखे व पुस्तके विहित करणे ;

(शेचाळीस) लेखापरीक्षा करावयाची कार्यपद्धती, लेखापरीक्षक ज्या बाबींवर अहवाल सादर करील त्या बाबी, त्याच्या लेखापरीक्षेसाठी ज्या नमुन्यात लेख्यांचे विवरण तयार करावयाचे तो नमुना, ज्या मर्यादेपर्यंत लेखापरीक्षकास संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करता येईल ती मर्यादा, लेखापरीक्षा ज्ञापन आणि अहवाल यांचा नमुना आणि संस्थने लेखापरीक्षेसाठी द्यावयाचा काही आकार असल्यास, तो आकार विहित करणे ;

(सत्तेचाळीस) कलम ८१ अन्वये लेखापरीक्षकांची नेमणूक करण्याकरिता कार्यपद्धती विहित करणे ,

(अठ्ठेचाळीस) लेखापरीक्षा, निरीक्षण किंवा चौकशी करीत असताना उघडकीस आलेल्या दोषांची दुरुस्ती करण्यासाठी नमुना विहित करणे ; १९७४ चा महा. ३.

(एकोणपन्नास) कलम ८३ खालील चौकशी आणि कलम ८४ खालील निरीक्षण यासाठीची कार्यपद्धती आणि तत्त्व विहित करणे ;

(पन्नास) चौकशी आणि निरीक्षण यांचा खर्च संविभाजित करण्यासाठी आणि कलम ८८ अन्वये अपचारी प्रवर्तकांविरुद्ध नुकसानभरपाई निर्धारित करण्यासाठी आणि खर्च व नुकसानभरपाई यांच्या वसुलीसाठी कार्यपद्धती विहित करणे ;

(एकावन्न) कलम ९० अन्वये रचना केलेल्या प्राधिकरणाकडून ज्या रीतीने नेमणूक केली जाईल आणि नियंत्रण ठेवले जाईल ती रीत, अशा प्राधिकरणात समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींची संख्या, आणि त्याने पार पाडावयाची कामे, अशा व्यक्तीची निवड व नामनिर्देशन करण्याची रीत, अशा प्राधिकरणास द्यावयाची फी, आणि ती द्यावयाची रीत आणि या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये आकारणे आवश्यक असलेल्या कोणत्याही खर्चाची, आकाराची किंवा व्ययाची गणना करण्याची कार्यपद्धती व रीत विहित करणे ;

१९७४ चा महा. ३. १[(बावन्न) सहकारी न्यायालये ज्या सदस्यांची मिळून बनतील त्या सदस्यांच्या अर्हता विहित करणे, त्यांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती यासंबंधी तरतूद करणे, २[सहकारी न्यायालयासमोरील] कामकाजात अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ; ३[दिलेल्या किंवा द्यावयाच्या सेवा किंवा त्यासाठी उभारावयाच्या यंत्रणेसाठी झालेला किंवा होण्याची शक्यता असलेला कोणताही खर्च विचारात घेऊन (कामकाजातील पक्षकारांनी केलेला खर्च धरून) विवादांचा निर्णय करण्यासाठी योग्य ती फी व खर्च निश्चित करणे, तो बसविणे व गोळा करणे यांसाठी तरतूद करणे, अशा कोणत्याही फीचे व खर्चाचे (आणि महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९७३ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी प्रलंबित असतील अशा किंवा त्यानंतर पाठवण्यात आलेल्या किंवा दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही विवादासंबंधात व इतर कामकाजासंबंधात लागू असलेल्या सर्व फीचे व खर्चाचे) प्रमाण निश्चित करण्याचा अधिकार निबंधकाकडे प्रत्यायोजित करण्याबाबत तरतूद करणे, ही फी व खर्च न्यायालय शुल्क मुद्रांकाच्या स्वरुपात रोख रकमेत किंवा इतर कोणत्याही रीतीने देण्याच्या पद्धतीबाबत तरतूद करणे व अशा कामकाजातील निर्णय, निवाडा किंवा आदेश यांच्या अंमलबजावणीबाबत तरतूद करणे] ; ]

(त्रेपन्न) ४[सहकारी न्यायालयाकडे] वाद ज्या नमुन्यात निर्देशित करण्यात येईल तो नमुना विहित करणे ;

(चौपन्न) आदेशिका काढणे आणि बजावणे आणि आदेशिकांची बजावणी सिद्ध करण्यासाठी तरतूद करणे ;

(पंचावन्न) ५[कलम ९५ अन्वये] आणलेल्या कोणत्याही जप्तीविरुद्ध दाखल करण्यात येतील त्या दाव्यांची व हरकतींची सूक्ष्म तपासणी करण्याची तरतूद करणे ;

---

१ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४६ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी खंड (बावन्न) दाखल करण्यात आला.

२ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १६ अन्वये "निबंधक आणि सहाकारी न्यायालये" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात करण्यात आले.

३ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम २ द्वारे "आणि विवादाचा निर्णय करण्यासाठी" या शब्दाने सुरु होणा-या आणि "यासाठी तरतूद करणे" या शब्दांनी संपणा-या मजकुराऐवजी दि. २१ फेब्रुवारी १९७४ पासून हा मजकूर समाविष्ट करण्यात आला असे समजण्यात येईल.

४ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ दुसरी अनुसूची अन्वये, "निबंधकाकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३२ (ड) अन्वये रजिस्ट्रारने या शब्दाऐवजी हे शब्द व ही संख्या दाखल करण्यात आली.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :— विवादांच्या निर्णय संबंधात विद्यमान नियम ८६ व तदन्वये दिलेल्या आदेशात घालून दिलेल्या प्रमाणानुसार फी व खर्च आकारणे व त्यांच्या आकारणीची गोष्ट ही विधीग्राह्य असणे.

" ३. मुख्य अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम किंवा दिलेले आदेश किंवा या नियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये दिलेले आदेश किंवा कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने दिलेला कोणताही न्यायनिर्णय, निर्णय, हुकूमनामा, निवाडा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने, १ मार्च १९७५ पासून मुख्य अधिनियमाच्या कलम १६५, पोट-कलम (२), खंड (बावन्न) अन्वये केलेले किंवा केले असल्याचे अभिप्रेत असलेले महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ यामधील नियम ८६ व उक्त नियमान्वये निबंधकाने वेळोवेळी दिलेले किंवा दिले असल्याचे अभिप्रेत असलेले आदेश हे, या अधिनियमाद्वारे सुधारलेल्या उक्त कलमान्वये अधिकारानुसार यथोचितरीत्या व कायदेशीररीत्या केले असल्याचे किंवा (आदेश) दिले असल्याचे मानण्यात येईल व ते, सक्षम प्राधिकाऱ्याकडून यथोचितरित्या निरसित करण्यात येईपर्यंत किंवा त्यात सुधारणा करण्यात येईपर्यंत त्याच स्वरूपात अंमलात राहतील आणि तद्नुसार, विवादांचा आणि इतर कामकाजांचा निर्णय करण्यासाठी निबंधकास किंवा सहकारी न्यायालयास देण्यात यावयाचा खर्च व फी विहित करण्यासाठी आणि ती फी व खर्च महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९७३ च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी प्रलंबित असणा-या व सहकारी न्यायालयाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या इतर विवादांना आणि कामकाजांना लागू करण्यासाठी निबंधकाने केलेली कोणतीही कृती आणि आकारण्यात आलेली आणि वसूल केलेली फी किंवा न्यायालय फीच्या रोख रकमेच्या किंवा इतर स्वरुपात बसवलेली आणि वसूल केलेली फी ही कायदेशीर समजण्यात येईल. कोणत्याही विवादात किंवा इतर कामकाजात निश्चित केलेली, बसवलेली आणि वसूल केलेली फी आणि खर्च यांच्याबाबतीत अशी फी किंवा खर्च निश्चित करण्याचा किंवा बसविण्याचा कोणताही प्राधिकार नाही किंवा कोणत्याही निलंबित कामकाजात, अशी फी किंवा खर्च बसविण्यायोग्य नव्हता किंवा नाही किंवा अशी फी न्यायालय शुल्क मुद्रांकाच्या स्वरुपात बसविणे किंवा वसूल करणे शक्य नाही याच केवळ कारणांवरून किंवा अशा इतर कारणांवरून कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात आक्षेप घेता येणार नाही."

सन १९७४ चा महा. ३.

(छपन्न) या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये देय असलेल्या कोणत्याही रकमा वसूल करण्यासाठी कार्यपद्धती आणि रीत विहित करणे ;

(सत्तावन्न) कलम ९५ अन्वये जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेच्या अभिरक्षेसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

(अठ्ठावन्न) निवाडे अंमलात आणताना अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

(एकोणसाठ) कलम १०० अन्वये ज्या रीतीने कोणतीही मालमत्ता संस्थेच्या स्वाधीन करण्यात येईल ती रीत आणि ज्या अटींना आणि शर्तींना अधीन राहून संस्थेकडून अशी मालमत्ता धारण करण्यात येईल त्या अटी व शर्ती विहित करणे ;

(साठ) अंमलबजावणीची कार्यवाही करताना, एखाद्या व्यक्तीने दिलेल्या कोणत्याही तारणाची रक्कम वसूल करण्यासाठी मालमत्तेची जप्ती व विक्री करण्याकरिता कार्यपद्धती विहित करणे ;

(एकसष्ट) कलम १०५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्याकरिता कार्यपद्धती आणि शर्ती आणि परिसमापकाने अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे आणि अतिरिक्त मत्तेचा विनियोग करण्यासाठी तरतूद करणे ;

(बासष्ट) कलम १०३ अन्वये नेमण्यात आलेल्या परिसमापकाच्या आदेशावर ज्या बाबतीत अपील करता येईल त्या बाबी विहित करणे ;

(त्रेसष्ट) ज्या संस्थेस प्रकरण ११ लागू आहे त्या संस्थेने ऋणपत्रे विक्रीस काढणे, त्याचे विमोचन करणे, ती पुन्हा काढणे, त्यांचे हस्तांतरण, पुनःस्थापन किंवा रुपांतर करणे यांसाठी कार्यपद्धती व शर्ती विहित करणे ;

(चौसष्ट) ज्या संस्थेस प्रकरण ११ लागू आहे त्या संस्थेने काढलेल्या ऋणपत्रांच्या मुद्दलाची जास्तीत जास्त रक्कम, व्याजाचा दर आणि अशा ऋणपत्रांच्या हमीसाठी इतर शर्ती विहित करणे ;

(पासष्ट) कलम १३३ अन्वये विक्रीचे काम करणा-या अधिका-यांची अर्हता आणि त्याच्या नेमणुकीच्या पद्धती विहित करणे, व असा अधिकारी ज्या अधिकारांचा वापर करील ते अधिकार आणि तो जी कार्ये पार पाडील ती कार्ये विहित करणे ;

(सहासष्ट) कलम १३४ अन्वये विक्रीकरिता असलेल्या गहाण मालमत्तेतील उत्पन्न आणि प्राप्ती स्वीकारण्यासाठी धारकाची नेमणूक करण्याकरिता तरतूद करणे व ज्या शर्तींवर त्यास नेमता येईल किंवा काढून टाकता येईल त्या शर्ती, त्यास ज्या अधिकारांचा वापर करता येईल ते अधिकार व जी कार्ये पार पाडता येतील ती कार्ये, आणि व्यवस्थापनाचा खर्च आणि त्यास घेता येईल असे पारिश्रमिक विहित करणे ;

(सदुसष्ट) [१][कृषि आणि ग्रामीण विकास बँकेस] गहाणकाराविरूद्ध कलम १३३ (२) अन्वये ज्या परिस्थितीत कारवाई करता येईल ती परिस्थिती विहित करणे ;

(अडुसष्ट) प्रकरण ११ अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत पुढील गोष्टी विहित करणे :—

(क) विक्रीची उद्घोषणा आणि विक्री करण्याची कार्यपद्धती आणि ज्या शर्तींवर विक्रीचा प्रयत्न सोडून देता येईल त्या शर्ती ;

(ख) विक्री किंवा विक्रीचा प्रयत्न यास आनुषंगिक असलेल्या खर्चाची गणना करण्याची पद्धती ;

(ग) अनामत रक्कम स्वीकारणे आणि विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग करणे यासाठी कार्यपद्धती ;

(घ) विक्रीचा प्रयत्न सोडून दिल्यास किंवा खरेदीची किंमत विहित मुदतीत अनामत ठेवण्यात न आल्यास, पुन्हा विक्री करण्याची कार्यपद्धती आणि अशाप्रकारे खरेदीची किंमत अनामत ठेवण्यात जो खरेदीदार कसूर करील त्यावर बसवावयाची शास्ती ;

(ङ) [२][कृषि आणि ग्रामीण विकास बँकेने] कलम १३५ अन्वये, पैशाचा विनियोग करण्याच्या पद्धतीचा नमुना ;

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १८ (अ) अन्वये 'भू-विकास बँक ' या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १८ (ब) अन्वये 'भू-विकास बँक ' या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(च) कलम १३६ खालील विक्रीच्या प्रमाणपत्राचा नमुना ;

(छ) कलम १३६ अन्वये खरेदी केलेली मालमत्ता, न्यायालयाने खरेदीदारांच्या स्वाधीन करण्याच्या कार्यपद्धती ;

(ज) कलम १४३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोटिशीचा नमुना ; आणि

(झ) अशा नोटिसा बजावण्याची फी आणि त्या नोटिशीत नमूद केलेल्या जमीन मालकांवर नोटिसा बजावण्याची रीत आणि जमीन मालकांची फी त्यांच्याकडे पाठवण्याची रीत ;

(एकोणसत्तर) प्रकरण ११ अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीत [१] [कृषि आणि ग्रामीण विकास बँकेने ] खरेदी केलेल्या मालमत्तेचा त्या बँकेकडून ज्या कालावधीत व ज्या पद्धतीने विनियोग करण्यात येईल तो कालावधी व ती कार्यपद्धती विहित करणे ;

(सत्तर) अपिले सादर करण्यासाठी व ती निकालात काढण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

[२] [(एकाहत्तर) सहकारी अपील न्यायालयाच्या सदस्यांच्या अर्हता आणि त्यांचा पदावधी विहित करणे ; ]

(बहात्तर) राज्य शासनाकडे करण्यात यावयाच्या अपिलांच्या बाबतीत ज्या प्राधिका-यास अशा अपिलांच्या सुनावणीचा अधिकार सोपवता येईल तो प्राधिकारी विहित करणे ;

(त्र्याहत्तर) या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये जो आदेश, निर्णय किंवा निवाडा कळवणे किंवा प्रसिद्ध करणे आवश्यक असेल असा कोणताही आदेश, निर्णय किंवा निवाडा कळविण्याची किंवा प्रसिद्ध करण्याची पद्धती विहित करणे ;

(चौ-याहत्तर) या नियमांपैकी कोणत्याही नियमांचे उल्लंघन या अधिनियमान्वये अपराध असेल अशी तरतूद करणे ;

(पंच्याहत्तर) या अधिनियमान्वये स्पष्टपणे आवश्यक किंवा अनुमत असलेल्या व या नियमांद्वारे विहित करावयाच्या इतर सर्व बाबींची तरतूद करणे.

(३) या कलमान्वये प्रदान केलेला नियम करण्याचा अधिकार, पूर्वप्रसिद्धीनंतर नियम तयार करण्यात येण्याच्या शर्तीस अधीन आहे.

(४) या कलमान्वये केलेले नियम, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे कमीत कमी तीस दिवस इतक्या मुदतीसाठी ठेवण्यात येतील आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात विधानमंडळ त्यात जे फेरबदल करील त्या फेरबदलाच्या ते अधीन असतील.

१९२५ चा मुंबई ७. **१६६.** (१) महाराष्ट्र राज्यास लागू असलेला मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे : **निरसन, व्यावृत्ती व अर्थ लावणे.**

परंतु, या निरसनामुळे अशाप्रकारे निरसित केलेल्या अधिनियमाच्या पूर्वीच्या प्रवर्तनास बाधा येणार नाही आणि त्या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तद्नुसार केलेली किंवा केली असल्याचे मानण्यात येणारी कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली किंवा करण्यात आली असल्याचे मानण्यात येणारी कोणतीही कारवाई, (यात, केलेली कोणतीही नेमणूक किंवा केलेली कोणतीही सोपवणूक, दाखल केलेला कोणताही अर्ज किंवा इतर दस्तऐवज, देण्यात आलेले नोंदणीचे प्रमाणपत्र, केलेले करार, काढण्यात आलेली

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १८ (क) अन्वये 'भू-विकास बँक.' या शब्दाऐवजी हे शब्द दिनांक २०-६-१९८८ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४६ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

अधिसूचना, आदेश, निदेश किंवा नोटीस, तयार करण्यात आलेला विनियम नमुना किंवा उपविधी, केलेला किंवा केला असल्याचे समजण्यात येणारा नियम किंवा निबंधक, लवाद, परिसमापक किंवा न्यायधिकरण, किंवा इतर अधिकारी, प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्यापुढे दाखल केलेली कार्यवाही समाविष्ट असेल) ही या अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत नसेल तेथवर, ती या अधिनियमाच्या तत्सम तरतुदी अन्वये केल्याचे किंवा करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीने किंवा कारवाईने अधिक्रामित झाली नसल्यास आणि अधिक्रामित होईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

(२) याप्रमाणे, निरसित अधिनियमानुसार नोंदणी झालेल्या किंवा नोंदणी झाल्याचे मानल्या जाणा-या ज्या संस्थांची नोंदणी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी अंमलात असेल अशा सर्व संस्था, अशा प्रारंभानंतर, या अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या संस्था आहेत असे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी निरसित केलेल्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार कोणलाही निबंधक, लवाद, परिसमापक किंवा न्यायाधिकरण किंवा इतर अधिकारी, प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्यासमोर अनिर्णीत असलेल्या सर्व कार्यवाह्या आवश्यक असेल त्याबाबतीत, या अधिनियमाखालील निबंधक, लवाद, परिसमापक किंवा न्यायाधिकरण किंवा इतर तत्सम अधिकारी, प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्याकडे हस्तांतरित झालेल्या असतील आणि असा अधिकारी; प्राधिकारी किंवा व्यक्ती अस्तित्वात नसेल किंवा असा तत्सम अधिकारी, प्राधिकारी किंवा व्यक्ती याबाबत संशय असेल तर राज्य शासन नामनिर्देशित करील त्या अधिका-याकडे, प्राधिका-याकडे किंवा व्यक्तीकडे त्या हस्तांतरित झालेल्या असतील आणि असा अधिकारी, प्राधिकारी किंवा व्यक्ती यासमोर या अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्या चालू राहतील आणि निकालात काढण्यात येतील..

(३) त्यावेळी अंमलात असलेला कोणताही कायदा, लेख किंवा दस्तऐवज यामध्ये, निरसित अधिनियम किंवा त्याची कोणतीही तरतूद किंवा त्या अन्वयेची कोणतीही कामे ज्याच्याकडे सोपविली आहेत असा कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती याबाबतचा कोणताही निर्देश हा, आवश्यकतेनुसार, या अधिनियमाच्या किंवा त्याच्या संबंधित तरतुदींचा किंवा या अधिनियमान्वये काम करणारा तत्सम अधिकारी, प्राधिकारी किंवा व्यक्ती यासंबंधीचा निर्देश आहे असा त्याचा अर्थ लावण्यात यईल आणि निरसित अधिनियम किंवा लेख किंवा दस्तऐवज याखालील कामे ही, तत्सम अधिकारी, प्राधिकारी किंवा यथास्थिती व्यक्ती यांची कामे असतील व ती ते पार पाडतील.

कंपन्यांबाबतचा अधिनियम लागू नसणे.

**१६७.** शंकानिरसनार्थ याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, ह्या अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या किंवा नोंदणी झाल्याचे मानण्यात आलेल्या संस्थांना कंपन्याबाबतचा अधिनियम, १९५६ याच्या तरतुदी लागू असणार नाहीत.

१९५६ चा १.